MAMAR 1.6

# एम.ए.मराठी

## सत्र - I

## (राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार सुधारित अभ्यासक्रम)

# संशोधनशास्त्र

# (RESEARCH METHODOLOGY)

© UNIVERSITY OF MUMBAI


**प्राध्यापक रविंद्र द. कुलकर्णी**
कुलगुरू,
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**प्राचार्य डॉ. अजय भामरे**
प्र-कुलगुरु,
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**प्राध्यापक शिवाजी सरगर**
संचालक,
दूरस्थ आणि ऑनलाईन शिक्षण केंद्र,
मुंबई विद्यापीठ, मुंबई



**प्रकल्प समन्वयक** : **प्रा. अनिल आर. बनकर**
सहयोगी प्राध्यापक, इतिहास विभाग व
प्रमुख, मानव्यविद्याशाखा,
दूरस्थ आणि ऑनलाईन शिक्षण केंद्र,
मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**अभ्यास समन्वयक** : **डॉ. सीमा मुसळे**
सहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग,
दूरस्थ आणि ऑनलाईन शिक्षण केंद्र,
मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**संपादक** : **प्रा. डॉ. वंदना महाजन**
प्राध्यापक, मराठी विभाग,
रानडे भवन, विद्यानगरी परिसर, कलिना,
मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**लेखक** : **प्रा. डॉ. सूर्यकांत आजगांवकर**
प्राचार्य,
संदेश कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय,
विक्रोळी (पूर्व), मुंबई.

: **प्रा. डॉ. राजशेखर शिंदे**
प्राध्यापक, मराठी विभाग,
द भै फ दयानंद कला व शास्त्र महाविद्यालय,
सोलापूर.

: **डॉ. सारीपुत्र तुपेरे**
सहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग,
संगमेश्वर महाविद्यालय (स्वायत्त), सोलापूर



**नोव्हेंबर २०२४, मुद्रण - १, ISBN-978-93-6728-324-0**

**प्रकाशक** : संचालक, दूरस्थ आणि ऑनलाईन शिक्षण केंद्र,
मुंबई विद्यापीठ, विद्यानगरी, मुंबई -४०० ०९८.

**अक्षर जुळणी व मुद्रण** : मुंबई विद्यापीठ मुद्रणालय,
विद्यानगरी, सांताक्रुझ (पूर्व), मुंबई - ४०० ०९८

# अनुक्रमणिका


| अनु. क्र. | घटकाचे नाव | लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| **घटक १** | अ) संशोधन म्हणजे काय? स्वरूप आणि व्याप्ती.<br>आ) वैज्ञानिक, सामाजिक व साहित्यिक संशोधन साम्यभेद<br>इ) विद्यापीठीय संशोधन स्वरूप आणि वैशिष्ट्ये | प्रा. डॉ. सूर्यकांत आजगांवकर | १ |
| **घटक २** | अ) साहित्य संशोधन व साहित्य विचार<br>आ) साहित्य संशोधन व समीक्षा अनुबंध<br>इ) साहित्य संशोधन स्वरूप आणि वैशिष्ट्ये | प्रा. डॉ. सूर्यकांत आजगांवकर | ३० |
| **घटक ३** | अ) साहित्याच्या संशोधनपद्धती (ग्रंथकार, साहित्यप्रकार, साहित्यकृती, कालखंड अभ्यास)<br>आ) साहित्याच्या संशोधनपद्धती (साहित्य संशोधनभाषाशास्त्र व बोलींचा अभ्यास)<br>इ) साहित्याच्या संशोधनपद्धती (ग्रंथालयीन वाचनाचे संयोजन, ग्रंथसूचिशास्त्र व संशोधन साधने | प्रा. डॉ. राजशेखर शिंदे | ४४ |
| **घटक ४** | अ) शोधनिबंध लेखनपद्धती<br>आ) प्रकल्प अथवा प्रबंधिका लेखनपद्धती<br>इ) प्रबंधलेखन पद्धती | प्रा. डॉ. सारीपुत्र तुपेरे | ७०<br>८०<br>९२ |


✞✞✞✞

**Format of Syllabus**

**Programme Name : M.A.Marathi**

**Course Name : संशोधनशास्त्र**
**Research Methodology**
**Course code 50611**

**Total Credits : 04**

**Total Marks : 100**

**University assessment : 50**

**college assessment : 50**

## Course Objective

१) संशोधन या संकल्पनेचे स्वरूप आणि वैशिष्ट्ये यांचा अभ्यास करणे.
२) संशोधन पद्धतींचा अभ्यास करणे.
३) साहित्य संशोधनाचे महत्त्व जाणून घेणे.
४) साहित्य संशोधन पद्धतींच्या आधारे साहित्याचे संशोधन करणे.

## Course outcome

१) संशोधन या संकल्पनेचे स्वरूप आणि वैशिष्ट्ये यांचे आकलन होईल.
२) विविध संशोधन पद्धतींचे महत्त्व ज्ञात होईल.
३) साहित्य संशोधनाची व्याप्ती लक्षात येईल.
४) साहित्य संशोधन पद्धतींच्या आधारे साहित्याचे संशोधन करता येईल.

MODULE 1 : (श्रेयांकने २, व्याख्याने ३०)

घटक १
अ) संशोधन म्हणजे काय? स्वरूप आणि व्याप्ती.
आ) वैज्ञानिक, सामाजिक व साहित्यिक संशोधन साम्यभेद
इ) विद्यापीठीय संशोधन स्वरूप आणि वैशिष्ट्ये

घटक २
अ) साहित्यसंशोधन व साहित्यविचार
आ) साहित्यसंशोधन व समीक्षा अनुबंध
इ) साहित्य संशोधन स्वरूप आणि वैशिष्ट्ये

MODULE 2 : (श्रेयांकने २, व्याख्याने ३०)

घटक ३

अ) साहित्याच्या संशोधन पद्धती (ग्रंथकार, साहित्यप्रकार, साहित्यकृती, कालखंड अभ्यास)

आ) साहित्याच्या संशोधन पद्धती (साहित्यसंशोधन भाषाशास्त्र व बोलींचा अभ्यास)

इ) साहित्याच्या संशोधन पद्धती (ग्रंथालयीन वाचनाचे संयोजन, ग्रंथसूचिशास्त्र व संशोधनसाधने)

घटक ४

अ) शोधनिबंध लेखन पद्धती

आ) प्रकल्प अथवा प्रबंधिका लेखन पद्धती

इ) प्रबंध लेखन पद्धती

अ) अंतर्गत परीक्षा एकूण गुण ५०.

१) प्रकल्प : ४० गुण

२) मौखिक परीक्षा : १० गुण

आ) सत्रान्त परीक्षा-एकूण गुण ५०

१) घटक १ व २ यावर आधारित पर्यायासह १५ गुणांसाठी एक दीर्घोत्तरी प्रश्न.

२) घटक ३ व ४ यावर आधारित पर्यायासह १५ गुणांसाठी एक दीर्घोत्तरी प्रश्न.

३) घटक १, २, ३ व ४ यावर आधारित पर्यायासह २० गुणांसाठी चार (आठपैकी चार)टीपा.

संदर्भग्रंथ :


१) कन्हाडे, सदा, संशोधन : सिद्धान्त आणि पद्धती, लोकवाङ्मयगृह, मुंबई, १९९७.

२) चुनेकर, सु. रा. व इतर (संपा. ); संशोधन : स्वरूप आणि पद्धती, शिक्षण प्रसारक संस्था, संगमनेर, १९८३.

३) जोशी, वसंत व इतर (संपा.); भाषा व साहित्य संशोधन खंड १, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे, १९८१.

४) जोशी, वसंत व इतर (संपा.); भाषा व साहित्य संशोधन खंड २, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे, १९८५.

५) जोशी, वसंत व इतर (संपा.); भाषा व साहित्य : संशोधन खंड ३, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे, १९८९.

६) तुळपुळे, शं. गो.; प्राचीन मराठी कोरीवलेख, पुणे विद्यापीठ, पुणे, १९६३.

७) देशमुख, उषा मा.; मराठी संशोधनविद्या, स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस, पुणे.

८) बनहट्टी, श्री. ना. (संपा. ); ज्ञानदेवी - अध्याय १२, सुविचार प्रकाशन मंडळ, पुणे, १९६७.

९) मालशे, स. गं. शोधनिबंधाची लेखनपद्धती, सुविचार प्रकाशन, नागपूर, १९७५.

१०) संत, दु. का.; शोधविज्ञानकोश, अनाथ विद्यार्थी गृह प्रकाशन, पुणे, १९८५.

११) संत, दु. का.; संशोधन पद्धती, प्रक्रिया व अंतरंग, अनाथ विद्यार्थी गृह प्रकाशन, पुणे, १९६२.

१२) Whitney, F. L.; Elements of Research, Prentice- Hall, New York, 1954.

# १अ

## संशोधनशास्त्र

**घटक रचना :**

१अ.० उद्दिष्टे
१अ.१ प्रस्तावना
१अ.२ संशोधन म्हणजे काय?
१अ.३ संशोधनाची वैशिष्ट्ये
१अ.४ संशोधन स्तर
१अ.५ विद्यापीठीय संशोधन स्वरूप आणि वैशिष्ट्ये
१अ.६ विद्यापीठीय शोध पदव्यांचे स्वरूप
१अ.७ संदर्भ ग्रंथ सूची
१अ.८ सरावासाठी प्रश्न

### १अ.० उद्दिष्टे

१. संशोधन या संकल्पनेचे स्वरूप आणि वैशिष्ट्ये स्पष्ट करणे.
२. संशोधन पद्धतींचे स्वरूप आणि महत्त्व विशद करणे.
३. संशोधन पद्धतींमधील साम्य-भेदांची चर्चा करून त्यांचे वेगळेपण विशद करणे.
४. विद्यापीठीय संशोधनाचे स्वरूप व वैशिष्ट्ये स्पष्ट करणे.
५. साहित्य संशोधनाची व्याप्ती लक्षात आणून देणे.
६. साहित्य संशोधन व समीक्षा व्यवहार यांचे आंतरिक नाते उलगडणे.
७. साहित्य संशोधनाचे महत्त्व अधोरेखित करणे.

### १अ.१ प्रस्तावना

उच्च आणि विद्यापीठीय शिक्षणाचे स्वरूप प्रामुख्याने संशोधन प्रधान असावे, असे मत सर्वसमंत झाल्याने महाविद्यालय, विद्यापीठे, विविध शाखात संशोधनाचे शिक्षण देऊ लागली आहेत. त्यामुळे निरनिराळ्या विषयात महत्त्वाचे संशोधन होत आहे आणि होत राहणार आहे. तसेच काही महत्त्वाच्याविषयांमध्ये व महत्त्वाच्या क्षेत्रांमध्ये मूलभूत संशोधन होण्यासाठी स्वतंत्र संशोधन संस्था, विद्यापीठे स्थापन झालेली आहेत. इतके संशोधनाचे आणि संशोधन शास्त्राचे महत्त्व वाढले आहे. तसेच स्वतंत्र संशोधन संस्थाही सुरू आहेत. त्यामुळे संशोधनाला सर्वत्र भरपूर प्रमाणात प्रतिसाद लाभत आहे.

मुळात माणसाच्या ठिकाणी प्रबळ अशी जिज्ञासावृत्ती असल्याने तो जीवनाच्या अनेक अंगांचा सातत्याने शोध घेत असतो. अज्ञात गोष्टी ज्ञात करून घेण्याची मानवी प्रवृत्ती असल्याने त्यात सातत्य दिसून येते. आजचे युग हे संशोधनाचे युग आहे. त्यामुळे साहित्य, समाज, विज्ञान, इतिहास, तत्त्वज्ञान, उद्योग, व्यवसाय, भाषाशास्त्र, ज्ञानाची वेगवेगळी क्षेत्रेही संशोधनाचा विषय झालेली आहेत. संशोधन हे निखळ ज्ञानप्राप्तीबरोबर व्यावहारिक

उपयोगितेसाठी केले जाते. ज्ञानप्राप्तीच्या हेतूने केलेले संशोधन हे तात्त्विक चिंतनाशी, तसेच बौद्धिक चिंतनाशी जोडलेले असते. तिथे व्यावहारिक उपयुक्तता अभिप्रेत नसते. परंतु ज्ञानप्राप्तीसाठी केलेले संशोधन मानवाच्या बौद्धिक प्रेरणांचा सतत घेतलेला शोध असते. तर व्यावहारिक दृष्टीने केलेले संशोधन हे सामाजिक उपयुक्ततेचा व मानवी जीवनाच्या उत्कर्षापकर्षाचा विचार करीत असते.

संशोधनात अज्ञात तत्त्वांचा, विचारदृष्टीचा शोध घेणे व त्यांचे पुनर्मुल्यांकन करणे यांना प्राधान्य असते. त्यामुळे संशोधन म्हणजे भूतकाळातील सामग्री गोळा करणे हे नसून त्या संकलित सामग्रीचे विवेचन व संवर्धन महत्त्वाचे असते.

संशोधनाच्या मागे एक चिकित्सक वृत्ती आहे. आधुनिक युगाच्या प्रेरणांपैकी ती एक प्रमुख प्रेरणा आहे. सतराव्या – अठराव्या शतकात ह्या प्रवृत्तीचा जोमाने विकास होऊन आधुनिक बुद्धिवादाचा उदय झाला. वैज्ञानिक दृष्टी ही वाढीस लागली. आपल्या सामाजिक व व्यक्तीगत जीवनात  वैज्ञानिक दृष्टीला अतिशय महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले.

आपल्या देशात आधुनिक काळात संशोधनाची पायाभरणी ही ब्रिटीशांमुळे झाली असे म्हणता येईल. इ.स. १७८४ मध्ये विल्यम जोन्स यांनी स्थापन केलेल्या'एशियाटिक सोसायटी ऑफ बेंगॉल'या संस्थेचे उद्दिष्ट प्राचीन इतिहास, प्राचीन अवशेष, कला शास्त्रे व वाङ्मय यांचा अभ्यास करणे हे होते. अशाच प्रकारची संस्था सर जेम्स मॅकिंटॉश याने इ.स.१८०४ मध्ये 'एशियाटिक सोसायटी ऑफ बॉम्बे' नावाने महाराष्ट्रात सुरु केली. हा उपक्रम इंग्रजी अंमल प्रस्थापित होण्यापूर्वी सुरु झाला होता.

महाराष्ट्रात प्रबोधनाची सुरुवात राष्ट्रीय अस्मितेतून झालेली दिसून येते. जीवनाविषयीची अपार उत्सुकता या प्रबोधनामध्ये दडलेली होती. तिच्या पूर्ततेसाठी विचारवंत, अभ्यासकांचे इतिहास-संस्कृतीकडे लक्ष गेलेले दिसते. आपल्या देशात सन १८५७ मध्ये विद्यापीठांची स्थापना झाली. सुशिक्षितांच्या पिढ्यांनी पुढे येऊन इतिहास आणि अन्य विषयांचा धांडोळा घेण्यास प्रारंभ केला. न्या. रानडे यांनी प्राचीन संताच्या कार्याचे मूल्यमापन केले व 'मराठी सत्तेचा उत्कर्ष' हा ग्रंथ लिहिला. साने, खरे, पारसनीस, राजवाडे यांनी महाराष्ट्रात इतिहास संशोधनाच्या नव्या युगाची निर्मिती केली. अशा प्रकारे महाराष्ट्रात संशोधनाची परंपरा प्राय: राष्ट्रीय अभिमानातून निर्माण झाली.

## १अ.२ संशोधन म्हणजे काय?

माणसाच्या ठिकाणी कुतूहल, जिज्ञासा, उत्सुकता, सर्जनशीलता असते. त्यामुळे माणूस आणि बाह्यविश्व, माणूस व अंतर्विश्व यांच्या संबंधाविषयी माणसाच्या मनात औत्सुक्यापोटी प्रश्न निर्माण होतात. त्या प्रश्नांची बौद्धिक पातळीवर सोडवणूक करण्याचा माणूस प्रयत्न करू लागतो. त्यावेळी संशोधनाचा जन्म होतो.

संशोधनात सातत्य, परिश्रम, परिशीलन, पाठपुरावा आणि बौद्धिकता यांची गरज असते. ज्ञाताचे अज्ञात कण व अज्ञानाचे ज्ञात कण यांचा पाठपुरावा करून संशोधनाची वाटचाल सुरु असते. मानवाची सतत सुरु असलेली बौद्धिक प्रक्रिया म्हणजे संशोधन होय. माणसाचे जगणे, उपयोजितता व वर्धिष्ठता याकरिता संशोधन केले जाते. बुद्धिजीवी माणसाच्या

ठिकाणी संशोधनाची उर्मी असल्याने विश्वरहस्य व जीवनरहस्य यांचे गूढ उकलण्याच्या इर्षेतून संशोधनाला सुरुवात होते. पण हे संशोधन वैज्ञानिक असू शकेल. ज्ञानप्राप्ती, व्यवहारोपयोगिता आणि नवनिर्मितीचा आनंद हा त्यापाठीमागे असू शकतो. जगातील सर्व संशोधनामागे मानवी जीवन समृद्ध करणे, संपन्न करणे अशी अदम्य ज्ञानपीपासा कार्यरत असते व त्यातून शोध लागतात. संशोधन समग्र स्वरुपाची अभिक्रिया आहे. त्यात बुद्धी व जाणिवेचा उपयोग होतो.

संशोधन म्हणजे ज्ञानात्मक पातळीवर घेतलेला शोध होय. संशोधनात प्रारंभी माहितीचे संकलन केले जाते. म्हणून संकलन म्हणजे संशोधन नाही. तर त्यात परिवेक्ष्याही असते. बौद्धिक, ज्ञानात्मक आणि सैद्धांतिक पातळीवर जेव्हा संशोधन केले जाते, तेव्हा ते नित्यनुतन असते. संशोधनाचे हे स्वरूप समजून घेतल्यानंतर संशोधन म्हणजे काय? हे स्पष्ट केले पाहिजे :

संशोधन – सं + शुध्, सं + शोधन,

संपूर्णपणे सर्वांगानी शुद्ध करणे.

संशोधन ही संज्ञा इंग्रजीतील Research या संज्ञेवरून आली आहे व Research हा शब्द फ्रेंच 'Resi' या शब्दावरून आला आहे.

Re + Search पुन: पुन: शोधन होय.

ज्या क्रियेत मूल्य, ग्रहणात्मकता असते ती संशोधन प्रक्रिया होय. विश्वकोशामध्ये संशोधन या शब्दाचा अर्थ सर्वेक्षण, निरीक्षण, सूक्ष्मता, सूक्ष्मविचार, सूक्ष्ममीमांसा, अनुसंधान, संविधान, तत्त्वसंधान, अनुविक्षा, खोज, शुद्धीकरण, नेटकेपणा, परीक्षा असे दिलेले आहेत.

मराठी शब्द कोशामध्ये संशोधन या शब्दाचा अर्थ चौकशी, काळजीपूर्वक तपास, तत्त्व शोधून काढण्याचे प्रयत्न, विचारांची संस्कारित मांडणी सुव्यवस्थित मांडणी असा दिलेला आहे.

**ऑक्सफर्ड डिक्शनरी –**

Discovery of facts and fresh approach towards interpretation of facts or theory.

संशोधन प्रक्रियेत Fresh approach, Interpretation and facts या तीन गोष्टी असतात.

सर्वार्थाने शुद्ध करणे, सर्वार्थाने शोध घेणे, निर्मळ करणे, निर्णय, निष्कर्ष यांची पुनर्बांधणी करणे, प्रशोध घेणे, प्रयोग करणे, परिशोधन या संकल्पना वा अन्वयाच्या संघटना (परिभाष्य)ह्या संशोधनात अभिप्रेत असतात. ज्या प्रकारचा संदर्भ असेल त्याप्रमाणे वरीलपैकी संकल्पना संशोधनात वापरावी लागते.

चौकशी, पाहणी, प्रयोग, प्रशोधन, परीक्षण, अनुसंधान हे सगळे घटकशोध अभिप्रेत असतात. ह्या सगळ्या घटकांच्या साहाय्याने केल्या जाणाऱ्या अभ्यास प्रक्रियेला संशोधन म्हणतात.

संशोधन ही अर्थपूर्ण (Meaningful) अन्वयार्थक (Significant) व बुद्धिपुरस्कार (delibaurate) प्रक्रिया आहे. संशोधन करत असताना 'मी' चा लोप करावा लागतो. वस्तुस्थिती किंवा तत्त्व शोधून काढण्यासाठी केलेल्या बौद्धिक पातळीवरचा प्रयत्न म्हणजे संशोधन होय. अर्वाचीन काळात संशोधन या शब्दाचा अर्थ 'शोध घेणे', नवे उपलब्ध करून देणे असा सांगितला आहे.

संशोधन संकल्पना अधिक ठळकपणेस्पष्ट करण्यासाठी शोध आणि संशोधन यातील फरक समजून घेणे आवश्यक आहे. शोध (Search) हा अज्ञाताचा असतो. (Fundamental Basic Discovery) ह्या शोधात सातत्य नसते.

तर संशोधन (Research) हे ज्ञानाचे पुनर्मुल्यांकन असते. संशोधनात सातत्य असते.

शोधामध्ये उपयोजन नसते. उदा. $H_2O$ = water हा शोध होय. पंचमहाभूतांचा शोध हा मूलभूत शोध होय. शोधनाची प्रक्रिया आहे. संशोधनामध्ये उपयोजन असते. उदा. पिण्यासाठी पाणी, कपडे धुण्यासाठी हलके, जड, पाणी हे संशोधन होय. म्हणून संशोधन हे उपयोजित असते.

शोध ही संकल्पनात्मक मांडणी आहे. (Pure Basic Research) तर घेतलेल्या शोधावर मिळविलेल्या ज्ञानाच्या साहाय्याने सातत्याने नवा शोध, नवे ज्ञान मिळविण्याची प्रक्रिया, पुनर्मुल्यमापन ज्ञाताचे व ज्ञानाचेही शोधन ज्या अभिक्रियेत चालू असते त्याला संशोधन म्हणतात. संशोधन ही प्रवाही अशी प्रक्रिया आहे. त्यामुळे संशोधन संकल्पना लवचिक अशी आहे.

**संशोधनाच्या व्याख्या –**

वेबस्टरच्या कोशातील – "New International Dictonary Research is corebul or critical inquairy or examination in seeking facts or principls deligeut investigation in order to as creating something."

**ऑक्सफर्ड डिक्शनरी**

"Studious inquiry usually critical and exhaustive investigation of or exprentoction."

**संशोधनाच्या व्याख्या –**

१) "संशोधन म्हणजे नवीन ज्ञान प्राप्त करण्यासाठी केले जाणारे पद्धतशीर प्रयत्न होय." – लेहमन व मोरी

२) "सामाजिक घटना व सामाजिक समस्यांच्या बाबतीत नवीन ज्ञान प्राप्त करून घेण्याच्या उद्देशाने केलेले सूत्रबद्ध प्रयत्न म्हणजे संशोधन." – मोझर

३) "संशोधन म्हणजे वैज्ञानिक पद्धतीत प्रत्यक्ष कार्यान्वित करण्याची सुव्यवस्थित व नियमबद्ध अभ्यासाची प्रक्रिया होय." – जॉन डब्ल्यू. वेस्ट.

४) "संशोधन म्हणजे कोणत्यातरी प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी क्रमबद्ध व शास्त्रशुद्ध चिंतन केलेले प्रयोग होय."- क्रॉफोर्ड

५) “संशोधन प्रक्रियेचे तीन पैलू असून त्यामध्ये सामान्यीकरणाच्या हेतूने संकल्पना, प्रारूप यांचा उपयोग, वर्तमान ज्ञानाची कक्षा वाढविणे, त्यात सुधारणा करणे, ज्ञान प्रमाणित करणे आणि प्रमाणित सिद्धांत निर्मितीसाठी व व्यवहारासाठी उपयोग करणे होय.” – स्लेसिंजर व स्टिव्हेन्सन

६) “शास्त्रीय संशोधन ही एक संचयी प्रक्रिया आहे. विशेषत: सामाजिक शास्त्रामध्ये ती एक नकारात्मक प्रक्रिया सुद्धा आहे. केवळ ज्ञान संपादन करूनच नव्हे तर कालबाह्य गृहिते रद्द करूनसुद्धा सृजनक्षमता विकसित होऊ शकते.” – प्रा. हेरींग

७) “संशोधन हे व्यवस्थित, नियंत्रित आणि अनुभवजन्य असते. त्याद्वारे नैसर्गिक घटनांमधील संभाव्य संबंधाच्या गृहितकांचे टीकात्मक परीक्षण केले जाते.” – प्रा. एफ. एन. केरलिंगर

८) “Re-search in present period is treated as advancement in knowledge aequired through scientific method.” – Dr. Sadhu & Others.

९) “Re-search is a honest, exhaustive, intelligect searching for facts and their meaning or implications with reference to a given problem.” – P.M.Cook.

१०) “Re-search may be defined a method of studing a problem, whose solutions are to be desived parly or whally from facts.” – W.S.Manore

having for its aim the revision of accepted conclusion in the light newly discoverd facts.

**अन्यकोशातील व्याख्या :**

1. “Resarch is symply systimatic and refine techniqs of thinking.” (New International Disctonary)

2. “Research is studies of carefully and systametic inquiry in subjects it ordered of discover facts producea new product a slove new problem ors proove disappear theory as origional on partial contributio to partical are subject and knowledge in Jenral.”

3. “Research is the manipulation of things, concepts or symbols for the purpose of generalizing to external correct veryfy knowledge whether that knowledgeaids in construction of theory or in practice of an art. The maechanic or physician is a reserch worker only when he attempts to generalize above all automobiles or all patients of given class.” – Encyclopaedia of Social Science Vol – III

**मराठी व्याख्या –**

१. “जिज्ञासूवृत्तीने एखाद्या प्रश्नाची सत्यान्वेशी भूमिकेतून चिकित्सा करून अंतिम निर्णायक व उत्तर शोधण्याची अथवा तथ्य निर्णय करण्याच्या प्रक्रियेला संशोधन म्हणतात.” - सदा कऱ्हाडे

२. “नवी भूमिका घेऊन प्रचलित प्रश्नाची पुनर्मांडणी करणे, संकलित वस्तुस्थितीची विशिष्ट दृष्टिकोनातून समीक्षा करणे. तथ्यांचे पुनर्मूल्यांकन करून नवे आकलन पुढे आणणे या सर्व प्रक्रिया संशोधन प्रक्रियेत अंतर्भूत असतात.” - र.ना. वरखेडे.

३. “एखाद्या समस्येचे उत्तर शोधण्यासाठी वैज्ञानिक पद्धती आणि तंत्राद्वारे संकलित केलेल्या माहितीचे वस्तुनिष्ठ मूल्यमापन केल्यानंतर नवीन तथ्यांचा शोध घेऊन विविध घटकातील कार्यकारण संबंधाच्या आधारे सर्वमान्य सिद्धांताचे आणि नियमांचे प्रतिपादन करणारी प्रक्रिया म्हणजे संशोधन होय.” -बोधनकर

४. “संशोधन म्हणजे नवीन शोध लावण्याची क्रिया,तपासणी,चौकशी असे दिले आहे.” य.रा. दाते -शब्दकोश

५. “संशोधन म्हणजे नवीन ज्ञान किंवा माहिती मिळवणे.” - दु. का. संत.

**संशोधनाचे स्वरूप –**

संशोधन पद्धतीला इंग्रजीत Research Methodology म्हटले जाते तर मराठीत शोध विद्या, संशोधनशास्त्र, पाठ संशोधन शास्त्र असे म्हटले जाते.

संशोधनाच्या मागे कोणता तरी एक उद्देश असतो. संशोधनात स्वतः बौद्धिक अभिक्रिया चालू असते. त्यामुळे वेगवेगळ्या शास्त्राचा प्रभाव वेगवेगळ्या काळात पडलेला दिसून येतो. प्राचीन काळातील शोध प्रक्रियेवर अध्यात्मशास्त्र, धर्मशास्त्र, तत्त्वज्ञान यांचा प्रभाव पडलेला होता. पुढच्या काळात इतिहास व तत्त्वज्ञान यांचा प्रभाव पडलेला होता, तर आधुनिक काळात विज्ञान, गणित, संख्याशास्त्र, मानसशास्त्र, समाजशास्त्र यांचा प्रभाव पडलेला दिसतो. मानवी प्रज्ञा, प्रतिभा आणि परिश्रम यांच्या जोरावर सर्वच ज्ञानक्षेत्रात अविरतपणे संशोधन सुरू आहे.

संशोधनामध्ये काही एक संकल्पना डोळ्यासमोर ठेवाव्या लागतात.त्या ढोबळ संकल्पना डोळ्यासमोर ठेवून संशोधन सुरू केल्यानंतर त्या वारंवार विचारपूर्वक हाताळाव्या लागतात. तत्पूर्वी संशोधनामागचे हेतू निश्चित करावे लागतात. मुळात संशोधन ही संशोधकाच्या ज्ञानाच्या कक्षा रुंद करणारी प्रक्रिया आहे. त्यामुळे संशोधकाला त्याने निवडलेल्या समस्येच्या बाबतीत नव-नवीन ज्ञानप्राप्ती करून घेण्यासाठी क्रमबद्ध प्रयत्न करावे लागतात. त्यासाठी शास्त्रीय पद्धतीचा अवलंब करावा लागतो. त्यामुळे विविध स्तरावर होणाऱ्या सूत्रबद्ध चिकित्सेमध्ये अज्ञानाचा नाश करून एक नवीन ज्ञान प्राप्त होते ते ज्ञान संशोधकांच्या ज्ञानकक्षा रुंदावत असते.

संशोधनात उपलब्ध ज्ञानाची सत्यता तपासता येते. संशोधन हे केवळ जिज्ञासेपोटी केले जात नसून नवीन ज्ञान प्राप्त करून ज्ञानसंग्रह वाढवण्यासाठी केले जाते. उपलब्ध ज्ञान हे सद्यसंशोधकास पूरक नसेल तर त्याचा त्याग करून संशोधक नवीन ज्ञान स्वीकारतो.

संशोधनात अनुभवाच्या आधारे प्राप्त झालेल्या ज्ञानाच्या सहाय्याने निष्कर्ष काढले जातात. त्यालाच सामान्यीकरण म्हणतात. संकल्पना व विशिष्ट घटक हे सामान्यीकरणात महत्त्वाचे असतात. सामान्यीकरण हे संशोधन प्रक्रियेचे स्वरूप आहे. संशोधनातून हाती आलेले निष्कर्ष हे ज्ञानाचे सिद्धांत असतात.सिद्धांतातून जे ज्ञान मिळते ते वर्तमान व भविष्यासाठी उपयुक्त ठरते. ज्ञानकक्षा विस्तारित करण्याचे काम प्राप्त केलेल्या ज्ञानाद्वारे होत असते. संशोधन हे क्रियाभिमुखता निर्माण करणारे असते. त्यातून संशोधन विषयक ज्ञानकक्षा विस्तारित होतात आणि व्यावहारिक उपयुक्तताही वाढते.

संशोधन हे मूलत: एक शास्त्र आहे आणि संशोधनाची म्हणून एक मूलभूत अशी शास्त्रीय पद्धती असते, संशोधक कोणत्याही शाखेचा असला तरी त्याला या पद्धतींचा अवलंब करावाच लागतो. ही शास्त्रीय पद्धती म्हणजे विमर्शक–विचार पद्धती असते. (Reflactive thinking). या विमर्शक विचारपद्धतीच्या मूलत: पाच पायऱ्या मानण्यात येतात. ह्या पाच पायऱ्या जॉन डयुई याने सांगितलेल्या आहेत.

१. व्यवहारात किंवा विद्या-व्यापारात अडचण जाणवते, शंका उपस्थित होतात.

२. अडचणींचे स्वरूप पक्केपणानेओळखून त्यासमस्यांची व्याख्या करणे.

३. ही समस्या कशी सोडवता येईल, त्यावर उपाययोजना कोणत्या करता येतील याचा अंदाज बांधणे, काही गृहीतके (Hypothesis) निश्चित करणे.

४. सूचलेल्या प्रत्येक परिकल्पनेचे परिणाम काय होतील ह्याविषयी अवगामी (Deductive) पद्धतीने विचार करणे व स्पष्टीकरण देणे.

५. परिकल्पनेने संकल्पिलेली गृहीतके खरोखर घडतात का ते पाहणे आणि परिकल्पनेची स्वीकृती किंवा अस्वीकृती यांची निश्चिती करणे, सर्वच परिकल्पना अस्वीकृत ठरल्यास पुन्हा नव्या परिकल्पनांची उभारणी करणे व सोडविणे हा विचार चालू ठेवणे.

६. हा जो परिणामकारक उपाय अंती हाती लागतो तो निष्कर्ष रूपाने मांडणे आणि त्याच्या भावी अडचणी व गरजा याच्या दृष्टीने अंदाज ठरविणे घेणे व मोल ठरविणे.

जॉन डयुई यांनी विचार–क्रियेच्या पहिल्या पाच पायऱ्या दिल्या आहेत त्यात टी.एस. केली यांनी सहाव्या पायरीची भर घातली आहे. म्हणून त्यांना ड्युई – केली स्टेप्स म्हणतात,या विमर्शकविचार पद्धतीत उद्गामी (विगमन Inductive) आणि अवगामी (निगमन Deductive) अशा दोन्ही पद्धतींचा आलटून पालटून उपयोग केल्याचे दिसून येते.

आपल्या समोरील समस्येवर परिणामवाचक उपाय शोधणे हीच अपेक्षा असते. उद्गामी पद्धतीनुसार सुचविण्यात आलेल्या प्रत्येक परिकल्पनेची (Hypothesis) अवगामी पद्धतीने चिकित्सा करणे व पुन्हा अनुगामी पद्धतीने परिकल्पनेची तपासणी करणे, ही शास्त्रीय पद्धती (Scientific Method) होय. ही शास्त्रीय पद्धती विमर्शक - विचारपद्धतीला लागू पडते. संशोधनाची पद्धती ती हीच होय. विमर्शक – विचारपद्धती, शास्त्रीय पद्धती आणि संशोधन या क्रिया समान असल्याचे दिसून येते.

**संशोधनाची व्याप्ती.**

संशोधन केवळ विचारांना खाद्य देणारे नसते तर सबळ पुराव्या आधारे, नोंदणीच्या आधारे संशोधकाला आपले प्रतिपाद्य मांडावे लागते. हेतुकथन व उद्दिष्ट कथनाला प्रत्यक्ष वा तांत्रिक असे दुहेरी महत्त्व संशोधनात प्राप्त होते. नेमकेपणाने आपले उद्दिष्ट सांगून विविध मार्गांच्या व पुराव्यांच्या आधारे सिद्ध करणे व आपले उद्दिष्ट पार पडले आहे असे स्पष्टपणे निवेदन करणे ही प्रक्रिया संशोधनात असते.

संशोधनाची निश्चितता व्याप्तीतून होत असते. त्यामुळे त्याचे महत्त्व अनन्यसाधारण आहे.संशोधन विषयाच्या अनेक बाजू असतात. त्यापैकी नेमक्या कोणत्या पैलूवर आपण लक्ष केंद्रित करणार आहोत व कोणत्या साधनाद्वारे करणार आहोत यावर संशोधनाची व्याप्ती ठरते. संशोधन एम्. फिल वा पीएच. डी. पदवीसाठी केले जाते तेव्हा प्रबंधिकेची शब्दमर्यादा, संशोधनासाठी लागणारा कालावधीसुद्धा व्याप्ती ठरविण्यास साहाय्य करतो. संशोधकसंशोधन करून प्रबंध लेखन करीत असतोतेव्हा त्याने संशोधन पद्धतीचा अभ्यास केलेला असतो. त्याद्वारे आपले आकलन सिद्ध करीत असतो हे संशोधनवृत्तीचे निदर्शक असते.

संशोधनाच्या व्याप्तीमध्ये अभ्यासासाठी आपण कोणते क्षेत्र निवडले, त्या क्षेत्रातील घटक कोणत्या नमुना पद्धती वा सूत्रानुसार निवडले, त्या घटकांबाबतची कोणती माहिती काटकोरपणे जमा केली हे स्पष्ट शब्दात मांडणे होय. आपले संशोधन कुठे सुरू होते आणि नेमके कुठे संपते हे स्पष्ट झाल्याने त्या माहितीवरून काढलेले निष्कर्ष किती व्यापक आहेतहे संशोधकाला स्पष्ट होऊ शकते. उदा.वि.वा शिरवाडकर यांनी लिहिलेल्या कथा, कविता, कादंबरी आणि नाटक या साहित्यापैकी कवितांचे संशोधन करावयाचे झाल्यास सर्व साहित्य अभ्यासासाठी न निवडता आदर्श मानवी जीवनमूल्यांची मांडणी करणाऱ्या या कवितांचा एक वर्ग कल्पून त्याचा मर्यादित कालावधीत सखोल अभ्यास करता येईल. त्यामुळे इथे आदर्श मानवी जीवनमूल्ये हे कविताचे समान सूत्र ठरते.

एकंदरीत वि.वा शिरवाडकरांनी साहित्याचे सर्व प्रकार हाताळले असले तरी सर्वांचा अभ्यास संशोधनात किंवा प्रबंधात शक्य होणार का याचा विचार करून संशोधनाची व्याप्ती निश्चित होते.

## १अ.३ संशोधनाची वैशिष्ट्ये

संशोधन कोणत्याही क्षेत्रातील असले तरी त्यांची काही सर्वमान्य वैशिष्ट्ये आहेत –

१) संशोधन एक प्रकारची योजकता असते व आखणी असते. (Sence of Dexine) हे त्याच्या मथळ्यातून व्यक्त होते.

२) संशोधन हे सजीव प्राण्याप्रमाणे स्वयंपूर्ण व स्वयंभू आहे. सेंद्रियतेच्या निकषावर निवडलेली वा संपादित केलेली सामग्री (Material), तिचे पृथक्करण, त्याची एकदंर झेप, गृहित धरलेला विशिष्ट कल्पित पक्ष, विविध घटकांमधील परस्परावलंबित्व व परस्परपूरकता या गोष्टी लावून पाहता आल्या पाहिजेत.

३) जी माहिती (data) मिळविली असेल; ती पुस्तकांतून तयार असलेली, मिळवलेली असेल किंवा पाहणी पद्धतीने जमविली असेल; पण ही माहिती किंवा ज्ञान संशोधनाचा पाया आहे. त्याशिवाय संशोधनाचे तंत्र पुढे चालू शकत नाही.

४) सर्वसामान्य माहिती, तिचे पृथक्करण हे प्रारंभी निर्जीव वाटले तरी संशोधकाच्या हाती त्याला एक गतिशीलता प्राप्त होते व तिच्यापासून महत्त्वाचे निष्कर्ष काढले जातात.

प्रत्येक क्षेत्रातील संशोधनात ही वैशिष्ट्ये दिसतात किंवा दिसणे आवश्यक आहे.

संशोधन ही सर्वव्यापक, सर्वगामी, ज्ञानक्षेत्रीय, व्यापक संकल्पना आहे. संशोधनात ज्ञानात्मकता अभिप्रेत असते. सत्य शोधणे ही प्रमुख प्रेरणा असली तरी ज्ञानस्वरूप, विकसित, उपयोजित समकालीन गरज, उपलब्ध ज्ञान, त्याच्या प्रवृत्ती आणि साधन सामग्री या घटकांमुळे संशोधनाचेस्वरूप बदलत जाते. त्यामुळे साहजिकच संशोधनात तीन स्तर निर्माण होतात.

## १अ.४ संशोधन स्तर

| | | | |
|---|---|---|---|
| १. | विशुद्ध संशोधन (Basic Research) | उदा. पाणी<br>उदा. सा, रे, ग, म हे स्वर | वैज्ञानिक संशोधन |
| २. | उपयोजित संशोधन | उदा. हलके, जड पाणी<br>उदा. रागदारीची निर्मिती | समाजशास्त्रीय संशोधन (Humanities) |
| ३. | विशेषात्मक संशोधन (Specilization Research) | उदा. शेतीसाठी पाणी, पिण्यासाठी पाणी,<br>उदा. विशेष राग | साहित्य संशोधन (Arts) |

संशोधनाचे हे मुख्यत: तीन प्रकार आहेत. वैज्ञानिक संशोधनाचा विषय 'वस्तू' असते. तर सामाजिक संशोधनाचा विषय माणूस असतो तर साहित्य संशोधनाचा विषय साहित्य असते. पण हे साहित्य ललित वा ललितेतर, सीमारेषेवरील शास्त्रीय साहित्य असू शकेल. या तिन्ही संशोधनात शोध पद्धती समान आहेत आणि शंका उपस्थित होणे, तिचे स्वरूप न्याहाळणे, समस्या सोडवणुकीचा अंदाज बांधणे व गृहीत कल्पना निश्चित करणे, तिच्या साहाय्याने मूळ अनुभवापर्यंत पोहचणे व निष्कर्ष काढणे या अभिक्रिया तिन्ही संशोधन प्रकारात समान असतात.

वैज्ञानिक, सामाजिक आणि साहित्यिक संशोधनाचे स्वरूप आपण पाहू.

### १अ.४.१ वैज्ञानिक संशोधन –

विज्ञानाच्या निष्ठेतून, संकल्पनेतून, व्यवस्थेतून जन्माला आलेल्या संशोधनाला वैज्ञानिक संशोधन म्हणतात. वस्तुनिष्ठ त्यामधून मानवनिष्ठा, त्याच्या अर्थव्यवहारातून मानवी सुखवाद, उत्क्रांती प्रगती यासाठी विज्ञान राबवले गेले. त्यातूनच वैज्ञानिक संशोधन जन्माला आले.

वैज्ञानिक संशोधन हे कोणत्याही विशिष्ट अशा प्रश्नांच्या जाणिवेने सुरू होते. प्रयोग व पाहणी करताना त्या प्रश्नाला प्राधान्य मिळेल, अशा रीतीने तो प्रश्न वेगळा केला जातो.

प्रयोगशाळेच्या आधारे विशिष्ट अशी नियंत्रित परिस्थिती निर्माण करता येते. या पद्धतीचा अवलंब कटाक्षाने केला जातो.

वैज्ञानिक संशोधनात सर्वच अवस्थांमध्ये निरनिराळ्या प्रकारच्या उपकरणांची आवश्यकता असते. अवलोकन, मापन हे बिनचूक असावे असा विज्ञानाचा कटाक्ष आहे. तथापि प्रयोग कितीही काटेकोरपणे बिनचूक केलेला असला तरी त्यातून निघालेल्या फलितांचा विचार करता, मानवी अपूर्णता लक्षात घेता त्यात अल्पप्रमाणात चूक झालेली असते, हे गृहीत धरलेले असते.

वैज्ञानिक संशोधनात प्रयोगांबरोबरच गणिताचेही महत्त्व अधिक आहे. अनेक वैज्ञानिक शास्त्रे ही गणिताधिष्ठीत आहेत. त्याच्या मदतीशिवाय संशोधन अशक्य आहे. या गणिताधिष्ठीततेमुळे संशोधन हे अतिशय गुंतागुंतीचे व कमालीचे महाग व तंत्रावलंबी झाले आहे. वैज्ञानिक संशोधनाचे तीन भाग आहेत –

अ) तंत्रज्ञानात्मक संशोधन – (Technological Research)

उदा. Computer, Teleprint, Telephone

ब) विशुद्ध जडवादी शास्त्रांचे संशोधन –

उदा. Psychology, Chemistry.

क) जीवशास्त्रीय संशोधन –

उदा. प्राणीशास्त्र, भूगर्भशास्त्र

मानवी जीवनाची प्रगती व संस्कृतीचा विकास वैज्ञानिक संशोधनाच्या गतीमधून निर्भर झालेली दिसते. कारण विज्ञान हे सामान्य माणसाच्या जीवनाला घेऊन भिडत असते. एकीकडे जीवनाचा अर्थ लावणे, संस्कृतीची प्रगती यासाठीच वैज्ञानिक संशोधन उपयुक्त ठरत असते. विज्ञान आणि तंत्रज्ञान, अणुऊर्जा, पदार्थ विज्ञान, रसायन, उद्योग, गणित वैद्यक, वनस्पती, प्राणीशास्त्र, जीवशास्त्र, खगोलशास्त्र, अवकाशशास्त्र हे वैज्ञानिक संशोधनाचे विषय आहेत.

### १अ.४.१.१ वैज्ञानिक संशोधनाचे स्वरूप –

१) वैज्ञानिक संशोधन हे प्रामाणिकतेवर (Verifiability) भर देत असते. कोणत्याही काळात, कोणत्याही संशोधकाने आपल्या संशोधनातून काढलेल्या निष्कर्षांचा अन्य पडताळा घेऊ शकतो. संशोधकाने संकलित केलेल्या तथ्यांच्या प्रामाणिकतेची तपासणी कोणीही करू शकतो.

२) अनुभव प्रामाण्यता (Empirical) ही वैज्ञानिक संशोधनात महत्त्वपूर्ण असते. इंद्रियानुभव प्रमाणित करण्यासाठी संशोधक बुद्धी व तर्काच्या निकषांवर पारखून पाहतो व जे अनुभव बुद्धी आणि तर्काच्या कसोटीला उतरतील ते वस्तुनिष्ठ मानून त्याआधारे निष्कर्ष काढले जातात. ते पुन्हा पुन्हा पडताळून पाहिले जातात. अनुभव प्रामाण्यता म्हणजे पुन्हा पुन्हा पडताळा घेतला असता तोच अनुभव येणे हे वैज्ञानिक संशोधनाचे मूलभूत तत्त्व आहे.

३) वैज्ञानिक संशोधनात जे काही प्राप्त होते ते जसेच्या तसे मांडणे म्हणजे वस्तुनिष्ठता होय. वैयक्तिक भावना व व्यक्तिनिष्ठता बाजूला ठेवून, अर्थ लावून केलेल्या संशोधनाचा उपयोग सर्वांसाठी होत असतो. संशोधनात भावनिक तटस्थता, निष्पक्षता महत्त्वाची असते.

४) वैज्ञानिक संशोधनात निश्चिततेला महत्त्वाचे स्थान आहे. (Difinition) वैज्ञानिक संशोधनात स्पष्टता असते. त्यातून निश्चित ज्ञानाची प्राप्ती होते. सर्वशाखीय ज्ञानासाठी निश्चित विशिष्ट आणि स्पष्ट अशी पद्धत वापरली जाते म्हणून त्याचा पडताळा घेता येतो.

५) सामान्यीकरणाला सुद्धा वैज्ञानिक संशोधनात महत्त्व आहे. (Generality) बरेचदा एखाद्या घटनेच्या मुळाशी कारणीभूत असणाऱ्या घटकात परस्पर असंबद्धता व विसंगती दिसून येते. त्यांच्यातील साम्य शोधण्याचे कार्य वैज्ञानिक संशोधन करते. सध्याच्या मुळाशी असणारी सुसंबद्धता स्पष्ट झाली की सामान्य विधानातून सिद्धांताची निर्मिती होते.

६) नैतिक तटस्थता (Ethical Neutrality) हे वैज्ञानिक संशोधनाचे महत्त्वाचे एक तत्त्व आहे. संशोधक विवेकशील तर्कबुद्धीचा वापर करून समोर आलेल्या घटनांचे निष्पक्ष दृष्टीने पृथ:करण करून सत्य शोधण्याचा प्रयत्न करतो. तेव्हा संशोधनाअंती काढलेले निष्कर्ष हे वस्तुनिष्ठ असतात. हीच नैतिक तटस्थता होय.

७) सप्रमाणतेला वैज्ञानिक संशोधनात विशेष महत्त्व आहे. ज्या प्रमाणात प्राप्तांकामध्ये फरक येतो तो व्यक्तिगत, सामूहिक किंवा परिस्थितीच्या वैशिष्ट्यांमधील खऱ्या फरकाचे प्रतिबिंब असते.

८) पूर्वानुभव किंवा भविष्य कथनक्षमता (Predictability) म्हणजे निष्कर्ष सत्य असल्याचे प्रमाण. वैज्ञानिक संशोधनात कारण परिणामकारक शोधण्याची क्षमता असते. कोणत्या कारणाचे काय परिणाम घडतात याच्या आकलनावरून संशोधक भविष्यकथन करतो. पूर्वीचे अनुभव हाच भविष्यकथनाचा आधार असतो. भविष्यकथन चुकले तर का चुकले याचा शोध घेणे व नवीन तथ्याच्या आधारे बदल करणे हे संशोधक करू शकतो.

थोडक्यात वैज्ञानिक संशोधन हे शुद्ध आणि उपयोजित स्वरूपाचे आहे. वैज्ञानिक संशोधनाचा विषय माणूस नसून वस्तू असते. ह्या शोधप्रक्रियेत भाष्य किंवा वैयक्तिकता यांना स्थान नसते. कोणीही कोठेही प्रयोग करून कार्यकारण संबंध शोधू शकतो. संशोधन हे यांत्रिक आणि तत्सम नियमांनी परिबद्ध असे आहे. वैज्ञानिक संशोधनात अवलोकनात तटस्थपणा असतो. त्यामुळे व्यक्तिनिष्ठाही तिथे नसते.

वैज्ञानिक संबोधन हे प्रयोगशाळा प्रधान असते. यंत्रांनी केलेली अवलोकने, पुरवलेला Data, घेतलेल्या नोंदी या अंतिम स्वरूपाच्या ठरतात. त्यामुळे निर्णय व निष्कर्ष हा एकमेव असतो. तो नेमका (exact) बिनचूक (Accurate) विश्वात्मक (Universal) असा असतो त्याचा पडताळा कोणीही घेऊ शकतो.

**वैज्ञानिक व साहित्य संशोधन साम्यभेद**

**साम्य-**

१. वैज्ञानिक संशोधन आणि साहित्य संशोधन या दोन्ही पद्धतीत संशोधकांनी सांगितलेल्या पाच पायऱ्या वापरल्या जातात.

२. संशोधनाच्या चौदा शोध पद्धती आहे. त्या वैज्ञानिक आणि साहित्य संशोधनात उपयोगी पडतात.

३. या दोन्ही संशोधन पद्धतीतील अचूकता,काटेकोरपणा,वर्गीकरण यांच्या साहाय्याने काढलेला निष्कर्ष असतो. निष्कर्ष सूक्ष्मतेने वैचारिकतेने काढावा लागतो. या बाबी दोन्ही संशोधन पद्धतीत समान असतात.

४. दोन्ही संशोधन पद्धती ज्ञानप्राप्तीबरोबर बौद्धिक आणि मानसिक आनंद सापडतो परंतु हा आनंद चिंतनाशी निगडित असतो.

५. वैचारिक अधिष्ठानाची गरज, बौद्धिक कुशाग्रता व मानसिक शिस्त,निरीक्षण, अवलोकन यातील अचूकता निष्कर्षातील नेमकेपणा विषयातील परिपूर्णता व सातत्य या दोन्ही गोष्टी संशोधन पद्धती समान असतात.

६. संशोधन विषयाची मांडणी व आखणीमधील योजकता विषयाची सुसूत्रता,चिंतनशीलता व अभिजातता हे सर्व गुण या दोन्ही संशोधन पद्धतीत समान असतात. हे गुण असल्याशिवाय निष्कर्ष हाती येत नाहीत.

७. वैज्ञानिक आणि साहित्यिक संशोधनाचा पाया मानवी जीवन हाच आहे. त्याची विविध अंगे संशोधनाच्या द्वारे तपासली जातात. जीवनाच्या समृद्धतेसाठी विविध प्रकारचे संशोधन सातत्याने सुरू असते.

**भेद-**

१) वैज्ञानिक संशोधन हे वस्तू प्रधान व माणूसप्रधान असते तर साहित्य संशोधन हे साहित्यप्रधान असते. कलानिर्मिती ही एक अभिव्यक्ती असते आणि तोच साहित्य संशोधनाचा दस्तावेज असतो. माणसाने निर्माण केलेल्या साहित्याचा शोध साहित्य संशोधनात घेतला जातो.

२) वैज्ञानिक संशोधन हे कार्योपजीवी असते. तसेच उपायशोधनपर असते तर साहित्य संशोधन हे कार्योपजीवी व उपायशोधनपर नसते. साहित्य संशोधन हे तत्त्वचिंतनाशी संबंधित असते. त्या दृष्टीने ते विद्वत संशोधन असते. त्यामुळे साहित्य संशोधनाची शोधआयुधे, वैज्ञानिक संशोधनाच्या शोध आयुधांपेक्षा भिन्न असतात.

३) ग्रंथालय हे साहित्य संशोधनाचे व्यापक असे आयुध आहे. भाषिक व लोकसाहित्य संशोधनासाठी समाज सर्वेक्षण हे व्यापक आयुध आहे. तर वैज्ञानिक संशोधनात प्रयोगशाळा हे महत्त्वाचे आयुध असून भोवतालचा निसर्ग हा आणखी एक प्रयोगशाळा वैज्ञानिक संशोधनात असतो.

४) वैज्ञानिक संशोधनातील शोधविषयापेक्षा साहित्य संशोधनातील शोध विषय हा विलक्षण लवचिक आणि अनेक विद्याशाखांनी संपृक्त असा आहे. साहित्याचा संबंधइतिहास, संस्कृती, धर्म, समाज, आध्यात्म, तत्त्वज्ञान यांच्याशी येतो.

५) वैज्ञानिक संशोधनात जीवनाभिमुखता, उपयुक्तता, व्यवहारिकता असते तशी साहित्य संशोधनातून वा कलेच्या संशोधनातून अपेक्षिता येत नाही.

६) वैज्ञानिक संशोधन हे वस्तुनिष्ठ असते. मन, भावना यांना थारा नसतो तर साहित्य संशोधन हे मनोनिष्ठ, प्रतिभानिष्ठ, सर्जनप्रधान असते.

७) वैज्ञानिक संशोधनातील वस्तुनिष्ठता साहित्य संशोधनात नसली तरी या दोन्ही संशोधनातून जीवनाभिमुखता साधता येणे शक्य आहे.

### १अ.४.२ सामाजिक संशोधन –

समाजशास्त्रीय संशोधन म्हणजे सामाजिक संशोधन होय. सामाजिक अभ्यास करणारे अनेक विषय हे या प्रकारच्या संशोधनाचे असल्याने त्या विषयातील संशोधनाला सामाजिक संशोधन असे म्हणतात.

१) सामाजिक संशोधन म्हणजे समाजात एकत्रित राहणाऱ्या क्रियाशील लोकांच्या जीवनातील अंतर्भूत प्रक्रियांचे संशोधन म्हणजे सामाजिक संशोधन होय. – ई. एस्. बोगार्डस

२) समाजशास्त्रीय संशोधनामध्ये मानवसमूहाच्या संबंधाच्या अध्ययनाचा समावेश होतो. – व्हीटने

३) सामाजिक घटना व समस्या याबाबत नवीन ज्ञान प्राप्त व्हावे म्हणून केलेल्या क्रमबद्ध संशोधनाला सामाजिक संशोधन असे म्हणतात. – सी. ए. भोझर

४) सामाजिक संशोधन ही सामाजिक जीवनाचे अध्ययन, विश्लेषण आणि संकल्पनीकरणाची एक पद्धती आहे. ज्यामुळे ज्ञानाची वृद्धी, शुद्धीकरण किंवा पुनर्परीक्षण होऊ शकेल. मग ते ज्ञान सिद्धांताची रचना करण्यास वा फ्लेक्स व्यवहारात स्थान देण्यास सहाय्यक ठरू शकेल.- स्लेसिंजर व स्टीफेन्सन

वरील व्याख्या विचारात घेऊन सामाजिक संशोधनाची **वैशिष्ट्ये** सांगता येतील.

- समाज आणि सामाजिक संस्था ह्या सामाजिक शास्त्राच्या संशोधनाची प्रयोगभूमी आहे. व्यक्ती, कुटुंब, समाज, समष्टी, विश्व यापासून निर्माण झालेली कोणतीही संस्था सामाजिक संशोधनाचे विषय असतात. या विषयांना एक प्रकारची मानवी परिमिती असते. त्यामुळे सामाजिक संशोधन हे मानवी परिमितीच्या सहाय्याने करावे लागते.

- सामाजिक संशोधन हे सामाजिक जीवनाबाबत नवीन माहिती व तथ्य गोळा करण्यासाठी केले जाते. जुन्या व वर्तमान स्थितीत अस्तित्वात असलेल्या माहितीचे चिकित्सक परिक्षण केले जाते.

- संशोधकास उपलब्ध झालेल्या वेगवेगळ्या माहितीचे विश्लेषण करून त्यातील परस्परसंबंध तपासून निष्कर्ष मांडले जातात. ही एक सतत चालणारी बौद्धिक प्रक्रिया आहे. सामाजिक संशोधनात सामाजिक घटकांचा अभ्यास करताना गट, समूह, संस्कृती, धर्म, समाज, परंपरा, मनोवृत्ती याद्वारे नवीन माहिती सिद्धांत व संकल्पना मांडल्या जातात.

- सामाजिक संशोधनाद्वारे दोन वेगवेगळ्या घटनांचा परस्परांशी असलेला संबंध तपासला जातो.

**सामाजिक संशोधन स्वरुप-**

मानवी वर्तन आणि मानवाचे समाजजीवन, मानवावर प्रभाव टाकणारे घटक, त्यांचा परिणाम अभ्यासणे हा सामाजिक संशोधनाचा हेतू आहे. सामाजिक संशोधनाचा उद्देश मानवी समाज मानवाचे समाजजीवन, त्यावर प्रभाव टाकणारे घटक आणि परिणाम यांचा अभ्यास करणे हा असतो. सामाजिक संदर्भात ज्या विविध समस्या जाणवतात त्याचा अभ्यास करणे हे उद्दिष्ट प्रामुख्याने ठेवले जाते. समाजजीवनाबाबतचे नवीन ज्ञान प्राप्त करून घेणे व आजपर्यंतच्या माहितीचे परिक्षण करणे हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून हे सामाजिक संशोधन केले जाते. समाजाच्या वेगवेगळ्या घटकांसंदर्भात वैज्ञानिक दृष्टिकोन ठेवून केलेले संशोधन समाजाच्या स्वास्थ्यासाठी, कल्याणासाठी उपयुक्त ठरत असते.

सामाजिक संशोधन हे वैज्ञानिक व तर्कशुद्ध कसोटीवर ज्ञानप्राप्ती करण्यास उपयुक्त ठरते. संशोधकाला प्राप्त झालेल्या माहिती, विश्लेषण आणि निष्कर्ष याद्वारे सामाजिक व शैक्षणिक तर्कशुद्ध ज्ञान विकसित होते. या प्रकारच्या संशोधनामुळे सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, भौतिक संदर्भातील घटनांचे तार्किक दृष्ट्या परीक्षण होते. त्यामुळे पूर्वग्रह, अज्ञान नष्ट होण्यास मदत होते.

सामाजिक व आर्थिकशोषण, शैक्षणिक परवड या पाठीमागच्या कारणांचा शोध घेऊन त्यावर उपाय शोधणे संशोधनामुळे शक्य होते. तसेच सामाजिक समस्यांनी उग्र रूप धारण करण्यापूर्वी त्यावर उपाय योजणे, नियंत्रण मिळविण्याकरिता सामाजिक संशोधन उपयुक्त ठरते.

सामाजिक शास्त्रांच्या अभ्यासात अनेक शास्त्रांचा व त्याच्या उपशास्त्रांचा अभ्यास करावा लागतो. पूर्णपणे एका शास्त्रात समाविष्ट होतील असे विषय फारच थोडे असतात. हा अभ्यास सामाजिक शास्त्रांच्या अभ्यासापुरताच मर्यादित असून चालत नाही, तर स्थापत्य, भूगर्भशास्त्र, शेतकी, वैद्यक, विज्ञान याचबरोबर धर्म, परंपरा, तत्त्वज्ञान इत्यादींचाही विचार करावा लागतो.

माणसामाणसांमधील संबंध (Human Relation) समजून घेणे हे आजच्या संपूर्ण सामाजिक संशोधनाचे मुख्य उद्दिष्ट आहे. सामाजिक संशोधनात काही वेळ वाङ्मयीन संशोधनाची मदत होत असते. हे लक्षात घेतल्यास आंतर-अनुशासनीयतेचा विचार (Inter-Dicipline) पुढे येत आहे.

थोडक्यात मानवी जीवन व्यवहाराचे अध्ययन करणारे सामाजिक शास्त्र महत्त्वपूर्ण आहे. मानवी जीवनाच्या प्रत्येक अंगाचा त्यात विशेष अभ्यास होतो. व्यक्तीच्या वर्तनावर प्रत्यक्ष अगर अप्रत्यक्ष, वैयक्तिक अगर समूह पातळीवर इतरांचा प्रभाव पडलेला असतो. हे प्रभावित झालेले वर्तन संशोधनाचा विषय ठरते. व्यक्तिवर्तनाच्या अभ्यासाच्या आधारे मानवी जीवन व्यवहारामागे असलेल्या तर्कशुद्ध व सुसंगत नियमांचा शोध हा सामाजिक संशोधनात घेतला जातो.

**सामाजिक संशोधन व साहित्य संशोधन साम्य-भेद:**

**साम्य-**

१. सामाजिक संशोधन आणि साहित्य संशोधन या दोन्हीमध्ये विमर्शक-विचार पद्धतीचा म्हणजे जुई केलीच्या पाच पायऱ्यांचा वापर केला जातो. मानवी प्रज्ञेतून निर्माण झालेली जी शास्त्रे आहेत त्यांचा शोध घेण्यासाठी ही पद्धती उपयोगी पडते.

२. सामाजिक संशोधन व साहित्य संशोधन या दोन्ही पद्धतीमध्ये ज्या चौदा पद्धतींचा शोध आहे त्या उपयोगी पडतात.

३. सामाजिक संशोधन हे सामाजिक जीवनाबाबत नवीन माहिती, तथ्ये गोळा करण्यासाठी केले जाते. तसे साहित्य संशोधनातही साहित्यकृतीची रचना,निर्मिती याविषयीची माहिती व तथ्य गोळा करण्यासाठी केले जाते.

४. सामाजिक संशोधनातसमाज, संस्कृती, मनुष्य, त्यांचे जीवन, सामाजिक मूल्यही मध्यवर्ती असतात. तसे साहित्य संशोधनामध्ये वा कलेतही समाज, संस्कृती, मानवी जीवन व मूल्यही महत्त्वाची असतात.

५. संशोधनातील अचूकता, काटेकोरपणा,वर्गीकरण अवलोकनातील बिनचुकपणा, निष्कर्षातील नेमकेपणा, विषय पूर्तता, परिपूर्णता चिंतनातील सातत्य, विषयाची आखणी व मांडणी यामधील योजकता, वैचारिक अधिष्ठान, कुशाग्र बुद्धिमत्ता. मानसिकस्वास्थ्य व शिस्त तसेच सत्याबद्दल आग्रहीपणा, जिज्ञासूवृत्ती, परिश्रम आणि चिकाटी या गोष्टी यादोन्ही प्रकारच्या संशोधनात प्राणभूत मानलेली आहेत.

६. साहित्य संशोधन आणि सामाजिक संशोधन या दोन्ही पद्धतीत ज्ञानप्राप्तीबरोबर बौद्धिक आणि मानसिक आनंद महत्त्वाचा असून तो चिंतनाशी निगडित असतो.

८. सामाजिक संशोधन आणि साहित्य संशोधन या सीमारेषा एकमेकांमध्येमिसळलेल्या दिसतात. त्याचे कारण माणूस आणि समाज या दोन्ही पद्धतीचा केंद्रबिंदू आहे.

९. सामाजिक संशोधनातील समस्या आणि विविध विद्याशाखा व विद्या यांच्याशी एकाच वेळी निगडित असतात. सामाजिक संशोधनाचे स्वरूप संमिश्र असते. तसेच साहित्य संशोधनाचे स्वरूप आहे.

**भेद-**

१. सामाजिक संशोधनात संशोधन विषय हा चल असतो कारण भावभावना असणारा, विचार करणारा, कल्पनाशक्ती असणारा माणूस व त्याने निर्माण केलेल्या संस्था व समाज संशोधन विषय असल्याने हे संशोधन क्षेत्र चल वा हलते असते. त्यामुळे नेमकेपणाने नोंदी घेणे अवघड असते. तर साहित्य निर्माण करणारा माणूस असला तरी त्याची साहित्यनिर्मिती अचल असते. त्यामुळे साहित्याचा अभ्यास अचूकतेने करता येतो.

२. समाजातील विविध संस्था ही सामाजिक संशोधनाचे प्रयोगभूमी आहे तर ग्रंथालय हे साहित्य संशोधनाची प्रयोगभूमी आहे.

३. सामाजिक संशोधनाचे मुख्य वैशिष्टय हे मानव समाजाच्या व्यवहारिक विकासाचे मार्ग दाखवणे हे आहे. त्यामुळे संशोधनात व्यवहार्यता व उपयुक्तता यांना महत्त्व असते. साहित्य संशोधनात मात्र व्यवहार्यता व उपयुक्तता हे मुख्य उद्दिष्ट नसते.

४. साहित्य संशोधनात जे अनुपलब्ध असते ते उपलब्ध करून देणे, त्यावर संस्कार करून टीकाटिप्पणी करून ते प्रकाशित करणे हा भाग असतो.

५. सामाजिक संशोधनात उपलब्ध असलेल्या माहिती व साधनांच्या साहाय्याने मानवी जीवन, समाज, संस्कृतीचा वेध घेतला जातो.

६. सामाजिक संशोधनातील वास्तव सृष्टीचा वेध घेतला जातो तर साहित्य संशोधनातील सृष्टी वास्तव सृष्टी नसते. ती लौकीकाधारित पण अलौकिक स्वरूपाची सृष्टी असते. ती स्वतंत्र, स्वायत्त व स्वयंपूर्ण असते. साहित्य संशोधनात साहित्यकृतीच्या सौंदर्य रूपाचा शोध घेतला जातो.

७. सामाजिक संशोधनातील निर्णय हे वैज्ञानिक संशोधनातील निर्णयापेक्षा निश्चित, नेमके व अचूक असतात. याइतकेही निर्णय साहित्य संशोधनात मिळू शकत नाही.

८. साहित्य संशोधनात अंतिम निश्चयन हे साहित्य सौंदर्याचे आणि साहित्यनिष्ठेचे केले जाते. तसे अंतिम निश्चयन सामाजिक संशोधनात करता येत नाही.

### १अ.४.३ साहित्य संशोधन

साहित्य ही माननीय कला असून तिची निर्मिती, आस्वाद या सूक्ष्म आत्मनिष्ठ प्रक्रिया आहेत. साहित्यही निर्मितीशील अभिक्रिया आहे. साहित्य हे विविध प्रेरणा आणि संस्कारातून आकार घेत असते. या साहित्याचा संबंध इतिहास, संस्कृती, धर्मशास्त्र, समाजशास्त्र, अध्यात्मशास्त्र आदी शास्त्रांशी येतो. त्यामुळे अशा साहित्याचे संशोधन करताना संशोधकाचा पिंड केवळ आस्वादक असून चालणार नाही किंवा मूल्यमापन कर्त्याचा असून चालणार नाही. कारण संशोधन हे सुद्धा सर्जन आहे; त्यात समीक्षेची सार्थ दृष्टी हवी तसेच सहानुभुतिपूर्वक विचार ग्रहण करण्याची ताकद हवी. त्याचबरोबर आवश्यक ती कल्पनाशक्ती व सौंदर्यदृष्टीही हवी.

साहित्य निर्मिती ही व्यक्तिसापेक्ष व मानवी मनाशी संलग्न असते. त्यामुळे तिच्यात काटेकोरपणा, नियमितपणा व संपूर्ण वस्तुनिष्ठतेला वाव नसतो. साहित्यात आत्माविष्कार, कलेचे स्वातंत्र्य, सर्वात्मकता, स्वायत्तता, केवलात्मकता असते, हे लक्षात घेऊन साहित्य संशोधन केले पाहिजे. साहित्यसंशोधनामध्ये संशोधकाला प्रतिपाद्य विषयात एकरूप होणे या गोष्टी साध्य करता आल्या पाहिजेत. तसेच त्याची दृष्टी पूर्वग्रह विरहित, नि:पक्षपातीपणाची, निर्भेळ शोधकता असलेली व आवश्यक अभिरुचीसंपन्न व प्रखर जिज्ञासा असलेली असावी लागते.

भाषाशास्त्रीय बोलीवर, छंदशास्त्र संशोधन, व्याकरण शास्त्रपर, साहित्यशास्त्र तत्त्वपर, सौंदर्यशास्त्रीय, अध्यात्मपर, लिपी, पाठचिकित्सा, नितीशास्त्रपर, ललितकलापर, शैलीशास्त्रपर असे साहित्यशास्त्राचे स्वरूप आहे. वैज्ञानिकसंशोधनातील विशुद्ध संशोधन आणि उपयोजित संशोधनाप्रमाणे साहित्यसंशोधन करता येणे शक्य आहे. त्यासाठी प्राचीन साहित्य, ऐतिहासिक कागदपत्रे, बखरी, लावण्या, पोवाडे आदी उपलब्ध होणे आवश्यक आहे. हे सर्व प्रकारचे साहित्य संशोधकाने त्याची पाठचिकित्सा करून दिली व त्यांचे संकलन, संपादन, शोधणव मांडणी केली, की त्या संशोधनाला विशुद्ध ही संकल्पना वापरता येईल. उदा. वि. भ. कोलते यांची 'महानुभाव चरित्रे' व 'सातीग्रंथांची' संपादने ही मूलभूत संशोधने ठरतील.

साहित्यसंशोधन हे शिस्तबद्ध व प्रामाणिक सर्जन आहे. त्यासाठी प्रज्ञा, प्रतिभा, स्फूर्ती यांची आवश्यकता असते. साहित्य संशोधन हे प्राय: ग्रंथालयीन संशोधन आहे. ग्रंथालये

आणि ग्रंथ ही साहित्य संशोधकाची कर्मभूमी आहे. हे संशोधन विमर्शक विचार पद्धतीचे असले तरी संशोधनातून हाती येणारे निष्कर्ष हे भौतिक संशोधनासारखे काटेकोर नसतात.

साहित्य संशोधनाचे अंतिम उद्दिष्ट भावनात्मक सृष्टीचे मूळ शोधणे व त्याच्या शब्दरूप आविष्काराच्या सौंदर्याचे स्वरूप उलगडणे हे असते. तसेच साहित्य सौंदर्याचे आणि साहित्य श्रेष्ठतेचे अंतीम निश्चयन करावयाचे असते. नवसंशोधनाचा सारा खटाटोप साहित्याचे सौंदर्य व श्रेष्ठत्व यांच्या अधिकाधिक वस्तुनिष्ठ निर्णयाकडे जाण्यासाठी असतो. मुळात साहित्य संशोधन ही व्यापक संकल्पना आहे. जेथे जेथे आत्मपरता असते त्याला साहित्य या संकल्पनेत सामावून घेतले जाते.

साहित्य संशोधनात साहित्य हा मूळ दस्तऐवज असतो. साहित्य वाङ्मय सारस्वत हा दस्तऐवज प्रमेय सिद्धांत असतो. त्यामुळे अशा प्रकारचे संशोधन जिथे केले जाते, त्याला साहित्य संशोधन म्हणतात.

### १अ.४.३.१ साहित्य संशोधनाची उद्दिष्टे-

- अनुपलब्ध साहित्य उपलब्ध करून देणे, तसेच जे साहित्य मौखिक स्वरुपात आहे ते अक्षरबद्ध करणे, त्याचे संकलन करून त्यावर संपादकीय संस्कार करणे व सुसूत्र मांडणी करून अभ्यासपूर्ण आवृत्ती निर्माण करणे हे साहित्य संशोधनाचे एक उद्दिष्ट होय. हे पाठचिकित्सा शास्त्राच्या साहाय्याने केले जाते. संकलन ही पहिली पायरी व संपादन ही शेवटची पायरी होय.
- साहित्य कृतीच्या नवनव्या अर्थ सौंदर्याचा शोध घेणे व साहित्यकृतीतील भावनात्मक सृष्टीचे मूळ शोधणे व तिच्या शब्दरूप आविष्कारातील सौंदर्यरूप न्याहाळणे हेही उद्दिष्ट आहे.
- साहित्य कृतीतील अनुभवाची श्रेष्ठता न्याहाळणे व लेखकाची नवनिर्माण क्षमता शोधणे, साहित्यातील जीवनानुभवाचा कलाकृतीच्या श्रेष्ठत्वाशी असलेला संबंध शोधून काढणे व तिचे पुनर्मूल्यांकन करणे हेमहत्त्वाचे उद्दिष्ट आहे.
- साहित्यकृतीबद्दल शोधदृष्टीने जे भावते ते वस्तुनिष्ठ पद्धतीने मांडणे.
- साहित्य परंपरेचा शोध घेणे, वाङ्मय प्रकार, कालखंड, प्रवृत्ती आशय, प्रेरणा, तत्त्वज्ञान, ग्रंथकार यांचा अभ्यास करणे हेही एक उद्दिष्ट आहे.
- शैली विज्ञानशास्त्राच्या साहाय्याने कलाकृतीचा आशय आणि अभिव्यक्तीचा पोत न्याहाळणे.
- तुलनात्मक संशोधनातून कलाकृतीवर व परंपरेवर प्रकाश टाकणे.

ही साहित्य संशोधनाची काही ठळक उद्दिष्टये आहेत.

मराठी साहित्य संशोधन हे तात्त्विक सिद्धांतपर, संपादनपर आणि आत्मनिष्ठ प्रक्रियेवर आधारितआहे. म्हणूनच साहित्य संशोधन ही एक अर्थपूर्ण, अन्वयार्थक आणि बुद्धिपुरस्सर अशी अभिक्रिया आहे. या विद्याशाखेचे स्वरुप गुंतागुंतीचे व संमिश्र आहे.

साहित्य ही एक निर्मिती आहे. त्यामुळे कलानिर्मिती, अभिव्यक्ती, रूप गोचरत्व, आविष्कार ही वेगळी प्रक्रिया ठरते. साहित्य कलेकडे बघण्याचे स्वातंत्र्य समीक्षकाप्रमाणे संशोधकालाही आहे. संशोधक भाषिक, व्याकरणिक, बोलीभाषा तसेच सांस्कृतिक, धार्मिक, अध्यात्मशास्त्र या अंगाने तसेच साहित्यकृतीचा कालखंड, साहित्यकृतीची प्रवृत्ती या अंगाने कलाकृतीचा शोध घेतात. साहित्य संशोधन करताना साहित्यकृतीचा आविष्कार व तिचे रूपगोचरत्व लक्षात घेणे आवश्यक आहे.

## १अ.५ विद्यापीठीय संशोधन : स्वरूप आणि वैशिष्ट्ये

गेल्या काही वर्षात ज्ञानक्षेत्रांचे स्वरूप बदलले आहे. ज्ञानविषयक संकल्पना, संकेत व्यूह बदलले आहे. उच्चशिक्षणाचे क्षेत्र केवळ ज्ञानक्षेत्र न राहता ते मोठ्या प्रमाणात जीवनान्वेषी व शोधलक्ष्यी झाले आहे. शिक्षण हे केवळ व्यक्तिगत आत्मसातीकरणाचे, आत्मगौरवाचे प्रतीक न राहता त्याला सामाजिक, सांस्कृतिक, वैचारिक व ज्ञानक्षेत्रीय असे विविध संदर्भ प्राप्त झाले आहेत. तिथपर्यंत जाण्याचा मार्ग म्हणजे संशोधन अशी संशोधनक्षेत्राची नवप्रतिमा निर्माण झालेली आहे. त्यामुळे ज्ञानक्षेत्रीय विविध अनुबंधच बदलले आहेत. त्याचा प्रभाव हा महाविद्यालयीन वविद्यापीठीय अभ्यासक्रमांवर पडलेला दिसून येतो. प्रत्येक ज्ञानक्षेत्र हे शोधमनस्क होऊ लागले आहे. त्यामुळे नव्या पदव्या (शोध) निर्माण होत आहेत.

प्रस्थापित शोधपदव्यांचे अधिष्ठान अलीकडच्या काळात बदललेले आहे. प्रत्येक ज्ञान क्षेत्र आपली शोध–वैशिष्ट्ये निश्चित करण्याचा प्रयत्न आजही सुरु आहेत. पदवी व पदव्युत्तर पदवी पातळीवरील संशोधनाची शोधवैशिष्ट्ये ठरविणे गरजेचे झाले आहे. अलीकडचे संशोधन हे केवळ ज्ञानलक्ष्यी न राहता ते मोठ्या प्रमाणावर अवलंबनीय झाले आहे. तसेच त्यात तांत्रिक सिद्धांत-सूत्र-प्रधान व प्रत्यक्षावलंबी अनुबंध निर्माण झाले आहेत.

आज विद्यापीठीय आणि एकंदर संशोधन अभिक्रीयेला विशेष महत्त्व प्राप्त झालेले दिसून येते. एकविसाव्या शतकातील बदलत्या घटना घडामोडींची चाहूल ज्ञानक्षेत्राला लागल्याचे हे संकेत मानता येईल. संशोधन हा विषय आणि त्यामागील ज्ञानशास्त्रीय अनुबंध बदलले आहेत. विविध पदव्या, पदविका, पदव्युत्तर पदव्या यांच्या रूपाने टायचे स्तरीकरण झालेले आहे.

वर नमूद केल्याप्रमाणेशोधविद्येचे खालीलप्रमाणे स्तरीकरण झालेले आहे. पदव्युत्तर स्तर - एम्. ए., एम्. कॉम., द्विपदव्युत्तर स्तर – प्रामुख्याने एम. फिल, डॉक्टरेट म्हणजे तज्ज्ञता, व्यासंग, संशोधनलक्ष्यी अवस्था असे शोधविद्येचे स्तरीकरण झालेले आहे. सहाजिकपणे या प्रत्येक अवस्थेतील संशोधनाच्या उपक्रमांची व्याप्ती, मर्यादा, उद्दिष्टे, अपेक्षा आदींचे निश्चितीकरण झाल्याने त्यादृष्टीने प्रबंध लेखन करणे सोपे झालेले आहे.

विद्यापीठ पातळीवरील संशोधन प्रक्रियेचा असा परिणाम झाला की, शोधविद्या म्हणजे संशोधन हे विविध स्तरयुक्त झाले. शोधपदव्यांची नावे जुनी राहिली. शोधाचे स्वरूप बदलले. ज्या नव्या पदव्या आल्या, त्यांना नवी नावे आली. पण त्याचवेळी मूलभूत शैक्षणिक धारणेत फरक पडला. श्रेष्ठ-उच्च पदव्यांना ज्ञानक्षेत्रीय उच्चत्तर उमेदवारीचे स्वरूप धारण करणाऱ्या पदव्या असे रूप प्राप्त झाले.

विद्यापीठीय संशोधनामध्ये ज्या उच्च स्तरीय पदव्या होत्या. त्याचे एम. फिल., पीएच. डी. व डी. लिट असे विविध स्तरयुक्त नामकरण केले गेले. त्याचे कारण या शोध पदव्या होत्या व आहेत.

## १अ.६ विद्यापीठीय संशोधनाचे स्वरूप

पूर्वी ज्ञानाची कक्षा मर्यादित होती. त्यामुळे विषयांमधील वा ज्ञानशाखेतील उपलब्ध असलेले ज्ञान परिचयात्मक पातळीवर प्रतीकात्मक रीतीने पदव्युत्तर (एम. ए., एम. एससी., एम. कॉम.) पातळीवरच्या पदव्यांसाठी, आकलनासाठी नेमले जात असे व तो पदवीधारक त्या प्रमाणात पारंगत म्हणून ओळखला जात असे. अलीकडच्या काळात जो ज्ञानाचा विकास होत आहे. त्याला ही पारंपरिक पारंगतता कमी पडते म्हणून पारंगततेची पूर्वतयारी असे स्वरूप पदव्युत्तर पातळीच्या (एम. ए. वगैरे) अभ्यासक्रमास प्राप्त झालेले दिसून येते. त्यामुळे एम. ए. वगैरे पातळीवरचे प्रबंध, शोधप्रबंध का नाहीत हे स्पष्ट होईल. पदव्युत्तर स्तरावरील लिहिलेल्या शोध निबंधात – एम. ए. एम. कॉम. एम. एस्सी.) पारिभाषिक संज्ञा, संकल्पना, सिद्धांत सूत्रे, नियम, संकेत, अवलंबनसूत्रे, आकलनपूर्वक उपयोजन, आवश्यक तेवढे शोध, संस्करण अपेक्षित असते. त्याच्या आधारे विषयाशी संबद्ध अशा काही परिक्षेत्रात पारंगतता मिळविणे शक्य असते. याचा अर्थ पारंगतता परिपूर्णपणे आत्मसात होण्यासाठी शोधप्रबंधाची तरतूद ही शोधप्रक्रियालक्ष्यी नसून विषयनिष्ठ अशी पारंगततालक्ष्यी आहे. म्हणजेच पदव्युत्तर (एम.ए.) पातळीवरचा शोधनिबंधक उच्च पातळीवरच्या लेखनाचा अवलंबनप्रक्रियेचा एक वस्तुपाठ असतो. थोडक्यात, एम. ए. पातळीवरचा अभ्यासक्रम हा उमेदवारीच्या स्वरूपाचा असतो. शोधनिबंध आदी संज्ञा केवळ शोधन हे ज्ञानमार्ग द्योतकाचे प्रतीक म्हणून आलेल्या आहेत. या अभ्यासक्रमात शोध निबंधासाठी निवडावयाविषयही तसे पारंगतता पातळीवरचे असतात. शोध अभिक्रियेचे मुख्य लक्षणज्ञानात अल्पशी का होईना नवी भर घालणे असते.

स्वातंत्र्योत्तर काळात संशोधनाला चालना मिळावी यासाठी उच्च पातळीवर मौलिक आणि मूलभूत स्वरूपाचे संशोधन करणाऱ्या राष्ट्रीय पातळीवरील विविध ज्ञानशाखांसाठी प्रयोगशाळा निर्माण करण्यात आल्या. विद्यापीठ अनुदान मंडळाच्या स्थापनेचे विद्यापीठ पातळीवर निरनिराळे संशोधनलक्ष्यी उपक्रम सुरू झाले. विद्यापीठ ही केवळ परीक्षा घेणारी केंद्रे न राहता निरनिराळ्या ज्ञानशाखा विषय यासाठी त्यात अधिविभाग सुरू झाले. नवीन आश्वासने सुरु झाली. त्यामुळे विद्यापीठीय शिक्षणाचा चेहरामोहरा बदलू लागला. पदव्या त्याचं राहिल्या तरी त्यांचे स्वरूप बदलले. एम. ए. पातळीवरील अभ्यासक्रम हे पारंगततालक्ष्यी झाले. जागतिक पातळीवर ज्ञानाचा स्फोट झाला. परिणाम हा संशोधनावर झाला. संशोधन हा विषय शोभेचा, मोठेपणाचा न राहता त्याचे कार्यालक्षित लक्षात आले. त्यामुळे छोट्या मोठ्या अभ्यासक्रमात संशोधनाचा प्रवेश झाला. साहजिकच शोधविद्येचे स्तरीकरण होणे अपरिहार्य झाले

### पदवी-पदव्युत्तर संशोधन व स्तरीकरण

एम. ए. पातळीपुढची पदवी पीएच. डी. ही प्रामुख्याने नव्या अभ्यासकांसाठी उपलब्ध होती. पण ज्ञानविषयक जे परिवर्तन होऊ घातले, त्यात त्या पदवीचे अपेक्षित असलेले मोठेपण कायम राहण्यासाठी एम. ए. पातळीनंतर नवी पदवी असणे आवश्यकहोते. हे विद्यापीठ

अनुदान मंडळाच्या लक्षात आल्यानंतर एम. फिल. ही पदवी त्याच्या पुरस्कार–प्रशस्तीमुळे विद्यापीठात निर्माण करण्यात आली. विद्यापीठ पातळीवरची ही पहिली शोध पदवी अस्तित्वात आली.

एकूणच उच्च पातळीवरील संशोधन प्रधानतेचे स्तरीकरण झाल्याने उच्च पदव्या केवळ शोभेच्या पदव्या न राहता त्यांना विद्याक्षेत्रीय, ज्ञानक्षेत्रीय उमेदवारीचे स्वरूप प्राप्त झाले. तसेच उच्च शिक्षण पातळीवरील ज्ञानार्जन दर्शक संज्ञाचे अर्थ (मराठी, इंग्रजी) समान आहेत. विद्वत्ता, व्यासंग, पांडित्य, तज्ज्ञता (संस्कृत-मराठी) या संज्ञाचे अर्थ ही समान आहेत. पण स्तरीकरणामुळे त्यात तरतमभाव करणे, श्रेणीकरण करणे हे सुद्धा आवश्यक झाले. प्रबंधवाचक डिझर्टेशन, थिसिस ट्रिटाईज या ग्रंथवाचक संज्ञाचे अर्थ लक्षात घेऊन त्याचा तरतमभाव करणे आवश्यक झाले.

उच्चशोध पदवीसाठीचे प्रबंध सामान्यत: तीन प्रकारचे असतात. पहिला प्रकार म्हणजे उच्च मास्टर्स किंवा ज्येष्ठ पारंगत पदवींसाठी तयार केलेले प्रबंध तुलनेने छोटेखानी असतात. त्याला प्रासंगिक म्हणता येते. त्यात शोधलेखनाची महत्त्वपूर्ण वैशिष्ट्येसंशोधक विद्यार्थ्याने आत्मसात केलेली असतात.त्याध्ये हेच अपेक्षित असते. तसेच शोध मार्ग प्रणीत क्लृप्त्या, तंत्र, संकेत, उपाय, प्रक्रिया इत्यादींचा अवलंब करून नवे ज्ञान समोर आणणे किंवा जे ज्ञान प्रस्थापित आहे, त्याचे व्यवस्थापन, पुनर्मांडणी करणे हे अपेक्षित असते. या प्रबंधासाठी कालमर्यादा सहा महीने ते एक वर्ष अशी असते. तसेच त्याचा विस्तार हा १०० ते १२५ पृष्ठांपेक्षा अधिक अपेक्षित नसतो.

दुसऱ्या स्तरावरील शोधप्रबंध म्हणजे डॉक्टरेट पदवीसाठी तयार केलेले प्रबंध. त्या प्रबंधाची तयारी दीर्घकाल (दोन ते तीन वर्षे) केलेली असणे अपेक्षित आहे. त्या प्रमाणात त्याची व्याप्ती व विस्तार अधिक असावा. पीएच. डी. पदवीसाठीचा प्रबंध उपक्रम म्हणजे व्यासंग – क्षेत्रीय उमेदवारी होय. ह्या संशोधनात अधिक प्रगल्भता, सखोलता, व्यासंग अपेक्षित आहे. मौलिक स्वरूपाचे शोधकार्य या दृष्टीने या प्रबंधांना महत्त्व आहे. पण पीएच. डी. शोधकार्य हे शोध–मार्गदर्शकाच्या मार्गदर्शनाखाली करावे लागते. ही विद्वत्तक्षेत्रीय उमेदवारीच होय. पण ती अध्ययन, अध्यापन, प्रयोजन यांनी अधिक प्रगल्भ झालेली असते. या शोधकार्यात सूक्ष्म विचारविश्लेषण, सुस्पष्ट युक्तिवाद, चिकित्सक पाहणी या गोष्टी अपेक्षित असतात. या दृष्टीने नवीनवी क्षेत्रे स्वतःच्या कक्षेत आणण्याचा हा तज्ज्ञांचाउपक्रम असतो. प्रबंधात अव्वल दर्जाची मौलिकता अपेक्षित असते.या दुसऱ्या स्तरावरील शोध–प्रबंधाचे स्थान थोडेफार स्वयंसिद्ध असते. तिसरा स्तर हा अत्यंत थोड्या लोकांच्या कक्षेत येण्यासारखा आहे. यात डी. लिट्., डी. एस्सी.अशा पदव्यांचा उल्लेख करावा लागतो. हा प्रबंध तसा ज्ञानक्षेत्रातील काहीतरी अस्सल, नवे योगदान देणारा असावा अशी अपेक्षा असते. डी. लिट्., डी. एस्सी. पदव्यांसाठीचे संशोधन कोणाच्याही मार्गदर्शनाखाली केलेले संशोधन नसते. हा प्रबंध म्हणजे विद्वत क्षेत्रातील मौलिक अशी कामगिरी होय. हा स्वतंत्र ग्रंथ (साधनिक प्रसुचिका) (बिब्लिओग्राफी) सूची (इंडेक्स) परिशिष्टे इत्यादींनी परिपूर्ण असावा व त्यात संदर्भावत्ता मोठी असावी अशी अपेक्षा असते. पीएच. डी. सारख्या पदवीनंतर संशोधनक्षेत्रातील महत्त्वपूर्ण अनुभवानंतर महत्त्वाचे ग्रंथरूप कार्य म्हणून ह्या उपक्रमाचे अनन्यत्व असावे अशी अपेक्षा असते. लेखकाचे संशोधनकार्य व अनुभव यांना महत्त्वपूर्ण स्थान आहे. शोधक्षेत्रीय प्रबंध-श्रेणीचे प्रमुख टप्पे मानता येतात. चढत्या श्रेणीची

ही उदाहरणे असल्याने प्रत्येक श्रेणीच्या काही अपेक्षा असतात. त्या विचारात घेऊन प्रबंध-सिद्धता करावी लागते.

**विद्यापीठीय संशोधनाची उद्दिष्टे-**

१. सर्व प्रकारच्या संशोधनाला चालना देणे विद्यापीठीय संशोधनाचे मुख्य उद्दिष्ट आहे.

२. प्राध्यापक, संशोधक, विद्वान, शैक्षणिक सहयोगी, इतर संशोधक यांना संशोधनाला अनुकूल वातावरण निर्माण करणे,संशोधन संस्कृती वाढविणे हे उद्दिष्ट आहे.

३. संशोधनासाठी आवश्यक साधनसामग्री,प्रयोगशाळा, ग्रंथालय,संगणक,प्रिंटर,इंटरनेट आदी पायाभूत सुविधा प्रदान करणे.

४. घटनेने नमूद केलेली संधीची समानता,न्याय या उद्दिष्टांची संशोधनात अंमलबजावणी करणे.

५. संशोधनात अधिकाधिक आंतरविद्याशाखीय संदर्भ आणणे.

६. संशोधन शिष्यवृत्ती, प्रकाशन, अनुदान इत्यादी स्वरूपात निधी उपलब्ध करून देणे.

७. प्राध्यापक, संशोधक, विद्वान यांना संशोधन लेखन प्रकाशित करण्यास प्रोत्साहित करणे.

८. प्राध्यापक व संशोधक विद्वान यांना शैक्षणिक व संशोधन स्वातंत्र्य देणे.

९. संशोधनासाठी नैतिक आचारसंहितेची मार्गदर्शक तत्त्वे तयार करून ती उपयोगात आणणे.

१०. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या नियमांचे व अटींचे पालन करून विद्यापीठीय संशोधनाची विश्वासार्हता वाढविणे.

**विद्यापीठीय संशोधनाची वैशिष्ट्ये-**

- वस्तुनिष्ठता, विश्वासार्हता,सामान्यीकरण,वैधता,पद्धतशीरपणा, अचूकता,अनुभवजन्य तार्किकता, अनुकरणीयता, नियंत्रण ही विद्यापीठ संशोधनाची उद्दिष्ट वैशिष्ट्ये आहेत. संशोधनाची इतरही काही वैशिष्ट्ये आहेत.

- वस्तुनिष्ठता -पूर्वग्रह, पक्षपातीपणा, आत्मनिष्ठता यापासून मुक्त असले तरी ते अधिक वस्तुनिष्ठ असते.

- विश्वसनीयता- कोणतेही संशोधन हे प्रत्येक वेळी समान परिणाम वा निष्कर्ष देत असेल तर ते संशोधन विश्वसनीय असते.

- विश्वसनीयता-संशोधनावरील माहिती गोळा करणे, संशोधनातील नोंदणी, निरीक्षण, विश्लेषण आणि अन्य संशोधन समजू शकतात. कोणतेही संशोधन प्रत्येक वेळी समान परिणाम व निष्कर्ष देत असेल तर ते संशोधन अधिक विश्वसनीय असते.

- सामान्यीकरण-संशोधनातून हाती येणारे निष्कर्ष सामान्य असले तरी मोठ्या लोकसंख्येला लागू पडतात.

- वैधता- संशोधन साधने,चाचण्या यात अचूकता असेल तर संशोधनातही अचूकता येते, त्यामुळे ते वैध ठरते.
- विश्वासार्हता - संशोधनासाठीची माहिती,अन्य स्त्रोत, विश्वासार्ह असले पाहिजेत, संशोधनासाठी प्रथम डेटा (मुख्य) वापरला पाहिजे.
- पद्धतशीरपणा -संशोधन पायऱ्यांच्या आधारे केलेले संशोधन पद्धतशीर असते. त्यात पद्धतशीर दृष्टिकोन अवलंबलेला असतो.
- अचूकता-सर्वोत्तम माहिती संकलन, संशोधन प्रक्रिया, योग्य नमुना निवडून संशोधन केले असता अचूक निष्कर्ष हाती येतात.
- अनुभवजन्यता-संशोधन वास्तवावर आधारित तसेच वास्तविक परिस्थितीच्या पैलूंशी संबंधित असते. तेव्हा ते अनुभवजन्य असते.
- तार्किकता -संशोधनात विगमन व निगमन पद्धती महत्त्वाची असते. तार्किक नियमांच्याद्वारे मार्गदर्शन केले जाते.
- अनुकरणीयता- भिन्न स्थिती, भिन्न पद्धती, समान निर्णय, परिणाम प्राप्त झाले तर संशोधन अनुकरणीय असते. याशिवाय विद्यापीठीय संशोधनाची आणखी काही वैशिष्ट्ये आहेत.
- स्तरीकरण -विद्यापीठीय संशोधनात शोध पदव्यांचे स्तरीकरण झालेले आहे. संशोधनाचे पदवीनिहाय स्वरूप वेगवेगळे असते.
- ज्ञानक्षेत्राचा विस्तार - संशोधनासाठी पूरक ठरणाऱ्या ज्ञानक्षेत्राचा विस्तार करण्याकडे कल असतो.
- प्रत्यक्ष अवलंबन - पारिभाषिक संज्ञा, संकल्पना,सिद्धांत, सूत्रे,नियम यांचे उपयोजन अवलंबनातून संशोधनात पारंगतता आणली जाते.
- अध्यापन पूरकता - विद्यापीठीय संशोधन हे अध्यापन पूरक असते.
- जीवनान्वेषी- संशोधन हे जीवनान्वेषी व जीवनाचा वेध घेणारे,गुणवत्ता सुधारण्यास मदत करणारे असते.
- कालमर्यादा -संशोधनाला कालाची मर्यादा आखून दिलेली असते. त्या कालावधीत ते पूर्ण करणे आवश्यक असते.
- व्यापकता- सर्व प्रकार व सर्व पद्धतीचा अवलंब विद्यापीठीय संशोधनात केलेला असतो. नवीन ज्ञान क्षेत्राची निर्मिती होत असते.त्यात व्यापकता असते.

**विद्यापीठीय संशोधन व्याप्ती व मर्यादा-**

विद्यापीठीय संशोधन हे एम.फिल., पीएच. डी., डी. लीट. या संशोधन पदव्यासाठी असते. त्यामुळे त्याची व्याप्ती ठरलेली असते. एम. फिल. पदवीसाठी प्रबंधिका लिहावी लागते. तो

प्रबंध नसतो हे लक्षात घेऊन विषयाची व्याप्ती ठरवावी लागते. लघुनिबंधाची आशय विश्लेषणाची पृष्ठसंख्या शंभर पानापर्यंत असते. संशोधनात कोणत्या पैलूवर आपण लक्ष केंद्रित करणार, कोणत्या साधन साहित्याच्या आधारे करणार आहोत ही त्या संशोधनाची व्याप्ती होय. प्रबंधिकेची शब्द मर्यादा तसेच संशोधनाचा कालावधी याचा विचार व्याप्तीमध्ये महत्त्वाचा ठरतो. एम.फिल. प्रबंधिकेची शब्द मर्यादा तसेच संशोधनाचा कालावधी अठरा महिने असतो. त्यामुळे एम. फिल. साठी प्रबंधिका लिहिताना संशोधन पद्धतीचा समग्र अभ्यास अभिप्रेत असतो. तसेच विषयाची व्याप्ती लक्षात घ्यावी लागते.

पीएच.डी. पदवीसाठी संशोधन प्रबंध लिहिताना एम.फिल. प्रमाणेच विषयाची व्याप्ती ठरवावी लागते. प्रबंधाच्या विषयाचे आशयाचे विश्लेषण करण्यासाठी लागणारी पृष्ठसंख्येची मर्यादा १५० पेक्षा अधिक असल्याने त्याचा विचार विषय व्याप्ती ठरवताना केला जातो. संशोधनात कोणत्या पैलूवर लक्ष केंद्रित केले जाणार,तसेच कोणत्या साधनसामग्रीच्या आधारे संशोधन करणार याचा विचार व्याप्तीमध्ये महत्त्वाचा ठरतो पीएच.डी. पदवीसाठीचा प्रबंध १८ महिन्यानंतर कधीही तीन वर्षाच्या काळात सादर करता येतो. त्यामुळे पीएच.डी. या संशोधनासाठी प्रबंध लेखन करताना संशोधन पद्धतीचा समग्र अभ्यास अभिप्रेत असतो. तसेच विषयाची व्याप्ती लक्षात घ्यावी लागते.उदा. वि.वा.शिरवाडकर यांनी कथा, कविता, नाटके,कादंबरी असे लेखन केलेले आहे. हे सर्व साहित्य संशोधनासाठी घेऊन विहित कालावधीत मर्यादित पृष्ठ संख्येत प्रबंध सादर करणार आहोत का? याचे उत्तर प्रथम द्यावे लागेल. शिरवाडकर यांच्या सर्व साहित्याचा अभ्यास करण्यापेक्षा कविताच संशोधनासाठी निवडल्यास आदर्श जीवनमूल्यांची मांडणी करण्याऱ्या कवितांचा एक वर्ग कल्पून ठरवलेल्या कालावधीत सखोल संशोधन करता येईल. कवितांमधील समानसूत्र अभ्यासाची योग्य दिशा ठरविण्यास मदत करते. सर्व प्रकारच्या विद्यापीठीय संशोधनाची व्याप्ती थोड्याफार प्रमाणात सारखी असते. डी.लिट पदवीच्या संशोधनाची व्याप्ती ही पीएच.डी. पदवीच्या संशोधनासारखीच असते. फक्त फरक एवढाच असतो की डी.लिट पदवीसाठी संशोधकाने मार्गदर्शकाच्या मार्गदर्शनाशिवाय स्वसामर्थ्याच्या आधारे संशोधन करावे लागते.

संशोधनाची व्याप्ती म्हणजे अभ्यासासाठी कोणते क्षेत्र निवडले, त्या क्षेत्रातील घटक कोणत्या नमुना पद्धतीने निवडले, त्या घटकांमधील कोणती माहिती काटेकोरपणे जमा केली हे स्पष्ट शब्दात सांगणे. संशोधन नेमके कोठे संपते हे स्पष्ट झाल्याने माहितीवरून काढलेले निष्कर्ष किती प्रमाणात व्यापक आहेत हे अन्य अभ्यासक तसेच संशोधकाला स्पष्ट होते.संशोधकाचा प्रामाणिकपणा त्यातून व्यक्त होतो.

विद्यापीठीय संशोधनातील सादरीकरणाबरोबर त्याची व्याप्ती आपण लक्षात घेतली. संशोधनाच्या व्यापकतेबरोबर विद्यापीठीय संशोधनाला काही मर्यादा आहेत.

*एम.फिल, पीएच.डी. पदवीकरताच्या प्रबंधिका व प्रबंध लेखनावर विस्तारदृष्ट्या पृष्ठ संख्येची मर्यादा घातलेली आहे.

- एम.फिल.साठी १०० पृष्ठांची,तर पीएच.डी.साठी दीडशेपेक्षा अधिक पृष्ठसंख्या असावी.

- संशोधन हे विहित कालावधीत पूर्ण करणे एम. फिल. बारा महिने, तर पीएच. डी. १८ महिन्यानंतर पूर्ण करणे.

- संशोधन करताना विशेषतःसाहित्य संशोधन करताना एकाच सूत्राचा तसेच एकाच दुसऱ्या पद्धतीचा आधार घ्यावा लागतो.
- एम. फिल पदवीसाठीच्या संशोधन विषयात व क्षेत्रात लवचिकता नसणे.
- विद्यापीठीय संशोधनात आंतरविद्याशाखीय संशोधनाचे प्रमाण नगण्य आहे.
- विद्यापीठ संशोधनातील झालेले स्तरीकरण, त्याची व्याप्ती आणि मर्यादा लक्षात घेतल्या तर आज त्या दृष्टीने नव्याने विचार संकेत निश्चित करण्याची गरज निर्माण झालेली आहे. संशोधन क्षेत्र, विषय, परिसर, गरज, विविध व्यासंग,क्षेत्र आणि त्याला असलेला अवसर लक्षात घेऊन हे विद्यापीठीय संशोधन तर अधिक सकस व जीवनान्वेषी ठरेल. संशोधक विद्यार्थ्यांच्या ठिकाणच्या गुणाच्या विकास त्यामध्ये अंतर्भूत असतो..

**विद्यापीठीय प्रबंध लेखन-**

**प्रबंध लेखन संकल्पना -**

निबंध,शोधनिबंध,दीर्घ निबंध, प्रबंधिका, प्रबंध या संज्ञा गद्य लेखनातील सुसूत्रता, शिस्तबद्धता, भाषापरता व गुणविशेषांच्या वाढत्या अपेक्षा व्यक्त करणाऱ्या संज्ञा आहेत. त्यापैकी प्रबंध हा लेखनप्रकार काही विशिष्ट गुणवैशिष्ट्यांनी युक्त असला पाहिजे. ज्या विषयात मौलिक स्वरूपाच्या संशोधनास वाव आहे,असा विषय निवडून त्यावर प्रबंध लेखन केले जाते. हे प्रबंध लेखन वस्तुनिष्ठत पद्धतीने आणि विगमन,निगमन पद्धतीने झाले पाहिजे. घटनांचा वेध, शोध,त्याचे वर्गीकरण व त्यातून सिद्धांत स्थापना ह्या तीन पायऱ्या आधारात घेऊन संशोधनास प्रारंभ करणे आवश्यक आहे. तत्पूर्वी संशोधनाचे प्रयोजन कोणते याचा विचार संशोधकाने केला पाहिजे. विचार म्हणजे अभ्युपगम आणि सिद्धांत कल्पना होय. प्रबंधाच्या बाबतीत सिद्धांत स्थापनेच्या पद्धतीला म्हणजे विगमन पद्धतीला अधिक महत्त्व आहे.

मराठीतील विविध विषयांवर अनेक अभ्यासक प्रबंध लेखन करतात त्यावेळी संशोधकांना प्रबंध लेखनात अनेकदा विविध ललित साहित्य कृतींचा परामर्श घ्यावा लागतो. त्यावेळी कवितेची मध्यवर्ती कल्पना,कादंबरीतील वातावरणनिर्मिती, कथेतील स्वभाव लेखन व नाटकातील पात्रचित्रण, चरित्रांची भाषाशैली अशा ढोबळ मुद्द्यांना धरून हा परामर्श घेऊन चालणार नाही. अशा अभ्यासाला अनुषंगिक अभ्यासक्षेत्रांचे ज्ञान असणे आवश्यक असते. त्याशिवाय ललित साहित्य कृतीतून व्यक्त झालेल्या जीवनानुभवांची उंची, खोली व व्यापकता विशद होणे कठीण असते.उदा.वि.स. खांडेकरांच्या कादंबरीतील समाज दर्शन असा प्रबंध विषय असेल तर संशोधकाने मीमांसा काळजीपूर्वक करणे आवश्यक आहे.

साहित्यात समाज जीवनाचे प्रतिबिंब पडलेले असते. या सिद्धांताचा इथे आधार घेऊन संशोधन केले पाहिजे. पण पुष्कळ वेळा साहित्यात दिसणारे समाजाचे चित्रण संपूर्ण सत्य नसते. म्हणून खांडेकरांच्या अन्य साहित्यातून सामाजिक आशयाचे निष्कर्ष काढताना ते लक्षात ठेवले पाहिजे.

संशोधनाचे दोन प्रकार आहेत- ज्ञात नसलेल्या ग्रंथाचीसंहिता नव्याने उपलब्ध करून देणे. दुसरा प्रकार म्हणजे उपलब्ध असलेल्या ग्रंथातील आशयाचा व त्यातील विचारसरणीचा काही नवा अन्वयार्थ लावणे.

**प्रबंध विषय निवड -**

प्रबंध विषयाची निवड करताना काही गोष्टी ध्यानात घेणे आवश्यक आहे. पहिली गोष्ट म्हणजे प्रबंध विषय अभ्यासकाला आवडेल असाच असला पाहिजे. त्याने आपल्या संशोधन मार्गदर्शकाबरोबर चर्चा करून त्यांच्या पूर्ण संमतीने तो विषय निवडलेला असावा. मार्गदर्शकाने सूचवला वा सांगितला म्हणून तो विषय निवडू नये. दुसरे म्हणजे प्रबंध विषय आटोपशीर असावा. विषयाचा विस्तार आणि पसारा भरमसाठ असेल तर प्रबंध परिचयवजा व पसरट होण्याची शक्यता असते. उदा. फडके- खांडेकर साहित्य,मराठी नाटके असे व्यापक विषय शेवटी अडचणीचे ठरतात. अशा विषयांच्या मुळाशी जाणे, प्रमेय शोधणे कठीण जाते पण विषयाच्या आटोपशीरपणाची कल्पना खूप आटोपशीर असू नये तसाच विषय अव्याप्तही असू नये.

विषय आवडीचा असावा, आटोपशीर असावा आणि अल्पज्ञात असावा. अभ्यासकांची झेप मोठी असेल तर सर्वज्ञात विषयाला तो नवी परिमाणे प्राप्त करून देऊ शकतो. विषय निवड करताना आणखी एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे ती अशी की शक्यतो एकच साहित्यिक, ग्रंथकार संशोधकाने संशोधनासाठी निवडू नयेत.

प्रबंध विषय निवडताना अनेक अभ्यासकांचा'अभ्यासासाठी विषय उरले नाहीत' असा समज असतो. पण संशोधनाच्या क्षेत्रात अनेक विषय संशोधनासाठी उपलब्ध आहेत. रूढ विषय सोडून नावीन्यपूर्ण व महत्त्वपूर्ण विषय निश्चित करणे हे अभ्यासाच्या प्रारंभी महत्त्वाचे ठरते.

**प्रबंध लेखनासाठी खालील विषय अभ्यासक निवडू शकतात**.

**अ)एका ग्रंथकाराचा अभ्यास-** महानुभाव, वारकरी संप्रदायातील संत,त्यांचे साहित्य,उदा. चक्रधर,गोविंदप्रभू यांचे साहित्य,संत निवृत्तीनाथ, संत ज्ञानदेव यांचे साहित्य, संत चोखामेळा,संत निळोबा यांचाही अभ्यास करता येईल. तसेच श्रीधर, नागेश प्रभूंतींचे आख्यानकाव्यही संशोधनविषय म्हणून निवडता येतील. तसेच कुसुमावती देशपांडे इरावती कर्वे,कवी मर्ढेकर, विभावरी शिरूरकर, श्री. ना. पेंडसे,अ. का. प्रियोळकर,रा.श्री.जोग, वा.ल. कुलकर्णी, कुसुमाग्रज असे अर्वाचीन ग्रंथकारही अभ्यासासाठी निवडता येतील.

**आ)जुने वाङ्मय प्रकार -**नाट्यछटा, रूपककथा, आख्यान काव्य, महाकाव्य,चिपळूणकरी निबंध असे जुने वाङ्मयप्रकार संशोधनविषय म्हणून निवडता येतील.

**इ)नवे वाङ्मय प्रकार -**ललित साहित्य -नाटक,कादंबरी, कविता, नवकथा, नवकाव्य असे वाङ्मय प्रकार निवडून त्या प्रकारातील साहित्य अभ्यासासाठी निवडण्यास भरपूर वाव आहे.

**ई)नियतकालिकांची वाङ्मयीन कामगिरी-**'विविध ज्ञानविस्तार', 'जोत्सना', 'करमणूक','अभिरुची', 'प्रतिभा' इत्यादी नियतकालिकांनी कशा पद्धतीने वाङ्मयीन विचार मांडून वाङ्मयाचे भरण पोषण केले त्याचा चिकित्सक अभ्यास करता येईल.

**ए)साहित्यशास्त्र -**रस विचार, अलंकार,वृत्त प्रकार,प्रतिमा विचार, शोकांतिका संकल्पना, मुक्त छंद इत्यादी विषयांचा मराठीच्या संदर्भात तत्त्वविचार विशद करून प्रबंधलेखन करण्यास भरपूर संधी आहे.

**ऐ)भाषाशास्त्र व व्याकरण -**भाषाशास्त्र व व्याकरण ही अभ्यासक्षेत्रे अभ्यासकांना उपलब्ध आहेत.मराठी भाषेवर कानडी,इंग्रजी,फारशी, उर्दू भाषेचा प्रभाव,मराठीचा कालीक अभ्यास मराठीच्या बोलींचा अभ्यास, विभक्ती व्यवस्था, प्रयोग विचार असे अनेक विषय अभ्यासकांसाठी उपलब्ध आहेत.

**ओ)साहित्य आणि सामाजिक संदर्भ-** राजकारण समाजकारण,धर्मकारण इत्यादींचा साहित्याशी संबंध असतो.संस्कृती संवर्धन, लोकजीवन यांच्या संदर्भात साहित्य मीमांसेला भरपूर वाव असतो. राजकीय स्थित्यंतरे व सामाजिक घटिते, धार्मिक चळवळी यातून साहित्याची स्थितीगती ठरते. त्याचा साहित्यनिर्मितीशी असलेला अनुबंध जाणून घेण्याच्या दृष्टीने अभ्यास होऊ शकतो.

**औ)लोकसाहित्य-** लोकसाहित्यातील लोककथा,लोकगीते, लोकनाट्य इ. प्रकारांचा विविधांगी चिकित्सक अभ्यास करता येतो.

वरील मुख्य विषय आहेत.या विषयांमधून पीएच.डी. संशोधनासाठी विषय निवडून अभ्यास करता येतो.सर्जनशील अभ्यास हा पीएच.डी.साठी करायचा असतो.या वरील विषयांमधून विषय निवडून वाचन, अवलोकन करावे.

**प्रबंधाची पूर्वतयारी -**

प्रबंध विषय,मार्गदर्शकांनी सांगितलेले निकष,अभ्यासकाच्या चिंतनातून हाती आलेले विषय या विषयांमधून दोन ते तीन विषय निवडावेत.त्यांचे पसंतीनुसार अनुक्रम ठरवावेत. पहिल्या पसंतीच्या विषयाची संदर्भसूची तयार करणे हे पहिले काम असते. ही सूची मराठी, इंग्रजी,संस्कृत, हिंदी अशी असावी. त्यात स्वतंत्र ग्रंथ,अनुवादित ग्रंथ,संपादित ग्रंथ,नियतकालिकातील लेख,वृत्तपत्रातील लेख यापैकी जे साहित्य उपलब्ध होईल त्यातून आपल्या विषयाची टिपणे काढावीत. त्या आधारे संकल्पित विषयावर पंचवीस-तीस पानांचा निबंध(गोषवारा) लिहावा. तो निबंध विद्यापीठाच्या संशोधन केंद्राच्या मार्गदर्शकास भेटून त्यांना वाचण्यासाठी द्यावा. निबंध वाचल्यानंतर मार्गदर्शकास पहिला विषय नाही आवडला तर दुसऱ्या विषयावर निबंध लिहून द्यावा. आणि शेवटी दोघांच्या विचार विनिमयातून संशोधनाच्या विषयाची निश्चिती करावी. प्रबंध विषय व मार्गदर्शक ठरविताना एक दोन व्यावहारिक बाबी लक्षात घेतल्या पाहिजेत. एक तर मार्गदर्शक स्थानीक असावेत त्यामुळे त्यांची गाठभेट घेणे सुलभ होते. त्याचबरोबर संशोधन केंद्राचे अंतर,प्रवास याही गोष्टी लक्षात घेतल्या पाहिजेत.

संशोधन विषयाची निश्चिती झाल्यानंतर विद्यापीठात नाव नोंदणी करावी.

१. विद्यापीठाचा नाव नोंदणी अर्ज (मार्गदर्शकाच्या शिफारसीसह) असला पाहिजे.

२. एम.ए. पदवी परीक्षा गुणपत्रक आणि प्रमाणपत्र सत्यप्रतीसह आवश्यक असते.

३. अन्य विद्यापीठात नाव नोंदणी करायची असेल तर मायग्रेशन सर्टिफिकेट सादर करावे.

४. संशोधन केंद्राचे संचालक किंवा मराठी विभाग प्रमुखांचे शिफारस पत्र.

५. संकल्पित प्रबंध विषयाचा आराखडा व रूपरेषा त्यांच्या आवश्यक प्रती असाव्यात.

ही रूपरेषा व आराखडा स्थूल स्वरूपात विषयाची व्याप्ती विशद करणारा असावा. त्यात विषय प्रतिपादन, उद्देश,शोध पद्धती,आधार पद्धती,व्याप्ती, प्रकरणे,संदर्भ यांच्या आधारे अंतिम रूपरेषा व आराखडा ठरतो.

अभ्यासकाने निवडलेला विषय प्रबंधपात्र आहे व मौलिक स्वरूपाचे संशोधन करण्यासाठी त्याची पुरेशी व्याप्ती आहे अशी रूपरेषा वाचून तज्ज्ञ समितीची खात्री झाली पाहिजे. या समितीच्या विचारविनिमयातून वा चर्चेतून विषय व्याप्ती निश्चित ठरवून त्यास मान्यता देण्यात येते. त्यानंतर संशोधक विद्यार्थी म्हणून अभ्यासकाची नाव नोंदणी मान्य होते आणि संशोधनास खऱ्या अर्थाने सुरुवात होते.

**प्रबंध अभ्यास**

प्रबंध लेखनापूर्वी संशोधनाच्या उद्देशाची निश्चिती आराखड्यात केलेली असते. त्यानुसार विषयाचे दोन-तीन वेळा वाचन केल्याने उद्देशांमध्ये सुस्पष्टता येते. विषयाची व्याप्ती उद्देशामुळे ठरते. तसेच विषयाची अति-व्याप्ती, अव्याप्तीही उद्देशामुळे टाळणे शक्य होते. आराखड्यातील प्रकरणे, मुद्दे यानुसार अभ्यासाचे नियोजन केले पाहिजे. त्यामुळे अभ्यासात सुटसुटीतपणा येतो आणि विचारातील गोंधळ नाहीसा होतो.

प्रबंध लेखनात संशोधना इतकेच संशोधन पद्धतीला महत्त्व असते. संशोधकांना विषयाच्या आणि आशयाच्यानुसार आपली संशोधन पद्धती ठरविली तरी एकाच पद्धतीने संशोधन पूर्ण होईल असे नाही. तसे केले तर संशोधनाला मर्यादा पडतात. त्यामुळे एकापेक्षा अधिक संशोधन पद्धतीचा अवलंब संशोधनात केल्यास संशोधन अधिक व्यापक होते.

साहित्य संशोधनात वाचन व श्रवण महत्त्वाचे आहे. जाणीवपूर्वक केलेल्या वाचनाने चौकसपणा, बहुश्रुतता वाढते त्यापेक्षा संशोधन विषयाचे आयाम वाढतात. दुसरे असे की संशोधनाने प्रत्येक वेळी ग्रांथिक पुरावा उपयोगी पडतो असे नाही. परंपरेने चालत आलेल्या काही गोष्टी रुढी,मिथके, लोक समजुती,लोककथा, लोकगीते पौराणिक गोष्टी या आपल्या परंपरेचा वारसा असतात. आपण कळत-नकळत या गोष्टी श्रवण केलेल्या असतात. त्याचा उपयोग या अभ्यासात केला पाहिजे. अति प्रगत तंत्रज्ञानाच्या युगात लोकजीवनातील लोक समजुती वगैरे आजही टिकून आहेत. मानवी संस्कृतीत त्याचं स्थान अनन्य आहे.

संशोधनातील ज्या संज्ञा-संकल्पना आहेत. त्यांचाही अभ्यासकाने जाणीवपूर्वक परिचय करून घेतला पाहिजे. त्यामुळे विषय विश्लेषण संकल्पनेच्या एका शब्दातून करता येते. विषय संशोधन साधने ही विषयानुसार वेगवेगळी असली तरी पायाभूत संशोधनाची साधने सर्वांनाच आवश्यक असतात.

अभ्यासाच्या काळात औपचारिक गोष्टींकडे लक्ष द्यावे लागते. नाव-नोंदणी ते प्रबंध विद्यापीठात सादर करेपर्यंत आणि निकाल लागेपर्यंत सर्व कागदपत्रांची एक फाईल तयार करणे. त्यात नोंदणी शुल्क, सत्रशुल्क,परीक्षा शुल्क आदींच्या पावत्यांसह इतर कागदपत्रे नीट ठेवणे आवश्यक आहे. मार्गदर्शकाकडे सादर केलेले प्रकरण लेखन, त्यांच्याकडून आलेल्या सूचना यांची एक फाईल ठेवावी. या औपचारिक भागात अभ्यासाची नोंद, ग्रंथालयातून आणलेली पुस्तकं यांच्या नोंदी ठेवाव्यात. तसेच मार्गदर्शकाच्या भेटी, मुलाखती आदींची नोंद ठेवणे गरजेचे असते.

यानंतर अभ्यासाचा दुसरा भाग येतो त्यात सिद्धता सूची बनविणे. प्रबंध विषयावर सहजपणे उपलब्ध झालेल्या साहित्याची संपूर्ण सूची बनवावी लागते. उदा. ग.त्र्यं.माडखोलकर: एका ग्रंथकाराचा अभ्यास, हा प्रबंध विषय असेल तर माडखोलकरांच्या संपूर्ण साहित्याची एक सूची तयार करावी लागेल व दुसरी सूची माडखोलकर विषयक साहित्याची करावी लागेल. सूची तयार झाल्यानंतर प्रबंधाच्या अभ्यासाचा पुढचा टप्पा सुरू होतो. प्रत्यक्ष अभ्यासाविषयी मूलभूत साहित्य वाचून त्याची टिपणे काढणे.उदा. चिं.त्र्यं. खानोलकर यांच्या कवितेचा चिकित्सक अभ्यास हा विषय निवडलेला असेल तर प्रथम खानोलकरांचे समग्र वाङ्मय अभ्यासावे. त्यानंतर एकेक कविता संग्रहाचा स्वतंत्रपणे अभ्यास करून ती टिपणे काढावीत. त्यानंतर संदर्भ साहित्य,त्यानंतर खानोलकरांच्या साहित्याचे समीक्षावाचन करणे, मार्गदर्शकाशी चर्चा करून आपल्या मतांचा, अभ्यासाचा पडताळा घेतला पाहिजे. इथपर्यंतच्या अभ्यासातून व मार्गदर्शकाशी केलेल्या विचार विनिमयातून समग्र प्रबंधाचे चित्र समोर उभे राहिले पाहिजे. यानंतर प्रबंध लेखनाचा तिसरा टप्पा सुरू होतो.

**प्रबंध लेखन**

प्रत्यक्ष प्रबंध लेखनात सुरुवात करण्यापूर्वी अनुक्रम, प्रस्तावना, भूमिका, विविध प्रकरणे, उपसंहार, परिशिष्टे, संदर्भसूची या क्रमाने संपूर्ण प्रबंध कसा उभा करावा याबद्दलची सुस्पष्टता अभ्यासकाला आली पाहिजे. तसेच प्रकरणाचे नाव, उपोद्घात,विविध मुद्दे,उपशीर्षक, प्रतिपाद्याची मांडणी,आधीच्या प्रकरणाचा पुढच्या प्रकरणाशी व एकूण प्रबंधाशी असलेला अनुबंध याची कल्पना अभ्यासकाला असली पाहिजे. प्रबंध लेखनासाठी वरील गोष्टींची सुस्पष्टता आल्यानंतर प्रबंध लेखनाला सुरुवात करावी. प्रबंध लेखनात आधार वा पुराव्याची गरज असते.त्याशिवाय प्रकरण लेखन करू नये. आपला सिद्धांत विशद करण्यासाठी आणि विधानाला बळकटी येण्यासाठी आधार व पुरावा दिला पाहिजे. आधार म्हणून द्यावयाची अवतरणे ही मूळ ग्रंथातील असली पाहिजेत. प्रत्येक प्रकरणाच्या अखेरीस १,२,३,४ असे क्रमशः आकडे देऊन त्यांचे संदर्भ नोंदविले पाहिजेत. शेवटचा मुद्दा समारोपाचा असावा. त्यात प्रकरण विवेचनाचे सार सांगून आपले निष्कर्ष मांडले पाहिजे. प्रकरणातील मुद्द्यांची वीण ही सहज सिद्ध असावी. प्रत्येक प्रकरणातील संपूर्ण विवेचन हे अतिशय पक्के व युक्तिवाद बिनतोड असला पाहिजे.

**प्रबंधाची भाषाशैली**

संशोधन हे प्रबंधाचे प्राणतत्त्व असते. संशोधनप्रधान लेखन सटीप,सुसंगत व साधार असावे. शैली अचूक, अल्पाक्षर आणि अर्थबहुल असावी. संदिग्ध व क्लिष्ट शैलीला प्रबंध लेखनात मुळीच स्थान नाही. इतरांच्या शैलीचे अनुकरणही लेखनात केलेले नसावे. वस्तुनिष्ठ भाषाशैली प्रबंध विषयास न्याय देऊ शकते. भाषा काटेकोर असावी. आलंकारिक व प्रतिशब्द भाषेत टाळले पाहिजेत.शब्दयोजना निश्चिततादर्शक असावी. शैली पूर्वग्रह दूषित, अतिशयोक्तीपूर्ण, भावनाप्रधान असली तर सत्यशोधनास अडथळे उत्पन्न होतात. व्याकरणदृष्ट्या भाषा शुद्ध असली पाहिजे. मजकुरात उपयोजिलेल्या संज्ञा व संकल्पना यात सुस्पष्टता असली पाहिजे. अक्षरविन्यास, पृथगात्मकता नेमकी हवी. एखाद्या संज्ञेविषयी एकदा वापरलेला विशिष्ट संक्षेप पुन्हा जसाच्या तसा योजिला पाहिजे. त्यात बदल होऊ

नयेत. प्रबंधात द्यावयाचे विविध संदर्भ तत्रैव व उनि यांचे उपयोग, संदर्भसूची इत्यादी संदर्भातील सूचना अनुसरल्या पाहिजेत.

प्रबंधाची प्रकरणे जसजशी लिहून होतील तसतशी मार्गदर्शकांकडून ती तपासून घ्यावीत. व त्यानंतर टंकलेखनासाठी द्यावी. टंकलेखन पूर्ण झाल्यानंतरप्रबंधाचे मुद्रितशोधन करुन घ्यावे. शेवटीविद्यापीठाच्या सूचनेनुसार प्रबंधाची बांधणी करून चार प्रतींमध्ये प्रबंध विद्यापीठाला सादर करण्यात यावा.

## १अ.७ संदर्भ ग्रंथ सूची

**संदर्भ ग्रंथ सूची –**


| | | | |
|---|---|---|---|
| १. | आवलगावकर, अविनाश (संपा.) २००६ | : | ‘मराठी साहित्य संशोधन : नव्या दिशा’, प्रतिमा प्रकाशन, पुणे. |
| २. | कऱ्हाडे, बी. एन. २००७ | : | ‘शास्त्रीय संशोधन पद्धती’, चिपळापुरे अँड कंपनी, नागपूर. |
| ३. | कोलते, वि. भि. १९६८ | : | ‘प्राचीन मराठी साहित्य संशोधन’ डोकळे प्रकाशन, पुणे. |
| ४. | अरारे, वि. रा. २००४ | : | ‘सामाजिक शास्त्रांची संशोधन प्रणाली’, अद्वैत प्रकाशन, अकोला. |
| ५. | जोशी, वसंत १९८१ | : | ‘भाषा व साहित्य संशोधन’, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे, खंड-१. |
| ६. | संत, दु. का. १९८८ | : | ‘संशोधन पद्धती : प्रक्रिया आणि अंतरंग’, विद्यार्थी गृह प्रकाशन, पुणे, द्वि.आ. |


## १अ.८ सरावासाठी प्रश्न

१. संशोधन म्हणजे काय ते सांगून संशोधनाचे स्वरूप व वैशिष्ट्ये विशद करा.

२. संशोधनाच्या विविध व्याख्या सांगून साहित्य संशोधनाचे वेगळे स्वरूप स्पष्ट करा.

३. वैज्ञानिक, सामाजिक व साहित्य संशोधन पद्धतींमधील साम्यभेदांची चर्चा करा.

४. साहित्य संशोधन हे वैज्ञानिक व सामाजिक संशोधनापेक्षा कसे वेगळे आहे ते उदाहरणासह स्पष्ट करा.

५. विद्यापीठीय संशोधनाचे स्वरूप आणि विशेष सांगा.

६. विद्यापीठीय शोध पदव्यांचे स्वरूप विशद करा.

✞✞✞✞

# २

# साहित्य संशोधन व साहित्यविचार

**घटक रचना :**

२.० उद्दिष्टे

२.१ प्रास्ताविक

२.२ साहित्य संशोधन

२.३ साहित्यविचार

२.४ साहित्य संशोधन व समीक्षा अनुबंध

२.५ साहित्य संशोधन स्वरूप आणि वैशिष्ट्ये

 २.५.१ साहित्य संशोधन स्वरूप

२.६ संदर्भग्रंथ सूची

२.७ सरावासाठी प्रश्न

## २.० उद्दिष्टे

१) साहित्य ह्या संकल्पनेचे स्वरूप विशद करणे.

२) साहित्य संशोधन संकल्पनेचे स्वरूप विशद करणे.

३) समीक्षा ही संकल्पना स्पष्ट करून साहित्य संशोधन व समीक्षा यांच्यातील अनुबंध स्पष्ट करणे.

४) साहित्य संशोधन म्हणजे काय ते सांगणे व वैशिष्ट्ये स्पष्ट करणे.

५) साहित्य संशोधनाचे महत्त्व विशद करणे.

## २.१ प्रास्ताविक

साहित्याच्या संशोधनाचा विचार केल्यास अतिशय संपन्न आणि समृद्ध परंपरा मराठीला लाभलेली आहे.

साहित्याचा वाङ्मयीन अंगाने, ऐतिहासिक पातळीवर, सामाजिक सांस्कृतिकदृष्ट्या उच्च संशोधन करणाऱ्या संशोधकाची मोठी परंपरा महाराष्ट्राला लाभलेली आहे. उदा. वि. का. राजवाडे, सरदेसाई, भावे, पांगारकर, अ. का. प्रियोळकर, लक्ष्मणशास्त्री जोशी आदींनी मूलगामी संशोधन परंपरा निर्माण केली. याच बरोबर पाश्चात्त्य अभ्यासकांनी नि:स्वार्थीपणे साहित्य संशोधन केलेले आहे. यामध्ये मोल्सवर्थ, झूल ब्लोक, ऑल्फ्रेड मास्टर्स, विल्यम केरी, इत्यादी. या पूर्वसुरींच्या संशोधन परंपरेचा शोध अभ्यास करून पुढील साहित्य परंपरा समृद्ध झालेली आहे.

## २.२ साहित्य संशोधन

साहित्य संशोधनाचा विचार करताना एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की साहित्य वा वाङ्मय हे वर्तनवादी सामाजिक शास्त्रांच्या म्हणजे मानवशास्त्र याच्या जवळ जाणारे असले तरी ते शास्त्र नाही. संगीत, चित्रशिल्प यांच्या खूप जवळचे असले तरी त्यातून साहित्य भिन्न आहे. कथा, कादंबरी, नाटक, कविता हे सर्जनशील साहित्य म्हणजे ललित साहित्य होय. तर इतिहास, तत्त्वज्ञान, शास्त्रीय लेखन यांस ललितेतर वाङ्मय/ साहित्य म्हणतात.

साहित्य संशोधनात जे अनुपलब्ध आहे ते उपलब्ध करून देणे, त्यावर संस्कार करून संपादित रूपात टीका –टिप्पणी करून ते प्रकाशित करणे हा एक भाग असतो. ह्यापेक्षाही विविध साहित्यकृतींचे नवे अर्थ, सौंदर्य उलगडणे हा अधिक महत्त्वाचा भाग असतो. साहित्य हे सामाजिक शास्त्रांप्रमाणेच समाजसंबंध आहे. पण त्याचं बरोबर ते मूल्यांचे जग आहे. ही मूल्ये विविध संकेत संकल्पना यांच्याशी संशोधनाच्या सीमारेषा जोडलेल्या दिसतात. त्यामुळे साहित्य संशोधनाचा विचार करतांना साहित्याच्या व्यासंगाची काही क्षेत्रे आहेत. त्याचा विचार करणे आवश्यक आहे.

साहित्य संशोधनाची साहित्येतिहास, साहित्य समीक्षा, भाषा व भाषाभ्यास ही प्रमुख क्षेत्रे आहेत. त्यांचे अध्ययन, अध्यापन, संशोधन या अभिक्रियामधील स्थान ही विचारात घेणे आवश्यक आहे. आज अध्यापन व विशेषतः संशोधनासंबंधीची नवी प्रतिमा आकारास येत आहे.

साहित्य संशोधनाचे पहिले व्यापक क्षेत्र हे वाङ्मय इतिहास हे आहे. या कालखंड, ग्रंथकार, साहित्य संप्रदाय, सामाजिक प्रभाव, आधी विषय समाविष्ट होतात. साहित्य प्रकृतीदृष्ट्या सर्वसमावेशक असे क्षेत्र आहे. त्यामुळे साहित्याच्या संशोधनात त्यांचे प्रतिबिंब पडणे अपरिहार्य आहे.

वाङ्मयेतिहासात कालखंडांना स्वायत्त असे अधिष्ठान आहे. कालखंडाचा अभ्यास हा इतिहास निमित्त असला तरी त्यात इतिहासाच्या अंगांना औपचारिक महत्त्व आहे. कालखंडाचे काही विचार वाङ्मयीन चर्चास्वरूप, त्यामागील विविध प्रवृत्ती असतील त्यांना न्याय देण्याच्या दृष्टीने कालखंडाचा विचार शोधक दृष्टीने करावा लागतो.

साहित्य संशोधनाचा दुसरा विषय म्हणजे ग्रंथकार व त्यांचे लेखन होय. लेखक, त्याचे जीवन, लेखन आदींचे आपल्या दृष्टिकोनातून विविध अंगोपांगांचे विवेचन, चिकित्सा करणे या संशोधनात अभिप्रेत आहे. लेखकाने विशिष्ट कालखंडात साहित्य निर्मिती केलेली असते. त्या कालखंडातील विचार, संकल्पना, वाङ्मय-कलाविषयक संकेत ह्या सगळ्याच्या अभ्यासाबरोबर व्यक्तीविशेषांचे, तिच्या मर्यादांचे विवेचन, चिकित्सक मूल्यमापन करणे आवश्यक आहे.

साहित्य संशोधनाचे तिसरे क्षेत्र समीक्षा क्षेत्रीय विषयांचे आहे. समीक्षा क्षेत्रात विविध वृत्ती-प्रवृत्ती आहे. त्यांचे विवेचन हे प्राय: संकल्पनाप्रधान आहे. या संकल्पनात्मक चिंतनाला विविध साहित्यकृतींचे अधिष्ठान असते. समीक्षेच्या बाबतीत सौंदर्यशास्त्रापासून नीतीशास्त्र

मानसशास्त्रापर्यंत विविध संकेत संकल्पनांचा आधार घ्यावा लागतो. तो विषयपरत्वे स्थलकाल सीमित करावा लागतो.

साहित्य संशोधनाचे आणखी महत्त्वाचे क्षेत्र म्हणजे भाषा होय. भाषा हे स्वतंत्र असे शास्त्र आहे. वाङ्मयाच्या भाषेचा विचार करताना शैली, अलंकार, अभिव्यक्ती पद्धती, संकल्पना, विचार हा महत्त्वपूर्ण ठरतो. साहित्य संशोधनात भाषा या क्षेत्राचा विचार शास्त्रीय व उपयोजित (अवलंबनीय) अशा अंगाने केला जातो.

ललित लेखनाच्या कोणत्याही शाखेत भाषेचे महत्त्व हे अनन्यसाधारण आहे. साहित्याच्या भाषेप्रमाणे विविध भाषांचा स्वतंत्रपणे अभ्यास व संशोधन केले जाते. बोलींचा अभ्यास हा तर विगमनात्मक केला जातो. साहित्यसंकलन करून विश्लेषण हे अभ्यासाचे टप्पे असतात.

साहित्य संशोधनामध्ये कालखंडाप्रमाणे साहित्यकृती हा महत्त्वाचा विषय असतो. साहित्यकृतींना वाङ्मयेतिहासामध्ये महत्त्वाचे स्थान लाभलेले असते. त्यांनी नवीन साहित्यप्रकारांना जन्म दिलेला असतो. साहित्यकृती ह्या संशोधकाला नेहमीच आकर्षित करत असतात. उदा. संगीत सौभद्र ही नाट्यकृती, कथानक, आशय, व्यक्तीदर्शन, जीवनदर्शन, भाषा, अन्य साहित्यकृतींची तुलना, विविध – दृष्टिकोण असा साहित्यकृतीचा अभ्यास व संशोधन करता येते.

कथा, कविता, नाटक अशा साहित्यकृतींचे संशोधन करताना लेखकाचे चरित्र, तत्कालीन विचार प्रवाह, समजुती, राजकीय-सामाजिक-धार्मिक परिस्थितीचे लेखनावरील प्रभाव असेही संशोधन केले जाते.

वाङ्मयप्रकार अनेक आहेत. कथा, कादंबरी, नाटक, कविता, निबंध, लघुनिबंध, चरित्र, आत्मचरित्र असे साहित्याचे प्रकार आहेत. आणि त्याचे उपप्रकारही आहेत. उदा. कादंबरीमध्ये राजकीय, सामाजिक, ऐतिहासिक, पौराणिक, ग्रामीण, प्रादेशिक, दलित, आदिवासी असे उपप्रकार होत. या साहित्यकृतींचा आकृतीबंध असतो. या कलाकृतीचे सौंदर्य हे तिच्या रूपात, थाटात आकृतीबंधात सामावलेले असते.

साहित्यप्रकारांचे स्वरूप, वैशिष्ट्ये, घटक, तंत्र यांचा कालानुक्रम झालेला बदल आदींचा अभ्यास केला पाहिजे.

साहित्य संशोधनांमध्ये लेखकाचा अभ्यास करताना लेखकाचे पर्यावरण विचारधारा, समकालीन साहित्यिक यांचा शोध घेतला पाहिजे. तसेच वाचक आवडीनिवडीचा लेखकावर, लेखनावर काही प्रभाव पडला का याचा शोध घेतला पाहिजे. पूर्वकालीन व समकालीन अभिरुचीला बरा वाईट प्रतिसाद देत लेखन करणाऱ्या लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाचे प्रतिसाद देणाऱ्या लेखकाचे व्यक्तिमत्त्व व वेगळेपण संशोधकाने शोधले पाहिजे. लेखकाचे विशेषत्व हेरणे म्हणजे संशोधन होय.

साहित्य संशोधनाची जी क्षेत्रे आहेत ती शोधदृष्टी आणि व्यासंग या दोन्हींना आवाहन देणारी आहेत. शोधदृष्ट्या काही नवीन प्रयोग करता येणे शक्य आहे. आजचे संशोधन हे वर्णनप्रधान व पृथक्करण प्रधान आहे. साहित्य संशोधनासाठी अधिक कल्पकता व चिंतन यांची गरज आहे. त्यादृष्टीने प्रयत्न होत आहेत.

साहित्य संशोधनामध्ये संशोधकाची भूमिका साहित्याचे स्वरूप-वैशिष्ट्ये यामुळे निर्माण झालेली संशोधन क्षेत्रे इ. गोष्टीचे विवेचन केले. या साहित्य संशोधनात अवलंबिल्या जाणाऱ्या पद्धतीही महत्त्वाच्या आहेत. मुळात साहित्य व त्याचा अभ्यास त्या दोन स्वतंत्र गोष्टी आहेत. साहित्य हे प्राय: सर्जनशील आहे. त्याचे आस्वादन हे साहित्याच्या अभ्यासाचे प्रमुख साधन आहे. त्याकरिता रसग्रहणात्मक भूमिका महत्त्वाची ठरते. 'सर्जनशील टीका' (समीक्षा) ही साहित्यसंशोधनास पोषक ठरते. साहित्याचा अभ्यास काटेकोरपणे शास्त्र नसले तरी ज्ञानाचे, विद्वत्तेचे क्षेत्र निश्चितच आहे. वाङ्मयाचे स्वरूप असले तरी वाङ्मय अभ्यासकाला वाङ्मयीन अनुभव बुद्धिगत पातळीवरून मांडता आले पाहिजे. म्हणजेच वस्तुनिष्ठता, व्यक्तिनिरपेक्षता, निश्चितता इत्यादी शास्त्रप्रणीत संकल्पनांना प्रमाण मानले पाहिजे. परंतु पूर्णपणे यांचा अवलंब केला तर त्यात साहित्यतत्त्व राहण्याची शक्यता नसते. त्यामुळे मर्यादित प्रमाणात अवलंब शक्य आहे. थोडक्यात साहित्याच्या संशोधनासाठी विज्ञान प्रणीत मूल्यांचा काटेकोरपणे स्वीकार करता येत नाही.

## २.३ साहित्यविचार

साहित्य ही लेखकांच्या दृष्टीने केवळ अभिव्यक्ती आणि रसिकांच्या दृष्टीने कला असली ती साहित्याचा वा साहित्यकृतीचा अभ्यास केवळ कला म्हणून व्हावा तसेच कलाविष्काराच्या स्वरूपाच्या अभ्यास व्हावा असा आग्रह असतो. आणि तो एका मर्यादेपर्यंत योग्य असतो. पण साहित्य हा महत्त्वाचा व विश्वसनीय असा सामाजिक दस्तऐवज आहे. साहित्य हे सामाजिक आणि सांस्कृतिक धन आहे. साहित्याची निर्मिती स्थळकाळाच्या बंधनात मर्यादित झालेल्या जाणिवातून होत असते. या जाणिवात वैयक्तिक अनुभव, जागृतता, सामाजिक जीवननिष्ठा इत्यादींचे एक सलग, स्वयंपूर्ण दर्शन घडते.

साहित्यनिर्मिती झाल्यानंतर काही दशके नव्हे तर शतकांचा अस्तित्वात असलेला विचार, कल्पना, संकेत यांच्या आधारे नवा अर्थ, नवा आशय साहित्यकृती धारण करू शकते. समकालीन संस्कृती, मानवी विचारधारा, मन यावर प्रकाश टाकू शकते. म्हणून साहित्य कधी जुने, कालबाह्य ठरत नाही. साहित्य हे केवळ दस्तऐवज व साधन नाही. त्याच्यात त्यापेक्षा काहीतरी अधिक आहे. म्हणजे साहित्य हे संस्कृतीचे रूप असून ही मानवी संस्कृती, साहित्य व कला यांच्या माध्यमातून आविष्कृत होते व त्या रूपात टिकून राहते. दुसरे असे की साहित्य हे सामाजिक परिस्थितीतून निर्माण होत असले तरी त्या जीवनात विशेष प्रकारची संपन्नता ते प्राप्त करून देते. साहित्याचा संबंध हा भावविश्वाशी असतो. मानवी भावविश्व हे साहित्यामुळे समृद्ध होत असते.

साहित्य हे लेखकाच्या व्यक्तिगत अनुभवातून साकार होत असते. ह्या अनुभवांचे स्वरूप बहुविध असले तरी त्यात वैयक्तिकता अधिक असल्याचे दिसून येते. भावना, संस्कार, कलात्मक जाणिवा ह्या साहित्यात प्रभावी असतात. पण त्याचबरोबर समाजाला संदेश देणे, मार्गदर्शन करण्याची तळमळही असते. या साहित्याच्या वैशिष्ट्याबरोबर साहित्याची समावेशकता हे वैशिष्ट्यही महत्त्वपूर्ण आहे. साहित्य हे शास्त्र नाही. पण साहित्याच्या अभ्यासात 'साहित्यशास्त्र' हा शब्द रूढ झालेला आहे. ज्याप्रमाणे समाजशास्त्र, इतिहास, अर्थशास्त्र ही सामाजिक शास्त्रे विशिष्ट मर्यादेपर्यंत शास्त्र ही पदवी धारण करतात तसे

साहित्य हे संबोधिले जाते. तो साहित्याच्या अभ्यासाचा एक भाग आहे. मुळात साहित्य हे निरनिराळ्या शास्त्रांची, कलांची संयोगभूमी आहे. असे मानायला हरकत नाही.

सुरुवातीला उल्लेख केल्याप्रमाणे साहित्याचे क्षेत्र सर्वसमावेशक आहे. कित्येक वेळ विशिष्ट राजकीय, सामाजिक हेतूने समकालीन वा तत्कालीन गरज भागविण्यासाठी साहित्यनिर्मिती होत असते. उदा. लो. टिळक, आगरकर, न. चिं. केळकर आदींचे लेखन.

साहित्याचा संबंध जसा इतिहासाशी आहे. तसाच तो धर्म, तत्त्वज्ञान, नितीशास्त्र, अध्यात्म यांच्याशीही आहे. आधुनिक साहित्याचा संबंध समाजशास्त्र, अर्थव्यवस्था, मानसशास्त्र यांच्याशीही आहे. वरील ज्ञान शाखांनी आधुनिक साहित्यावर खोल ठसा उमटविला आहे. त्यामुळे त्या शास्त्रांची माहिती घेतल्याशिवाय आधुनिक वाङ्मयाचे संशोधन शक्य होणार नाही.

साहित्याचा संबंध हा प्राय: मानवी विचार, भावना, जाणिवा यांच्याशी असतो. जीवनाच्या गुंतागुंतीबरोबर जाणिवांचे स्वरूप गुंतागुंतीचे होणे अपरिहार्य असते. तसेच जीवनधारणाही गुंतागुंतीच्या होतात. ह्या क्रियाही पुढे अशाच चालू राहणार. मानवाच्या भौतिक प्रगतीबरोबर मानवी संवेदनशीलता, विविध प्रकारची जागृतता अधिक वाढत जाणार हे लक्षात घेणे जरूर आहे.

वरील विवेचनाच्या आधारे साहित्य कसे सर्वसमावेशक आहे, विविध प्रकारच्या ज्ञानाची व शास्त्रांची संयोगभूमी कशी आहे, हे स्पष्ट होईल.

साहित्याचा संबंध मनुष्याच्या भावविश्वाशी आहे, हे लक्षात घेऊन त्याचे रसग्रहण, आकलन, मूल्यमापन हे भावविश्वाचे स्वरूप नीट ओळखून होणे गरजेचे आहे. साहित्य, नाट्यादी कलांमधून जी भाव आविष्कृती होते, तिचे विवेचन प्राचीन व आधुनिक समीक्षकांनी बारकाईने केलेले आहे. तसेच इतर शास्त्रांप्रमाणे सौंदर्यशास्त्र हे साहित्य संशोधनासाठी प्रमाण मानून त्याची मूलभूत तत्त्वे शोधावी व त्याआधारे साहित्य सौंदर्य व समीक्षकाला विकसित करणे आवश्यक आहे.

लेखक आपला विशिष्ट अनुभव व साहित्याच्या माध्यमाच्या आधारे पुन्हा घेण्याचा प्रयत्न करतो. त्या अनुभवाचे अव्वलपण, एकजिनसीपणा, सघनता, सखोलता यावर साहित्याचे श्रेष्ठत्व अवलंबून असते. साहित्याचे अनन्यसाधारण वैशिष्ट्य म्हणजे माणसाचे संपूर्ण जीवनदर्शन हे मानवी जीवनाच्या पार्श्वभूमीवर घडविणे. साहित्य व माणूस ह्यांची फारकत न करता हे जीवन चित्रण होते, त्यामुळे ते मनोज्ञ व कलापूर्ण होते.

विज्ञानाच्या परिसरात समाजाच्या परिवेशात मानवी मानवी जीवनाचा, माणसाचा शोध पर्यायाने माणूसपण शोधणे हे साहित्य संशोधनाचे अंतिम उद्दिष्ट आहे. साहित्याच्या माध्यमातून माणूस माणसाच्या शोधात आहे, अशी आजच्या साहित्याची व्यवच्छेदक खुण सांगता येईल.

एकंदरित साहित्याचे सामर्थ्य, संपूर्ण माणसाचे दर्शन त्याच्या जीवनाच्या सानिध्यात घडविण्यात कसे आहे, हे स्पष्ट होते. साहित्याच्या पार्श्वभूमीवर माणूसपणाचा शोध घेणे, हे साहित्य संशोधकाचे उद्दिष्ट आहे.

साहित्याला प्राप्त होणारे श्रेष्ठत्व हे कोणत्याही दैवी गुणांमुळे नसून त्याच्या ठायीच्या गुणांमुळे प्राप्त होते. हे लक्षात घेतले तर साहित्याच्या संशोधनाच्या निरनिराळ्या वाटा दिसणे शक्य आहे.

## २.४ साहित्य संशोधन व समीक्षा अनुबंध

मराठीतील संशोधनाची पूर्व परंपरा केवळ ज्ञानसाधनेची होती. संशोधनाने होणाऱ्या निरामय आनंदाचा लाभ घेण्याची वृत्ती त्याच्या मागे होती. अज्ञात असलेली दालने ज्ञानाच्या प्रदेशात आणण्याची महत्वाकांक्षा ही संशोधनामागे होती. अज्ञात इतिहास साधने, अज्ञात साहित्यसंपदा प्रकाशात आणण्याचे प्राथमिक संशोधन कार्य मुख्यत्वे या काळात झाले. कोणत्याही तऱ्हेची अनुकुलता नसताना तत्कालीन संशोधकांनी संशोधन करून ज्ञानाचा ठेवा समोर आणला. हा सारा निष्काम कर्मयोग होता.

आजची मराठी संशोधन परंपरा पाहिली तर त्यात बरेच बदल झालेले दिसून येतात. आजचे संशोधन हे ज्ञान प्राप्तीबरोबर व्यावहारिक हेतूनेही चालले आहे. थोडक्यात आजचे संशोधन हे ज्ञान प्राप्तीपेक्षा पोटार्थी बनत चालले आहे असे दिसून येते. संशोधकाच्या भूमिकेत आणि उद्दिष्टांत बदल झालेले आहेत. परंतु संशोधनाचा इतर शास्त्रांशी असलेल्या संबंधात मात्र काही विशेष फरक पडला नाही. संशोधनाचा इतर शास्त्रांशी, विभागाशी असलेला संबंध मात्र आजतागायत टिकून आहेत. हे संबंध कसे आहेत, त्याच कसा संबंध आहे हे पाहावे लागते. त्यादृष्टीने संशोधन आणि साहित्य-समीक्षा यांच्याही संबंधाचा विचार करता येईल.

समीक्षा हा एक ज्ञानव्यापार आहे. सार्वत्रिक निकषांची आकांक्षा धरणारा व यथोचित शब्दांतून प्रकट होणारा साहित्यकृती विषयीचा रसिकाचा जो मूल्यगर्भ अभिप्राय म्हणजे साहित्य-समीक्षा होय.

वस्तुत: साहित्य समीक्षा ही एकस्वरूपी नाही. निरनिराळ्या प्रकारच्या अनेक परस्पर–संबंध अभिक्रियांचा तो एक कलाप आहे. त्यामुळे समीक्षेची भूमिका एवढी व्यापक आहे की, त्यात साहित्यविषयक लिहिलेल्या कोणत्याही लेखनाचा त्यात समावेश होऊ शकतो. साहित्याचे कार्य, प्रकृती इत्यादी विषयीची चर्चा वाङ्मयातील आविष्कार पद्धती, विचार, जीवन, चिंतन इत्यादींचे स्वरूप पाहणे, एखाद्या लेखकाचा कालखंड, त्याचा अभ्यास वाङ्मय प्रकाराचा अभ्यास, साहित्यकृतीचे परीक्षण, वाङ्मय वैशिष्ट्ये पाहणी, इत्यादी सारे समीक्षा लेखनात समाविष्ट होते. परंतु प्रत्येक प्रकारात समाविष्ट होणाऱ्या लेखनाचे स्वरूप भिन्न भिन्न असते.

समीक्षेचे जसे आहे तसे संशोधनातील शोध या अभिक्रियेचे स्थान आहे. संशोधन हे प्रकृतीदृष्ट्या एकाच प्रकारचे नाही. सर्वच ज्ञानक्षेत्रांना आवश्यक असणारी ती एक संकल्पना आहे.

संशोधन ही नुसती संकल्पना नसून ती एक महत्त्वाची अभिक्रिया आहे. ज्ञानाची क्षेत्रे भिन्न भिन्न असल्याने संशोधनाचे स्वरूप सुद्धा वेगवेगळे झालेले आहे, असे लक्षात येते. विज्ञान क्षेत्रातील संशोधन हे प्रयोगाधीष्ठीत असल्याने प्रयोगशाळा, प्रयोग आखणी, उभारणी, अवलोकन ह्यांना महत्त्वाचे स्थान आहे. सामाजिक शास्त्रांत अगदी वेगळ्या प्रकारांचा व

पद्धतींचा अवलंब केला जातो. या संशोधनात ग्रंथालयाबरोबर मुलाखत, प्रश्नावली, पाहणी, प्रशोध, अहवाल या शोध आयुधांचा अवलंब विशिष्ट पथ्ये पाळून शोध घ्यावा लागतो.

इतिहास, तत्त्वज्ञान, शिक्षण ह्या क्षेत्रातील संशोधनाचे स्वरूपही असेच संपूर्ण तथा भिन्न व स्वविशिष्ट आहे. इतिहासातील उपलब्ध असलेल्या साधनसामग्रीचे अव्वलपण तपासून घेणे ऐतिहासिक संशोधनात महत्त्वाचे आहे. तर तत्त्वज्ञान, शिक्षण, मानसशास्त्र इत्यादी क्षेत्रांतील संशोधनाचे स्वरूप वेगळे आहे. अवलोकन, चिंतन, प्रयोग यांच्या साहाय्याने अमूर्त, तात्विक संकल्पनांचे स्वरूप बुद्धिगम्य करून घेता येते.

वाङ्मयक्षेत्रातील संशोधन हा स्वतंत्र प्रकार आहे. वैज्ञानिक व सामाजिक शास्त्राचे संशोधन असे केले जाते तसे साहित्य संशोधनाचे नाही. वाङ्मयीन कलाकृती, साहित्यकृती ही शब्दजनित असते. साहित्य कृतीतील शब्द व्यवहारातील शब्दाप्रमाणे बोधक असतात. तसेच ते प्रतीकात्मक असतात. साहित्यकृती शब्दरूप असली तरी ती मूल्यात्मक दृष्टीने महत्त्वाची असते. तिचे मूल्याधीष्ठीत्व कायम असते. तिला विविध प्रकारची नवी मूल्ये सतत प्राप्त होत असतात. पण साहित्यकृतीला मूल्यात्मक अधिष्ठान प्राप्त करून देण्याचे काम साहित्य-समीक्षा करते. त्यामुळे समीक्षात्मक लेखन हे प्रकृतिवैशिष्ट्याने अगदी वेगळ्या प्रकारचे झालेले असते. खरे तर समीक्षालेखनाची भूमिका ही शोधभूमिकेला जवळची आहे. त्यामुळे साहित्य समीक्षापर लेखन प्राय: शोधलेख स्वरूप मानले जाते.

साहित्य समीक्षा निरनिराळ्या साहित्य प्रकारातील लेखनाची केली जाते. परंतु प्रत्येक प्रकारचे स्वरूप वेगळे असते. त्यामुळे समीक्षा कलाकृतीच्या कलांगांची चर्चा, लेखक प्रवृत्ती, लेखन वैशिष्ट्ये यांची चर्चा करणे तसेच साहित्यकृतीचे संदर्भ, अनुबंध तपासणे, लेखकाची कलात्मक दृष्टी, साहित्यकृतीचा नवार्थ शोधणे, तात्त्विकदृष्टया साहित्य-स्वरुपाची चिकित्सा हे समीक्षेमध्ये अभिप्रेत असते. साधारणत: समीक्षा लेखन हे संशोधनपर लेखनाशी बरेचसे मिळते-जुळते का असते हे स्पष्ट करण्यासाठी संशोधन संकल्पना कशी विकसित होत गेली हे ध्यानात घेतले पाहिजे.

‘संशोधन’ हा शब्द मराठीत Research या इंग्रजी शब्दाला मराठी पर्याय म्हणून आलेला आहे व त्यात मराठी पर्यायात शोध म्हणजे Search या अभिक्रियेला महत्त्व आहे. प्रबोधनाच्या चळवळीनंतर प्राचीन वाङ्मय, कलाकृतींना विशेष महत्त्व प्राप्त झाले. प्राचीन ग्रंथ लेखन यांच्या स्वरूपाचे अवलोकन, शोधन, स्पष्टीकरण इत्यादींना महत्त्व झाले. त्यातून वाङ्मयीन संशोधनाचा उदय झाला. प्राचीन वाङ्मय वगळून जे वाङ्मय विषयक लेखन होते ते समीक्षारूप लेखन होय. त्यास समीक्षा संशोधन म्हणणे योग्य नाही. असा समज रूढ झाला तो अद्यापही रूढ आहे. त्यामुळे समीक्षा व संशोधन यातील नातेसंबंध तपासणे आवश्यक झाले.

प्रबोधन चळवळीनंतर विज्ञान विकासाची वेगाने वाटचाल सुरु झाली. त्यामुळे Research आणि Search ह्या दोन वेगवेगळ्या संकल्पना असल्याचे स्पष्ट झाले. Research या संकल्पनेची व्यापकता स्पष्ट झाली.

संशोधनाची वैशिष्ट्ये लक्षात घेऊन ज्ञानक्षेत्राने आपापली decipline (अनुशासन) तयार केली. विज्ञान क्षेत्रीय, सामाजिक शास्त्रातील तसेच साहित्य क्षेत्रातील संशोधन एकस्वरूपी

नसल्याचे स्पष्ट झाले. तसेच विज्ञान, समाज, शिक्षण क्षेत्रांतील प्रयोगाचे स्वरूप एकसारखे नाही हे उलगडले. त्यामुळे समीक्षा लेखनातील शोध हा वेगळा असणार हेही स्पष्ट झाले. समीक्षालेखन हे शोधक्षेत्रीय संकल्पनांचा अवलंब करणारे असले तरी ते सर्व प्रकारच्या लेखनाला लागू पडणार नाही. शोध घेणे, शोध दृष्टीने विचार करणे ही मानसिक अभिक्रिया आहे. ती वाङ्मयीन समीक्षा लेखनाला वर्ज्य नाही. असे असले तरी समीक्षापर लेखन व शोधदृष्टीने केलेले लेखन (संशोधन) यात थोडी स्पष्ट व थोडी पुसट रेषा काढता येणे शक्य आहे.

समीक्षापर लेखन आणि शोध दृष्टीने लिहिलेला लेख यांच्यापासूनच्या अपेक्षा भिन्न आहेत. त्यामुळे दोघांचे लेखन, विवेचन, शैली इत्यादी परस्परांपासून भिन्न असतात. त्यामुळे साहित्य संशोधन आणि समीक्षा यांच्यात वेगळेपण अधिक आहे. साम्य कमी आहे. संशोधन हे प्राय: समस्यामूलक असते. (Problem Orientaid) असते. एखादा प्रकल्प हाती घेऊन विशिष्ट उद्दिष्टये, विशिष्ट पद्धतीचा अवलंब करून पार पडलेले संशोधन हे शब्दांकित करण्यासाठी शोध लेखन होत असते. तर समीक्षेत विषयासंबंधी आपले मत, अवलोकन, चिंतन, अभ्यास यातून बनलेले असते. समीक्षेत ही भूमिका महत्त्वाची असते.

एखाद्या विषयासंबंधी लेखकाला जे म्हणावयाचे असते, ते महत्त्वपूर्ण पण थोडेफार उत्स्फूर्तपणे समीक्षा लेखनातून मांडलेले असते. विषयाकडे पाहण्याचा दृष्टिकोन, एक बाजू, अभिप्राय म्हणून समीक्षेचा जन्म झालेला असतो. त्याउलट ज्ञानात लक्षणीय, संस्मरणीय भर घालण्याच्या दृष्टीने संशोधनाचा जन्म झालेला असतो.

आपले म्हणणे कसे मांडायचे ह्याचे काही संकेत, नियम शोधलेखन करणाऱ्याला अवलंबणे आवश्यक असते. संशोधनपर लेखनाचे हे अनन्य वैशिष्ट्य आहे. समीक्षा लेखनात आपल्या महत्त्वाच्या विधानांना पुरावा देण्याची गरज नसते. सर्वसाधारण उल्लेख करून पुढे जाता येते. पण संशोधनात असे करता येत नाही. संदिग्ध, मोघम विवेचन संशोधनात चालत नाही. विशिष्ट व्यक्तीचे, लेखकाचे विशिष्ट मत कोणत्या स्वरुपात आलेले आहे, हे उद्धृत करावे लागते. संदर्भ द्यावा लागतो. अशी गरज समीक्षेत भासत नसते. बऱ्याच गोष्टी गृहित धरून समीक्षेत विवेचन करता येते. समीक्षेमुळे वाचकांनी स्वतंत्रपणे विचार करणे व आपले मत मांडणे अपेक्षित असते. परंतु काहीवेळा समीक्षा लेखन हे समस्या शोधक झालेले असते. ते विचारांना खाद्य देणारे असते. संशोधनात काहीही गृहीत धरीत नाही. सारे म्हणणे, विवेचन हे सप्रमाण असावे लागते. समीक्षा लेखन हे संशोधनास पूरक असते.

संशोधनाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे माहिती, संदर्भ इत्यादीचे नोंदणीकरण (Documentaion) हे होय. हा एका वस्तुनिष्ठ भूमिकेच्या अवलंबनाचा भाग असतो. संशोधनात संदर्भ बिनचूक देणे व देत असता अभ्यासकाला आपल्या साधन स्त्रोतापर्यंत जाण्याचा मार्ग उपलब्ध करून देणे महत्त्वाचे असते. संशोधनात आपले म्हणणे व विचार अभिव्यक्त करून भागत नाही. सर संशोधनासाठी काटेकोरपणा, बिनचूकपणा आवश्यक असतो. संशोधनात निष्कर्ष सबळ व वस्तुनिष्ठ पुराव्यांवर आधारलेले आहेत. असे दाखवून भागत नाही, तर वाचकाला ते पारखून घेण्याची साधने त्याला उपलब्ध करून द्यावी लागतात. समीक्षा लेखनात निवडलेल्या विषयावर आपण काही विचार केला आहे, आपली काही मते, अनुभव अवलोकन आहे, एवढे वाचकाच्या निदर्शनास आणून दिले तरी पुरेसे

असते. विशिष्ट प्रश्न घेऊन त्याचे विविध घटक, पैलू विचारात घेऊन त्याची छाननी करून उपाय वा मार्ग शोधण्याचा प्रयत्न संशोधनात असतो. तसा प्रयत्न समीक्षेत नसतो. समीक्षात्मक लेखनात बौद्धिक आविष्काराची भूमिका असते. संशोधनपर लेखनाने निश्चित विषय (Topic) वा प्रश्न (Problem) निवडणे, व शास्त्रपूर्ण मार्गांनी सोडवणूक करणे व त्याद्वारे निश्चित व लक्षणीय स्वरूपाची ज्ञानात भर घालणे हे वैशिष्ट्य होय. समीक्षात्मक लेखनात थोडेफार रंजन, थोडासा कल्पनाविलास, विविध संदर्भांचा सूचक अनेकार्थबोधक वापर, रचना कौशल्य प्राप्त झालेली दिसून येते. परंतु संशोधनपर लेखनात या गोष्टी गैरलागू असतात.

शोधलेखनापाठीमागे एक उद्देश असतो. त्यामुळे लेखन त्या दिशेने झालेले असते. वस्तुनिष्ठता हे संशोधनात्मक लेखनाचे वैशिष्ट्य आहे, तर व्यक्तिनिष्ठता हे समीक्षात्मक लेखनाचे वैशिष्ट्य आहे. समीक्षेत लेखक ‘मी’ प्रथम पुरुषवाचक, एकवचनी सर्वनामाच्या विविध रूपाचा वापर करू शकतो. परंतु संशोधनात वस्तुनिष्ठ भूमिकेमुळे अलिप्तवृत्तीला साजेशी तृतीय पुरुषी भूमिकेचा सूचक वापर केला जातो. वस्तुनिष्ठ भूमिकेमुळे समीक्षात्मक लेखनात ठाशीवपणा व रोखठोकपणा दिसतो तो संशोधनपर लेखनात त्या प्रमाणात असतोच असे नाही. हे स्पष्ट आहे. “हे उघड आहे”, “हे सिद्ध होते” त्या उल्लेखांऐवजी संशोधनात्मक लेखनात “हे असणे शक्य आहे”, “हे संभाव्य आहे”, “हे स्वीकार्य वाटावे” असे शब्दप्रयोग येतात. हे त्या भूमिकेशी समर्पक असतील. परंतु संशोधकाच्या मताला निश्चितपणा नसतो असे नाही. पण त्यासंबंधीची स्पष्ट व आग्रही जाणीव तेवढी महत्त्वाची वाटत नाहीत.

एकंदरीत चिकित्साप्रधान लेखन ह्या दृष्टीने समीक्षात्मक लेखन हे संशोधनात्मक लेखनाच्या काही वैशिष्ट्यांना जवळचे वाटत असते तरी समीक्षा लेखन व संशोधनात्मक लेखन ह्यात प्रकृतिभिन्नता आहे. समीक्षात्मक लेखनात विशिष्ट विचार, अवलोकन, निरीक्षण, चिंतन इत्यादी व त्यांचे प्रत्ययकारी आविष्करण हे महत्त्वाचे असते.

संशोधनपर लेखनात सत्यशोधक हेच अंतिम उद्दिष्ट असते. त्याकरिता सुस्पष्टपणा, नेमेकेपणा, बिनचूकपणा, लेखनात साक्षेपीपणा असावा लागतो. बहुनिर्देशयुक्तता हे सध्या समीक्षात्मक लेखनात अपेक्षित असले तरी शोध लेखनात मात्र तशी अपेक्षा नसते.

संशोधनपर लेखन व समीक्षापर लेखन यांच्या प्रकृती वैशिष्ट्यांची चर्चा इथे केली. त्यानंतर संशोधन व समीक्षा यांच्यातील साम्य-भेद समजून घेऊ. समीक्षेत साहित्यकृतीचा आस्वाद घेतल्यानंतर तिचे विश्लेषण, मूल्यमापन व अर्थनिर्णयन केले जाते व शब्दांकनाने समीक्षेची पूर्तता होते. संशोधनामध्ये परीक्षण, परिशीलन, अनुसंधान हे सगळे ज्ञानात्मक पातळीवरचे कार्य असते. शुद्धीकरण, दुरुस्ती, संशोधनामध्ये अपेक्षित असते. सर्वार्थाने शुद्ध करणे, सर्वार्थाने निर्मल करणे, शोध होणे यासाठी चिकित्सक अभ्यास केला जातो, त्यालाच संशोधन असे म्हणतात. संशोधनात एखाद्या विषयावर लक्ष केंद्रित करून शोध घेणे, पूर्वानुभव, अर्थानुभूती यातून संकल्पना साकारणे महत्त्वाचे असते. शोध घेतांना हाती आलेली प्रमेये म्हणजेच संकल्पना होय.

समीक्षेत केवळ समोरच्या वस्तूचे निरीक्षण, चिकित्सा करून ज्ञानात भर पाडत नाही. जे गृहीत ज्ञान असते. (सैद्धांतिक कल्पना) त्याआधारे साहित्यकृती तपासली जाते.

संशोधनामध्ये ज्ञानबुद्धी अपेक्षित असते. प्रस्थापित कल्पनेचा नव्याने शोध घेणे वा नव्याने संकल्पना शोधून काढणे अपेक्षित असते. तर समीक्षा हे दुव्याचे काम करते. स्वत: आकलन ज्ञान संक्रमित करणे अशी प्रक्रिया समीक्षेत असते.

संशोधनात वस्तुनिष्ठता असल्याने त्यात भावनात्मकतेला थारा नसतो, तर समीक्षा व्यापारात व्यक्तिनिष्ठता असल्याने समीक्षकाला ज्या साहित्यकृतीविषयी वा कलाकृतीविषयी स्वारस्य असते. त्याकडे तो लक्ष देतो. समीक्षेत उत्स्फुर्ततेचा भाग असतो. आवडीनिवडीचा भाग असतो. पुरावे उपलब्ध करून देणे, पुराव्याचे, संदर्भाचे उल्लेख करून देणे. प्रमाण-पुरावे अभ्यासकाला तपासण्यासाठीची सोय संशोधन करते. तर समीक्षेत विचारांना खाद्य पुरविले जाते. संशोधनाची पाठभेद भाषानिश्चिती, प्रतनिश्चिती इत्यादी अंगे समीक्षेत समाविष्ट होणार नाहीत. तर समीक्षेत रसास्वाद, मूल्यमापन ही अंगे संशोधनात अपेक्षित नसतात.

साहित्य संशोधनामध्ये आत्मनिष्ठ आहे. लवचिकपणा व मूल्याभाव आहे. त्यामुळे कलेचाही भाग त्यात असतो. कला म्हणजे रस साहित्य, ज्ञान साहित्य होय. म्हणून संशोधनात कलेचा भाग असतो, असे म्हणता येईल समीक्षण म्हणजे कलेचे शास्त्र होय. रससाहित्याचे शास्त्राच्या पायावर केलेले परीक्षण असते. त्यामुळे समीक्षा नुसते रससाहित्य नाही तर ते ज्ञानशास्त्र ही आहे.

साहित्याचा विषय, आशय, निवेदन, रस इत्यादीचा विचार, चिंतन हे समीक्षेत केले जाते. म्हणून समीक्षा कला आहे. तसेच आस्वाद, रसग्रहण हे समीक्षेत असते. त्यामुळे समीक्षा शास्त्र आहे. तर संशोधन हे पूर्णत: शास्त्र आहे. त्यात वस्तुनिष्ठता आवश्यक असते.

समीक्षेतील ज्या टीका पद्धती आहेत त्यांचा उपयोग कसा करावयाचा हे ठरविणे, मूलाधार शोधणे यासाठी संशोधनाला समीक्षेची गरज आहे. त्यामुळे समीक्षा हे संशोधनाचे साधन आहे. कलाकृतीचे मर्म शोधण्याचे साधन समीक्षा आहे. म्हणजेच आस्वादन, विश्लेषण, मूल्यमापन समीक्षा करते म्हणून समीक्षेला साधनरूप अस्तित्व प्राप्त होते. तर संशोधन वाङ्मय कलाकृतीच्या साधनाचे साधन असते. म्हणजे समीक्षेत संशोधनाचा उपयोग साधन म्हणून होतो. संशोधन हे साधनांचे साधन असते व संशोधनासाठी समीक्षेतून विषय पुरविले जातात.

संशोधन प्रक्रिया ही एक अर्थी ऐतिहासिक आणि पारंपरिक गोष्ट मानली तरी परंपरा आणि मानवता यांचा अतूट संबंध असल्याने त्यात फारकत करता येत नाही. संशोधन प्रक्रिया ही पायाभूत ठरणारे साधन आहे. समीक्षा हे अंतिम फलित आहे. संशोधन हे साक्षेपी असून समीक्षा तारतम्यावर व आंतरदृष्टीवर आधारलेली आहे.

थोडक्यात कोणत्याही दृष्टीने वाङ्मयाचा केलेला अभ्यास हा वाङ्मय क्षेत्रात समाविष्ट होणारा असला पाहिजे. म्हणजे त्या अभ्यासाचा मूळ संदर्भ वाङ्मयाशी असायला हवा. वाङ्मयाला मध्यवर्ती कल्पून, प्रमाण मानून विविध दृष्टींनी जो अभ्यास केलेला असेल तर तो वाङ्मय अभ्यास होय. हे लक्षात ठेवले पाहिजे. त्याचप्रमाणे तो वाङ्मयाभ्यास असला तरी तो समीक्षारूप असेल असे नाही; पण तो संशोधनात्मक जरूर असेल. अशा रीतीने समीक्षा व

संशोधन ह्या काही प्रमाणात समरूप आहेत; पण बहुवंशी स्वतंत्र व स्वयंनिष्ठ अशा अभिक्रिया आहेत.

## २.५ साहित्य संशोधन स्वरूप आणि वैशिष्ट्ये

### २.५.१ साहित्य संशोधन स्वरूप

वैज्ञानिक शास्त्रे, वस्तुनिष्ठ सामाजिक शास्त्रे सामाजिक असतात. परंतु कला व साहित्याची निर्मिती ही मनोनिष्ठ, प्रतिभानिष्ठ आणि सृजनप्रधान असल्यामुळे साहित्याच्या संशोधनात वैज्ञानिक आणि सामाजिक इतर काही शोधपद्धतीची मदत घ्यावी लागते. संगीत, चित्र, शिल्प या कलांप्रमाणे साहित्य ही मानवीय कला असून तिची निर्मिती, आस्वाद ह्या सूक्ष्म आत्मनिष्ठ कला आहेत. साहित्याच्या द्वारा मनुष्य आपले भाव, कल्पना, विचार व्यक्त करीत असतो. संवेदनांचे विश्व साहित्यातून गोचर होत असते.

साहित्य ही एका कलावंताने घेतलेली अनुभूती असते. मानवी प्रतिभाशक्तीचा व कल्पनाशक्तीचा नितांत रमणीय आविष्कार म्हणजे साहित्यनिर्मिती होय. तिच्या निर्मितीची प्रक्रिया ही विलक्षण गुंतागुंतीची, विविध प्रेरणांनी आणि संस्कारांनी संकुल झालेली असते. त्यामुळे साहित्यनिर्मितीला नियमात बसविणे अशक्य ठरते. पण तरीही काव्यशास्त्र व साहित्यशास्त्र यांची निर्मिती अनेक शतकांपासून होत आलेली आहे. कारण साहित्य निर्मिती ही जरी गूढ अनिर्वचनीय मानसिक प्रक्रिया असली तरी तिची अभिव्यक्ती प्रकट व इंद्रियगम्य व संवेदनगम्य असते. म्हणून त्याच्या साह्याने साहित्याचा शास्त्रीय विचार सहज करता आला.

साहित्याचा संबंध इतिहास, संस्कृती, धर्मशास्त्र, समाजशास्त्र, अध्यात्मशास्त्र आदींशी येतो. त्यामुळे अशा साहित्याचे संशोधन करताना संशोधकाचा पिंड केवळ आस्वादक असून चालणार नाही किंवा मूल्यमापनकर्त्याचा असून चालणार नाही. त्यात समीक्षेची सार्थ दृष्टी हवी तसेच सहानुभूतीपूर्वक विचार सौंदर्यदृष्टीही हवी. साहित्याची निर्मिती ही व्यक्तिसापेक्ष व मानवी मनाशी संलग्न असते. त्यामुळे त्यात काटेकोरपणा, नियमितता असते. परंतु वस्तुनिष्ठतेला संपूर्ण वाव नसतो. साहित्यात आत्माविष्कार कलेचे स्वातंत्र्य, सर्वात्मकता, स्वायत्तता, केवलात्मकता असते, हे लक्षात घेऊन साहित्यसंशोधन केले पाहिजे. साहित्य संशोधनामध्ये संशोधकाला प्रतिपाद्य विषयाचा सांगोपांग अभ्यास, विषयाची आवड, अध्ययन, मनन, चिंतन आणि विषयाशी एकरूप होणे या गोष्टी करता आल्या पाहिजेत. तसेच संशोधकाची दृष्टी पूर्वग्रह विरहित व नि:पक्षपातीपणा, निर्भेळ शोधकता असलेली व आवश्यक अभिरुची संपन्न व प्रखर जिज्ञासा असलेली असावी लागते.

भाषाशास्त्रीय, बोलीपर, छंदशास्त्र संशोधन, व्याकरणपर, साहित्यशास्त्र तत्त्वपर, सौंदर्यशास्त्रीय, लिपी, पाठचिकित्सा, ललितकलापर, शैलीशास्त्रपर असे साहित्य संशोधनाचे स्वरूप आहे. वैज्ञानिक संशोधनातील विशुद्ध संशोधन आणि उपयोजित संशोधनाप्रमाणे साहित्य संशोधन करता येणे शक्य आहे. त्यासाठी प्राचीन साहित्य, ऐतिहासिक कागदपत्रे, बखरी, लावण्या, पोवाडे आदि उपलब्ध होणे आवश्यक असते. हे सर्व प्रकारचे साहित्य संशोधकाने त्याची पाठचिकित्सा करून दिले व त्यांचे संकलन, संपादन, शोधणी व मांडणी केली की त्या संशोधनाला विशुद्ध संशोधन ही संकल्पना

वापरता येईल. उदा. वि. भि. कोलते यांची 'महानुभव चरित्रे' व 'साती ग्रंथा'ची संपादने ही मूलभूत संशोधने ठरतील.

साहित्य संशोधनात तर्कप्रधान अशा दोन शोधप्रक्रिया विशेष महत्त्वपूर्ण मानल्या जातात. या दोन प्रक्रियांमधून पुढे दोन शोधपद्धती स्वीकारल्या गेल्या. एक म्हणजे निगमन पद्धती (deductive Method) व दुसरी म्हणजे विगमन पद्धती (Inductive Method) होय. पाश्चात्त्य संशोधनात विगमन पद्धती तर मराठी संशोधनात निगमन पद्धतीचा स्वीकार केला आहे. साहित्य संशोधनात पाठचिकित्सा शास्त्राला दोन्ही पद्धतींना महत्त्व मिळाले आहे. त्यामुळे मूलभूत संशोधनाची सुरुवात पाठचिकित्सेपासून करावी लागते. आणि साहित्य संशोधनशास्त्रामध्ये पाठचिकित्सा शास्त्राला महत्त्वाचे स्थान लाभले आहे.

मुळात साहित्य संशोधन हे शिस्तबद्ध व प्रामाणिक सर्जन आहे. त्यासाठी प्रज्ञा, प्रतिभा, स्फूर्ती यांची आवश्यकता असते. साहित्य संशोधन हे प्राय: ग्रंथालयीन संशोधन आहे. लोकसाहित्याचे संशोधन हे मात्र क्षेत्रीय संशोधनाबरोबर ग्रंथालयीन आहे. ग्रंथालये व ग्रंथ ही संशोधकाची कर्मभूमी आहे. हे संशोधन विमर्शक विचार पद्धतीचे असले तरी संशोधनातून हाती येणारे निष्कर्ष हे भौतिक संशोधनासारखे काटेकोर नसतात. नेमके आणि निश्चित निर्णय साहित्य संशोधनात मिळू शकत नाहीत. साहित्य संशोधनाचे हे स्वाभाविक वैभवच होय. साहित्याच्या बाबतीत निर्णय घेणे हे जबाबदारीचे व नाजूक असते. साहित्यकृतीत कितीतरी गूढ आणि अतर्क्य गोष्टी असतात. त्या भावतात पण शब्दांच्या रूढ चिमटीत पकडण्याचा प्रयत्न केल्यास बिघडतात.

साहित्य संशोधनामध्ये संशोधकाच्या दृष्टीने साहित्य हे एक महत्त्वाचे दस्तऐवज साधन असते. तसेच साहित्याचे लक्षणीय वैशिष्ट्य म्हणजे साहित्याची नित्य-नाविन्यता हे होय. श्रेष्ठ साहित्य निर्माण झाल्यानंतर काही दशकांनी, शतकांनी अस्तित्वात आलेल्या विचार, कल्पनांच्या, संकेतांच्या आधारे नवा आशय, नवा अर्थ धारण करणे. समकालीन संस्कृती, मानवी विचार, संस्कृतीवर वेगळा प्रकाश टाकू शकते. या अर्थाने साहित्य पर्यायाने साहित्य संशोधन ही नूतन असते. साहित्य संस्कृतीरूप मानवी संस्कृती व कला यांच्या रूपाने साकार होते. व त्या रूपातच टिकून राहते. त्यामुळे कोणत्याही देशातील, प्रदेशातील संस्कृतीचा विचार हा तिथल्या साहित्य, कला यांच्या आधारे करता येतो. उपयुक्ततावादी भूमिकेबरोबर साहित्यात काही विशेष गुण असल्याने ते चिरंतन होते. उदा. गोडसे भटजींनी 'प्रवासवर्णन' हे माहिती देण्यासाठी लिहिले पण त्याला वाङ्मयीन महत्त्व प्राप्त झाले. साहित्याच्या ह्या वैशिष्ट्यांची जाणीव साहित्य संशोधनात सतत ठेवावी लागते. अन्य संशोधनापेक्षा साहित्य संशोधन हे वेगळे आहे. वैशिष्ट्यपूर्ण आहे. साहित्याचा संबंध मानवी भावविश्वाशी असतो. त्यामुळे मानवाचे भावविश्व समृद्ध करणे हे कार्य साहित्य करत असते. लेखकांच्या व्यक्तिगत अनुभवातून साहित्य साकार होत असते. ह्या अनुभवात विविधता आणि वैचारिकता असते. कित्येकदा भावनांचा वा संस्कारांचा भाग असतो. पण त्यातही कलात्मक जाणीव प्रभावी असते. साहित्याच्या वैशिष्ट्यांमुळे त्याचे संशोधन गुंतागुंतीचे होते. तसेच भावनांचा संबंध असल्याने संशोधनाचे स्वरूप अतर्क्य म्हणजे अचूक अंदाजाच्या पलीकडे असल्याने साहित्य संशोधनात निश्चितता ही एक प्रतिक्रियारूप असण्याची शक्यता अधिक असते.

साहित्य संशोधनाच्या वैशिष्ट्यांचा विचार करताना एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे. साहित्य हे संकुल समावेशक आहे. साहित्य हे निरनिराळ्या शास्त्रांची व कलांची संयोगभूमी आहे. संशोधनाच्या दृष्टीने हा विचार स्वीकार्यही आहे. साहित्याची धारणाही तशीच आहे. त्यामुळे साहित्य संशोधनात सर्वसमावेशकता आलेली असते.

विज्ञानशास्त्रे माणसाला व समाजाला संशोधनामध्ये बाजूला ठेवून मानवनिरपेक्ष, मानवरहित अशा जगाचा परिशोध घेतात. सामाजिक शास्त्रे विज्ञानाला व माणसाला बाहेर ठेवून मानवनिर्मित समाजाची रचना, ठेवण इत्यादीचा अभ्यास करतात. मानसशास्त्र मानवी मन जगापासून वेगळे काढून त्याचे खरेखुरे रूप, उघडे नागडेपणे न्याहाळण्याचा प्रयत्न करते. याचाच अर्थ ही शास्त्रे (संशोधन प्रकार) माणसाचे, समाजाचे, मानवी मन: सामर्थ्याचे व दुबळेपणाचे पृथगात्मक दर्शन घडवितात. साहित्यात मात्र मानवी जीवन व माणूस यांच्यात फारकत न करता एकमेकांच्या सान्निध्यात त्याचे चित्रण करते. त्यामुळे ते मनोज्ञ व कलापूर्ण होते. सर्व शास्त्रांच्या सानिध्यातच मानवी जीवन, त्याचे कलाविश्व आदीचा शोध घेणे व सजकता निर्माण करणे हे काम साहित्य व साहित्य संशोधनात केले जाते.

साहित्य संशोधनाच्या वैशिष्ट्यांचा एक विचार करताना एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे ती अशी की संशोधनात (संशोधकीय) प्रतिभेला स्थान असते. ती कार्यरत असते. 'चिं. त्र्यं. खानोलकरांच्या शोधात' या ग्रंथात जया दडकर यांनी 'चानी' कादंबरीच्या विवेचनातून दडकर 'चिं. त्र्यं. खानोलकर : व्यक्ती व साहित्य' यांच्याशी किती एकरूप झाले होते याचा प्रत्यय स्वामींच्या मठात गेले असताना पाकोळ्यांची चिकचिक कानी पडताच त्यांना जो भावानुभव आलेला तो त्यांनी सांगितला आहे तेथे येतो.

इतर संशोधन प्रकारांपेक्षा साहित्य संशोधनामध्ये प्रतिभेचे स्थान व महत्त्व कसे असते हे डॉ. द. न. गोखले यांनी सांगितले आहे. "व्यक्तिमत्त्वाच्या शोधात दरवेळी घटकाकडून पूर्णत्वाकडे मी जात होतो असे नाही. अधूनमधून ज्याला प्रतिभ ज्ञान म्हणतात, स्फूर्ती म्हणतात तिची स्फुरणे मी अनुभवित होतो... शोधाची ही सारी प्रक्रिया कधी माझ्या जागृत मनात तर कधी माझ्या सुप्त मनात पण चालू होती असे लिहितात.

मुळात संशोधन ही जीवनवृत्ती आहे आणि प्रत्यक्ष जीवानाशी संबंध अशी ही कृती आहे. साहित्य हा संस्कृतीचा एक भाग आहे आणि साहित्य संशोधन हे एक सांस्कृतिक कार्य आहे.

साहित्य संशोधनाचे अंतिम उद्दिष्ट हे भावनात्मक सृष्टीचे एक शोधणे. साहित्याच्या शब्दरूप आविष्काराच्या सौंदर्याचे स्वरूप उलगडणे हे असते. तसेच साहित्य सौंदर्याचे आणि साहित्य श्रेष्ठतेचे अंती निश्चयन करावयाचे असते. नवसंशोधनाचा सारा खटाटोप साहित्याचे सौदर्य व श्रेष्ठत्व यांच्या अधिकाधिक वस्तुनिष्ठ निर्णयाकडे जाण्यासाठी असतो. मुळात साहित्य संशोधन ही व्यापक अशी संकल्पना आहे. जेथे जेथे आत्मपरता असते त्याला साहित्य या संकल्पनेत सामावून घेता येते. साहित्य हा दस्तऐवज प्रमेय सिद्धांत असतो. त्यामुळे अशा प्रकारचे संशोधन जिथे केले जाते त्याला साहित्य संशोधन म्हणतात.

साहित्यकृतीतील अनुभवाची श्रेष्ठता न्याहाळणे, लेखकाची नवनिर्माण क्षमता शोधणे. साहित्यातील जीवनानुभवाचा कलाकृतीच्या श्रेष्ठत्वाशी असलेला संबंध शोधणे व तिचे पुनर्मूल्यांकन, पुनर्मूल्यमापन करणे हेही साहित्य संशोधनाचे महत्त्वाचे उद्दिष्ट आहे. साहित्य कृतीबद्दल शोध दृष्टीने जे भावते ते वस्तुनिष्ठ पद्धतीने संशोधनात मांडणे, तसेच साहित्य-

परंपरा, वाङ्मयप्रकार, कालखंड, प्रवृत्ती आशय, प्रेरणा व ग्रंथकार याचा शोध घेणे आदि उद्दिष्टे आहेत.

मराठी साहित्य संशोधन हे तात्त्विक सिद्धांतपर, संपादनपर आणि आत्मनिष्ठ प्रक्रियेवर आधारित असे आहे. म्हणून साहित्य संशोधन ही एक अर्थपूर्ण, अन्वयार्थक आणि बुद्धिपुरस्सर अशी अभिक्रिया ठरते.

## २.६ संदर्भग्रंथ सूची


१. डॉ. जोशी, वसंत स. (संपा.) : 'मराठी भाषा व साहित्य संशोधन' (खंड-१), महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे, खंड-१, प्र.आ. १९८१.

२. डॉ. जोशी, वसंत स. (संपा.) : 'मराठी भाषा व साहित्य संशोधन' (खंड-१), महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे, खंड-३, प्र.आ. १९८९.

३. देशमुख, उषा मा. : 'मराठी संशोधन विद्या', स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस, पुणे, १९८९.

४. पाटील म. सु. : 'साहित्याचे सामाजिक व सांस्कृतिक अनुबंध' शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, २००१.

५. संत, दु. का. : संशोधन : पद्धती, प्रक्रिया आणि अंतरंग, पुणे विद्यार्थीगृह प्रकाशन, द्वि. आ. १९८८.


## २.७ सरावासाठी प्रश्न

१. साहित्य संशोधनाची संकल्पना उलगडून त्याचे स्वरूप विशद करा.

२. साहित्य संशोधन आणि साहित्य समीक्षा यांचे परस्परसंबंध स्पष्ट करा.

३. साहित्य संशोधनाच्या वैशिष्ट्यांची चर्चा करा.

४. साहित्य संशोधनाच्या प्रमुख क्षेत्राची सविस्तर ओळख करून द्या.

✞✞✞✞

# ३

# साहित्याच्या संशोधन पद्धती

**घटक रचना :**

३.१ उद्देश

३.२ प्रास्ताविक

**घटक ३अ**

३अ.१ ग्रंथकार/लेखकाभ्यास

३अ.२ साहित्यकृतींचा अभ्यास

३अ.३ कालखंडाचा अभ्यास

३अ. ४ साहित्यप्रकाराचा अभ्यास

३अ. ५ तौलनिक साहित्याभ्यासपद्धती

३अ. ६ स्त्रीवादी संशोधन पद्धती

३अ. ७ ऐतिहासिक संशोधन पद्धती

३अ. ८ समाजशास्त्रीय व मार्क्सवादी संशोधन पद्धती

३अ. ९ भाषावैज्ञानिक संशोधन पद्धती

**घटक ३आ**

साहित्यसंशोधन भाषाशास्त्र आणि बोलींचा अभ्यास

**घटक ३इ**

३इ.१. ग्रंथालयीन वाचनाचे संयोजन

३इ.२ ग्रंथसूची शास्त्र

३इ.३. संशोधन साधने

३.३ समारोप

३.४ संदर्भ ग्रंथ सूची

३.५ सरावासाठी प्रश्न

## ३.१ उद्देश

१) साहित्य संशोधन पद्धतींची आवश्यकता स्पष्ट होईल.

२) संशोधन पद्धतीचे उपयोजन कसे करावे याची जाणीव होईल.

३) संशोधन पद्धती संशोधन विषयावर अवलंबून असते, याचे ज्ञान होईल.

४) संशोधनात एकच एक पद्धती उपयोजनात येत नाही, हे स्पष्ट कळेल.

५) सूचीशास्त्रामुळे प्रबंधलेखनाची शास्त्रीय शिस्त समजून येईल.

## ३.२ प्रास्ताविक

प्रस्तुत घटकात आपल्याला साहित्याच्या संशोधन पद्धतींचा अभ्यास करायचा आहे. मानवाच्या जिज्ञेसेतून संशोधनप्रक्रियेला चालना मिळाली आहे. सुरुवातीला विज्ञानाच्या क्षेत्रात संशोधन प्रक्रियेला स्थान मिळाले. विकासक्रमात हळूहळू सामाजिक शास्त्रे, साहित्य आणि मानव्यविद्या या शास्त्रांमध्येही संशोधन होऊ लागले. संशोधनाची दृष्टी सुस्पष्ट होत गेली. परिणामस्वरूप वैज्ञानिक संशोधन आणि वाङ्मयीन संशोधन यातला भेद स्पष्ट झाला. वैज्ञानिक क्षेत्रांतील संशोधनात प्रयोग, पाहणी व सिद्धांत यांना महत्त्व असते. साहित्याच्या संशोधनात संकलन, पृथक्करण आणि अन्वयार्थ यांना महत्त्व असते. विज्ञानाची वस्तुनिष्ठता आणि साहित्याची सर्जनप्रधानता लक्षात घेतली तर ही बाब ध्यानात येईल. त्या त्या विद्याशाखेनुसार संशोधन पद्धतींचे स्वरूप बदलत असते. त्यावरून संशोधन पद्धतींचे संशोधन प्रक्रियेतील महत्त्व सुस्पष्ट होईल. तसेच या पद्धतींची निवड संशोधनासाठी निवडलेल्या विषयावर अवलंबून असते. या कारणामुळे साहित्य संशोधनात पद्धतींची विविधता आढळून येते. म्हणून संशोधन पद्धतींचे स्वरूप इथे आपण अभ्यासणार आहोत.

## ३.३ साहित्याच्या संशोधन पद्धती

साहित्याचे संशोधन करत असताना अनेक पद्धतींचा अवलंब केला जातो. त्यामध्ये मग साहित्यकृतीच्या लेखकाचा म्हणजेच ग्रंथकाराचा अभ्यास, साहित्यप्रकारनिष्ठ, साहित्यकृतीनिष्ठ व कालखंडानुसार साहित्य कृतीचा अभ्यास या पद्धतींच्या अनुषंगाने साहित्याचे संशोधन केले जाते. या सर्व पद्धतींचा आपण विस्ताराने आढावा घेऊ.

## ३अ.१ग्रंथकार/ लेखकाभ्यास :

साहित्याच्या संशोधनक्षेत्रात ग्रंथकार संशोधन पद्धतीलाच ‘एका लेखकाचा अभ्यास' पद्धतीही म्हटले जाते. एका लेखकाचा अभ्यास ही पद्धती अत्यंत प्रिय झालेली आहे. एखादा सांकल्पनिक विषय, त्यातील अभ्यासाच्या दिशा, त्याचा कालखंड, त्यावरील उपलब्ध साहित्य आणि सांकल्पनिकविषयाचे शीर्षक इतक्या गोष्टी करण्यापेक्षा 'एका लेखकाचा अभ्यास', या शीर्षकापासूनच सुलभ वाटतो. एखाद्या लेखकाच्या काही कलाकृती वाचलेल्या असतात, विद्यापीठीय पातळीवर पदव्युत्तर वर्गाला ‘एका लेखकाचा अभ्यास’ अशी एक प्रश्नपत्रिकाही असते. त्यामुळे या पद्धतींची साधारण तोंड ओळख झालेली असते. या कारणांमुळे ही पद्धती अभ्यासकांना प्रिय वाटते.

या पद्धतीमध्ये आधी एक लेखक निश्चित करावा. तो लेखक प्राचीन कालखंडातील की आधुनिक कालखंडातील हे निश्चित झाले, की त्याची ग्रंथसंपदा उपलब्ध होते का, याचाही अंदाज घ्यावा. बऱ्याचवेळा काही आधुनिक लेखकाची ग्रंथसंपदा मिळत नसल्याने त्यालाच प्राचीन म्हणावे की काय, असे वाटते.

अभ्यासासाठी निवडलेल्या लेखकाची ग्रंथसंपदा समग्रपणे कालानुक्रमागत वाचून काढावी. या वाचनातून आपल्या काही प्रतिक्रिया तयार होतात. त्याचीही आपल्या टिपणवहीत नोंद ठेवावी. त्यानंतर त्या लेखकाच्या साहित्याचा शोध पुढील दृष्टीने करावा.

अ) १) लेखकाचे जीवन व व्यक्तिमत्त्व

२) स्थलकाल परिस्थिती

३) लेखककालीन वाङ्मयीन वातावरण

हे मुद्दे लेखकाच्या अभ्यासातील पण लेखकाच्या साहित्याच्या बाहेरील आहेत. लेखक नीट समजून घेण्यासाठी आणि लेखकाच्या साहित्याच्या अन्वय लावण्यासाठी हे मुद्दे महत्त्वाचे ठरतात. या नंतर प्रत्यक्ष लेखकाच्या साहित्याचा सखोल अभ्यास पुढील मुद्द्याद्वारे करावा.

आ) १) लेखकाने हाताळलेले वाङ्मयप्रकार

२) लेखकाचा त्याच्या समकालीन आणि पूर्वकालीन साहित्याचा प्रभाव

३) लेखकाचा मूल्यात्म दृष्टिकोण

४) लेखकाचे वाङ्मय इतिहासातील स्थाननिश्चिती

५) लेखकाची भाषाशैली

या व अशा आवश्यकतेनुसार, विषयानुसार (म्हणजे शैलीशास्त्रीय, तौलनिक असे अभ्यास विषय) नवीन वेगळे मुद्देही येतील, त्यानुसार अभ्यास पूर्ण करावा.

**३अ.१.१ लेखकाचे जीवन व व्यक्तिमत्त्व :**

लेखकाच्या अभ्यासातील हा प्राथमिक मुद्दा म्हणूयात. लेखकाच्या अभ्यासात वैयक्तिक माहिती संकलित करणे आवश्यक वाटते. लेखकाचा जन्म, त्याचा परिसर, त्याचे बालपण, त्याचे कौटुंबिक जीवन, त्याच्या जीवनाला कलाटणी देणारे घटनाप्रसंग, लेखकाचे शिक्षण, त्याच्या कामधंद्याचे स्वरूप, त्याची व्यक्तिगत अभिरुची, प्रवासाची–सहलीची आवड, त्याची लोककला व इतर कलाप्रकारांतील रुची, खेळांची आवड या सर्व गोष्टी जाणून घेतल्या पाहिजेत. यातूनच विचारधारणा तयार होत असते. या गोष्टी लेखकाच्या साहित्यात कोणत्या ना कोणत्या प्रकारे प्रतिबिंबित होतात. लेखकाची जीवनविषयक दृष्टी काही अंशी त्याच्या साहित्याचे रूप ठरवीत असते.

उपरोल्लेखित माहिती सहजासहजी ग्रंथ स्वरुपात असेलच असे काही नाही. प्रसंगपरत्वे लेखकानेच कुठे कुठे लिहिलेले असते. कारणपरत्वे मित्रमंडळ, कुटुंबीय, समीक्षक यांनीही लिहिलेली असते. असे काही नसेलच तर जवळच्या वेगवेगळ्या लोकांकडून माहिती घ्यावी लागेल. मुलाखती हा एक पर्याय समकालीन लेखकासाठी असतो. अशी माहिती घेऊन लेखकाच्या आयुष्याचे उत्खनन करायचे असते. कोणत्या साहित्यप्रकारात वैयक्तिक जीवनातील गोष्टी अपरिहार्यपणे प्रकट झाल्या आहेत, ते वाचून संदर्भासह त्यातील सौंदर्यनिर्मिती उलगडून दाखविता येते. विजया राजाध्यक्ष यांनी मर्ढेकरांच्यावर

केलेलेसंशोधन, विंदा करंदीकरांवर केलेले संशोधन, जया दडकरांनी खानोलकरांवरकेलेले संशोधन या मुद्द्यासाठी उत्तम उदाहरणे देता येतील.

पण लेखकाच्या व्यक्तिगत जीवनात आलेल्या गोष्टींचे शोध घेतल्यानंतर हे या जीवनप्रसंगातील आहे, एवढ्यापुरताच अभ्यासकाचा आनंद. कारण, तो प्रसंग लेखकाच्या कलाकृतीमध्ये दीप्तिमान होऊन बसलेला असतो. त्या प्रसंगाला स्वतंत्र अस्तित्व व आशय मिळतो.

### ३अ.१.२ देश – स्थल – काल परिस्थिती :

लेखकाच्या अभ्यासात स्थल-काल-परिस्थितीचा अभ्यास करावा लागतो. लेखक कोणत्या देशात जन्मतो, वाढतो व कोणत्या देशात राहतो, हे पाहणे हे महत्त्वाचे आहे. त्या ठिकाणाची सामाजिक, राजकीय परिस्थिती कशी होती हे पाहणे महत्त्वाचे आहे. त्या ठिकाणाची स्थित्यंतरे माणूस म्हणून लेखकाला प्रभावित करीत असतात. लेखक त्याच्या ठिकाणच्या परिस्थितीशी संवादी राहिला की विसंवादी जीवन जगत होता, त्याच्या भोवतालच्या परिस्थितीशी त्या ठिकाणच्या समस्यांचे पडसाद लेखकमनावर उमटतात. यापासून तो अलिप्त राहू शकत नाही. “विशिष्ट कालाचा गुणधर्म, देशाची समान सांस्कृतिक परंपरा आणि काळाचे सर्वव्यापी भान या बाबी त्या त्या वेळेच्या लेखकांच्या लेखनातून कमी अधिक प्रमाणात प्रकट होत असतात. हे लक्षात घेऊन एक लेखकाच्या अभ्यासात देश, काळ, परिस्थितीच्या विचाराला महत्त्वाचे स्थान असते, हे विसरता कामा नये.” (बाळकृष्ण कवठेकर : ‘साहित्याचा अभ्यास’, पृ. ६६) कृष्णाजी प्रभाकर खाडीलकर (१८७२ – १९४८) यांची पौराणिक नाटके त्या काळातील परिस्थितीतून निष्पन्न झाली आहेत. स्वातंत्र्यासाठी आंदोलने चालू होती. पौराणिक रूपकावरूनखाडीलकरांनीब्रिटिशांवर हल्ला चढविला. रूपकात्मक द्वंद खाडिलकरांच्या नाटकात दिसून येते. परिणामी तत्कालीन राजकीय परिस्थितीवर आघात होत होता.

### ३अ.१.३ वाङ्मयीन वातावरण :

लेखकाच्या जडणघडणीबरोबर लेखकाच्या लेखनकाळाच्या पुढेमागे वाङ्मयीन वातावरण कसे होते, त्याचा धांडोळा लेखकाचा अभ्यास पूर्णत्वास नेण्याच्या दृष्टीने महत्त्वाचाठरतो. वेगवेगळ्या काळात वेगवेगळ्या वाङ्मयीनप्रवृत्ती,वाङ्मयप्रकार, ऐतिहासिक किंवा सामाजिक स्वरूपाची निर्मिती आणि वेगवेगळे विचारप्रवाह असतात. एखादा प्रभावी लेखक असेल वा वाङ्मयप्रकार असेल तर त्याचा प्रभाव समकालीन लेखकावर पडतो.१९२०नंतरचा कालखंड ना. सी. फडके व वि. स. खांडेकर यांचा दिसून येतो. तसेच तो कादंबरी वाङ्मय प्रकाराचाही काळ होता. त्या दोन्ही गोष्टींचा प्रभाव तत्कालीन कादंबरीवर दिसून येतो.

वरील तीन मुद्द्यांच्या अनुषंगाने लेखकाच्या समकालीन एकंदर वातावरणाचा अभ्यास यात अपेक्षित आहे.याने एक भरभक्कम पार्श्वभूमी लेखकाच्या शोधासाठी आपल्यासमोर तयार होईल. लेखकाचे व्यक्तिगत जीवन,त्याची देखभाल, परिस्थिती आणि त्याच्या समकालातील वाङ्मयीन वातावरणाच्या अभ्यासाने लेखकाविषयी काही विधाने करण्याची मुभा मिळते. लेखकाला घडविणाऱ्या वेगवेगळ्या परिस्थितीनंतर निष्पन्न होणाऱ्या त्याच्या प्रत्यक्ष साहित्यकृतींचा अभ्यास आपल्याला पुढे न्यायचा आहे.

### ३अ.१.४ लेखकाने हाताळलेले वाङ्मयप्रकार :

आता प्रथम आपल्याला आपण निवडलेल्या लेखकाच्या साहित्यकृती पहायच्या आहेत. त्यांच्या वाङ्मयप्रकाराची वर्गवारी आपल्या अभ्यासासाठी करायची. लेखकाने कोणकोणते वाङ्मयप्रकार हाताळलेला आहेत, तो कोणत्या वाङ्मयप्रकारासाठी प्रसिद्ध किंवा त्याची वैयक्तिक आवड त्यात प्रकटत असल्याने तो तिकडे जास्त लक्ष देतो आहे का, या प्राथमिक शंकांची चर्चा करावी. एखाद्या प्रकारातून प्रतिभेचा उत्तुंग आविष्कार घडविल्यानंतर लेखकाला त्या प्रकारातून अनुभव, निरीक्षणे व्यक्त करण्यासाठी तो प्रकार न हाताळता दुसऱ्या प्रकारातून अनुभवाचा घाट घडताना दिसतो.वि. वा. शिरवाडकरांनी कविता व नाटक या दोन प्रकारात कसदार व दर्जेदार लेखन केले.यासोबतच कादंबरी या वाङ्मयप्रकारात त्यांनी लिहिलेल्या काही कादंबऱ्यालक्षणीय ठरल्या आहेत. या स्वरूपाचा शोधही लेखकाला काही अंशी न्याय देणारा असतो. शिरवाडकरांच्या नाटकात काव्य आहे आणि काव्यात नाट्य आहे, नाटक संवादी आहे, कविता भावकाव्यपर म्हणजे निवेदनात्मक आणि बोलणारा कवीच आहे. हा होणारा परकाया प्रवेश कसा असेल हा चिंतनाचा विषय होऊ शकतो आणि यातून लेखक हा विषय सूक्ष्मपणे अभ्यासला जातो.

लेखकाची कामगिरी एकाच वाङ्मयप्रकाराची असेल किंवा लेखकाचा एखादाच वाङ्मयप्रकार अभ्यासासाठी घेतलेला असेल तेव्हाही तो समग्र लेखक वाचावा लागतोच. त्याशिवाय आंतरविरोधातील विश्लेषण होत नाही. अरविंद गोखले यांनी केवळ कथालेखन केले. कथेवर त्यांची निष्ठा होती. नवकथेच्या काळात कादंबरी काहीशी निष्प्रभ झाली होती; किंवा नवप्रथेची लक्षणे कादंबरीवर दिसत होती. उदा.‘बनगरवाडी’वरनवकथेचा प्रभाव दिसून येतो. अरविंद गोखले यांच्या अनुभवविश्वाच्या अनुषंगाने त्यांच्या एकाच साहित्यप्रकारातील लेखनाचा शोध घेता यावा.

### ३अ.१.५ लेखकाच्या वाङ्मयाचे आशय-स्वरूप :

साहित्यकृतीत जीवनाचा आविष्कार होत असतो. कारण साहित्य सर्वस्वी नवीन असे काही नसते. ते जीवनाच्याच घटितांच्या शक्यतांचे अंग असते. आधी जीवन-समाज मग साहित्य असा क्रम लागतो. म्हणून जगण्याचे प्रत्यंतर साहित्यामधून होत असते.“साहित्यातून दैनंदिन जगण्याचे उर्ध्वपातन झाले पाहिजे” असे भालचंद्र नेमाडे म्हणतात. या उर्ध्वपातनातून जगणे प्रतिबिंबित होण्याची अपेक्षा आहे. लेखकाच्या साहित्यात प्रकट झालेले भावविश्व कोणत्या स्वरूपाचे आहे, कोणत्या संवेदना दिसून येतात आणि एकंदर जीवनविचार कसा प्रकट झाला आहे, याचा शोध आशयातून घ्यायचाअसतो.

आशयाचे विश्लेषण प्रकारानुरूप वेगळे करावे लागते.कादंबरी असेल तर तिच्या अनेक पोटप्रकारांतून समाजाचे, जीवनाचे व्यापक दर्शन कसे घडविले आहे, याची चिकित्सा करते. त्यामधील नवतेचे स्वरूप पूर्वसुरींहूनकसे निराळे आहे, हे पाहून घ्यावे लागेल.

### ३अ.१.६ लेखकाची मूल्यनिष्ठा :

लेखकाची मूल्यनिष्ठा ही त्याची खाजगी बाब आहे. काही लेखकांनीमूल्यनिष्ठा जाणीवपूर्वक स्वीकारलेली असते. लेखकाचीमूल्यनिष्ठा निर्मितीमध्ये कळत नकळत उतरलेली असते. सामाजिक बांधिलकीच्या भूमिकेतून साहित्यनिर्मिती करणाऱ्या लेखकाच्या अभ्यासाबाबत

हा मुद्दा महत्त्वाचा ठरतो. साने गुरुजींच्या साहित्यामधून मनुष्यमात्रांविषयी सदभाव प्रकट करणारे चित्रण आहे. बाबुराव बागूलांच्या साहित्यात अशीच सामाजिक बांधिलकी आणि आध्यात्मिकता पाहायला मिळते. मूल्यनिष्ठा घेऊन झालेले लेखन उर्जस्वल,कसदार असते. मूल्यनिष्ठेच्या अनुषंगाने केलेला अभ्यास त्या समाजाचा स्थितीदर्शकही असू शकतो.

### ३अ.१.७ लेखकाचे वाङ्मयेतिहासातील स्थान :

हा लेखकाच्या अभ्यासातील चरमबिंदू असला पाहिजे. खूप चांगली चिकित्सा करून लेखकाचे वाङ्मयेतिहासातील स्थान न सांगता संशोधन सिद्ध केले तर त्याला तसाही अर्थ राहणार नाही. लेखकाचे वेगवेगळ्या प्रकारातील लेखन, त्याची त्यामधील नवता, प्रकारांमध्ये केलेली मोडतोड या सर्वांमधून लेखक कोठे बसू शकतो, हे सांगावे लागेल.पु.शि.रेगे, बा. सी. मर्ढेकर हे दोघे नवकवीच. रेगे आधुनिक प्राचीन कवी! तर नवकाव्याच्या जरीपटक्याचा मान मर्ढेकरांना का गेला, याचा शोध घेतला की दोघांचीही वाङ्मयेतिहासातील स्थाननिश्चिती होते.

सारांश,'एका लेखकाचा अभ्यास' ही लोकप्रिय पद्धती आहे. प्रथमदर्शनी हा अभ्यास सुलभ वाटूनही तो तसा नसतो. लेखकाची पूर्वकालीन परिस्थिती, समकालीन परिस्थिती आणि लेखकाची निर्मिती या त्रयींतून हा अभ्यास अपेक्षित आहे, म्हणून तो व्यापक होऊ शकतो.

## ३अ.२ साहित्याकृतींचा अभ्यास

प्रस्तुत मुद्द्यामध्ये आपल्याला एका विशिष्ट साहित्यकृतीच्या अभ्यास पद्धतीचा परिचय करून घ्यायचा आहे. एखाद्या श्रेष्ठ साहित्य कलाकृतीने वेगळी परंपरा निर्माण केली असेल तर अशा साहित्यकृतीवर स्वतंत्र शोधन झाले आहे. ‘संगीत सौभद्र’ आणि ‘कोसला’ या दोन साहित्यकृतींवर संशोधन झाले आहे. विषय मर्यादित घेऊन त्या विषयाचा पाळ्यामुळ्यांसह सखोल अभ्यास करता येतो. “एखादी कलाकृती जीवन दर्शकाच्या दृष्टीने अंत:सामर्थ्य घेऊन निर्माण झालेली असते; ती युगकर्ती असेल वा नसेल, पण पुन्हा आपणास समीक्षामूल्यांचा फेरविचार करायला लावणारी असू शकते. – जी कलाकृती आपल्या काळाशी जीवनमूल्यदृष्ट्या आणि वाङ्मयमूल्यदृष्ट्या संबंधित असून त्या काळाबाहेर विकसित पावलेली असते, जिच्या निर्मितीच्या शोधात लेखकाच्या समग्र वाङ्मयनिर्मितीचे संदर्भ उपस्थित होतात आणि त्या विशिष्ट वाङ्मयप्रकारची तात्त्विक चिकित्सा संभवते, वाङ्मयाच्या इतिहासात जिला महत्त्वपूर्ण स्थान लाभलेले असते... अशी कलाकृती संशोधनाच्या व समीक्षेच्या सर्व पद्धती व प्रकार यांना आवाहन करते.” (व. दि. कुलकर्णी, भाषा व साहित्य साहित्य : संशोधन, पृ. ३६७)

### ३अ.२.१ साहित्यकृतीचा कोणत्या अभ्यासपद्धतीने अभ्यास करावा? :

विशिष्ट साहित्यकृतीची एकदा निवड झाली, की तिचा अभ्यास कोणत्या पद्धतीने करावा, हा प्रश्न पडतो. मागे चर्चिल्याप्रमाणे साहित्याचे संशोधन कोणत्याही एकच एक पद्धतीने पूर्ण होत नसते. ज्या ज्या पद्धतींचे उपयोजन करून कलाकृतीला न्याय देता येईल. त्या पद्धतींचे

उपयोजन करावे. विशिष्ट पद्धती घेतली की मर्यादा पडते. त्याकरिता साहित्यकृतीच्या आशयाला विचारात जावे, ती आपल्यासाठी पद्धती संगत जाईल.

### ३अ.२.२. साहित्यकृतीचे संहिताबाह्य स्वरूप :

काही कृतीच्या अभ्यासात एका लेखकाच्या अभ्यासासाठी जे मुद्दे आपण पहिले आहेत, (साहित्यकृतीबाह्य), त्या मुद्द्यांचा इथेही विचार करता येतो.

लेखकाने जे सर्जन घडविलेले आहे ते स्वतंत्र असते. ती पौराणिक, ऐतिहासिक किंवा मौखिक परंपरेतील आहे, ते एकदा निश्चित करावे. साहित्यकृतीचा मूळ आधार मिळाला की लेखकाने त्याचे पुन:सर्जन कसे केले आहे, हे तपासत जावे. मग साहित्यकृतीच्या प्रेरणास्थानापर्यंत पोचता येते. साहित्यकृती पूर्वकथेवर आधारित असेल तर लेखकाची नवनिर्मिती कशात आहे, या गोष्टी शोधता याव्यात.

### ३अ.२.३. साहित्य कलाकृतीचे आशय विश्लेषण :

कलाकृतीचे विश्लेषण करताना साहित्यकृतीचा घाट, तिच्यातील एकसंधता, आशय- विषय, त्यामधील आंतरविरोध, ताणतणाव, घटना-प्रसंगांची मालिका आणि लेखकाची शैली या गोष्टी महत्त्वाच्या ठरतात. कलाकृतीला जितके भिडाल, तितकी ती कलाकृती व्यापक होत जाते.

चांगल्या श्रेष्ठतर कलाकृतीमध्ये सामाजिक आणि सांस्कृतिक बाजूचे विश्लेषण देश, स्थल-काल, परिस्थितीनुसार करावे. कालविसंगतीचे विश्लेषण कलाकृतीवर अन्याय ठरतो. पौराणिक वा ऐतिहासिक कथावस्तू घेतलेली असेल तर कालसमोर ठेवून त्याकालीन रूढी, परंपरा विचारात घ्याव्यात. आजची दृष्टी त्याकाळात लावू नये.

### ३अ.२.४. समीक्षेचे पुनर्वाचन :

कलाकृतीच्या अभ्यासाची साधने, कलाकृतीचे परीक्षण, समीक्षा असतात. यांचे पुनर्वाचन करावे. पुनर्वाचनात मूळ समीक्षेत जे साहित्यकृतीविषयी आलेले नसते, त्यांचा शोध घेता येतो. तसेच खंडमंडनही करता येते. कधी कधी समीक्षकच आपले पुनर्वाचन करतो. ‘कोसला’ कादंबरीविषयी पु. ल. देशपांडे यांनी प्रतिकूल मत दिले होते; पण नंतर त्यांनी फारच छान परीक्षण केलेले आहे. असे पुनर्वाचन समीक्षकाच्या संवेदनशीलतेवरअवलंबून असते. पुनर्वाचन ही संशोधकाची सामाजिक, सांस्कृतिक व वाङ्मयीन न्यायदृष्टी असते.

### ३अ.२.५. कलाकृती/साहित्यकृती आणि साहित्य यातला फरक :

आता आणखी एक फरक स्पष्ट करून घेऊ या. ‘कोसला’, ‘सावित्री’, ‘हिमालयाची सावली’ या कलाकृती आहेत, तर ‘विशाखा’, ‘देखणी’, ‘सांगावा’ यांना आपण कलाकृती न म्हणता साहित्य म्हणतो. ‘विशाखा’ हा कवितांचा संग्रह तर ‘सांगावा’ कथांचा संग्रह आहे. अनेक कविता, अनेक कथा यात विषय वैचित्र्य असते. एकसलग बंदिस्त असणाऱ्या पुस्तकाला कलाकृती म्हणतो तर आशय वैचित्र्य, विषय वैचित्र्य असणाऱ्या पुस्तकाला साहित्य अशी व्यापक संज्ञा वापरली जाते. कथासंग्रहाला, कवितासंग्रहांना एकसमुचित असा विषय

नसतो. म्हणून त्यांना साहित्यकृती म्हणता येणार नाही. एक कविता, कथा यांना साहित्यकृती म्हणता येते.

## ३अ.३ कालखंडाचा अभ्यास

'विशिष्ट कालखंडाचा अभ्यास' ही पद्धती कालानुषंगिक अभ्यास करते. विशिष्ट काळात कोणत्या प्रवृत्ती होत्या, विचारप्रवाह काय होता किंवा त्या एका कालखंडात कोणती निरीक्षणे दिसून येतात. याचा शोध घेणे या पद्धतीत अपेक्षित असते. मराठी साहित्यात प्राचीन आणि आधुनिक असे दोन उभे कालभेद आहेत. त्याचे पुन्हा वैशिष्ट्यानुरूप कालभेद करता येतील. उदा. रंगभूमीचा सुवर्णकाल, नवकवितेचा काल असेही भेद अभ्यासाच्या सोयीकरता केले जातात. या अभ्यासपद्धतीद्वारे कालिक वैशिष्ट्यांचा, कालिक प्रेक्षकांचा शोध घेणे अपेक्षित असते.

### ३अ.३.१ कालखंड : प्राचीन - बहिर्मुख, आधुनिक - अंतर्मुख

कालखंड पद्धतीने अभ्यास करताना काही महत्त्वाच्या गोष्टी लक्षात घ्याव्या लागतात. त्या अशा की, प्राचीन कालखंडातील संत हे आपल्या लौकिकासाठी लिहीत नव्हते. बहुश: लोकोद्धारासाठी संतांचा आविष्कार झाला. ते लोकांपुढे भाष्य, प्रवचन-कीर्तन करीत. म्हणजे ते बहिर्मुख प्रवृत्तीचे होते. आधुनिक साहित्यनिर्मिती स्व-लौकिकासाठी झालेली आहे. मनाचा तळ, मनाची गदळ त्यात असते. म्हणून त्यात अंतर्मुखता असते. अंतर्मुखतेत प्रश्न उपस्थित होतात. तर बहिर्मुखतेत प्रश्नांची उत्तरे, समस्यांची उकल असते. विशिष्ट वाङ्मयीन कालखंडातील अभ्यासपद्धतीची अशी प्रमुख लक्षणे असतात. त्याने अभ्यासातील गूढप्रश्न सोडविणे शक्य असते.

प्राचीन वाङ्मयअंतर्मनाचा, अध्यात्माचा विचार करणारे असूनही ते बहिर्मुखी आहे. ज्ञानेश्वरांच्या समोर चातुर्वर्ण्यव्यवस्थेची चौकट होती. ती चौकट न मोडता ज्ञानेश्वरांनी आध्यात्मिक ज्ञानाचे विमोचन केले तर परकीय व परधर्माच्या आक्रमकांपासून स्वधर्माचे रक्षण कसे करावे, ही एकनाथ महाराजांसमोरची समस्या होती. म्हणजे या पद्धतीने प्राचीन कालखंडाचा अभ्यास करताना बहिर्मुखतेचा आणि अर्वाचीन कालखंडाचा अभ्यास करताना अंतर्मुखतेचा विचार अभ्यासावर प्रकाश टाकणारा असेल.

### ३अ.३.२. कालखंडाच्या धारणा

त्या त्या कालखंडाच्या काही पक्क्या धारणा असतात. प्राचीन काळाच्या अनुषंगाने लोकधर्म, समाजधर्म असे शब्द योजले जातात. आधुनिक काळात समाजमन-लोकमन असे शब्द संज्ञेच्या रूपात दिसतात. "प्रत्येक कालखंडाचे स्वतःचे असे एक प्राणतत्त्व-अस्तित्व विशेष असतो. या विशेषाच्या अधिष्ठानावर त्या त्या काळातील तत्त्वज्ञान, विधिनिषेध, संस्कार, संकेत व्रतोत्सव, मूल्यभान सिद्ध होतात. हा मूल्यभाव कलावंतांचे सौंदर्यसंवेदन, समकाल यांच्या संयोजनातून त्या त्या काळाचे अस्तित्व, त्याचा आशय आणि अभिव्यक्तीसह आकारास येतो. एकेकाळी प्रभावशील ठरणारा मूल्यभाव नंतरच्या काळात नामशेष होतो; परंतु एरवी इतिहास जमा झालेला मूल्यभाव, जीवनधारणा तत्कालीन अस्सल साहित्यकृतीतून चैतन्यरूपानेथरारत असल्याचा अनुभव नेहमीच येतो. यासाठीच

विशिष्ट काळातील साहित्य आणि साहित्याला प्रेरक ठरणाऱ्या धारणा यांचा परस्पर तोल, ताण न्याहाळणे, त्यांचा परामर्श घेणे, त्या त्या साहित्य विचारात आवश्यक ठरते." (गो. म. कुलकर्णी, 'भाषा व साहित्य : संशोधन', पृ. ३९९)

## ३अ.४ साहित्यप्रकाराचा अभ्यास

साहित्यप्रकार अभ्यास पद्धतीमध्ये साहित्यप्रकारांचे वर्गीकरण करणे अपेक्षित असते. आज आपण कथा, कविता, कादंबरी, प्रवासवर्णन, आत्मचरित्र, चरित्र अशा संकल्पना साहित्यप्रकारांसाठी वापरतो. परंतु साहित्यप्रकाराचा मुलभूत आणि सैद्धांतिक अभ्यास करणारे कथनात्म, नाट्यात्म आणि भावकाव्यात्म अशाप्रकारे वर्गीकरण करतात. असे वर्गीकरण साहित्याच्या स्वरूप-लक्षणांच्या आधारे असल्याने ते योग्य, उचित ठरते. कथा-कादंबरी-कविता-साहित्य या संकल्पना आहेत. आपल्याला साहित्यसंकल्पनांचे वर्गीकरण करायचे नसून साहित्यप्रकाराचे म्हणजे कथनात्म साहित्य, नाट्यात्म साहित्य आणि भावकाव्यात्म साहित्य असे करायचे आहे. यामध्ये परंपरेचे समग्र साहित्य येते. भालचंद्र नेमाडे यांचा कादंबरीवरचा गाजलेला लेख या प्रकारच्या वर्गीकरणातील आहे. साहित्यप्रकारांच्या वर्गीकरणाच्या तीन महत्त्वाच्या भूमिका आहेत.

### ३अ.४.१ नाममात्रवादी भूमिका व एकसत्त्ववादी भूमिका :

यात कांट आणि क्रोचे यांची महत्त्वाची भूमिका आहे. नाममात्रवाद्यांच्या मते साहित्याचे प्रकार नसतात. ते प्रकार बाहेरून केलेले असतात. त्यांचे विश्लेषण असे, की साहित्याचा निर्माता, स्वयंभू आणि स्वच्छंदी असतो. म्हणून कोणत्याही घाटाला ते बांधून घेत नाहीत. जे लिहितात त्याचे आशयानुसार घाट घडत जातो. निर्मात्याला आशय व्यक्त करायचा असतो. तो आशय अनन्य असाच असतो. तो स्वत:चा आपला घाट शोधतो. तयार करतो आणि त्यात बसतो. नंतरून केले जाणारे वर्गीकरण हे विद्यापीठीय अभ्यासाची सोय असते. असे केलेले वर्गीकरण निर्मिती आणि तिच्या आस्वादनासाठी नाममात्रच असते. कारण प्रत्येक कलाकृतीचा घाट वेगळा असतो. आस्वादनही वेगळे असते. अशी नाममात्रवाद्यांची भूमिका आहे. "काही विचार प्राचीन परंपरात आढळत असले, तरी एक समग्र, एकजिनसी भूमिका म्हणून त्यांचा उगम मुख्यत: एकोणिसाव्या शतकातील स्वच्छंदतावादीही परंपरेत आहे. या समीक्षेत तात्त्विक बैठक निर्माण करणारा सौंदर्यशास्त्रज्ञ म्हणजे इमॅन्युअलकांट. कांटचा विचार वेमेदेत्तोक्रोचे या तत्त्वज्ञाने मांडला. (मिलिंद मालशे : साहित्य : अध्यापन आणि प्रकार, पृ. १४१)

या संदर्भात वसंत आबाजीडहाके यांनी महत्त्वाची भूमिका घेतली आहे. त्यांच्या मते, साहित्यप्रकारांचे वर्गीकरण स्थळकाळावर आधारित नसते, तर ते वाङ्मयीन संघटनांच्या अथवा संरचनांच्या आधारावर केलेले असते. मात्र हे साहित्यप्रकार अढळ स्वरूपाचे नसतात. नवनव्या साहित्यकृतीमुळे त्या त्या साहित्यप्रकारांच्या संकल्पनेत बदल होत असतो. 'पण लक्ष्यात कोण घेतो'? (ह. ना. आपटे), 'दौलत' (ना. सी. फडके), 'कोसला' (भालचंद्र नेमाडे) या तीन कादंबऱ्या जरी घेतल्या तरी कादंबरीची 'स्थिर' रचना आहे, असे म्हणता येणार नाही. एखाद्या साहित्यप्रकारातरचनाबंधाच्या दृष्टीने वेगळेपण असलेल्या विशिष्ट साहित्यकृतींचा समावेश केला जातो. उदा. 'ज्ञानेश्वरी', 'तुकारामांचे अभंग', 'राम

जोशी' यांच्या 'लावण्या', 'तुतारी' (केशवसुत) इत्यादींचा समावेश कविता या वाङ्मयप्रकारात केला जातो! त्याचे विविध उपप्रकार केले जातात. मात्र त्यांच्या स्वरूपात लवचिकपणा आढळतो. साहित्यप्रकार नाममात्र असतात. हे खरे नसते, तसेच त्यांच्या सीमा बंदिस्त असतात, हेही खरे नाही. कोणतेही लेखन साहित्यप्रकारांशी जोडलेले असते. तसेच वाचनही. (व. आ. डहाके : 'वाङ्मयप्रकार : संकल्पना व स्वरूप', २००४, पृ.१३७)

कोणत्याही अनुभवाला काही संदर्भ, परंपरा असाव्या लागतात. संदर्भाशिवाय त्या अनुभवाला अर्थपूर्णता येत नाही. कलाकृतीचा अनुभव सहसंदर्भ असतो. कलाकृती म्हणून अनुभव घेताना, आस्वादितानाकलाविषयक संकल्पना उभी राहते.

कलापरंपरेतून मिळालेल्या संकल्पना, तत्त्वे, निकष यांचा उपयोग करणे सौंदर्यशास्त्रीय समीक्षेत अपरिहार्य आहे, असे टी. एस. एलियटचे मत आहे.

एकसत्त्ववादीसाहित्यप्रकारांना अढळ मानतात आणि प्रत्येक प्रकाराला एकच एक सत्त्व असते, असे समजतात.

### ३अ.४.२ पायाभूत करार :

'पायाभूत करार' ही संकल्पना मिलिंद मालशे यांची. कथनात्म नाट्यात्म, आणि भावकाव्यात्म या मूलभूत साहित्यबंधांना मालशे यांनी 'पायाभूत करार' म्हटले आहे. पायाभूत स्वरूपाच्या करारांमधून विशिष्ट साहित्य प्रसिद्ध होतात. कथा, कादंबरी, महाकाव्य, पोवाड्यासारखेकथनात्म करारामधून निर्माण होतात. शोकात्मिका, सुखात्मिका नाट्यात्म करारामधून तर उद्देशिका, विलापिका, अभंग इ. प्रकार भावकाव्यामधून निर्माण होतात. मिलिंद मालशे यांच्या 'पायाभूत करारा'लावसंत आबाजी डहाके यांनी मान्य करून त्याला पुष्टी जोडली आहे. डहाके म्हणतात, "मालशे यांनी सांगितलेला करार म्हणजे साहित्यप्रकाराच्या संदर्भातील 'सार्वत्रिक तत्त्वे' होत. करारांमधून विशिष्ट साहित्यप्रकार सिद्ध होतात, असे म्हणण्याऐवजी विशिष्ट साहित्यप्रकारांमध्ये विशिष्ट करार प्रामुख्याने आढळतो, असे म्हणणे उचित होईल."

ॲरिस्टॉटल ते मिलिंद मालशे, यांच्यामार्फत साहित्यप्रकारांच्या वर्गीकरणात अनेक दृष्टी दिसून येतात. क्रोंचे यांची वाङ्मयप्रकार संकल्पना समीक्षक आणि इतिहासकार यांना उपयुक्त ठरते. साहित्यविधा आणि साहित्यप्रकार असाही एक प्रकार तज्ज्ञांनी केला आहे. साहित्यविधा सार्वत्रिक तत्त्वे सुचवितात. साहित्यप्रकारसंकेतजन्य तर साहित्यविधा नैसर्गिक आहेत, असे गटे यांनी सांगितले आहे.

एकूणच साहित्य अभ्यास संशोधनामध्ये या प्रमुख अभ्यास पद्धती सोबतच पुढील काही अभ्यास पद्धतींचा अवलंब केला जातो. त्यांचा विचार आपण इथे करू.

## ३अ.५ तौलनिक साहित्याभ्यास पद्धती

तुलनात्मक संशोधन पद्धती ही संशोधन क्षेत्रात अत्यंत महत्त्वाची आहे. या पद्धतीमध्ये दोन कवी, कथाकार, कादंबरीकार, नाटककार, दोन लेखक किंवा दोन साहित्यकृती, दोन कालखंडे, दोन वेगळ्या भाषांतील साहित्य यांची तुलना केली जाते. तौलनिक संशोधनात

साहित्य-संस्कृती व्यवहारात होणाऱ्या बदलांचा अभ्यास करता येतो. या अभ्यास पद्धतीच्या आधारे कोण-कोणत्या विद्याशाखांना स्पर्श करता येऊ शकतो याचे विश्लेषण वंदना महाजन यांनी आपल्या लेखात केले आहे. "तौलनिक साहित्याचा अभ्यास करत असताना विशिष्ट भाषेतील साहित्याची व्याप्ती, त्यातील सिद्धांतन सांस्कृतिक आदानप्रदान, पुनरुज्जीवन, वेगवेगळ्या साहित्यप्रकारांचे सिद्धांत, सामाजिक वाङ्मयीन, सांस्कृतिक चळवळी कालखंड, भाषांतरीत साहित्य, साहित्य प्रकारांचे रुपबंध व शैली त्याचबरोबर वाङ्मयीन इतिहासाची तुलना करता येऊ शकते." (वंदना महाजन, पृ.१०) म्हणजेच संशोधनाची ही पद्धत अत्यंत व्यापक पातळीवरती दोन भिन्न परिप्रेक्ष्यातील साहित्यकृतींचा अनुबंध ध्यानात घेऊन त्यातील साम्य भेदांची विविध पातळ्यांवरती चर्चा करू शकते. उदा. मराठी साहित्याच्या इतिहासात अनेक नवे आकृतीबंध, विविध पंथनिष्ठ आणि संप्रदायनिष्ठ साहित्य, वेगवेगळ्या भाषा-संस्कृतीच्या संक्रमणानंतर साहित्याच्या आशय-विषय-घाटात झालेली स्थित्यंतरे या सर्व मुद्द्यांचा विचार करून त्यावर तौलनिक अभ्यासाधारे नवे दृष्टिकोण मांडता येऊ शकतात. अशा तुलनेतून नव्या मूल्यांची मांडणी करता येते. अलक्षित विषयांचे, आशयांचे तुलनात्मक संशोधन यातून शक्य होते.या प्रक्रियेमध्ये विश्लेषणाला अधिक महत्त्व असते. यातून साहित्यकृतीच्या मूल्यमापनाबाबत निर्णय देता येणे शक्य होते. "एकापेक्षा अधिक अशा कोणत्याही एककाची तुलना करणे म्हणजेच तौलनिक पद्धती होय." (पृ.१९) या व्याख्येवरून आपल्याला या अभ्यास पद्धतीचे स्वरूप ध्यानात येते. तौलनिक साहित्याभ्यास होत असताना मात्र तो निःपक्षपातीपणे होणे इथे अत्यंत महत्त्वाचे असते.

## ३अ.६ स्त्रीवादी अभ्यास पद्धती

स्त्रीवाद ही एक राजकीय आणि सामाजिक भूमिका घेऊन लढणारी चळवळ आहे. पुरुषसत्ताक व्यवस्थेचे समाज, धर्म, संस्कृती, साहित्य या सर्वांवर असणारा प्रभाव अधोरेखित करून या व्यवस्थेत घुसमटलेल्या सर्व स्त्री-पुरुषांना केवळ 'मानव' म्हणून एकाच मूल्यात बांधण्याचा प्रयत्न ही विचारधारा करते. त्यामुळेच पुरुषसत्ताक व्यवस्थेत निर्माण झालेल्या सर्व संकेतांची, नियमांची, संकल्पनांची चिकित्सा स्त्रीवादाला करावी लागते. ही अतिशय सकारात्मक विचारप्रणाली असून न्याय, समता, स्वातंत्र्यया तत्त्वांचा ती अंगिकार करते. स्त्रीवाद हा तसा मूलतः पर्यावरणवादी विचार आहे. लिंग समानता हा मुख्य उद्देश ठेवून पुरुषसत्ताक व्यवस्थेत स्त्रियांच्या वाट्याला आलेल्या नकारात्मक, अभावात्मक वास्तवाची चिकित्सा यात अपेक्षित असते.या तत्त्वांच्या आधाराने संपूर्ण समाज, संस्कृती, साहित्य, इतिहास, पर्यावरणयावर या संशोधन/अभ्यास पद्धतीद्वारेनव विचार मांडू शकतो. हा या विचारधारेतून केला जाणारा अभ्यास, संशोधन हे स्त्रीला केंद्र ठेवून सुरू होते आणि ते विकसित होऊन संपूर्ण मानवतावादाकडे वाटचाल करताना दिसते. म्हणूनच ती अनेक विद्याशाखांशी नाते सांगते. स्त्रीवादी ही ज्ञानशाखा आंतरविद्याशाखीय ज्ञानशाखा म्हणूनही मान्यतापावलेली आहे.

कालपरत्वे या विचारात अनेक नव्या विचारधारांचा समावेश होत गेला. त्यामुळे या सिद्धांतनात अनेक प्रवाह आपल्याला दिसतात. या संशोधन पद्धतीत म्हणूनच केवळ साहित्याचाच अभ्यास होत नाही तर सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, आर्थिक व ऐतिहासिक संदर्भाचाही अभ्यास होतो. शोभा शिंदे यांनी 'श्रीवाणी'मध्ये लिहिलेल्या लेखामध्ये या संशोधन पद्धतीचे स्वरूप नोंदविलेले आहे. "या संशोधन पद्धतीत व

अभ्यासात लिंगभाव (Gender studies) चा विस्तृत दृष्टिकोन ठेवून फक्त स्त्री - पुरुष ही binary न मानतातृतीयपंथी, समलिंगी त्यांच्या वाट्याला आलेला सामाजिक तिरस्कार, बहिष्कृत होणे हे अनुभवसुद्धा अभिप्रेत आहेत." (शोभा शिंदे,'आमची श्रीवाणी', ऑगस्ट २०२३ ते जाने. २०२४) एकूणच एका व्यापक पटावर संवेदनशीलता बाळगून मानव हरेक प्रकारच्या शोषणातून मुक्ती मिळवून स्वातंत्र्य, समता, बंधुभाव निर्माण करण्याचा प्रयत्न हा संशोधनाधारित अभ्यासातून सिद्ध होते. या अभ्यास पद्धतीच्या आधारे साहित्याचा सर्वंकष अभ्यास मांडला जाऊ शकतो. मराठीतील अगदी प्राचीन काळापासून ते आधुनिक युगातील साहित्याचा विचार या विचारधारेतून मांडला जातो. पुरुषसत्ताक संकेत धारणांचे सामाजिक, सांस्कृतिक, कला क्षेत्रातील प्रभाव यातून आधोरेखित केले जातात.

## ३अ. ७ ऐतिहासिक संशोधन पद्धती

या संशोधन पद्धतीलाच 'कालक्रमिक संशोधन पद्धती' म्हणतात. गोविंद काजरेकर यांनी या पद्धतीच्या उद्देशाचे विवेचन केले आहे. ते म्हणतात "भूतकालीन घटनांचा क्रम ठरवणे आणि त्यांचे अर्थनिर्णयन करणे हे ऐतिहासिक संशोधन पद्धतीचे मुख्य ध्येय असते." (गोविंद काजरेकर, 'आमची श्रीवाणी', पृ. १९) यामध्ये संशोधकाची मोठी भूमिका असते. माहिती व साधने जमा करणे, साधनांची विश्वासार्हता व अस्सलपणाचे परीक्षण, माहितीचे विश्लेषण, निष्कर्ष, अहवाललेखन, सिद्धांतीकरण, इतिहासातील दस्तऐवजांचे संपादन करणे, त्यातील साधनांची प्रतवारी लावणे, त्याची विश्वसनियता ठरवणे, या उपलब्ध साधनांचा कालखंड निश्चित करणे इ. कामे विविध शिलालेख, ताम्रपट, बखरी, पत्रे, मुद्रा, नाणी, स्थानपोथीअशा विविध नाणकशास्त्रीय, पुरभिलेखाशास्त्रीय साधानांच्या आधाराने करावे लागते. विविध कालखंड, त्या काळात उदयास आलेल्या व अस्त पावलेल्या सत्ता, सत्ता परिवर्तनाच्या काळानुसार बदलणारेसमाजकारण, धर्मकारण, अर्थकारण, संस्कृती, साहित्यव्यवहार, विविध धारणा अशा अनेक पैलूंवरही अभ्यास करावा लागतो. या पद्धतीतत्या त्या कालखंडाचा युगधर्म शोधावा लागतो. समग्र सांस्कृतिक व्यवहारांना एक इतिहास असतो. हा सांस्कृतिक व्यवहार साहित्य, वाङ्मयातूनही साक्षात होत असतो. म्हणून इतिहास संशोधनात वाङ्मयाचा इतिहास मांडणे हे देखिल महत्त्वाचे ठरते.

काळानुसार नव्या विचारधारा, नवीन दृष्टिकोण विकसित होत असतात. या दृष्टिकोणातून इतिहासाची पुनःमांडणी होत असते. ही एकप्रकारची इतिहासाची चिकित्सा असते. एखाद्या समाजाचा, संस्कृतीचा इतिहास मांडण्यासाठी जे निकष प्रमाण मानाले जातात तेच निकष वाङ्मयाचा इतिहास मांडण्यासाठी पूरक ठरतात. मराठी वाङ्मयाच्या इतिहासाचा विचार करता असे दिसून येते की, भारतीय समाज व्यवस्था ही जात, वर्ग, वर्ण, वंश याने प्रभावित झालेली आहे. त्यामुळे समाजाचे मुख्य अंग असणाऱ्या संस्कृतीवरही याचा प्रभाव दिसतो. आणि संस्कृतीचे दर्शन विविध कलांमधून पर्यायाने साहित्यातूनही होत असते. मग असे साहित्य हे अभिजन किंवा उच्च जात, वर्गातील लेखनाने पुरेपूर आहे. किंवा साहित्य इतिहासात याच्याच नोंदी अधिक सापडतात. मग अशा वेळी इतिहासात अद्याप उजागर न झालेल्या बहुजनांच्या लेखनाचा, पुराव्यांनिशी नवा आलेख मांडणे महत्त्वाचे ठरते. म्हणूनच काळानुसार बदलणारी विचारसरणी इतिहासातील अनेक दबलेल्या, दुर्लक्षित झालेल्या लेखनाचे संशोधन करत असते.

प्रत्येक कालखंडात इतिहास लिहीत असताना एक नवी, वेगळी पद्धत अवलंबिलेली असते. कदाचित ही पद्धत पुढे जाऊन जुनी ठरण्याची शक्यताही असते. ज्याची जाणीव त्या त्या काळातील इतिहासकारालाही असते. यामुळे साहित्याचा इतिहास किंवा या इतिहासाचे पुनःर्लेखन करत असताना इतिहास संशोधकाकडे पूर्वग्रहनिरपेक्ष दृष्टी असावी. तसेच व्यक्तिविशिष्ट व समुदायविशिष्ट दृष्टिकोण त्याच्याकडे नसावा. असा दोष असेल तर मात्र असा इतिहास अस्मिताकेंद्री होण्याच्या शक्यता अधिक दाट असतात. तसेच इतिहासकाराने कोणत्याही दबावाला, भावनाला बळी न पडता वस्तुनिष्ठ दृष्टिकोण स्वीकारून इतिहासाची मांडणी करावी. या काही महत्त्वाच्या बाबी या ऐतिहासिक संशोधन पद्धतीत महत्त्वाच्या असतात.

## ३अ. ८ समाजशास्त्रीय व मार्क्सवादी संशोधन पद्धती

साहित्य हा समाजाचा आरसा असतो या लोकप्रिय विधानातून साहित्य आणि समाजाचा संबंध किती घनिष्ठ असतो हे ध्यानात येते. हिप्पोलिट तेन यांच्या 'हिस्टरी ऑफ इंग्लिश लिटरेचर'या पुस्तकात साहित्य निर्मितीवर समाज परिस्थितीचा नेमका कसा परिणाम होतो याचे विवेचन केले आहे. यातूनच त्यांची वंश, समाज आणि काल (युगप्रवृत्ती) हा सिद्धांत पुढे आला. याच गोष्टी साहित्यावर प्रभाव टाकत असतात. मराठी साहित्य इतिहासाच्या प्राचीन, मध्ययुगीन, आधुनिक व उत्तर आधुनिक काळात अनेक स्थित्यंतरे आली, नव्या विचारधारा प्रभावित होत गेल्या; तर काही लोप पावत गेल्या. त्यामुळे त्या त्या काळातील विचारधारेला, युगप्रवृत्तीला प्रतिसाद देणारे साहित्याचे आशय, विषय, रूप, प्रकार यात बदल होत गेले. उदा. मध्ययुगात आध्यात्मिक विचार-चळवळीतून पुढे आलेला तत्त्वविचार वेगवेगळ्या संप्रदाय व पंथांनी आपल्या साहित्यकृतीतून मांडला. याउलट आधुनिक काळात ते तसेच न राहता त्यामध्ये कायापालट झाला. विविध प्रकारच्या सामाजिक प्रश्नांचे भान अधोरेखित करणारे आकृतिबंध निर्माण झाले. साहित्यातून मांडल्या जाणाऱ्या आशय-विषयांना ठळक करणारी भाषेची रूपेदेखील बदलत गेली. अशी अनेक स्थित्यंतरे काळानुरूप होत गेली. एकूणच समाज साहित्याला केवळ आशय, रूपच देत नाही तर या निर्मितीमागील प्रेरणाही ठरत असतो. या दृष्टिकोणातून साहित्याचा अभ्यास समाजशास्त्रीय संशोधन पद्धतीत अपेक्षित असते. एकूणच साहित्यकृतीच्या आशय, विषय रूपाचा संबंध आपल्याला फक्त साहित्याभ्यासातच सापडतो असे नाही तर त्याची उत्तरे आपल्याला समाजशास्त्रीय दृष्टिकोनातूनही शोधता येतात.

याच समाजशास्त्रीय संशोधन पद्धतीचा पुढचा टप्पा म्हणजे मार्क्सवादी संशोधन पद्धती होय. भारतीय समाजव्यवस्था वंश, वर्ग, जात, वर्ण अशा विभाजनाने बद्ध आहे. यामुळे या सामाजिक वास्तवातील जातीय, वर्गीय जाणिवा साहित्यातून उमटत असतात. मार्क्सवाद हा समाजातील वर्गीय व्यवस्थेचे विश्लेषण करणारे सिद्धांतन आहे. आर्थिकदृष्ट्या सत्ता एकवटलेला वर्ग इतर वर्गावरती आपले वर्चस्व प्रस्थापित करत असतो. (यातून एक या वर्गाचे मनोरंजन करणारे, या वर्गाला अपेक्षित असणारे आशय, विषय साहित्यातून हाताळले जातात.) यातून एक सांस्कृतिक वर्चस्वही स्थापन होत असते. हे कलानिर्मितीवर प्रभाव टाकते. या बहुजनांच्या कला-साहित्य निर्मिती दुय्यम, कनिष्ठ स्थानावर गणल्या जातात. वर्गीय वर्चस्ववादाचे नाते साहित्याशी कशा पद्धतीचे आहे हे प्रथम मार्क्सवादाने मांडले. मार्क्सवाद ही मुळात भांडवलदारी, वर्गीय व्यवस्थेतून निर्माण होणाऱ्या शोषणाला विरोध

करणारी विचारप्रणाली आहे. पुढे हीच विचारप्रणाली साहित्य मूल्यमापनासाठी अवलंबली जात असताना त्याच्या सिद्धांतनात अनेक बदल झाले. समाजशास्त्रीय संशोधन पद्धती व मार्क्सवादी संशोधन पद्धती या एकसारख्या नसून त्या एकमेकींना पूरक अशा आहेत. एकूणच साहित्य निर्मितीमागील प्रेरणा, आशय, विषय, आकृतिबंध यांचे विश्लेषण मार्क्सवादी साहित्य- समीक्षा सिद्धांतनाच्या आधारे करणे अपेक्षित असते.

## ३अ. ९ भाषावैज्ञानिक संशोधन पद्धती

या अभ्यास पद्धतीमध्ये वर्णनात्मक, ऐतिहासिक व समाजभाषाविज्ञान यातील तत्त्वांचा आधार घेऊन संशोधनात्मक अभ्यास करता येतो. अशा प्रकारच्या अभ्यासातून एखाद्या समूहाची भाषा, या भाषांमध्ये होणारी परिवर्तने, भाषेअंतर्गतअसणारे संकेत, सामाजिक-सांस्कृतिक परिप्रेक्ष्य व भाषा सहसंबंध या अनुषंगाने अभ्यास करता येतो. हा अभ्यास लिखित आणि मौखिक भाषारूपांची नोंद करणे तसेच क्षेत्रिय रूपाने भाषिक सर्वेक्षण करणे हा गोष्टीद्वारे करता येतो. या अभ्यासातून सैद्धांतिक स्वरूपाची मांडणी करून अंतिम निष्कर्ष सांगितले जातात.

✞✞✞✞

घटक ३आ

# ३आ साहित्यसंशोधन, भाष्यशास्त्र आणि बोलींचा अभ्यास

## ३आ.० साहित्य संशोधन :

साहित्याच्या संशोधनाला संवेदनशील अभ्यासक भेटला पाहिजे. अशा अभ्यासकाच्या प्रतिसादाचे चार प्रकार व्यक्त होतात.

अ) कृतीलक्ष्यी अभ्यास – प्रत्यक्ष साहित्यकृतीचे वाचन अभिप्रेत

ब) संवेदनात्मक बोधन – संवेदनात्मक पातळीवरचा अनुभव

क) आकलन पातळी – कलाकृतीचे आकलन अभिप्रेत

ड) मूल्यमापनात्मक पातळी – मूल्याधिष्ठित अभिप्राय अपेक्षित

या चार पातळ्यावरून सामान्य वाचक साहित्याचा अभ्यासक म्हणवला जातो. साहित्याचे संवेदन स्वीकारत वाचक मूल्याधिष्ठित अभिप्रायावर येतो तेव्हा सामान्य वाचक तटस्थ होतो. साहित्याचा अभ्यासक म्हणून त्याचा प्रवास सुरु होतो. साहित्यकृतींमधील वेगवेगळ्या प्रसंगाकडे, घटनांकडे विवेचनाच्या दृष्टीने पाहण्याला सुरुवात होते.

## ३आ.१ परिवर्तनशील साहित्यप्रकार आणि बहुसंस्कृती :

साहित्याचे प्रकार सतत परिवर्तनशील असतात. साहित्याचे काही गुणविशेष स्थिर होतात. 'कोसला' (भालचंद्र नेमाडे') प्रकाशित होईपर्यंत कादंबरी म्हणजे विशिष्ट कथानक असणारी कलाकृती असा संकेत रूढ झाला होता. 'कोसला'ला कादंबरी परंपरेचे कथानक नाही, तर ती परिस्थितीवर, शैक्षणिक वातावरणावर, मनुष्य स्वभावावर भाष्य करते. साहित्यप्रकार असे सतत परिवर्तनशील असले, की इतिहासात बदल जाणवत राहतात. प्रयोगशीलतेसोबत सांस्कृतिकता असेल तर कलाकृती देशप्रेमाच्या सीमारेषा ओलांडून जातात. बहुसांस्कृतिक सहसंबंध साहित्याने कसे जोडले गेले आहेत हेही पाहता येते.

## ३आ.२. कलासंस्कृती व जागतिक संस्कृती :

आधुनिकोत्तरवादाचे हे महत्त्वाचे वैशिष्ट्य, की मानवाच्या इतिहासावर जागतिक स्वरूपाची संस्कृती प्रथमच आकारास येत आहे. विश्व-मानव एक आहे, त्यांच्या सांस्कृतिक धारणा निराळ्या असल्या तरी एवढ्या मोठ्या विश्वात माहितीची देवाण-घेवाण प्रचंड रेट्याने होत आहे. आता साहित्याच्या अभ्यासात दृष्टीची साक्ष घेणे अपरिहार्य ठरत आहे.

## ३आ.३. साहित्य संशोधनातील वस्तुनिष्ठता :

साहित्याचा अभ्यास करताना एक गोष्ट ठामपणे ठरवावी लागते, की आपल्याला विज्ञानाचा नाही तर साहित्याचा अभ्यास करायचा आहे. साहित्याच्या अभ्यासाला विज्ञानाचा दर्जा प्राप्त होणार नाही; पण वस्तुनिष्ठ अभ्यास करणे शक्य आहे. वस्तुनिष्ठ अभ्यास करताना ते कधी भावलक्ष्यी तर कधी विचारलक्ष्यी होते. यातला सुवर्णमध्य साधता आला नाही तर

अभ्यास व्यक्तिनिष्ठतेकडे झुकू लागतो. मानसशास्त्रीय, समाजशास्त्रीय, मानववंशशास्त्रीय या आधुनिक ज्ञानाधारित अभ्यास पद्धती निष्पन्न झाल्या आहेत. संज्ञामीमांसा अंतर्गत रुपवादी, संरचनावादी, आदिबंधात्मक, आधुनिकतावादी, आधुनिकोत्तरवादी या पद्धतींचा प्रभावीपणे संशोधनात उपयोजन केले जात आहे. या पद्धतीच्याद्वारे अभ्यास अधिकाधिक वस्तुनिष्ठ करता येतो.

**३आ.४. भाषाशास्त्रीय अभ्यासपद्धती :**

भाषाशास्त्रीय अभ्यासपद्धतीकडे अभ्यासकांचे पूर्ण दुर्लक्ष झाले आहे. भाषाशास्त्रीय अभ्यास पद्धती ही अत्यंत वस्तुनिष्ठ आणि नेमके निष्कर्ष हाती देणारी अभ्यास पद्धती आहे. भाषा म्हणजे लिखित नव्हे, जी भाषा लोक बोलतात ती. रामायण, महाभारत, हरिभाऊ आपटे यांची साहित्यातील भाषा आहे ती संकेतबद्ध आहे.

भाषाशास्त्रात आपल्याला ऐतिहासिक भाषाशास्त्र आणि वर्णनात्मक भाषाशास्त्र या दोन पद्धतींद्वारे अभ्यास करता येतो. या दोन्ही पद्धतींमध्ये नमुन्यासाठी फार भटकंती, खर्च करावा लागत नाही. थोडेसे फिरणे, वेगवेगळ्या सांस्कृतिक गटातील व वयोगटातील आणि भिन्न भाषकांशी संवाद आणि काही नमुन्याकरिता ध्वनीमुद्रणआवश्यक असते. भाषाशास्त्रात शुद्ध भाषा, अशुद्ध भाषा असे काही नसते. काही पूर्वकल्पना डोक्यातून काढून या विषयाकडे पाहायला हरकत नाही. जिवंत बोलीवर अभ्यास असल्याने निरस, कोरडे असे या पद्धतीमध्ये नसते; चैतन्यदायी असते. शब्दांची रूपे कशी बदलत गेली, मूळ शब्द काय, त्याचे आजचे अपभ्रष्ट रूप शब्दांचा अर्थ बदल झाला आहे का, बदलला असेल आधीचा व आताचा अर्थ इत्यादी पहाणे आवश्यक ठरते.

**अ) ऐतिहासिक भाषाशास्त्र :**

भाषाशास्त्रीयअभ्यासाची ऐतिहासिक भाषाभ्यास पद्धती आहे. या पद्धतीत विविध कालखंडातील भाषेचा अभ्यास केला जातो. वेगवेगळ्या कालखंडातील भाषा, तिचे बदलते स्वरूप, वाक्यरचना आणि शब्दोत्पत्ती याचा विचार करता येतो.

भाषा कधीच स्थिर नसते. उदा. यादवकालीन भाषा, बहामनीकालीन भाषा, शिवकालीन भाषा, पेशवेकालीन भाषा कालिक टप्पे राजवटींनुसार दिसून येतात. ते भाषा स्थिर नसल्याचेच दाखवितात. सतत वहात राहणे, नकळतपरिवर्तन स्वीकारणे हा भाषेचा अंगभूत स्वभाव आहे. कारण व्यवहारसुलभता हाच भाषेचा उद्देश असतो. भाषा ध्वनिरूपात असल्याने बोलणारी व्यक्ती, कोण आहे, वय काय, ती कोठे असते, तेथील वातावरण काय या साऱ्या गोष्टी परिवर्तन घडवितात. संदेशवहन व अर्थवहनाच्या गरजेपोटी भाषेची निर्मिती झालेली असते.

या अभ्यासपद्धतीची ध्वनी विचार, व्याकरण विचार, वाक्यविचार, रीतीविचार यांचा प्राचीन परंपरेपासून विचार होत आलेला आहे. एवढेच नाही तर भाषेची कालसंगती, स्थलसंगती यांचाही विचार ऐतिहासिक पद्धतीत केला जातो.

ऐतिहासिक भाषाभ्यासपद्धती पुन्हा दोन प्रकाराने उपयोजन करता येते. १. तौलनिक अथवा बहुभाषिक पुनर्रचन पद्धती, २.अंतर्गत अथवा एकभाषिक पुनर्रचन पद्धतीने कोणत्याही भाषेचा उपलब्ध रूपांच्या आधारे प्राचीन अनुपलब्ध भाषेचे पुनर्रचन केले जाते.

**आ) वर्णनात्मक भाषाभ्यास :**

या अभ्यासपद्धतीने कोणत्याही एकाच कालखंडात बोलल्या जाणाऱ्या भाषेचा अभ्यास केला जातो. आधुनिक भाषाशास्त्राने मर्यादा असणाऱ्या ऐतिहासिक अभ्यासपद्धतीने विश्लेषण टाळून शास्त्रशुद्ध विश्लेषणासाठी वर्णनात्मक पद्धतीचा स्वीकार केला आहे. ध्वनी, स्वनिमविचार, पदिमविचार, वाक्यविचार आणि अर्थविचार या घटकांचा या पद्धतीत मूलत: विचार केला जातो.

## ३आ.बोलींचा अभ्यास

भाषेचा अभ्यास करण्यासाठी जी एक शाखा-अभ्यासपद्धती उदयास आली ती म्हणजे भाषाशास्त्र ही पद्धती होय. भाषेचा अभ्यास हा जसा ध्वनीरूपाचा, भाषेच्या व्याकरणिक नियमांचा अभ्यास असतो तसाच तो लिखित आणि मौखिक या भाषारूपांचाही असतो. लिखित भाषेचा म्हणजेच लिपिबद्ध भाषेचा, साहित्य भाषेचा तो अभ्यास असतो. तर मौखिक मध्ये व्यवहारात वापरल्या जाणाऱ्या भाषिक-बोलीरूपांचा अभ्यास असतो. बोलींचा अभ्यास हा एकप्रकारे त्या भाषेच्या समूहाचा, संस्कृतीचा, परंपरेचा, त्यात झालेल्या परिवर्तनाचा तो अभ्यास असतो. या अर्थानेच हा अभ्यास संशोधनाचे एक क्षेत्र म्हणून मान्यता पावलेले आहे. या प्रकारच्या संशोधनात स्थानिक भाषाभेद, अन्य भाषा संपर्क, कालिक भाषाभेद, इतर भाषांशी तुलना या काही प्रमुख गोष्टींवर भर दिला जातो. अशा प्रकारे बोली भाषांचा अभ्यास मांडणाऱ्या जॉर्ज ग्रियर्सन यांचे संशोधन मौलिक आहे. 'लिंग्विस्टिक स्टडी ऑफ मराठी'या ग्रंथाच्या सातव्या व नवव्या खंडामध्ये त्यांनी मराठी बोलींचे विश्लेषण केलेले आहे. अशा बोलींचा अभ्यास त्या त्या समूहाचा इतिहास, परंपरा, त्यांचे वेगळेपण, जीवनरीत समजून घेण्यासाठी अत्यंत उपकारक ठरतो. अशा पद्धतीचा अभ्यास मराठीमध्ये डॉ गं. ना. जोगळेकर, डॉ काल्याण काळे, डॉ. अंजली सोमण, डॉ. रमेश धोंगडे, डॉ. मिलिंद मालशे, डॉ. वसंत जोशी, डॉ. जयश्री पाटणकर यांनी केलेले आहे. तसेच गणेश देवी यांनी साठपेक्षा अधिक बोलींचा सर्वेक्षणात्मक अभ्यास मांडला आहे. अशा प्रकारच्या अभ्यासाने अनेक बोली, मानवी समूह उजागर होताना दिसतात. अलका मटकर यांनी त्यांच्या लेखामध्ये अशा प्रकारच्या अभ्यासात महत्त्वपूर्ण, मूलभूत असणाऱ्या संशोधक बाबींचा उल्लेख केला आहे. (अलका मटकर, 'आमची श्रीवाणी', पृ. ९५)

- अभ्यास करत असणाऱ्या विशिष्ट बोलींचा संक्षिप्त इतिहास, परंपरा मांडण्याचा प्रयत्न अशा अभ्यासातून झाला पाहिजे. तसेच त्या बोलीभाषेतील शब्दकोश तयार झाला पाहिजे.
- संबंधित बोलीची व्याकरणव्यवस्था व त्यातील नियमांचे विश्लेषण केले गेले पाहिजे.
- तसेच या बोलींच्या अनुषंगाने दोन किंवा त्यापेक्षा अधिक बोलींचा तुलनात्मक अभ्यास करून त्याबाबतचे एक मूल्यात्मक विश्लेषण करणे गरजेचेआहे.कारण या प्रकारच्या अभ्यासांती ती बोली कोणत्या प्रमाणभाषेशी संबंधित आहे यासंबंधीचे साधार विधान

करता येते.महाराष्ट्रामध्ये अनेक जाती- उपजाती, प्रांत, भटके विमुक्त, आदिवासी समाज आहेत. या प्रत्येकानुसार स्व-समाजाचे अस्तित्व, निराळेपण निर्देशित करणाऱ्या तितक्याच बोलीही आहेत. ज्या बोली त्या समूहाच्या संस्कृतीचे, धर्माचे, जीवनरीतीचे निर्देश करत असतात. त्यामुळे क्षेत्रीय अभ्यासाद्वारे या बोलींचे प्रथम संकलन करून त्याच्या इतर पैलूंचा विचार मांडणे शक्य होते.

- अशा बोलींचा अभ्यास करत असताना अनेक प्राचीन ग्रंथातील या बोली, क्षेत्राविषयी सापडणारे उल्लेख, ताम्रपट, शिलालेख, भूर्जपत्रे (हिमालयात सापडणाऱ्या भूर्ज नावाच्या झाडाची अंतर्साल. जे कागदापेक्षा अधिक टिकावू असते. ज्यावर पूर्वीचे राजे आपला निरोप लिहून पाठवत असत.), दुर्मीळ नाणी इ. गोष्टी आधारभूत ठरत असतात.
- तसेच या प्रकारच्या संशोधनाला राज्य व केंद्र सरकारकडून अनेक योजना राबविल्या पाहिजेत, भरघोस अनुदान देणे गरजेचे आहे. तसेच या बोलीतून निर्माण होणाऱ्या साहित्य कृतींना प्रोत्साहनपर पुरस्कार देऊन त्याच्या प्रसार व प्रचारालामदत करणे गरजेचे आहे.
- यामध्ये अत्यंत महत्त्वाचा व कळीचा मुद्दा असा आहे की प्रमाणभाषा ही श्रेष्ठ, उच्च प्रतीची व बोली कनिष्ठ व हलक्या प्रतीच्या हा गैरसमज लोकांच्यामनातून दूर होईल यासाठी प्रयास केला पाहिजे. अशा प्रकारच्या गैरसमजामुळेनिर्माण झालेले न्यूनगंड त्या भाषिक समूहातील व्यक्तीला त्या बोलीपासून दूरलोटत असतात, पर्यायाने त्यातून निर्माण होऊ पाहणाऱ्या साहित्याचे क्षेत्र आकुंचते व बोलीभाषा मरणकळा सहन करत राहते. यातून पर्याय म्हणून प्रमाणभाषेचे प्रशिक्षण देणे व बोली भाषेचा स्थानिक शिक्षण, अर्थ व्यवहार या क्षेत्रात तिचा सहज वावर होईल असे वातावरण निर्माण करणे महत्त्वाचे ठरते.
- प्रमाणभाषेतील शब्द व त्याला पर्यायी बोलीभाषेतील शब्द असा शब्दकोश निर्मितीचा ध्यास संशोधकाला असला पाहिजे.या अशा अनेक पैलूंवर प्रकाश टाकत बोलींचा अभ्यास करणे शक्य होते. या संशोधनाने भविष्यकाळात  मृतावस्थेत / लुप्त होऊ पाहणाऱ्या बोलींचे वर्तमानकाळात संवर्धन करता येणे शक्य होते. नव्या समाज भाषावैज्ञानिक अंगाने अशा अलक्षित बोलीप्रकाशात येतील व यातून अशा बोलींच्या अभ्यासाची, संशोधनाची गोडी आपोआप निर्माणहोईल.

इतकेच नाही तर ज्या समाजाच्या अशा वेगळ्या बोली आहेत तो समाज मुख्य प्रवाहापासून दूर आहे. या अभ्यासामुळे या समूहाला मुख्य प्रवाहात सामील होण्यास, करण्यास मदत होईल. आतापर्यंत अशा दुर्लक्षित राहिलेल्या समूहाचे जगणे समजून घेण्यासाठीची एक नवी वाट निर्माण होईल.तसेच समूहा-समूहांतर्गत एकसंधतेची भावना बळावत जाईल.

✞✞✞✞

**घटक ३इ**

## ३इ.१. ग्रंथालयीन वाचनाचे संयोजन

अपेक्षित सर्व पद्धतींची चर्चा करून झाल्यानंतर आता वाचनाचे संयोजन कसे करायचे याची चर्चा करू या. साहित्याच्या संशोधनाचा बराचसा किंवा सर्वच भाग ग्रंथालयीन वाचनाचा असतो. मूळ आधार साधने वाचून झाल्यानंतर संशोधकाला संदर्भ साधनांसाठी काही ठिकाणी जावे लागते. हल्ली घरबसल्याही हे होऊ शकते; परंतु सर्वच संदर्भ साधने ही महाजालातून मिळत नसतात. त्यामुळे ग्रंथालयांना भेटी देणे अपेक्षित असते.

संशोधक अनेकवेळा अनेक पद्धतीशास्त्रांवरील ग्रंथांचे वाचन करताना दिसून येतात. प्रात्यक्षिक म्हणून याकडे संशोधकांना पाहता येईल.सुरुवातीला शक्य असल्यास विद्यापीठात जाऊन एखादे–दुसरे प्रबंध संपूर्ण वाचावे. अशा आयत्या प्रबंधाच्या वाचनाचे एक दोन फायदे होतीलच. एक तर या वाचनामुळे प्रबंधलेखनाचीभीती अगर मनामध्ये धाकधूक असेल ती नाहीशी होईल. त्यामुळे आत्मविश्वास वाढेल. प्रबंधाची भाषा, मुद्द्यांची मांडणी, अवतरणांचा आधार, अवतरणे का घ्यावीत, घ्यावीतच का, आपले मत कसे मांडवे इत्यादी गोष्टी प्रबंधवाचनाने माहीत करून घेता येतील.

वाचन महत्त्वाचा मुद्दा असतो. आपल्या संशोधनाच्या काळातील वाचन अवांतर न ठेवता, नेमक्या विषयाचे ठेवावे. त्या सुमारास इतर काही लिहिण्याचे, विषयबाह्य वाचनाचे प्रयोजन ठेवू नये. अभ्यासविषयाची संदर्भ साधने वेगवेगळ्या स्वरूपाचे कोश, नियतकालिके, दैनिक असू शकतात. सर्व साधने उपलब्ध होण्यासाठी मुंबई ग्रंथसंग्रहालय, दादर, एशियाटिक सोसायटी, मुंबई, शासकीय विभागीय ग्रंथालय (नियतकालिक विभाग) पुणे इथून अपेक्षित संदर्भ आपल्याला मिळतील. या वाचननियोजनात काही जुने–नवे नियतकालिकांचेवर्षाखेरचे अंक पाहावे. त्या अंकांमध्ये वर्षभरातील परीक्षण, लेख, समीक्षा, शोधनिबंध इ. सूची प्रकाशित झालेली असते. 'इथे मराठीचिये  नगरी' हे जुने नियतकालिक व 'भाषा आणि जीवन' हे चालू नियतकालिक वर्षभरातीलप्रकाशितांची सूची प्रकाशित करते. 'भाषा आणि जीवन' मध्ये केवळ भाषाविषयक सूची असते. हे पाहिले की होणारी वणवण, त्रागा थांबेल.

संशोधन विषयाला अनुसरून साधनांचा शोध घेणे आज शक्य आहे. 'ललित' मासिक लेखकाच्या जीवनातील महत्त्वाच्या घटनांवर विशेषांक काढते. उदा. लेखक साहित्य संमेलनाध्यक्ष म्हणून निवडला जाणे, लेखकाला मोठा पुरस्कार–'ज्ञानपीठ'सारखा. अशा प्रसंगी विशेषांक काढण्याची परंपराच 'ललित'ने निर्माण केली आहे. याची आपल्या अभ्यासाला मदतच होईल.

ग्रंथवाचन करताना काही गोष्टींची खबरदारी घ्यावी. वाचन चालू असताना पुस्तकाचा ग्रंथालयातील क्रमांक टिपण घ्यावा. पुन्हा आवश्यकता वाटलीच तर तीच प्रत घ्यावी, जी आपण आधी हाताळलेली असेल.

या वाचनादरम्यान टिपणे घेता यावेत. टिपणांसाठी आवश्यक असणारे सर्व संदर्भ घ्यावेत. टिपण निष्कारण मोठी घेऊ नयेत.

## ३इ.२ ग्रंथसूची शास्त्र

संशोधनाची शिस्त संशोधकाच्या प्रामाणिकपणाच्या गोष्टीवर अवलंबून असते. संशोधनाला अंतर्गत शिस्त असावी लागते. शिस्त प्रबंधलेखनाच्या सुचींवरून प्रथमदर्शनी डोळ्यांत भरते. नीटनेटकेपणा मांडणीला आणि महत्त्वाच्या ठिकाणच्या निर्देशाला महत्त्व असते. हा निर्देश सूचीशास्त्रातून प्रकट होते. त्याची आता चर्चा करूयात.

### ३इ.२.१ तळटिपा / तळसंदर्भ नोंद :

तळटीपेसंदर्भातील एक गोंधळ, आधी स्पष्ट करून घेऊ.

तळटिप ही संज्ञा इंग्रजीमधील Footnote शब्दासाठी वापरली जाते. संशोधनाच्या संदर्भात आवश्यक मजकूर घेतला जातो. विवेचनात आवश्यक नसणारा अधिकच मजकूर पानाच्या तळाशी स्वतंत्रपणे देण्याची एक शिस्तशीर पद्धत होती. तो मजकूर मुद्द्याच्या संदर्भात अनावश्यक असतो; पण तो महत्त्वाचा वाटतो. म्हणून अभ्यासक तो मजकूर पानाच्या तळाशी देतो. अनावश्यक मजकूर आवश्यक संदर्भात न दिल्याने मुद्द्याचा ओघ टिकून राहील, विश्लेषणात पाल्हाळ निर्माण होणार नाही. तळटिपेचा मजकूर पुढील अभ्यासकांना पूरक असू शकेल. संदर्भ मजकुराच्या त्याच पानावर आवश्यक तेवढी जागा घेऊन पानावरील मुख्य मजकुराच्या तळाशी एक सरळ पूर्ण आडवी रेष ओढून त्याखाली अनावश्यक तो मजकूर दिला जाण्याची शिस्त रूढ होती. “एखाद्या साधनाचा शोध घेऊनही ते मिळाले नसल्यास त्या साधनासाठी आपण तेथवर आपण माग काढत गेलो, त्याची नोंद तळटिपेत करावी. एखाद्या भावी अभ्यासकाला ते उपलब्ध होण्याचा संभाव असतो.” (मिलिंद मालशे : २०१४ :४०)

तळटिपेत तळ + टिपा असे दोन शब्द आहेत. तळाला दिलेली टीप असा तळटीप या सामासिक शब्दाचा अर्थ आहे. परंतु अलीकडे अवतरणाचा संदर्भ म्हणजे तळटीप समजले जात आहे. कारण Foot note तळटीपहा संशोधनातील प्रकार अवलंबला जात नाही.

### ३इ.२.२ संदर्भ नोंद :

संदर्भ नोंदविण्याचेकाही संकेत सूचीशास्त्रातरूढ आहेत.

शोधनिबंधाच्या, शोधप्रबंधाच्या शेवटी संदर्भसूची देण्याविषयी काही आंतरराष्ट्रीय मानदंडाच्या चार पद्धती ‘शैली पुस्तिका’त (StyleGuide) सांगण्यात आल्या आहेत –

१) APA (American Psychological Association)

२) CMS (Chicago Manual of Style)

३) MLA (Modern Language Association)

४) ASA (American Socialogical Association)

मराठीत MLA आणि APA (Harvard Style) प्रिय झालेल्या दिसतात. MLA पद्धतीमध्ये नियतकालिक / पुस्तकाच्या नावाखालील रेखन (अधोरेखन) केले जाते तर APA

पद्धतीमध्ये नियतकालिक / पुस्तकांच्या नावाखालील रेखन करण्याऐवजी नावच तिरप्या अक्षरांत टाईप केले जाते.

प्रत्यक्ष संशोधनात उपयोजलेल्या अवतरणांची संदर्भनोंद व एकंदर ग्रंथांची संदर्भसूची देण्याच्या वेगवेगळ्या रीती रूढ आहेत. उपयोजिलेल्याअवतरणांच्यासंदर्भनोंदीपुढीलप्रमाणेद्याव्यात.

**१) ग्रंथकारनाम :** आधी नावाची आद्याक्षरे द्यावीत. नंतर आडनाव द्यावे, आडनावानंतर स्वल्पविराम द्यावे. उदा. वि. रा. शिंदे,

**२) ग्रंथनाम :** हस्तलिखित प्रतीत ग्रंथनाम लिहिल्यानंतर ते अधोरेखित करावे, टंकलिखित होते तेव्हा ते ठळक आणि आता संगणकावर तो तिरप्या अक्षरांत करावे. उदा. *दिलीप चित्रे यांची कविता (हस्तलिखित),* दिलीप चित्रे यांची यांची कविता (टंकलिखित), दिलीप चित्रे यांची कविता (संगणक टाईप)

**३) संपादक व भाषांतरकाराचे नाव :** ग्रंथनामानंतर (,) स्वल्पविराम देऊन संपा : किंवा अनु. / भाषा असे संक्षेपीकरण करावे, उदा. संपा: रणधीर शिंदे / अनु. गोरख थोरात

**४) आवृत्तीचा उल्लेख :** एकाहून अनेक आवृत्तीं निघालेल्या असतील तर त्यांचा उलेख करावा. उदा. प्र. आ. (प्रथम आवृत्ती) सुधारित आवृत्ती – सु. आ.

**५) प्रसिद्धीस्थल :** ग्रंथ जेथून प्रकाशित झाले आहे, त्या गावाचे नाव उदा. मुंबई / पुणे / कोल्हापूर

**६) प्रकाशकनाम :** प्रकाशक नाम संदर्भ सूचित देण्याची पद्धत आहे. छोट्या शोधनिबंधात संदर्भसूची नसते. अशावेळेला तिथेच प्रकाशनाम द्यावे आणि स्वल्पविराम द्यावा. उदा. पॉप्युलर प्रकाशन,

**७) प्रसिद्धिकाल :** सन द्यावा. पुस्तकाच्या आतल्या पानावर शक असल्यास श. असा संक्षिप्त उल्लेख करावा. वृत्तपत्राच्या संदर्भात दिनांक द्यावा व पुढे स्वल्पविराम द्यावा उदा, २०२४ श. १९४६/२५.५.२०२४

**८) खंडाचा अंक :** आवश्यक असल्यास तो द्यावा, त्यानंतर स्वल्पविराम द्यावा. उदा, खंड १३,

**९) पृष्ठांक :** शेवटी पृष्ठक्रमांक द्यावा, उदा. पृ. १५

वरील माहितीचे प्रात्यक्षिक पाहू या –

संदर्भ ग्रंथ-

१) माधव आचवल, जास्वंद, मौज प्रकाशन गृह, मुंबई, १९७४, पृ. १५४ नियतकालिक संदर्भ

२) वसंत दावतार. “दोला”च्या निमित्ताने, आलोचना, वर्ष १३ वे, अंक ८ वा मार्च १९७४, पृ.१५

संदर्भ देताना ग्रंथकार एकच, पण त्याचे ग्रंथ वा लेखक अनेक असतील तर लेखकनाम टाळून तिथे ..... टिंबे द्यावेत.

उदा.,

पाटणकर रा. भा. (१९७४), 'क्रोचेचेसौंदर्यशास्त्र', वाई प्राज्ञ पाटशाळा मंडळ

...................... (१९७७), 'कांटचीसौंदर्यमीमांसा', मुंबई, ऐशियाटिक सोसायटी व मौज

...................... (1981 ऊ. आ) सौंदर्यमीमांसा, पुणे, कॉंटिनेंटल

### ३इ.२.३. ग्रंथालयीन / संग्रहालयीन हस्तलिखित संग्रह

ऐतिहासिक वा प्राचीन वाङ्मयाबाबत काही हस्तलिखितांचे संदर्भ असतील तेव्हा शीर्षक आधी द्यावे आणि त्यापुढे कंसात क्रमांक / (हस्तलिखित) असे द्यावे, स्वल्पविराम देऊन कोठे मिळाले ते सांगावे.

उदा. एकनाथी भगवत (ह.लि.), मराठी संशोधन मंडळ, बा. क्र. २ पृ. ५०

### ३इ.२.४. तत्रैव आणि उनि :

तत्र + एव = तत्रैव म्हणजे तिथेच आहे. लागोपाठ संदर्भ आलेला असेल तर तत्रैव लिहून स्वल्पविराम देऊन पृष्ठक्रमांक द्यावा.

उदा.,

१) गंगाधर पाटील, "गाणारं झाड", अनुष्टुभ – पु. शि. रेगे विशेषांक, जुलै-ऑगस्ट १९७८, पृ. 67

हाच संदर्भ पुन्हा असेल तर आपल्या केवळ मजकुराचा पृष्ठक्रमांक दाखवायचा आहे.

१) तत्रैव, पृ. ३४

समजा दुसऱ्या प्रकरणात तोच संदर्भ आला असेल तर तिथे तत्रैव लिहून चालणार नाही. तिथे लेखकाचे नाव लिहून पुढे उपरनिर्देष्टित – उनि. लिहून पृष्ठक्रमांक लिहावा.

उदा., अ :

१) रमेश तेंडुलकर, गीतभान, विश्वमोहिनी प्रकाशन, पुणे प्र.आ.१९८२, पृ. ११

२) विजया राजाध्यक्ष, कवितारती, श्रीविद्या प्रकाशन, पुणे, पृ. १२७

३) रमेश तेंडुलकर, उनि., पृ.३०

उदाहरण ब :

१) गंगाधर पाटील, "गाणारं झाड", अनुष्टुभ – पु. शि. रेगे विशेषांक, जुलै – ऑगस्ट, १९७८, पृ. ६७

२) तत्रैव, पृ.३४

उदाहरण ‘अ’ व ‘उदाहरण’ ‘ब’ लक्ष देऊन पहा म्हणजे उनि व तत्रैव मध्ये फरक कळेल.

### ३इ.२.५. विषयसूची :

विषयसूची ही संशोधन सदरीकरणातीलअंतिम पायरी. अभ्यासकांना, परीक्षकांना व सामान्य लोकांनाही काही वेळ विशिष्ट माहिती, संदर्भ वारंवार पहायचे असते. काही नावे, काही संज्ञा, काही संकल्पना पहायच्या असतात. तेवढ्याकरिता विषयसूची तयार करायची असते. प्रबंधाच्या शिस्तीचा तो एक भाग आहे. संज्ञा, संकल्पना, ग्रंथनामे, संस्थानामे इत्यादी यांची सूची करून ते कोणकोणत्या पृष्ठावर आहेत ते यावे.

उदा.,

अमृतानुभव ६, १५, २५, ३७, ३३, ४०, २०१

कोलटकर अरुण ७, ९, १००, १५१

तुकाराम २७, ५२, ९२, ९७, १००, १२७, २०५

तुकाराम गाथा ३०, ९०, १२७

रतिभाव २२, ३७, ९०

सांगीतिक प्रतिमा १८५, १९४, १९६

विषयसूचीसाठी अलीकडील उत्तम उदाहरण म्हणून पाहावे –

रणधीर शिंदे : दिलीप पुरुषोत्तम चित्रे यांची कविता, दर्या प्रकाशन, पुणे २०१३

### ३इ.२.६. वर्णानुक्रम / आनुपूर्ती :

संदर्भग्रंथ सूची, विषयसूची, कोष्टके, इ. वर्णानुक्रमे द्यायची असतात. ह. श्री. जोग यांनी करून दिलेल्या आनुपुर्तीच्या रचनेचाच विचार करावा.

१) मराठी वर्णमालेची आनुपुर्ती संस्कृतला धरून असावी.

२) ळ, क्ष, ज्ञ ह्या वर्णांना स्वतंत्र स्थान द्यावे, स्थान ‘ह’ नंतरचे आहे.

३) ‘ञ’ या उच्चारात स्वतंत्र मान्यता. ते ‘अ’ पुढील वर्गास अनुसरून अनुनासिक समजावे. उदा. अंक अङ्क, अंत – अन्त

४) ‘ॲ’ आणि ‘ऑ’ हे मराठीत मान्यता पावलेले स्वनिम

अ, ॲ, आ, ऑ, इ, ई, उ, ऊ, ऋ, तृ

ए, ऐ, ओ, औ, (अनुस्वार), : (विसर्ग), अं, अ:

क, ख, ग, घ, ङ् च, छ, ज, झ

ट, ठ, ड, ढ, ण,त, थ, द, न

प, फ, ब, भ, म, य, र, ल, व, श, ष, स, ह, क्ष, ज्ञ

## ३इ.३. संशोधन साधने

आता आपल्याला संशोधनातील साधनांच्या बाबतीत इथे चर्चा करायची आहे. संशोधन करीत असताना बऱ्याच वेळा असे दिसून येते, की आपण उपयोजित करीत असलेली साधने दुय्यम दर्जाची आहेत. ते टाळून त्याचे मूळ साधन पाहणे महत्त्वाचे असते. भारतातील आणि महाराष्ट्रामधील महाभिलेखागारांना भेटी देऊन अस्सल माहिती मिळविता येईल. अस्सल संशोधन साधने कुठे कुठे मिळतात, याची एकत्रित माहिती प्रा. रमेश वरखेडे यांनी दिली आहे, ती अशी :

| **अभ्यास साधने** | |
|---|---|
| भारतातील अभिलेखागारे शासनेतर अभिलेखागारे | दिल्ली, जयपूर, अलिगड, बिकानेर, हैद्राबाद, मद्रास, भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे राजवाडे इतिहास संशोधन मंडळ, पुणे गोदातीर इतिहास संशोधन मंडळ-नांदेड, डेक्कन कॉलेज, पुणे |
| कंपनी – उद्योजकाची अभिलेखागारे | गोदरेज कं. |
| वस्तूसंग्रहालय(Musiums) | हैद्राबाद : सालारगंज म्युझियम, मुंबई : प्रिन्स ऑफ वेल्स म्युझिम औंध : वस्तूसंग्रहालय |
| नागेश्वर संग्रहालय (Numismatic) | त्र्यंबकेश्वर नाणेसंग्रहालय |
| संदर्भ ग्रंथालये | एशियाटिक लायब्ररी, मुंबई, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, दादर, राष्ट्रीय संग्रहालय, कोलकाता |
| काही मूलभूत साधने संशोधनाला उपयुक्त ठरतात. | |
| वाङ्मयीन साधने | प्रवासवर्णने चरित्र – आत्मचरित्रे, वृत्तांत, कालपट, अग्रलेख नियतकालिके – अनियतकालिके |
| शब्दकोश, ज्ञानकोश | विश्वकोश, ज्ञानकोश, संज्ञा–संकल्पनाकोश, पारिभाषिक कोश, चरित्रकोश, स्थलकोश, सांख्यिकी कोश, वंशावळी इत्यादी |
| अविक्रेय साहित्य | अप्रकाशित प्रबंध, कंपन्यांचे अहवाल, स्मरणिका, गौरविका, प्रदर्शनाच्या माहितीपुस्तिका, प्रचारसाहित्य, निवडणुकांचे जाहीरनामे, भित्तिपत्रेके, भाषणसंहिता, दैनंदिन्या, पत्रे, हिशेबचोपड्या, सभांचे इतिवृत्त, प्रतिमा अवपफिती, अनुबोधपट, पेटंटस् इ. |

| | |
|---|---|
| शासकीय प्रकाशाने | कायदे, नियम, अध्यादेश, चौकक्षी आयोगांचे अहवाल, जनादेश, सांख्यिकी परिपत्रके इत्यादी. |
| नकाशे | युद्धाची वाटचाल, भौगोलिक तपशील, पिके, पर्जन्यमान, दळणवळण मार्ग |
| इलेक्ट्रॉनिक साधने | Searchengines इ. वूक्स, वेबपेजेस, यू ट्युब विकिपीडिया इ. |

इत्यादींमधून आपल्याला अभ्यास साधने मिळू शकतात. ग्रंथांची प्रमाणभूतता पारखताना मिलिंद मालशे या गोष्टी ध्यानात घेण्यास सांगतात: “विश्वसनीयता, विधान-पद्धती, अद्ययावतपणा, अधिकृतता, व्याप्ती आणि आवाका, प्रचारकी वा व्यासंगी स्वरूप आणि लेखकाची पात्रता” या गोष्टी ताडून संदर्भ घ्यावे.

## ३.३ समारोप

समीक्षा-अभ्यास वा संशोधनासाठी अभ्यासपद्धतींचे उपयोजन करावे. योग्य अशा अभ्यास पद्धतीचे उपयोजन करावे, हे संशोध्य विषयाचा आशय आणि विषय आपल्याला सूचवत असतात, आशयविषयअभ्यासपद्धतीला खुणावत असतात. अभ्यासाच्या काही पद्धतींचा परिचय आपण करून घेतला. तसेच त्या पद्धतींचे उपयोजन कसे करावे, हेही त्या परिचयात सांगितले आहे.

संशोधन पद्धतीच्याद्वारे आपण अभ्यासविषयाचे विश्लेषण वस्तुनिष्ठपणे करू शकतो, निश्चित काही निष्कर्ष आपल्या हाती लागू शकतात. कोणत्याही एका अभ्यास पद्धतीच्या विश्लेषणाशिवाय केलेला अभ्यास हा गोंधळ उडविणारा आणि गुंतागुंतीचा होऊ शकतो. योग्य पद्धतीच्या विश्लेषणामुळे साहित्याच्या आणि बोलीच्या अभ्यासात साहित्यातील सौंदर्य उघड होऊन साहित्याचा वेगवेगळ्या घटनाप्रसंगाशी असलेले अन्वय सुस्पष्ट होतात आणि त्या अभ्यासातून कालिक वैशिष्ट्येही कळू शकतात. अभ्यासपद्धतींचे हे महत्त्वअभ्यासकांनी लक्षात घ्यावे.

## ३.४. संदर्भग्रंथ सूची

१. डॉ.जोशी, चं. वि., डॉ. उपाध्ये बाबुराव व इतर, (संपा.) : ‘साहित्याचा अभ्यास’, गुरुवर्य डॉ. र. बा.मंचरकर सद्भावग्रंथ, प्रतिमा प्रकाशन, पुणे,२००३.

२. डॉ. जोशी, वसंत स. (संपा.) : ‘मराठी भाषा व साहित्य संशोधन’ (खंड-१), महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे, दु. आ. २००६

३. वास्कर, आनंद (संपा.) : ‘वाङ्मयप्रकार : संकल्पना व स्वरूप’ (डॉ.विजय निंबाळकर गौरवग्रंथ), अन्वय प्रकाशन, पुणे, २००८.

| | | | |
|---|---|---|---|
| ४. | भागवत, श्री. पु. व इतर (संपा.) | : | 'साहित्य : अध्ययन आणि प्रकार', मौज प्रकाशन, मुंबई, दु. आ. २०११. |
| ५. | मालशे, स. गं. (संपा.), | : | 'शोधनिबंधाची लेखनपद्धती', लोकवाङ्मय गृह, मुंबई, सहावी . आ. ऑक्टो. २०१४. |
| ६. | वरखेडे, रमेश नारायण, वरखेडे, मंगला रमेश | : | 'संशोधनाचे पद्धतीशास्त्र', इन्स्टिट्यूट ऑफ नॉलेज इंजिनिअरिंग, नाशिक, २००३ |
| ७. | शिंदे, शोभा | : | 'आमची श्रीवाणी' संपा. वंदना महाजन, ऑगस्ट २०२३ ते जाने. २०२४ |
| ८. | महाजन, वंदना | : | तत्रैव |
| ९. | काजरेकर, गोविंद | : | तत्रैव |
| १०. | अलका मटकर | : | तत्रैव |


## ३.५ सरावासाठी प्रश्न

### अ) दीर्घोत्तरी प्रश्न

१. साहित्याचे संशोधन आणि शास्त्रीय संशोधन यातील फरक सांगून साहित्य संशोधनातील अभ्यासपद्धतींचेमहत्त्वसुस्पष्ट करा.

२. ग्रंथकार अभ्यासपद्धतींचे स्वरूप विशद करा.

३. साहित्यप्रकार अभ्यासपद्धतीच्या अभ्यासकांच्या वेगवेगळ्या भूमिका स्पष्ट करा.

४. एका साहित्यकृतीचा अभ्यास ग्रंथकारअभ्यासपद्धतीपेक्षा कोणत्या कारणांमुळे निराळा होतो, ते सांगा.

### ब) लघुत्तरी प्रश्न

१. ग्रंथकार अभ्यासपद्धती प्रिय का झाली ते लिहा.

२. साहित्याभ्यास पद्धतीच्या अडचणी सांगा.

३. संशोधनातील सूचीशास्त्राचे महत्त्वसांगा.

४. वर्णानुक्रमाचे महत्त्वसांगा.

✞✞✞✞

# ४अ

## शोधनिबंध लेखनपद्धती

**घटक रचना :**

४अ.१ उद्देश

४अ.२ प्रस्तावना

४अ.३ शोधनिबंध : संकल्पना व स्वरूप

४अ.३.१ शोधनिबंध शब्दार्थ

४अ.३.२ शोधनिबंध म्हणजे काय?

४अ.३.३ शोधनिबंधाचे घटक

४अ.३.४ शोधनिबंधाचे प्रकार

४अ.३.५ शोधनिबंधाचा रचनाबंध

४अ.४ शोधनिबंध लेखनपद्धती

४अ.४.१ पूर्वतयारी

४अ.४.२ संदर्भ, वाचन व संकलन

४अ.४.३ संदर्भांचे व्यवस्थितीकरण

४अ.४.४ शोधनिबंधाचा प्रारंभ

४अ.४.५ विषयाची मांडणी

४अ.४.६ साधक बाधक चर्चा

४अ.४.७ निष्कर्ष

४अ.४.८ संदर्भ

४अ.५ समारोप

४अ.६ संदर्भ

४अ.७ पूरक वाचन

४अ.८ सरावासाठी प्रश्न

### ४अ.१ उद्देश

१. शोधनिबंधाचे स्वरूप लक्षात घेणे.
२. शोधनिबंध लेखन प्रक्रिया समजून घेणे.
३. शोधनिबंध लेखनातील तांत्रिक पद्धती विचारात घेणे.

४. शोधनिबंधाची लेखनाचे उपयोजन लक्षात घेणे.
५. शोधनिबंध लेखनशास्त्र आकलनात घेणे.

## ४अ.२ प्रस्तावना

मानवी जीवनशोधात ज्या विविध ज्ञानशाखा आहेत. त्यामध्ये संशोधन हे एक महत्त्वाचे ज्ञानक्षेत्र आहे. एखाद्या विषयसूत्राच्या अनुषंगाने आपल्या बुद्धीचा वापर करून अनेक तार्किक तथ्यांचा अभ्यास करत विशिष्ट सत्यापर्यंत पोहोचण्याची बौद्धिक प्रक्रिया संशोधनाने साध्य केली जाते. संशोधनाची ही जाणीव मानवी जीवसृष्टीमध्ये प्राचीन काळापासून अस्तित्वात आहे. आदिमानवाला या भूसृष्टीविषयी जे विविध प्रश्न पडले ते त्याने आपल्या बौद्धिक शक्तीच्या आधारे सोडविले. ही शोधाची बौद्धिक प्रकिया संशोधनाचा गाभा आहे. संशोधनाचे जे विविध आकृतिबंध आहेत, त्यामधील शोधनिबंध हा एक महत्त्वाचा प्रकार आहे. प्रस्तुत घटकामध्ये आपण शोधनिबंध या लेखनपद्धतीचा साकल्याने विचार करणार आहोत. तद्पूर्वी शोधनिबंध म्हणजे काय? हे समजून घेऊन त्याचे स्वरूप लक्षात घेणे अगत्याचे ठरेल.

## ४अ.३ शोधनिबंध : संकल्पना व स्वरूप

संशोधनाच्या क्षेत्रातील शोधनिबंध हा महत्त्वाचा घटक आहे. तो एक संशोधनपर लेखनाचा प्रकार आहे. त्यामध्ये बौद्धिकरूपात एका विषयाचा शोध घेतला जातो. संशोधनशास्त्रामध्ये सांगितलेल्या तत्त्वाधारे याची मांडणी करणे गरजेचे असते. ही तत्त्वे शोधविषय, गृहितके, शोधपद्धती, विषयविवेचन, मूल्यमापन, निष्कर्ष आणि संदर्भ अशा स्वरूपाची असतात. शोधनिबंध लेखनाची एक पद्धती असते. याचा अंगीकार करून शोधनिबंधाचे लेखन अपेक्षित असते. यासाठी शोधनिबंधाची मूलतत्त्वे समजून घेणे गरजेचे ठरते. याचा विचार पुढीलप्रमाणे लक्षात घेता येईल.

### ४अ.३.१. शोधनिबंध शब्दार्थ :

शोधनिबंध या शब्दाला इंग्रजीत Research Paper किंवा Scholarly Article असे म्हटले जाते. यालाच हिंदीमध्ये ‘शोधपत्र’ असे म्हणतात. यामध्ये संशोधन ही महत्त्वाची ज्ञानशाखा आहे. कोणत्याही संशोधनात एखाद्या विषयाचा मूलगामी शोध घेतला जातो. त्याची बहुआयामी चिकित्सा करून काही निष्कर्ष मांडले जातात. त्याप्रमाणेच शोधनिबंधामध्ये सुद्धा एक सूत्रपद्धतीने एका विषयाची मांडणी केली जाते. परंतु याचे स्वरूप प्रबंध, प्रबंधिका आणि शोध प्रकल्पापेक्षा लहान असते. काही शब्द, काही पृष्ठे आणि काही संदर्भांच्या आधारे शोधनिबंध लिहिला जातो.

शोधनिबंध या शब्दामध्येच निबंध हा शब्दही दडलेला आहे. निबंध म्हणजे नियमानी बांधलेली अशी रचना असते. त्यात निरीक्षणशक्ती, नियमितता, निवडक्षमता, ज्ञान, अनुभव, विचार, कल्पना असे विविध घटक अंतर्भूत असतात. निबंधाला विषयाचे बंधन असत नाही. त्यात कोणत्याही विषयाच्या अनुषंगाने विचार मांडता येतात. निबंध आणि शोधनिबंध हे दोन्ही शब्द वेगवेगळे आहेत. त्यांच्या संरचनेत फरक असतो. निबंधाला शब्दमर्यादा असली

तरी मांडणीच्या तांत्रिक मर्यादा असत नाहीत. परंतु शोधनिबंधाला संशोधनशास्त्राचा पाया असावाच लागतो. म्हणून शोधनिबंध हा शब्दार्थ व्यापक अर्थाने आविष्कृत होतो.

### ४अ.३.२ शोधनिबंध म्हणजे काय?

शोधनिबंध हा लेखनाचा एक महत्त्वाचा प्रकार आहे. संशोधनशास्त्रात त्याची विशिष्ट व्याख्या सांगितलेली आहे. शोधनिबंध हा शैक्षणिक क्षेत्राशी निगडित असून त्यामध्ये संशोधक आपली भूमिका मांडतो. यावरुन त्याची व्याख्या करता येईल.

१. एखाद्या लेखकाने विशिष्ट विषयावर मूळ संशोधनाच्या आधारे केलेले विश्लेषण आणि निष्कर्षांचे स्पष्टीकरण म्हणजे शोधनिबंध होय.

२. एखाद्या समस्येवर केलेल्या संशोधनावरून थोडक्यात निष्कर्ष मांडून समाधानकारक चर्चा करून केलेले लेखन म्हणजे शोधनिबंध होय.

३. पद्धतशीर अन्वेषणातून सोडविलेला प्रश्न आणि मिळालेले उत्तर संबंधित ज्ञानक्षेत्रातील अभ्यासकांसमोर मांडण्यासाठी व स्वीकृत विषयावरील चर्चासंवाद विस्तारित करण्यासाठी निवडलेला आकृतिबंध म्हणजे शोधनिबंध होय. (मंगला वरखेडे, पृ.९३)

संशोधनशास्त्रात एखाद्या विषयाचा शोध घेत जाणे ही क्रिया अतिशय महत्त्वाची असते. ते एक सूत्र असते. त्या सूत्राची गुंफन करत जात असताना या संदर्भातील पूर्वसंचिताचा शोध घेणेसुद्धा महत्त्वाचे असते. म्हणूनच वरील व्याख्यांचा विचार करता शोधनिबंध म्हणजे काय? या प्रश्नाचे उत्तर आपणास मिळते.

### ४अ.३.३ शोधनिबंधाचे घटक :

शोधनिबंध हा एक संशोधनशास्त्रीय आविष्कार असतो. त्यामध्ये विशिष्ट घटक अंतर्भूत असतात. शोधनिबंधाचे शीर्षक, संशोधकाचे नाव, सारांश, प्रस्तावना, संशोधन पद्धती, विषयकेंद्री माहितीचे विश्लेषण, साधक-बाधक चर्चा, समारोप, निष्कर्ष, संदर्भ हे शोधनिबंधातील महत्त्वाचे घटक आहेत. या सर्व घटकांचा एकसंघ आविष्कार शोधनिबंधात होणे गरजेचे असते. तेव्हाच शोधनिबंधाला संशोधनमूल्य प्राप्त होते. म्हणून हे घटक शोधनिबंधामध्ये महत्त्वाचे आहेत.

शोधनिबंधाचे शीर्षक हा पहिला महत्त्वाचा घटक असतो. यावरून शोधनिबंधाचा आशय, विषय आपल्या लक्षात येतो. शोधनिबंधाचे शीर्षक नेहमी संक्षिप्त व मार्मिक असावे. त्यामध्ये अचूकता असायला हवी. विषयाचे नावीन्य त्यामधून अभिव्यक्त व्हायला हवे. शोधनिबंधात संशोधकाचे नाव असावेच लागते. त्यावरून तो शोधनिबंध लेखक आपल्या लक्षात येतो. नाव लिहीत असताना ते संपूर्ण लिहावे. त्याखाली पत्ता, फोन, ई-मेल वगैरे नोंदी करणे गरजेचे आहे. शोधनिबंधाची सुरुवात सारांश रूपाने करावयाला हवी. त्यानंतर प्रस्तावना लिहावी. संशोधन पद्धती हा घटक शोधनिबंधात महत्त्वाचा असतो. संशोधनशास्त्रात ज्या विविध संशोधन पद्धती सांगितलेल्या असतात त्यापैकी कोणती तरी एक पद्धती शोधनिबंधात वापरावी लागते. विषयकेंद्री माहितीचे विश्लेषण व साधक-बाधक चर्चा शोधनिबंधाचा केंद्रवर्ती घटक असतात. यात शोधनिबंधाच्या विषयाची तपशीलवार मांडणी

येते. शेवटी समारोप व निष्कर्ष मांडून शोधनिबंध संपतो. अंतिमत: संदर्भयादी जोडून शोधनिबंध पूर्ण होतो.

### ४अ.३.४. शोधनिबंधाचे प्रकार

संशोधनशास्त्रात शोधनिबंधाची संकल्पना विशद करत असताना त्याचे प्रकार सांगितलेले आहेत. वास्तविक शोधनिबंध हा संशोधन पद्धतिशास्त्रातील महत्त्वाचा प्रकार आहे. त्याचेही विविध प्रकार पडतात. मंगला वरखेडे यांनी संशोधनाचे पद्धतीशास्त्र या ग्रंथामध्ये शोधनिबंधाचे चार प्रकार सांगितलेले आहेत, ते खालीलप्रमाणे,

१. ज्ञानसंग्रहात्मक/ स्पष्टीकरणात्मक शोधनिबंध
२. विश्लेषणात्मक शोधनिबंध
३. नैदानिक शोधनिबंध
४. युक्तिवादात्मक शोधनिबंध

वरील प्रकारांविषयी त्यांनी तपशीलवार विवेचन केलेले आहे. या प्रकारांचे स्वरूप मांडत असताना त्या लिहितात, विशिष्ट विषयातील संपादित केलेल्या माहितीच्या लहान लहान भागांबद्दल अधिक जाणून घेण्यासाठी केलेली चिकित्सा व संपादित माहितीची सूत्रबद्ध मांडणी करण्यासाठी लिहिलेला विवेचक निबंध, अशी ज्ञानसंग्राहक निबंधाची व्याख्या करता येईल. माहिती संकलन व माहिती संक्रमण हे या निबंधाचे प्रयोजन असते. स्वाभाविकच माहितीचे वर्गीकरण करून तिची सुरचित मांडणी करणे हे या निबंधाचे प्रारंभिक लक्ष्य असते. माहितीचे सूक्ष्म वाचन करून त्यातील संदिग्धता व दोष दूर करणे, तपशीलातील चुकांची दुरुस्ती करून जरूर तेथे सुधारणा, परिष्करणे करून मूळचे घोटाळे दूर करणे, नवे तपशील अंतर्भूत करून माहितीचे अद्ययावत व सुस्पष्ट अनुरेखन करणे हे या निबंधाचे ध्येय असते. (पृ.९४) संकलित वस्तुस्थितीकडे विशिष्ट दृष्टीतून पाहणे, प्रचलित प्रश्नांची पुनर्मांडणी करणे, अंत:संबंधावर नवा प्रकाश टाकणे, म्हणजेच माहितीचे पुनर्वाचन करून नवार्थबोधक व नव संदर्भदर्शक अर्थविश्लेषण करणाऱ्या निबंधास विश्लेषणात्मक शोधनिबंध म्हणता येईल. कुठलाही वाद-प्रतिवादाचा पवित्रा न घेता महत्त्वाच्या विषयावर नवा प्रकाश टाकण्यासाठी माहितीच्या अर्थविश्लेषणावर भर देणारा निबंध, हे या शोधनिबंधाचे वैशिष्ट्य असते. (पृ.९६) न सुटलेल्या गुंतागुंतीच्या समस्येची उकल करण्यासाठी या समस्येचे विविधांगी परीक्षण करून समस्येचे अचूक निदान करणाऱ्या संशोधक तपासातून नैदानिक निबंध आकार घेतो. (पृ.९७) तर इतरांच्या मुद्यांपेक्षा आपल्या वेगळ्या मुद्यांची मांडणी करण्यासाठी, तौलनिक विश्लेषणासाठी, संकलित वस्तुस्थितीकडे विशिष्ट दृष्टीतून पाहून त्यातील अंत:संबंधावर नवा प्रकाश टाकण्यासाठी, प्रचलित पुनर्मांडणी करणारे, ऐतिहासिक माहितीचे पुनर्वाचन करून नवी संगती लावण्यासाठी लिहिले जाणारे निबंध हे युक्तिवादात्मक शोधनिबंध असतात. (पृ.९८) वरील सर्व प्रकार हे शोधनिबंधाचे व्यापक रूप आपल्यासमोर मांडतात. या प्रकाराचे वेगळेपण त्याच्या अभिव्यक्तीत आहे. वास्तविक सर्व शोधनिबंधाचे प्रकार हे संशोधनशास्त्राच्या पद्धतीनुसार नव्या विषयांचा शोध घेणारे आहे. यांची संरचना सारखीच असते. त्यांचा रचनाबंध एकसारखाच असतो. त्याचा विचार शोधनिबंधाचे स्वरूप लक्षात घेताना करणे अगत्याचे ठरते.

**४अ.३.५. शोधनिबंधाचा रचनाबंध :**

संशोधनशास्त्रात शोधनिबंधाची संरचना दिलेली आहे. त्यामध्ये परिचय, पद्धती, परिणाम आणि चर्चा यांचा समावेश होतो. वास्तविक ही रचना वरील शोधनिबंधाच्या घटकांची संरचनात्मक मांडणीच असते. असे असले तरी शोधनिबंधाची रचना मांडत असताना अनेक नियमांचे भान ठेवावे लागते. याची मुद्यान्वये मांडणी खालीलप्रमाणे करता येईल.

१. शोधनिबंधाच्या रचनेतील महत्त्वाचा भाग म्हणजे जो विषय शोधनिबंधात मांडला जातो, त्याची घटकरचना व शब्दमर्यादा अगोदर निर्धारित करावी लागते. साधारणत: दोनहजार ते तीनहजार शब्दापर्यंत शोधनिबंध लिहिलेला असावा.

२. शोधनिबंधासाठी निवडलेला विषय आणि त्यासाठीचे शीर्षक हा शोधनिबंधाच्या रचनेतील आणखी एक महत्त्वाचा भाग आहे. शीर्षकांत अचूकता, संक्षिप्तता आणि नावीन्यपूर्णता असायला हवी.

३. कोणत्याही शोधनिबंधात सारांश मांडणे गरजेचे असते. यामध्ये विषयाची खोली आणि व्याप्ती आपल्या लक्षात येते. याचे स्वरूप कमीत कमी शब्दात मांडलेले असावे. विषयाचा सार यामध्ये यायला हवा.

४. शोधनिबंधाच्या रचनेमध्ये संशोधन पद्धतीचा वापर महत्त्वाचा असतो. किंबहुना त्याशिवाय शोधनिबंधाला शोधनिबंध म्हणता येत नाही. संशोधनशास्त्रात विविध पद्धती सांगितलेल्या आहेत. आपल्या विषयानुसार संशोधन पद्धतीचा निर्देश करणे अगत्याचे ठरते.

५. विषय विवेचन, विश्लेषण आणि चर्चा या गोष्टी शोधनिबंधाच्या रचनेत महत्त्वाच्या ठरतात. कोणताही विषय मांडताना तो मूलभूतपणे मांडलेला असावा. विशेषत: संदर्भासह याची मांडणी करणे येथे अपेक्षित असते. साधक-बाधक चर्चा व्हायलाच हवी. त्याशिवाय शोधनिबंधाची संरचना परिपूर्ण होत नाही.

६. शोधनिबंधाच्या रचनेत निष्कर्ष हा एक महत्त्वाचा भाग असतो. तो नेहमी शोधनिबंधाच्या शेवटी येतो. निष्कर्ष हे नेहमी अनुक्रमे द्यावेत. त्यांची संख्या पाच ते दहा पर्यंत असायला हवी. निष्कर्षाची भाषा वस्तुनिष्ठ असायला हवी.

७. शोधनिबंधाच्या रचनेतील शेवटचा भाग म्हणजे संदर्भ मांडणी होय. यामध्ये ग्रंथ, वृत्तपत्रीय लेख, मासिकांमधील लेखन, इंटरनेटवरील संदर्भांचा समावेश होतो.

वास्तविक विषयनिहाय याची संदर्भ मांडणी वेगवेगळी असते. काही वेळा टीपा, तळटीपा दिल्या जातात. यातून शोधनिबंधाचे अधिक आकलन होण्यास मदत होते. शोधनिबंधाची संरचना साचेबद्ध असून शोधनिबंधाच्या लेखनामध्ये या संरचनेचा विचार केल्याशिवाय शोधनिबंधाची पूर्णता यशस्वी होणार नाही. म्हणून संशोधनशास्त्रात शोधनिबंधाचा रचनाबंध महत्त्वाचा असतो. शोधनिबंधाचे स्वरूप व्यापक आहे. त्याविषयी मंगला वरखेडे लिहितात, अनुभवाधिष्ठित माहितीचे वस्तुनिष्ठ आकलन समोर आणण्यासाठी पद्धतशीर, तर्कशुद्ध व बहुविध युक्तिवादातून घेतलेला सर्जनशील शोध असे या निबंधाचे स्वरूप असते. शोधनिबंध ही मुळात तज्ज्ञतेवर आधारलेली एक सूक्ष्म पाहणी (Critical Enquiry) असते. या पाहणी अहवालाचे पद्धतशीर निरूपण करण्यासाठी निबंधात्मक आकृतिबंध स्वीकारलेला असतो.

या निबंधात विमर्शक विचारपद्धतीतून आशयविश्लेषण केलेले असते. (पृ.९३) एकुणात शोधनिबंध ही संकल्पना व तिचे स्वरूप संशोधनशास्त्रात महत्त्वाचे असून यातूनच शोधनिबंधाच्या लेखनपद्धतीचा विचार विकसित झालेला आहे.

## ४अ.४ शोधनिबंध लेखनपद्धती

शोधनिबंधाची संकल्पना व स्वरूप लक्षात घेतल्यानंतर शोधनिबंधाची लेखनपद्धती विचारात घेणे अगत्याचे ठरेल. स.गं.मालशे यांनी लिहिलेले आणि मिलिंद मालशे यांनी संपादित केलेला 'शोधनिबंधाची लेखनपद्धती' हा ग्रंथ यादृष्टीने अतिशय महत्त्वाचा आहे. यामध्ये अतिशय मूलभूतपणे शोधनिबंधाच्या लेखनपद्धतीची मांडणी केलेली आहे. संशोधन विषयाची मांडणी, वाचनाचे संयोजन, संदर्भशोध, टिपणे, संदर्भसाधने, संदर्भ प्रक्रिया, विषयसूची, समारोप, टिपा इत्यादी घटक त्यामध्ये अंतर्भूत आहेत. वास्तविक ही मांडणी प्रबंधलेखनासाठी अत्यावश्यक आहे. परंतु शोधनिबंध या संकल्पनेतील लेखनासाठी यातील काही दिशादर्शक तत्त्वांना केंद्रवर्ती ठेवून मांडणी करणे उपकारक ठरेल असे वाटते. त्यानुसार शोधनिबंध लेखनपद्धतीचा विचार पुढील तत्त्वांच्या आधारे करता येईल.

### ४अ.४.१ पूर्वतयारी :

कोणतीही गोष्ट पूर्वतयारी शिवाय साध्य होत नाही. याला शास्त्रीय भाषेत पूर्वनियोजन असे म्हणतात. शोधनिबंध लेखनासाठी सर्वप्रथम विषयाची निवड महत्त्वाची असते. शोधनिबंधाचा विषय हा काही अचानक मिळत नसतो. त्यासाठी सातत्याने वाचनप्रक्रियेतून जावे लागते. विविधांगी वाचन करूनच एखाद्या विषयावर शोधनिबंध लिहिता येतो. सामान्यत: जिज्ञासावृत्ती ही विषयनिवडीमध्ये महत्त्वाची असते. शोधनिबंधाचा विषय निवडताना बऱ्याचवेळा त्याची व्याप्ती लक्षात घेतली जात नाही. यासाठी संशोधनशास्त्रात सांगितलेली सूक्ष्म अभ्यासपद्धती उपयुक्त ठरणारी आहे. शोधनिबंधासाठीचा विषय हा मूलभूत असून त्याची व्याप्ती मर्यादित असावी. त्यात नाविन्यपूर्णता असणे अत्यंत आवश्यक आहे. याविषयी स.गं.मालशे यांनी अतिशय मार्मिक भाष्य केलेले आहे. ते लिहितात, विषय निवडणे म्हणजे केवळ शीर्षकाचे शब्द निश्चित करणे नव्हे, ज्या क्षेत्रात थोडेफार वाचन झालेले आहे त्यातील एखाद्या विषयावर स्वत:ला जाणवलेले काही नवीन विचार मनामध्ये निर्माण झाल्याखेरीज संशोधनप्रक्रिया सुरूच होऊ शकत नाही (मालशे, पृ.११) एकूणच शोधनिबंध लेखनाच्या पूर्वतयारीतील हा अतिशय महत्त्वाचा भाग आहे.

### ४अ.४.२ संदर्भ वाचन व संकलन :

शोधनिबंध लेखनपद्धती मधील संदर्भ वाचन व संकलन हा दुसरा महत्त्वाचा भाग आहे. शोधनिबंधात संदर्भांशिवाय लेखन करता येत नाही. हे संदर्भ आपल्या विषयाशी निगडित असावे लागतात. तसेच ते विषयाच्या संदर्भातीलही असणे गरजेचे असते. एकूणच विषयाला पूरक असलेले संदर्भ शोधणे, त्यांचे वाचन करणे, त्यातील गर्भित अर्थ समजून घेऊन त्याची नोंद करणे या गोष्टी शोधनिबंध लेखनात अतिशय महत्त्वाच्या ठरतात. साधारणपणे संदर्भ वाचन व संकलन करत असताना स.गं.मालशे यांनी पुढ्ठा पद्धती सांगितलेली आहे. त्यामध्ये लेखकाचे नाव, पुस्तकाचे नाव, प्रकाशन संस्थेचे नाव, पत्ता, आवृत्ती वर्ष, पृष्ठे, किंमत अशा विविध नोंदी प्रारंभी करण्याचे त्यांनी सांगितलेले आहे. त्यानंतर याखाली संबंधित ग्रंथ

अथवा संदर्भातील जो मजकूर आपल्याला शोधनिबंध लेखनासाठी आवश्यक आहे त्याचे वस्तुनिष्ठ तपशील नोंदविणे गरजेचे असल्याचे त्यांनी विशद केलेले आहे. एखाद्या लेखकाच्या लेखनातील कोणता भाग किती प्रमाणात घ्यावा याविषयी काही संकेत संशोधनशास्त्रात सांगितले जातात याचे पालन येथे करणे गरजेचे आहे.

### ४अ.४.३ संदर्भांचे व्यवस्थितीकरण :

शोधनिबंध लेखनामध्ये ग्रंथवाचन करून जे संदर्भ प्राप्त केले जातात. त्या संदर्भांचे व्यवस्थितीकरण करणे खूप गरजेचे आहे. या व्यवस्थितीकरणामध्ये पहिला महत्त्वाचा भाग म्हणजे आपल्या विषयाच्या अनुक्रमानुसार संदर्भाची क्रमवारी ठरवून घेणे. त्यामुळे विषयाची मांडणी करताना संदर्भ देणे सोपे होते. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे संदर्भ घेत असताना लेखकाचे नाव, ग्रंथनाव, प्रकाशन संस्था, स्थळ, आवृत्ती, वर्ष आणि पृष्ठ क्रमांक लिहून घेणे गरजेचे आहे. तिसरा महत्त्वाचा भाग म्हणजे संदर्भ मांडत असताना संबंधित लेखकाचा नामोल्लेख करूनच दुहेरी आवतरणामध्ये संदर्भ द्यावा. त्याला क्रमांक देऊन लेखनाच्या शेवटी त्याच क्रमावर त्याची तपशीलवार नोंद करायला हवी. उदा. सुधाकर शेलार, साहित्य संशोधन*: वाटा आणि वळणे*, अक्षरवाङ्मय प्रकाशन, पुणे, २०१९. पृ.२०१. या पद्धतीने संदर्भांचे व्यवस्थितीकरण करणे शोधनिबंध लेखनात महत्त्वाचे असते.

### ४अ.४.४ शोधनिबंधाचा प्रारंभ

शोधनिबंध लेखनात प्रारंभीचा मजकूर अतिशय महत्त्वाचा असतो. शोधनिबंधाचा प्रारंभ हा शोधनिबंधातील विषयाकडे घेऊन जाणारा असावा लागतो. ते एकार्थाने विषयाचे प्राक्कथन असते. यामध्ये विषयांतर्गत येणाऱ्या विविध संज्ञा, संकल्पना व घटकांचा अर्थ विशद केलेला असावा लागतो. उदा. नामदेव ढसाळ यांच्या कवितेतील विद्रोह या विषयावरील शोधनिबंधाचे लेखन करताना सुरुवातीला नामदेव ढसाळ यांचा जीवनपरिचय, त्यांच्या कवितालेखनाचा आढावा आणि विद्रोहाची संकल्पना स्पष्ट करणे गरजेचे असते. त्याशिवाय या विषयाच्या अंतरंगात जाता येणार नाही. एकुणात शोधनिबंधाचा प्रारंभ हा महत्त्वाचा असतो. यातून शोधनिबंधाची पुढील दिशा स्पष्ट होते.

### ४अ.४.५ विषयाची मांडणी

शोधनिबंधाचा गाभा म्हणजे विषयाची मांडणी होय. संशोधनशास्त्रामध्ये विषयाची मांडणी करत असताना विषयाची क्रमबद्ध रचना, मुद्देसूद विवेचन, संदर्भानुसार विषयविवेचन करणे इत्यादी गोष्टी महत्त्वाच्या असल्याचे सांगितले जाते. यातून विषयाची सूत्रबद्ध मांडणी सार्थपणे होऊ शकते. शोधनिबंध लेखन करणाऱ्या अभ्यासकाला विषयाचे चांगले आकलन असेल तर विषयाची चांगली मांडणी करू शकतो. यासाठी त्याचे प्रगल्भ वाचन, चिंतन आणि मनन असावे लागते. शोधनिबंधाच्या विषयाला केंद्रवर्ती ठेवून संशोधकाने वाचन केल्यास विषयाची मांडणी करणे सोयीचे होते. विषयाच्या अंतरंगापर्यंत त्याला जाता येते. एकूणच विषयाची मांडणी हा भाग शोधनिबंधात महत्त्वाचा ठरतो.

### ४अ.४.६ साधक बाधक चर्चा

शोधनिबंध ही एखाद्या विषयाची मूलभूत मांडणी असते. त्याबरोबरच त्या शोधनिबंधात संबंधित विषयांतर्गत येणाऱ्या घटकांची चिकित्सा करणेसुद्धा गरजेचे असते. या चिकित्सेत वस्तुनिष्ठ स्वरूपात मांडणी यायला हवी. एखाद्या विरोधी मताची मीमांसा करताना ती साधक-बाधक पद्धतीने करणे गरजेचे असते. तेव्हाच शोधनिबंधाला संशोधन मूल्य प्राप्त होते. अन्यथा तो शोधनिबंध न राहता केवळ काल्पनिक निबंध होऊ शकतो. अभ्यासकाने याचे भान ठेवणे अत्यंत गरजेचे आहे. संशोधनशास्त्रात अशा साधक बाधक चर्चेला विश्लेषण असे म्हणतात. विश्लेषण हे अवगत तथ्यांच्या आधारे गृहितकांचा घेतलेला शोध असतो. ते एका अर्थाने पृथक्करण असते. यामध्ये विषयांतर्गत घटकांचा शोध घेतला जातो. त्या घटकांची बहुआयामी पद्धतीने मांडणी केली जाते. त्यातील सत्य-असत्यतेचे स्पष्टीकरण दिले जाते. एकूणच शोधनिबंधात ही साधक बाधक चर्चा अपेक्षितच असते.

### ४अ.४.७ निष्कर्ष

संशोधनशास्त्रात निष्कर्षांना महत्त्वाचे स्थान असते. कोणत्याही संशोधनात अंतिमत: निष्कर्ष मांडले जातात. हे निष्कर्ष अभ्यासकाने केलेल्या संशोधनाचे फलित असतात. त्यामुळे कोणत्याही संशोधनाचे यश हे निष्कर्षांवर आधारित असते. संशोधनाच्या कार्यात संशोधक/ अभ्यासक एका विषयावर चिंतन करतो. आपल्या विषयाशी निगडित संदर्भ शोधतो. त्या संदर्भसाधनांचे आकलन करून एका विशिष्ट निर्णयाप्रत येतो. हे निर्णयमत त्याच्या चिंतनातून येते. त्यासाठी भक्कम पुरावे त्याच्याकडे असतात. या पुराव्याच्या आधारे शोधनिबंधात शेवटी निष्कर्ष मांडले जातात. या निष्कर्षांची मांडणी चढत्या क्रमाने करावी लागते. एका अर्थाने हे शोधनिबंधाचे विशेषच असतात. त्यांची संख्या मर्यादित असावी लागते. त्यामध्ये अंतिम निष्कर्ष हा शोधनिबंधाच्या विषयाचे साररूप असतो. त्यामुळे संशोधकाला यावर विशेष भर द्यावा लागतो. संशोधनपद्धतींचा वापर करून या निष्कर्षांपर्यंत पोहचावे लागते. एकूणच शोधनिबंधात निष्कर्ष हा अंतिमत: महत्त्वाचा घटक ठरतो.

### ४अ.४.८ संदर्भ

शोधनिबंधाच्या स्वरूपातील शेवटचा घटक म्हणजे संदर्भ होय. यामध्ये ग्रंथ संदर्भ, नियतकालिकातील संदर्भ, वृत्तपत्रातील संदर्भ, कोशामधील संदर्भ, आंतजालावरील संदर्भ अशा विविध संदर्भांची जोड शोधनिबंधाला द्यावी लागते. याला जोडून काही टिपा, नकाशे, आकृत्यासुद्धा दिल्या जातात. परंतु त्या आवश्यकतेनुसार देणे संयुक्तिक ठरते. संशोधनशास्त्रामध्ये संदर्भ देण्याच्या विविध पद्धती आहेत. त्यामध्ये एकवाक्यता नाही. असे असले तरी सामान्यत: एक प्रमाणबद्ध पद्धती इथे मांडता येईल. साधारणपणे संदर्भ देताना शोधनिबंधात जिथे संदर्भ दिलेला असतो तेथे क्रमांक दिला जातो. तो क्रमांक जशाचा तसा देऊन त्याठिकाणी सर्वप्रथम लेखकाचे नाव, पुस्तकाचे नाव, प्रकाशक, आवृत्ती आणि पृष्ठ क्रमांक अशी मांडणी केली जाते. उदा. स.गं. मालशे, *शोधनिबंध लेखनपद्धती*, लोकवाङ्मय गृह, मुंबई, १९७५, पृ. १७. या पद्धतीने संदर्भ देणे गरजेचे असते.

एकुणात शोधनिबंधाच्या लेखनपद्धतीवरील सर्व घटक महत्त्वाचे ठरतात. या घटकांना शोधनिबंध लेखन करताना प्रत्येक अभ्यासकाने विचारात घेणे अगत्याचे ठरते. वास्तविक शोधनिबंध या संकल्पनेतील लेखनासाठी यातीलही काही दिशादर्शक तत्त्वांना केंद्रवर्ती ठेवून मांडणी केलेली आहे. त्यानुसार शोधनिबंधाचे लेखन या तत्त्वांच्या आधारे करता येईल.

## ४अ.५ समारोप

शोधनिबंधाची लेखनपद्धती हा विषय संशोधनशास्त्रातील महत्त्वाचा आहे. शोधनिबंध हा एक लहान घटक असला तरी त्याची व्याप्ती मोठी आहे. त्याची संकल्पना व स्वरूप इथे आपण लक्षात घेतलेले आहे. तसेच त्याचे लेखन करतानासुद्धा लेखनशास्त्रातील मूलभूत तत्त्वे विचारात घेणे गरजेचे असते. प्रस्तुत घटकामध्ये आपण शोधनिबंधाच्या लेखनपद्धतीची मांडणी विस्ताराने केलेली आहे. ती संशोधकांना उपकारक ठरेल.

## ४अ.६ संदर्भ

१. मालशे, स. गं. : *शोधनिबंध लेखनपद्धती*, लोकवाङ्मय गृह, मुंबई, १९७५.

२. कऱ्हाडे, सदा : *संशोधन : सिद्धांत आणि पद्धती,* लोकवाङ्मय गृह, मुंबई, १९९७.

३. संत, दु. का. : *संशोधन पद्धती : प्रक्रिया व अंतरंग*, विद्यार्थी प्रकाशन, पुणे, १९८८.

४. वरखेडे, रमेश व वरखेडे, मंगला : *संशोधनाचे पद्धतीशास्त्र*, भाषाविकास संशोधन संस्था, कोल्हापूर, २०२२.

५. पाटणकर, जयश्री : *संशोधनाची क्षेत्रे आणि पद्धती*, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, २०१०.

६. जोशी, वसंत (संपादक) : *भाषा व साहित्य : संशोधन, खंड पहिला*, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे, १९८१.

७. शेलार, सुधाकर : *साहित्यसंशोधन: वाटा आणि वळणे*, अक्षरवाङ्मय प्रकाशन, पुणे, २०१९.

## ४अ.७ पूरक वाचन

१. डॉ. उषा देशमुख : *मराठी संशोधनविद्या*

२. डॉ. रमेश वरखेडे व मंगला वरखेडे : *संशोधनाचे पद्धतीशास्त्र*

३. डॉ.जयंत वेलणकर : *प्रबंध कसा लिहावा?*

४. रा.ग. जाधव : *वाङ्मयीन निबंधलेखन*

५. व. वि. कुलकर्णी : *मराठी प्रबंध सूची*

## ४अ.८ सरावासाठी प्रश्न

**अ) दीर्घोत्तरी :**

१. शोधनिबंध संकल्पना व स्वरूप स्पष्ट करा.

२. शोधनिबंधाचे घटक विशद करा.

३. शोधनिबंधाची रचनाप्रक्रिया विशद करा.

४. शोधनिबंधाचे महत्त्व स्पष्ट करा.

५. शोधनिबंध लेखनाचे स्वरूप विशद करा.

**ब) लघुत्तरी / टिपा :**

१. शोधनिबंध लेखनाची पूर्वतयारी विशद करा.

२. शोधनिबंध लेखनासाठी संदर्भवाचन कसे करावे ते लिहा.

३. शोधनिबंधासाठीच्या संदर्भांचे व्यवस्थितीकरण स्पष्ट करा.

४. शोधनिबंधाची सुरुवात कशी करावी ते स्पष्ट करा.

५. शोधनिबंध लेखनाची तत्त्वे विशद करा.

**क) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. शोधनिबंध शब्दार्थ लिहा.

२. शोधनिबंध म्हणजे काय?

३. शोधनिबंध लेखनपद्धती म्हणजे काय?

४. शोधनिबंध लेखनात निष्कर्ष किती महत्त्वाचे आहेत?

५. शोधनिबंधाचे संदर्भ कसे असावेत?

✞✞✞✞

# ४आ

## प्रकल्प अथवा प्रबंधिका लेखनपद्धती

**घटक रचना :**

४आ.१ उद्देश

४आ.२ प्रस्तावना

४आ.३ प्रकल्प अथवा प्रबंधिका : संकल्पना व स्वरूप

- ४आ.३.१ प्रकल्प शब्दार्थ
- ४आ.३.२ प्रकल्प म्हणजे काय?
- ४आ.३.३ प्रकल्पाचे प्रकार
- ४आ.३.४ प्रकल्पाची पद्धती

४आ.४ प्रकल्प अथवा प्रबंधिका लेखनपद्धती

- ४आ.४.१ प्रकल्पाचे शीर्षक
- ४आ.४.२ प्रकाराची नोंद
- ४आ.४.३ उद्दिष्टे
- ४आ.४.४ प्रकल्पाचे साहित्य
- ४आ.४.५ कार्यपद्धती
- ४आ.४.६ निवेदन
- ४आ.४.७ सादरीकरण
- ४आ.४.८ आकृत्या व चित्रांकन
- ४आ.४.९ प्रकल्पाचे विशेष/निष्कर्ष
- ४आ.४.१० प्रकल्प अहवाल

४आ.५ समारोप

४आ.६ संदर्भ

४आ.७ पूरक वाचन

४आ.८ प्रश्नावली

## ४आ.१ उद्देश

१. प्रकल्प ही संकल्पना समजून घेणे.
२. प्रकल्पाचे स्वरूप लक्षात घेणे.
३. प्रकल्प लेखन प्रक्रिया समजून घेणे.
४. प्रकल्प लेखन पद्धती विचारात घेणे.
५. प्रकल्प लेखनशास्त्र आकलनात घेणे.

## ४आ.२ प्रस्तावना

संशोधनशास्त्र ही एक व्यापक ज्ञानशाखा आहे. त्यामध्ये अनेक शास्त्रांचा अभ्यास केला जातो. या अभ्यासाच्या वेगवेगळ्या पद्धती आहेत. त्यांचे उपयोजन विविधांगी रूपात केले जाते. शोधनिबंध हे त्यातील एक लघुरूप असते. त्याचा शोध आपण मागे घेतलेला आहे. प्रस्तुत घटकामध्ये संशोधनशास्त्रातील एका व्यापक शोधरूपाचा आढावा आपण घेणार आहोत. ते रूप म्हणजे प्रकल्प होय. याला शोधप्रकल्प असेही म्हटले जाते. याची रचना शोधनिबंधापेक्षा मोठी आणि प्रबंधापेक्षा लहान असते. प्रकल्पाचे प्रयोजन हे नवनिर्माणक्षम प्रज्ञा विकसित करणे, उपलब्ध साधनातून सृजनात्मक निर्मिती करणे, माहितीचे संकलन करून तिला नव्या रूपात मांडणे हे असते. शैक्षणिक क्षेत्रात अशा प्रकल्पांना अतिशय महत्त्वाचे स्थान आहे. विद्यार्थ्यांना विविध प्रकल्प देऊन त्यांच्यातील जिज्ञासा, संशोधनदृष्टी आणि क्षमतांचा विकास केला जातो. एकूणच संशोधनशास्त्रात प्रकल्पाची उपयोगिता आणि मौलिकता महत्त्वपूर्ण आहे. अशा संशोधनक्षेत्रातील महत्त्वाचा घटक असलेल्या प्रकल्पाचा विचार प्रस्तुत ठिकाणी आपण करणार आहोत. प्रकल्प लेखनपद्धतीचा विचार करण्यापूर्वी याची संकल्पना व स्वरूप सर्वप्रथम समजून घेणे अगत्याचे ठरेल.

## ४आ.३ प्रकल्प : संकल्पना व स्वरूप

प्रकल्प ही संशोधनशास्त्रातील एक महत्त्वाची संज्ञा आहे. त्यामध्ये विविध घटक अंतर्भूत आहेत. या प्रकल्पाचे स्वरूपही वैशिष्ट्यपूर्ण असते. संशोधन पद्धतीमध्ये या प्रकल्पाची स्वरूपतत्त्वे विशद केलेली आहेत. त्याची संकल्पना सांगितलेली आहे. यामध्ये शब्दार्थापासून ते त्याच्या विविध व्याख्या, घटक, प्रकार आणि स्वरूपाचा विचार अनुस्यूत आहे. प्रस्तुत ठिकाणी आपण प्रकल्प संकल्पना व स्वरूपविचार विस्ताराने करणार आहोत.

### ४आ.३.१ प्रकल्प शब्दार्थ :

प्रकल्प या शब्दाला इंग्रजीत Project (प्रोजेक्ट) असे म्हणतात. याला शोधप्रकल्प असेही म्हणता येते. शब्दकोशामध्ये 'प्रोजेक्ट' या शब्दाचा मतितार्थ विशद करताना लिहिलेले आहे की, 'प्रोजेक्ट' हा शब्द 'प्रोजेक्टम' या लॅटिन क्रियापद proicere वरून आलेला आहे, जो pro- यामधून वरून येतो, जो अग्रक्रम दर्शवतो, असे काहीतरी जे काही काळापूर्वी येते. ग्रीक Pro च्या समांतर आणि iacere करण्यासाठी. अशाप्रकारे 'प्रकल्प' या शब्दाचा मूळ अर्थ 'कृतीपूर्ती' असा होतो. जेव्हा इंग्रजी भाषेने सुरूवातीला हा शब्द स्वीकारला तेव्हा तो एखाद्या गोष्टीच्या योजनेचा संदर्भ देत होता. ही योजना प्रत्यक्षात आणण्याच्या कृतीला

नाही. एखाद्या प्रकल्पाच्या अनुषंगाने केलेले काहीतरी 'ऑब्जेक्ट' म्हणून ओळखले जाऊ लागले. प्रत्येक प्रकल्पाच्या विकासाचे काही टप्पे असतात. प्रोजेक्ट मॅनेजमेंट इन्स्टिट्यूटच्या आधारे, एखाद्या प्रकल्पाची व्याख्या 'तात्पुरता प्रयत्न' म्हणून केली जाऊ शकते. ज्याचा उद्देश संघ, संस्था किंवा समाजामध्ये बदल घडवून आणणे आहे. (en.wikipedia.org.project) संशोधनशास्त्रात 'प्रकल्प' हा शब्द व्यापक अर्थाने वापरला जातो. शैक्षणिक क्षेत्रात याला अतिशय महत्त्वाचे स्थान आहे.

### ४आ.३.२ प्रकल्प म्हणजे काय?

संशोधनशास्त्रात 'प्रकल्प' ही संज्ञा स्पष्ट करताना त्याची विशिष्ट व्याख्या सांगितलेली आहे. या व्याख्येवरून प्रकल्प म्हणजे काय या प्रश्नाचे उत्तर आपल्याला मिळते. वास्तविक प्रकल्पाची व्याख्या करताना अभ्यासकांपेक्षा कोशांचा आधार प्राधान्याने घ्यावा लागतो. अशाच काही कोशगत प्रकल्पाच्या काही व्याख्या पुढीलप्रमाणे लक्षात घेता येतील.

१. प्रकल्प म्हणजे वैयक्तिकरित्या किंवा सहकार्याने आणि शक्यतो संशोधन किंवा डिझाइनचा समावेश असलेले कोणतेही उपक्रम, ज्यात विशिष्ट ध्येय साध्य करण्यासाठी काळजीपूर्वक नियोजित केले जाते.
२. विश्लेषणाच्या उद्देशाने प्रकल्प हा एक ठोस आणि संघटित प्रयत्न आहे ज्यामुळे एक अद्वितीय आणि नाविन्यपूर्ण वितरण करण्यायोग्य आहे, जे उत्पादन, सेवा किंवा प्रक्रिया किंवा विज्ञान संशोधन उपक्रम देखील असू शकते, ज्याची संकल्पना यावर आधारित आहे.
३. व्यापक स्वरूपाचा व्यक्तिगत अथवा सामुदायिक अभ्यासाचा दीर्घकालीन संदर्भग्रंथ, क्षेत्रीय सर्वेक्षणावर आधारलेला तपशीलवार अभ्यास हा संशोधन प्रकल्प होतो. (संशोधन पद्धतीशास्त्र, पृ.१६)

प्रकल्पाच्या वरील व्याख्यांमधील पहिल्या दोन व्याख्या पाश्चात्त्य अभ्यासकांनी मांडलेल्या आहेत. पहिली व्याख्या इंटरनेटवरील कोशामधून घेतलेली आहे. तर दुसरी व्याख्या ऑलिव्हियर मेस्ली यांनी लिहिलेल्या ‘प्रकल्प व्यवहार्यता : असुरक्षिततेचे मुद्दे उघड करण्याची साधने’ या लेखामधून घेतलेली आहे. तिसरी व्याख्या ही डॉ. रमेश वरखेडे यांनी केलेली आहे. या सर्व व्याख्यांचा विचार करता प्रकल्प ही संज्ञा विशिष्ट उपक्रमाशी निगडित असल्याचे आपल्या लक्षात येते. ही याची व्यापक बाजू आहे. संशोधनशास्त्रामध्ये शोधप्रकल्पाच्या चौकटीत केल्या जाणाऱ्या प्रकल्पांचा विचार अनुस्यूत आहे. यामध्येही वैयक्तिक अथवा सहकार्याने केलेले संशोधनकार्य असते. याची रचना शैक्षणिक उपक्रम म्हणून बांधीव असते. त्याची विशिष्ट संरचना असते. या संरचनेत विविध घटक असतात. प्रकल्पाची संकल्पना अधिक स्पष्ट होण्यासाठी या घटकांचा विचार करणे अगत्याचे ठरेल.

### ४आ.३.१ प्रकल्पाचे प्रकार :

प्रकल्प ही संकल्पना व्यापक आहे. त्यामध्ये विविध प्रकार येतात. वास्तविक क्षेत्रनिहाय प्रकारांची रचना बदलत असते. त्यांची पद्धती वेगळी ठरते. साधारणपणे त्याप्रकारामध्ये खालील प्रकार सांगितले जातात. त्यामध्ये -

१. लघु प्रकल्प
२. बृहद् प्रकल्प
३. शोधप्रकल्प
४. शैक्षणिक प्रकल्प
५. शासकीय प्रकल्प
६. उद्योग प्रकल्प
७. सर्वेक्षणात्मक प्रकल्प
८. संग्रहात्मक प्रकल्प
९. संकलनात्मक प्रकल्प
१०. रचनात्मक प्रकल्प
११. तक्त्यांच्या निर्मितीचा प्रकल्प
१२. प्रतिकृती निर्मितीचा प्रकल्प इत्यादी.

प्रकल्पाचे वरील सर्व प्रकार महत्त्वपूर्ण आहेत. लघु प्रकल्पामध्ये एखाद्या संक्षिप्त विषयावर संशोधन केले जाते. त्याची व्याप्ती लहान असते. तर बृहद् प्रकल्प हा यापेक्षा व्यापक आणि प्रदीर्घ असतो. शैक्षणिक क्षेत्रात विद्यार्थ्यांना विविध उपक्रम दिले जातात. यामध्ये प्रकल्प हा भाग असतो. या शैक्षणिक उपक्रमामधून विद्यार्थ्यांची जिज्ञासा विकसित करण्याचे प्रयोजन ठरवलेले असते. अशाच प्रकारचे इतर प्रकल्पही आपापल्या गुणविशेषांसह तयार केले जातात. संशोधकाला या सर्व प्रकारांची जाण असणे, या प्रकाराची माहिती असणे, त्यांचा अभ्यास असणे, या प्रकारांची व्याप्ती आणि पद्धती जाणून घेणे गरजेचे आहे. त्याशिवाय आपला कोणताही प्रकल्प यशस्वीपणे पूर्ण करता येणार नाही.

### ४आ.३.४ प्रकल्पाची पद्धती :

कोणत्याही संशोधनात पद्धतीशास्त्राला अतिशय महत्त्वाचे स्थान असते. त्याला मेथडॉलॉजी असे म्हणतात. प्रकल्पामध्ये ही प्रकल्प पद्धती प्रोजेक्ट मेथडॉलॉजी आहे. मराठी विश्वकोशामध्ये या पद्धतीविषयी मूलभूत विवेचन आलेले आहे. प्रकल्प पद्धती ही प्रसिद्ध तत्त्वज्ञ व शिक्षणतज्ज्ञ जॉन डयूई यांनी मांडलेली आहे. जॉन डयूई यांनी प्रतिपादित केलेल्या कार्यवाद या तत्त्वज्ञानावर ही पद्धती आधारलेली आहे. कृतीद्वारे शिक्षण हे या पद्धतीचे खास वैशिष्ट्य मानले जाते. प्रकल्प पद्धतीत विद्यार्थ्यांना, अभ्यासकांना मुक्त वातावरणात अध्ययन, संशोधन करता येते. याचा वापर भाषा, कला, सामाजिक शास्त्रे, गणित, विज्ञान या अध्ययन शाखांमध्ये प्राधान्याने करता येतो. प्रकल्प पद्धतीचे प्रमुख तीन टप्पे सांगितले जातात. युवराज पवार यांनी मराठी विश्वकोशामध्ये लिहिलेल्या प्रकल्प पद्धती या नोंदीमध्ये या तीन टप्प्यांची मांडणी केलेली आहे. यामध्ये प्रकल्पपूर्व नियोजन, प्रकल्पाची कार्यवाही आणि प्रकल्पोत्तर कार्यवाही यांचा समावेश होतो. याविषयी अधिकचा तपशील खालीलप्रमाणे लक्षात घेता येईल.

**(१) प्रकल्पपूर्व नियोजन -** यामध्ये प्रकल्प निवड व नियोजन हे मुख्य घटक असतात. गणित, भाषा, विज्ञान, सामाजिक शास्त्रे व पर्यावरण या विषयांतील अनेक घटक असे आहेत की, जे वर्गात न अभ्यासता समाजात जाऊन त्यांची माहिती मिळवावी लागते. अशा आशयासाठी प्रकल्पपद्धती उपयुक्त ठरते. ज्या घटकांचे आकलन वर्गामध्ये होऊ शकत

नाही, कृतीला वाव असते, जेथे प्रत्यक्ष कामास वेळ लागतो. शिक्षकाशिवाय इतर सामाजिक घटकांकडून प्रत्यक्ष ज्ञान मिळवावे लागते असे घटक प्रकल्पपद्धतीमध्ये अध्ययनासाठी निवडले जातात. उदा. बँकेचे व पोस्टाचे व्यवहार समजून घेणे, वर्तमानपत्रातील कात्रणांचा संग्रह करणे, विविध ठिकाणांना भेटी देणे, औषधी वनस्पतींची माहिती गोळा करणे, भूखंडाचे क्षेत्रफळ काढणे इत्यादी.

**(२) प्रकल्पाची प्रत्यक्ष कार्यवाही -** प्रकल्पाची निवड केल्यानंतर तो प्रकल्प पूर्णत्वास नेण्याच्या दृष्टीने नियोजन करणे आवश्यक असते. निवडलेला प्रकल्प कोणत्या घटकासंदर्भातील आहे, ते पाहून त्यासंदर्भात कोणती माहिती विद्यार्थ्यांना द्यावी लागेल, याचे नियोजन शिक्षकाला करावे लागते. त्याची व्याप्ती निश्चित करावी लागते. यानंतरचा महत्त्वाचा भाग म्हणजे शिक्षकाला प्रशासकीय नियोजन करावे लागते. प्रकल्प ज्याठिकाणी राबवायचा आहे, त्याबाबत शिक्षकाला शाळा, संस्था अथवा कार्यालय यांच्याशी पत्रव्यवहार करावा लागतो. प्रकल्प राबवण्यापूर्वी प्रकल्पास किती वेळ द्यायचा? ज्या स्थळाला भेट देणार, तेथील लोकांचा उपलब्ध होणारा वेळ किती असेल? यांचा विचार करणे आवश्यक असते. तसेच शालेय वेळापत्रकात व्यत्यय येणार नाही, याचीही दक्षता घेणे जरुरीचे असते. वर्गातील विद्यार्थ्यांचे गट करणे, गटप्रमुख नेमणे, प्रत्येक गटाने कोणती माहिती केव्हा घ्यायची, प्रात्यक्षिक कामाचे वेळापत्रक निश्चित करणे, गटागटांमध्ये समन्वय साधणे, शिक्षक, विद्यार्थी व तज्ज्ञ व्यक्ती यांच्यामध्ये समन्वय साधणे इत्यादी बाबींचा विचार नियोजनामध्ये करावा लागतो. प्रकल्पाचे नियोजन अचूक असेल, तर प्रकल्पाची प्रत्यक्ष कार्यवाही करणे सुलभ होते. विद्यार्थ्यांनी केलेली नोंदणी, मापन, लेखन, प्रयोग इत्यादी बाबी योग्य पद्धतीने झाल्या किंवा नाही यावर शिक्षकाचे लक्ष असणे महत्त्वाचे असते.

**(३) प्रकल्पोत्तर कार्यवाही -** यात प्रकल्प सुरू असताना विद्यार्थ्यांना आलेल्या अडचणी, त्यांनी घेतलेल्या नोंदी, केलेले प्रात्यक्षिक कार्य इत्यादींबाबत चर्चा करणे अपेक्षित असते. विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन करणे, त्या घटकासंबंधीच्या संपूर्ण माहितीची उजळणी करून त्याचे दृढीकरण करणे आणि विद्यार्थ्यांना विषय घटकाच्या ज्ञानाबरोबरच इतर कोणते ज्ञान प्राप्त झाले, याची शिक्षकाने विद्यार्थ्यांबरोबर चर्चा करणे अपेक्षित असते. शेवटी शिक्षकाने प्रकल्पाचे यश-अपयश जाणून घेऊन प्रकल्पाचे मूल्यमापन आणि प्रकल्पाचा अहवाल तयार करावा. एकूणच प्रकल्प पद्धतीमधील वरील सर्व घटक अतिशय महत्त्वाचे आहेत. या सर्व टप्प्यांमधूनच प्रकल्पाची कार्यसिद्धी होते. त्यामुळे प्रकल्प लेखकांनी या टप्प्यांचे भान ठेवून संशोधनपर लेखन करणे गरजेचे आहे. प्रकल्प लेखनासाठी वरील पद्धतीशास्त्र पूरक ठरणारे आहे.

## ४आ.४ प्रकल्प लेखनपद्धती

प्रकल्प हा संशोधशास्त्रातील महत्त्वाचा लेखनाविष्कार आहे. विशेषत: शैक्षणिक क्षेत्रामध्ये या प्रकल्पांना अतिशय महत्त्वाचे स्थान असते. प्रकल्प या संकल्पनेचे मुख्य घटक असतात. या घटकामध्ये प्रकल्पाचा विषय, त्याचे वेगळेपण अथवा महत्त्व, त्याचा आंतरविद्याशाखीय सहसंबंध, कच्चा आराखडा, उद्देश, गृहितके, संशोधन पद्धती, प्रकरणनिहाय विषय मांडणी, निष्कर्ष, संदर्भ, परिशिष्टे, आकृत्या, नकाशे, मुलाखती इत्यादींचा समावेश होतो. हे सर्व

घटक प्रकल्पाची संरचना निर्धारित करत असतात. त्यांचा विचार येथे लक्षात घेणे अगत्याचे ठरेल.

### ४आ.४.१ प्रकल्पाचे शीर्षक

कोणत्याही संशोधनामध्ये विषय हा भाग अतिशय महत्त्वाचा असतो. शीर्षकामध्ये विषयाची मांडणी केलेली असते. प्रकल्पाचे शीर्षक हे संशोधनशास्त्राला धरून असायला हवे. विशेषत: मूलभूत प्रकारचा विषय शीर्षकामधून आविष्कृत व्हायला हवा. त्याची व्याप्ती विस्तृत तर असायला हवी, परंतु त्याची कक्षा मात्र मर्यादित, वस्तुनिष्ठ आणि आवाक्यातील असणे गरजेचे असते. याविषयी स.गं.मालशे यांनी अतिशय मार्मिक भाष्य केलेले आहे. ते लिहितात, विषय निवडणे म्हणजे केवळ शीर्षकाचे शब्द निश्चित करणे नव्हे, ज्या क्षेत्रात थोडेफार वाचन झालेले आहे त्यातील एखाद्या विषयावर स्वत:ला जाणवलेले काही नवीन विचार मनामध्ये निर्माण झाल्याखेरीज संशोधनप्रक्रिया सुरूच होऊ शकत नाही (मालशे, पृ.११) प्रकल्पाचा विषय हा संशोधन पद्धतिशास्त्राला धरून असायला हवा. त्याच्या शीर्षकात अचूकता, वस्तुनिष्ठता आणि समर्पकता असायला हवी. उदा., मराठी कादंबरीची सूची (प्रारंभ ते २०२३) अशा प्रकारच्या शीर्षकावरून संशोधन कार्यातील मौलिकता आणि विशिष्टता अधोरेखित होते.

### ४आ.४.२ प्रकाराची नोंद

प्रकल्पामध्ये विषय शीर्षकानंतर संबंधित विषय कोणत्या प्रकारात येतो, याची ठळक नोंद करावी लागते. ते करणे बंधनकारक आहे. कारण यावरून प्रकल्पाच्या कक्षा आपल्या लक्षात येतात. मागे आपण प्रकल्पांच्या प्रकाराचा विचार केलेला आहे. त्यामध्ये लघु प्रकल्प, बृहद प्रकल्प, शोधप्रकल्प, शैक्षणिक प्रकल्प, शासकीय प्रकल्प, उद्योग प्रकल्प, सर्वेक्षणात्मक प्रकल्प, संग्रहात्मक प्रकल्प, संकलनात्मक प्रकल्प, रचनात्मक प्रकल्प, तक्त्यांच्या निर्मितीचा प्रकल्प, प्रतिकृती निर्मितीचा प्रकल्प इत्यादींचा समावेश होतो. यापैकी एक प्रकल्प प्रकार विषयाच्या किंवा शीर्षकाच्या खाली नोंदविणे गरजेचे असते. उदा. लघु प्रकल्प अंतर्गत विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली लिहून त्याखाली विषय शीर्षक ठळक अक्षरात लिहावे लागते.

### ४आ.४.३ उद्दिष्ट्ये

प्रकल्प रचना करत असताना निश्चित ध्येय असणे आवश्यक असते. ध्येय, उद्दिष्टाशिवाय कोणतेही संशोधन पूर्ण होत नसते. उद्दिष्टांवरून प्रकल्पाची दिशा स्पष्ट होत असते. याविषयी रमेश वरखेडे लिहितात, आपल्या संशोधनात ज्या ज्या गोष्टींवर प्रकाश टाकायचा असेल त्या सर्व संशोधन उद्दिष्टांची यादी द्यावी. (ब्रिटीश वसाहत कालातीत भारताचा राजकीय अन्वयार्थ या विषयाची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे लिहिता येतील. इस्ट इंडिया कंपनीचा प्रवेश आणि भारतीय सत्ताकारणातील बदलत्या प्रवाहांचा मागोवा घेणे, सत्तावन्नच्या बंडानंतर बदललेल्या ब्रिटिश राजनीतीच्या ध्येयधोरणांचा व राजकीय डावपेचांचा शोध घेणे, एकोणिसाव्या शतकातील राष्ट्रीय व सुधारणावादी भारतीय राजकारणातील अंत:प्रवाह जाणून घेणे, संस्थानिक आणि ब्रिटिश यांच्या राजकीय संबंधांचा मागोवा घेणे, विसाव्या शतकातील सशस्त्र क्रांतिकारकांच्या व अहिंसक असहकाराच्या राजकीय

चळवळींचा परामर्श घेणे, धार्मिक राजकारण व राष्ट्रीय राजकारणातील परस्परसंबंधांवर प्रकाश टाकणे इत्यादी उद्दिष्टे नोंदवावीत) उद्दिष्टांच्या या तपशीलामुळे आपल्या अभ्यासाची दिशा स्पष्ट होते. (रमेश वरखेडे, पृ.१३) प्रकल्पाची रचना करताना उद्दिष्टांची मांडणी करणे आवश्यक असते. हे वरील विवेचनावरून आपल्या लक्षात येते.

### ४आ.४.४ प्रकल्पाचे साहित्य

प्रकल्प लेखन करताना आवश्यक साधन साहित्य अतिशय महत्त्वाचा भाग असतो. यालाच संदर्भ साहित्य असेही म्हणता येईल. संशोधनशास्त्रात संदर्भ साधने मिळविणे, त्यांचे वाचन करणे, त्यांच्या नोंदी घेणे, त्याचे विश्लेषण करणे इत्यादी गोष्टी येतात. या सर्व प्रक्रियांसाठी संशोधकाला आपण जो प्रकल्प विषय घेतलेला आहे. त्याविषयीची कोणती साधने आपल्याला हवीत. याचे स्पष्टीकरण करून घ्यायला हवे. प्रकल्पामध्ये साहित्य विविध प्रकारचे असू शकते. त्यामध्ये विद्याशाखाधारित संदर्भ साहित्य, पुस्तके, शब्दकोश, नियतकालिकांमधील लेख, विश्वकोश, ज्ञानकोश, अप्रकाशित साहित्य, मौखित साहित्य, प्रबंध, सर्वेक्षण, वृत्तपत्रातील लेख, माहिती, इत्यादींचा समावेश होतो. याविषयी झिना ओ लिअरी यांनी संशोधन प्रकल्पाची मांडणी करताना साहित्याचा आढावा या घटकामध्ये विस्तृत विवेचन केलेले आहे. त्या लिहितात,

- चांगल्या संशोधनामध्ये विषयाशी संबंधित, कार्यपद्धतीय आणि सैद्धांतिक साहित्यामधील प्रतिबद्धतेची गरज असते. ह्यामुळे तुम्हाला विषयाचा शोध घेणे, प्रश्न परिभाषित करणे, तर्क स्पष्टपणे मांडणे, तुमच्या अभ्यासाबाबत सैद्धांतिक माहिती देणे, योग्य आकृतिबंध विकसित करणे, औपचारिक साहित्य परीक्षण लिहिणे यासाठी मदत होईल आणि कधी कधी संशोधनासाठी प्राथमिक डेटा स्त्रोत ठरू शकेल.
- साहित्य प्रकारांमध्ये संदर्भ साहित्य, पुस्तके इत्यांदीमधील योग्य साहित्य शोधण्यासाठी तुम्ही ग्रंथपाल, निरीक्षक आणि इतर संशोधकांच्या अनुभवाची मदत घेतली पाहिजे.
- साहित्याची उपलब्धता सतत वाढत असते. त्यामुळे विविध इलेक्टॉनिक डेटाबेस आणि सर्च इंजिने यांच्या वापरासाठी विद्यार्थ्यांनी कळीच्या शब्दांचा शोध घेण्याचे नैपुण्य विकसित करणे आवश्यक आहे. यासाठी तुम्हाला मोठ्या प्रमाणात लिहिलेल्या कामामधील समर्पकता आणि गुणवत्ता त्वरित जोखणे देखील आवश्यक आहे.
- स्त्रोतांचे व्यवस्थापन आणि विवेचन यामुळे संबंधित साहित्याच्या नोंदी पुरवल्या जातात. त्यामध्ये उतारा, लेखक आणि प्रेक्षक यांचा उल्लेख, लहान सारांश, चिकित्सक समीक्षा आणि टिपणे यांचा समावेश होतो. तुम्हाला उद्धृत केलेल्या स्त्रोतांचे महत्त्व, अचूकता आणि गुणवत्ता याचे स्मरण करून देतील.
- औपचारिक साहित्य परीक्षण हे तुमच्या विषयाची तुमच्या वाचकांना माहिती देण्यासाठी, संशोधक म्हणून तुमची विश्वासार्हता प्रस्थापित करण्यासाठी आणि तुमच्या कामाची गरज आणि समर्पकता याबाबत युक्तिवाद करण्यासाठी संकल्पित केलेले एक अगदी विशिष्ट वितंडवादी उत्तम लिखाण होय. बहुतांश लोकांना हे एक कठीण काम वाटते. ज्याच्यासाठी सहनशीलता, सराव, मसुदा लिहिणे आणि पुनर्लेखन याची गरज भासते. (पृ.१०७)

एकुणात प्रकल्प लेखनामध्ये प्रकल्प साहित्य हा अतिशय महत्त्वाचा भाग असतो. चांगले व योग्य साहित्य निवडल्यानंतर, त्याचे वाचन केल्यानंतरच प्रकल्प लेखन करता येत असते. साहित्याची निवड आणि त्याची प्रकल्प लेखनात मांडणी करताना संशोधकीय नैतिकता पाळणे अत्यंत गरजेचे असते. वाङ्मयचौर्यासारख्या गोष्टी प्रकल्प साहित्यामध्ये असता कामा नयेत. अलीकडे इंटरनेटच्या माध्यमातून विविध प्रकारचे साहित्य सहजपणे उपलब्ध होत असते. या साहित्याचा वापर संशोधनात करताना काळजी घ्यायला हवी. त्याची विश्वसनीयता तपासणे, योग्य पद्धतीने त्याचा संदर्भ घेणे, तशी त्याची नोंद प्रकल्पात करणे गरजेचे असते. या सर्व बाबींचा विचार प्रकल्प साहित्याची मांडणी करताना करावा लागतो.

### ४आ.४.५ कार्यपद्धती

प्रकल्प लेखनपद्धती मध्ये कार्यपद्धती महत्त्वाची आहे. कोणताही प्रकल्प यशस्वी होण्यासाठी या कार्यपद्धतीचा वापर करावा लागतो. ही केवळ काम करण्याची पद्धती नाही, तर ती संशोधन कार्याला यशस्वी करण्यासाठीच्या सैद्धांतिक पद्धतीमध्ये येते. त्यामुळे या प्रकल्प कार्यपद्धतीला अतिशय महत्त्वाचे स्थान आहे. झिना ओ लिअरी यांनी या कार्यपद्धतीसंदर्भात खालील महत्त्वाचे भाग सांगितलेले आहेत.

१. कार्यपद्धतीचे आकलन : संख्यात्मक, गुणात्मक आणि मिश्र दृष्टिकोन
२. कार्यपद्धतीचे आकलन : मूल्याधारित, क्रियाभिमुख आणि बंधमुक्त दृष्टिकोन
३. प्राथमिक डेटा : सर्वेक्षण, मुलाखती आणि निरीक्षण
४. दुय्यम डेटा : दस्तऐवज, डेटा संच आणि ऑनलाईन डेटा

प्रकल्प लेखन करताना वरील सर्व कार्यपद्धती अतिशय महत्त्वाच्या ठरतात. त्यामुळे यांच्याविषयी विस्ताराने माहिती घेणे अगत्याचे ठरेल.
प्रकल्पाच्या कार्यपद्धतीमध्ये संख्यात्मक आणि गुणात्मक संशोधन परंपरा या ज्ञानोत्पादनातील मूलभूत विवादाचे प्रतिनिधित्व करतात, पण संख्यात्मक आणि गुणात्मक या संज्ञांचा वापर हा विशेषकरून पद्धतीसंबंधात, गोंधळात टाकणारा, वादगस्त आणि मर्यादित असू शकतो. आपल्या जगात, समाजाचा अभ्यास हा इतर कोणत्याही घटकाच्या शास्त्रीय अभ्यासापेक्षा वेगळा नाही आणि शास्त्रीय पद्धत, निगमन तर्कशास्त्र, वस्तुनिष्ठता आणि सांख्यिकीकरण यांचा ती आधार आहे. समाजविज्ञानात अनेकदा प्रायोगिक आराखडा किंवा संख्यात्मक डेटा विश्लेषणाच्या माध्यमातून चाचणी करण्यात येते. संख्यात्मक परंपरेचा आधार असलेल्या गृहितकांचे गुणात्मक परंपरा समालोचन करते आणि अनुमानजन्य तर्कशास्त्र, व्यक्तिनिष्ठता, अनेक सत्य, संशोधनाचे राजकीय स्वरूप, संख्येपेक्षा खोलीचे महत्त्व याचा ती आधार आहे. संस्कृतीदर्शन मानसघटनाशास्त्र, संस्कृतीदर्शी कार्यपद्धती व स्त्रीवादी दृष्टिकोनही गुणात्मक कार्यपद्धतीची उदाहरणे आहेत. (पृ.१५६)

मूल्याधारित संशोधन हे कार्यक्रम आणि धोरण अशा काही उपक्रमांचे मूल्य निर्धारित करण्यासाठी हाती घेतले जाते व त्यात अंमलबजावणी आणि परिणाम दोघांचाही अंतर्भाव असतो. कृतिसंशोधन हे एकात्मिक ज्ञाननिर्मिती आणि बदलाची अंमलबजावणी यास समर्पित आहे. (पृ.१८४)

प्राथमिक डेटा हा चालू, संपूर्णपणे संशोधकाच्या मालकीचा असतो. आणि संशोधकांच्या गरजांनुसार गोळा केलेला असतो. सर्वेक्षणामध्ये प्रतिसादकाकडून मिळालेली माहिती, त्याचे प्रामाणिकीकरण, याची गोपनीयता महत्त्वाची आहे. मुलाखतीमध्ये मुक्त स्वरूपाच्या प्रश्नउत्तरांचा समावेश होतो. मुलाखतीचा वापर अनेकदा अधिक सखोल गुणात्मक डेटा टिपण्यासाठी वापण्यात येतो. तशाच प्रकारे दुय्यम डेटा या घटकाच्या संदर्भातही डाटाबेस आणि इंटरनेट इत्यादी ठिकाणी आढळणारा डेटा याचा विचार अनुस्यूत आहे. (पृ.२८२) या सर्व कार्यपद्धतीतील तत्त्वांचा विचार प्रकल्पाच्या लेखनामध्ये लक्षात घेणे गरजेचे आहे.

### ४आ.४.६ निवेदन

यामध्ये निवड केलेल्या प्रकल्पामागचा हेतू अधिक स्पष्टपणे मांडला जातो. वास्तविक प्रकल्पाच्या उद्दिष्टांमध्ये याची कल्पना येते. परंतु प्रकल्पाच्या निवेदनात याचा हेतू अधिकपणे स्पष्ट केला जातो. त्यामुळे याला महत्त्वाचे स्थान असते. कोणतेही संशोधन विशिष्ट भूमिका घेऊनच केले जाते. ही भूमिका संशोधकाच्या वाचन, मनन, चिंतन आणि अभ्यासातून आविष्कृत होते. बऱ्याच वेळा प्रकल्प असो अथवा प्रबंध किंवा शोधनिबंध असो यांचे लेखन हे हेतूपूर्वकच केले जाते. पदवी प्राप्त करणे, अभ्यासक्रमाचा भाग म्हणून लेखन करणे, शैक्षणिक गुणांकन मिळविण्यासाठी प्रकल्प करणे अशा विविध हेतूंचा त्यामागे समावेश असू शकतो. परंतु संशोधनशास्त्रामध्ये जे अभ्यासक अहोरात्र कष्ट, परिश्रम करत असतात ते केवळ एवढ्या हेतूनेच प्रकल्प करत नाहीत, तर निखळ संशोधनदृष्टी, संशोधकीय भूमिका त्यामागे असते. अशा संशोधनाची क्रियापद्धती अव्याहतपणे चालू असते. त्याला कालमर्यादा असत नाही. असे असले तरी प्रकल्पाचा हेतू निश्चित असणे गरजेचे असते. याची मांडणी प्रकल्प निवेदनात अभ्यासकाला करावी लागते.

### ४आ.४.७ सादरीकरण

प्रकल्पाचा पुढील भाग हा प्रकल्पाच्या सादरीकरणाचा असतो. यामध्ये संकलित केलेल्या माहितीची यथायोग्य पद्धतीने मांडणी करणे, प्रकल्प साहित्य संकलन करत असताना वेळोवेळी आलेल्या विशेष अनुभवांच्या नोंदी करणे, प्रकल्प लेखन करताना ज्या ज्या लोकांचे सहकार्य मिळाले याचा उल्लेख करणे तसेच संदर्भ साहित्याच्या नोंदी करणे गरजेचे असते. हा एक शिष्टाचाराचा भाग म्हणूनही महत्त्वाचा असतो. प्रकल्प सादरीकरणामध्ये दुसरा महत्त्वाचा भाग म्हणजे बऱ्याचवेळा शैक्षणिक व संशोधनात्मक प्रकल्पांमध्ये विशिष्ट संरचना तयार केल्या जातात. त्याला इंगजीमध्ये Module असे म्हणतात. अशा प्रकल्प रचनांचे सादरीकरण करावे लागते. जी कृती प्रकल्पामध्ये केलेली आहे ती दृश्य रूपात सादर करणे यामध्ये येते. शैक्षणिक क्षेत्रात अशा प्रकल्पांच्या सादरीकरणासाठी स्पर्धा घेतल्या जातात. विशेषत: विज्ञानक्षेत्रात याचे प्रमाण सर्वाधिक असते.

प्रभावी सादरीकरण करण्यासाठी काही कौशल्ये आत्मसात करणे गरजेचे आहे. झिना ओ लिअरी यांनी प्रकल्पाच्या प्रभावी सादरीकरणासंदर्भात महत्त्वपूर्ण विवेचन केलेले आहे. त्यांच्या मते, प्रकल्पाचे एका विशिष्ट पद्धतीने सादरीकरण करावे. सादरीकरण हे उभयमार्गी संभाषण असते. प्रेक्षकांना गुंतवून ठेवणे आणि त्यांच्यावर लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे. त्यामध्ये नैपुण्य आणि ज्ञान हा घटक महत्त्वाचा आहे. त्याबरोबच उद्दिष्ट, कथनपरता,

पारदर्शकता, खेळकरपणा, पॉवरपॉईंटचा वापर अशा विविध गोष्टींचे भान सुद्धा महत्त्वाचे आहे.

### ४आ.४.८ आकृत्या व चित्रांकन

प्रकल्प हा एक प्रकारचे सर्वेक्षणात्मक संशोधन असते. त्यामुळे प्रकल्प लेखनात सर्वेक्षणातून संकलित केलेली माहिती विविध आकृत्या, नकाशे, तक्ते, रेखाटने, चित्रांमधून दर्शविणे आवश्यक असते. यामुळे प्रकल्पाला संदर्भमूल्य प्राप्त होते. उदा. प्रकल्प करत असताना एखाद्या अभ्यासकाने मुलाखती घेतल्या असतील तर मुलाखत घेतानाची छायाचित्रे प्रकल्प लेखनात मुद्रांकित केली तर प्रकल्प अभ्यासाला वास्तवाचे रूप प्राप्त होते.

### ४आ.४.९ प्रकल्पाचे विशेष/निष्कर्ष

प्रकल्प लेखनातील शेवटचा मुद्दा हा प्रकल्पाच्या अभ्यासातून हाती आलेल्या निष्कर्षांची मांडणी करणे. संशोधनशास्त्रात निष्कर्षांना महत्त्वाचे स्थान असते. संशोधनाअंती अभ्यासक जेव्हा विशिष्ट गृहितांपर्यंत येतो, त्यांची मांडणी करणारे संक्षिप्त विचार निष्कर्षात येतात तो एक प्रकारे प्रकल्पाचा सारच असतो. त्यांना प्रकल्पाचे विशेष असेही म्हणतात.

### ४आ.४.१० प्रकल्प अहवाल

प्रकल्पातील शेवटचा महत्त्वाचा भाग म्हणजे प्रकल्प अहवाल लेखन होय. यामध्ये प्रकल्पाचे संपूर्ण तपशील आलेले असतात. प्रकल्प अहवाल हा एक महत्त्वाचा दस्तऐवज असतो. त्यामध्ये प्रकल्पाची सर्व माहिती आलेली असते. सामान्यत: प्रकल्पाच्या कार्याचे मूल्यमापन, उद्दिष्टांची पूर्तता, प्रकल्पाचा मागोवा, प्रकल्पाची सर्व क्रिया-प्रक्रिया आणि इतर सर्व गोष्टींची माहिती या अहवालात असते. त्यामुळे प्रकल्प लेखनपद्धतीमध्ये प्रकल्प अहवालाला अतिशय महत्त्वाचे स्थान आहे. प्रकल्प सादर करताना हा अहवाल सादर केला जातो. तो जमा करणे बंधनकारक असते. याला प्रकल्पाचे सार असेही म्हणता येईल. यातून प्रकल्पाची व्याप्ती आणि महत्त्व अधोरखित होते.

## ४आ.५ समारोप

प्रकल्प लेखनपद्धती हा संशोधनशास्त्रातील एक महत्त्वाचा भाग आहे. झीना ओ' लिअरी यांनी संशोधन प्रकल्पाला आव्हान असे म्हटलेले आहे. यामध्ये विषयाची निवड, प्रकल्पाची उद्दिष्टे निश्चित करणे, पद्धतिशास्त्रानुसार साधनसाहित्याचे आकलन करणे, तर्कसंगत योजना करणे, प्रतिपाद्य विषयाची पद्धतशीर आखणी करणे, आकलन, विश्लेषण करून प्रकल्प सिद्धीस घेऊन जाणे इत्यादी गोष्टी प्रकल्प लेखनात अतिशय महत्त्वाच्या असतात. यासाठी प्रकल्प लेखनपद्धती अभ्यासणे गरजेचे आहे. एकुणात प्रकल्प हा संशोधन पद्धतिशास्त्राचा महत्त्वाचा घटक आहे. त्याचे लेखनशास्त्र संशोधकांना अवगत असणे ही संशोधनाची अट असते. वरील विवेचनात केलेला समग्र विचार यादृष्टीने महत्त्वपूर्ण ठरतो.

## ४आ.६ संदर्भ

१. झीना, ओ' लिअरी : *संशोधन प्रकल्प कसा करावा*, सेग पब्लिकेशन, नवी दिल्ली, २०१४.
२. आगलावे, प्रदीप : *संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे*, विद्या प्रकाशन, नागपूर, २०००.
३. राजाध्यक्ष, मानसी व पाटकर, विवेक : *प्रोजेक्ट डेव्हलपमेंट : सायन्स अँड आर्ट, ज्ञानदा प्रकाशन, वाशिम,* २०२४आ.
४. वरखेडे, रमेश, वरखेडे, मंगला: *संशोधनाचे पद्धतीशास्त्र*, भाषाविकास संशोधन संस्था, कोल्हापूर, २०२२.
५. जोशी, वसंत (संपादक) : *भाषा व साहित्य : संशोधन, खंड पहिला*, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे, १९८१.
६. मालशे, मिलिंद : *प्रयोगकलांसाठी संशोधनपद्धती*, लोकवाङ्मय गृह, मुंबई, २०११.

## ४आ.७ पूरक वाचन

१. दत्ता देशकर : संशोधनपद्धतीची मूलतत्त्वे
२. ग.ह.खरे : संशोधकाचा मित्र
३. डॉ. निलम ताटके : संशोधन करताना
४. रा.ग. जाधव : वाङ्मयीन निबंधलेखन
५. पॅम डेनिकोला, ल्युसिंडा बेकर : संशोधन प्रस्ताव विकसित करणे

## ४आ.८ सरावासाठी प्रश्न

**अ) दीर्घोत्तरी :**

१. प्रकल्प संकल्पना व स्वरूप स्पष्ट करा.
२. प्रकल्पाचे प्रकार स्पष्ट करा.
३. प्रकल्पाची पद्धती विशद करा.
४. प्रकल्पाचे महत्त्व स्पष्ट करा.
५. प्रकल्प लेखनाचे स्वरूप विशद करा.

**ब) लघुत्तरी/टिपा :**

१. प्रकल्प लेखनाची पूर्वतयारी विशद करा.
२. प्रकल्प लेखनासाठी संदर्भवाचन कसे करावे ते लिहा.
३. प्रकल्प लेखनासाठीची कार्यपद्धती स्पष्ट करा.
४. प्रकल्प लेखनाची सुरुवात कशी करावी ते स्पष्ट करा.
५. प्रकल्प लेखनाच्या सादरीकरणाची तत्त्वे विशद करा.

**क) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. प्रकल्प शब्दार्थ लिहा.

२. प्रकल्प म्हणजे काय ?

३. प्रकल्प लेखनपद्धती म्हणजे काय ?

४. प्रकल्प लेखनात निष्कर्ष किती महत्त्वाचे आहेत ?

५. प्रकल्प लेखनाची उद्दिष्टे कशी असावीत ?

✞✞✞✞

# ४इ

## प्रबंधलेखन पद्धती

**घटक रचना :**

४इ.१ उद्देश

४इ.२ प्रस्तावना

४इ.३ प्रबंध: संकल्पना व स्वरूप

- ४इ.३.१ प्रबंध शब्दार्थ
- ४इ.३.२ प्रबंध म्हणजे काय
- ४इ.३.३ प्रबंधाचे स्वरूप
- ४इ.३.४ प्रबंधाची संरचना

४इ.४ प्रबंधलेखन पद्धती

- ४इ.४.१ प्रबंध विषयाची निवड
- ४इ.४.२ वाचनाचे संयोजन
- ४इ.४.३ संदर्भशोध
- ४इ.४.४ टिपणे
- ४इ.४.५ संदर्भ साधने
- ४इ.४.६ संदर्भ प्रक्रिया
- ४इ.४.७ प्रबंध विषयाची मांडणी
- ४इ.४.८ निष्कर्ष
- ४इ.४.९ टिपा / तळटिपा व संदर्भ नोंदी
- ४इ.४.१० सूची

४इ.५ समारोप

४इ.६ संदर्भ

४इ.७ पूरक वाचन

४इ.८ सरावासाठी प्रश्न

---

### ४इ.१ उद्देश

---

१. प्रबंधाचे स्वरूप लक्षात घेणे.
२. प्रबंधलेखनाची प्रक्रिया समजून घेणे.

३. प्रबंधलेखनातील विविध पद्धती विचारात घेणे.
४. प्रबंधाच्या लेखनाचे उपयोजन लक्षात घेणे.
५. प्रबंधाचे लेखनशास्त्र आकलनात घेणे.

## ४इ.२ प्रस्तावना

संशोधन क्षेत्रातील महत्त्वाचा भाग म्हणजे प्रबंधलेखन होय. शोधलेख, शोधप्रकल्प यापेक्षाही प्रबंध हा व्यापक घटक असतो. प्रबंधलेखन हे संशोधनातील अंतिम कार्य आहे. यासाठी संशोधनशास्त्राचा उत्तम अभ्यास असणे गरजेचे असते. किंबहुना प्रबंधलेखनाची विविध तंत्रे व पद्धती संशोधकाने प्रथमत: आत्मसात केलेली असावी लागतात. तेव्हाच संशोधनाचे अंतिम रूप प्रबंधाच्या माध्यमातून साकार करता येते. विद्यापीठीय परिप्रेक्ष्यात प्रबंध लिहिणे ही पीएच.डी पदवी मिळविण्यासाठीची महत्त्वाची पायरी असते. त्यासाठीची विविध प्रक्रिया पूर्ण कराव्या लागतात. प्रशासकीय पातळीपेक्षा संशोधनात्मक पातळीवरून संशोधनाचे काम पूर्णत्वास घेऊन जाणे, त्याची प्रबंधरूपात बांधणी करणे, संशोधनशास्त्रातील तत्त्वान्वये प्रबंध सादर करणे या गोष्टी अतिशय महत्त्वाच्या असतात. एकूणच प्रबंधलेखन पद्धती हा संशोधनशास्त्रातील अंतिमत: महत्त्वाचा भाग ठरतो. या घटकामध्ये प्रबंधलेखनाचा संकल्पनात्मक आणि उपयोजनात्मक विचार करायचा आहे. परंतु तद्पूर्वी प्रबंध म्हणजे काय हे समजून घेऊन त्याचे स्वरूप लक्षात घेणे अगत्याचे ठरेल.

## ४इ.३ प्रबंध: संकल्पना व स्वरूप

संशोधनशास्त्रात प्रबंध हा महत्त्वाचा घटक आहे. ते एक संशोधनाचे प्रारूप आहे. त्यामध्ये शोधविषयाची मांडणी केलेली असते. प्रबंधाची मांडणी करत असताना त्याच्या लेखनाचे तंत्र अवगत करून घेणे अगत्याचे असते. त्यामध्ये संशोधनशास्त्रामध्ये सांगितलेल्या तत्त्वांधारे याची मांडणी केली जाते. ही तत्त्वे शोधविषय, गृहितके, शोधपद्धती, विषयविवेचन, मूल्यमापन, निष्कर्ष आणि संदर्भसूची अशा स्वरूपाची असतात. प्रबंधलेखनाची एक पद्धती असते. याचा अंगीकार करून प्रबंधलेखन अपेक्षित असते. यासाठी प्रबंधलेखनाची मूलतत्त्वे समजून घेणे गरजेचे ठरते. यासाठी सर्वप्रथम प्रबंध ही संज्ञा मूलभूतपणे लक्षात घेणे क्रमबद्ध ठरेल. यासाठी प्रबंधाची संकल्पना व स्वरूपविचार मूलभूतपणे करणे गरजेचे आहे. संशोधनशास्त्रात प्रबंधाची संकल्पना विस्ताराने दिलेली आहे. त्यामध्ये प्रबंधाचा शब्दार्थ, त्याची संरचना आणि स्वरूपाचा विचार प्राधान्याने केलेला पहावयास मिळतो. याविषयी अनेक अभ्यासकांनी विविध प्रकारचे विवेचन केलेले आहे. ते पुढीलप्रमाणे,

### ४इ.३.१ प्रबंध शब्दार्थ :

प्रबंध या शब्दाला इंग्रजीत Thesis असे म्हणतात. थीसिस हा मूळ ग्रीक शब्द आहे. ज्याचा अर्थ 'काहीतरी मांडणे' असा सांगितला जातो. त्याला हिंदीमध्ये 'शोधप्रबंध' असेही म्हणतात. पीएच.डी. पदवी प्राप्त करण्यासाठी प्रबंधाचे सादरीकरण आवश्यक असते. कोणत्याही संशोधनात एखाद्या विषयाचा मूलगामी शोध घेतला जातो. त्याची बहुआयामी चिकित्सा करून काही निष्कर्ष मांडले जातात. त्याप्रमाणेच प्रबंधामध्येसुद्धा एका व्यापक विषयाची विस्तृत सूत्रपद्धतीने मांडणी केली जाते. परंतु याचे स्वरूप प्रबंधिका आणि शोध

प्रकल्पापेक्षा दीर्घ असते. विस्तृत शब्दरचना, अनेक पृष्ठ संख्या आणि विविधांगी संदर्भांच्या आधारे प्रबंध लिहिला जातो.

प्रबंध ही संज्ञा स्पष्ट करताना हेमंत विष्णू इनामदार लिहितात, लेख (आर्टिकल), निबंध (एसे), शोधनिबंध (रिसर्च पेपर), दीर्घ निबंध (डिझर्टेशन), ग्रंथ (ट्रीटाइज) व प्रबंध (थिसिस) इत्यादी संज्ञा गद्यलेखनातील सुसूत्रता, सुसंगतता, शिस्तबद्धता, अभिजातता व भाष्यपरता या गुणविशेषांच्या चढत्या-वाढत्या अपेक्षा व्यक्त करणाऱ्या आहेत. यापैकी प्रबंध हा लेखनप्रकार काही विशेष गुणवैशिष्ट्यांनी युक्त असावा लागतो. (भाषा व साहित्य संशोधन, खंड-पहिला, पृ.४१५) एकूणच प्रबंध ही संकल्पना संशोधनशास्त्रात महत्त्वाची आहे. तिला संशोधनात व्यापक अर्थाने विचारात घेतले जाते.

### ४इ.३.२ प्रबंध म्हणजे काय?

प्रबंध हा संशोधकीय लेखनाचा एक महत्त्वाचा प्रकार आहे. संशोधनशास्त्रात त्याची विशिष्ट व्याख्या सांगितलेली आहे. प्रबंध हा शैक्षणिक क्षेत्राशी निगडित असून त्याचे सादरीकरण पीएच.डी. पदवी मिळविण्यासाठी संशोधक करतो. संशोधनशास्त्रात प्रबंध ही संकल्पना स्पष्ट करताना त्याच्या व्याख्या दिलेल्या आहेत. त्यातील काही व्याख्यांचा विचार इथे करता येईल.

१. प्रबंध हा एखाद्या विषयाचा सर्वांगीण अभ्यास करून लिहिलेला व पी.एच.डी. ही पदवी मिळवण्यासाठी सादर केलेला प्रदीर्घ लेख होय.
२. प्रबंध हा मूलत: एक लांबलचक आणि तपशीलवार संशोधन प्रकल्प असतो, जो डॉक्टरेट पदवी मिळविण्यासाठी आवश्यक म्हणून लिहिला जातो. ही एक विशिष्ट विषयाची सर्वसमावेशक परीक्षा आहे आणि त्याचा उद्देश विद्यार्थ्यांचे त्यांच्या अभ्यासाच्या क्षेत्रातील प्रभुत्व आणि मूळ संशोधन करण्याची क्षमता प्रदर्शित करणे हा आहे.
३. प्रबंध हा लेखकाने संशोधन आणि निष्कर्ष सादर करणारा, शैक्षणिक पदवी किंवा व्यावसायिक पात्रतेसाठी उमेदवारीच्या समर्थनार्थ सादर केलेला दस्तऐवज आहे.

संशोधनशास्त्रात एखाद्या विषयाचा शोध घेत जाणे ही क्रिया अतिशय महत्त्वाची असते. ते एक सूत्र असते. त्या सूत्राची गुंफन करत जात असताना या संदर्भातील पूर्वसंचिताचा शोध घेणेसुद्धा महत्त्वाचे असते. म्हणूनच वरील व्याख्यांचा विचार करता प्रबंध म्हणजे काय? या प्रश्नाचे उत्तर आपणास मिळते.

### ४इ.३.३ प्रबंधाचे स्वरूप :

प्रबंध हा एक संशोधनशास्त्रीय आविष्कार असतो. त्याचे स्वरूप साचेबद्ध असते. याविषयी हेमंत विष्णू इनामदार यांनी अत्यंत मार्मिकपणे विवेचन केलेले आहे. ते लिहितात, ज्या विषयात काही मौलिक स्वरूपाच्या संशोधनाला वाव आहे, असा विषय निवडून त्यावर प्रबंध लिहिला जातो. प्रबंधातून जे संशोधन अपेक्षित असते, ते वस्तुनिष्ठ (ऑब्जेक्टिव्ह) पद्धतीने व विगमन (इंडक्लिव्ह) पद्धतीने झाले पाहिजे. घटनांचा शोध, त्यांचे वर्गीकरण व त्यातून सिद्धांत स्थापना या शास्त्रीय संशोधनाच्या तीन पायऱ्या त्यात असल्या पाहिजेत.

या पायऱ्यांवर चढण्यापूर्वी, आपल्या संशोधनाचे प्रयोजन कोणते, या प्रश्नाचा विचार प्रबंधाच्या अभ्यासकाने करणे आवश्यक आहे. हा विचार संशोधन–पद्धतीत अभ्युपगमन किंवा सिद्धांत कल्पना (हायपॉथिसिस) या संज्ञेने ओळखला जातो. निरीक्षिलेल्या घटनांचे स्पष्टीकरण करण्यासाठी मांडलेली व तात्पुरती गृहीत धरलेली कल्पना म्हणजे सिद्धांतकल्पना किंवा अभ्युपगमन होय. संशोधनासाठी निवडलेला विषय संशोधनपात्र आहे की नाही, हे ठरविण्यासाठी त्याचे अभ्युपगमन कोणते, ते अभ्यासकाने पाहिले पाहिजे. ते पाहिल्यानंतर संशोधन पद्धती कितपत शास्त्रशुद्ध आहे, तसेच अशा पद्धतीनुसार फलित होणारे सिद्धांत हे प्रारंभी प्रयोजिलेल्या उद्दिष्टाला कितपत अनुकूल ठरतात, याचाही पडताळा केला पाहिजे.

प्रबंधाच्या बाबतीत प्रत्यक्ष सिद्धांतापेक्षाही सिद्धांत स्थापनेच्या पद्धतीला, म्हणजेच विगमन पद्धतीला अधिक महत्त्व आहे. आधी प्रयोजिलेले अभ्युपगमन सिद्ध न होता, शास्त्रीय पद्धतीने प्रसंगी काहीसा वेगळा सिद्धांत फलित झाला, तरी त्या संशोधनाचे मूल्य कमी होत नाही. किंबहुना शास्त्रीय पद्धतीचे अनुकरण हेच प्रबंधलेखनाचे खरे प्रयोजन असते. या पद्धतीवरून क्रमप्राप्त झालेला सिद्धांत हा अभ्यासकाने अपरिहार्यपणे स्वीकारावा लागतो. (भाषा व साहित्य संशोधन खंड पहिला, पृ.४१६) प्रबंधाचे हे स्वरूप लक्षात घेता प्रबंधलेखन ही गोष्ट अतिशय महत्त्वाची असल्याचे आपल्या लक्षात येते.

### ४इ.३.४ प्रबंधाची संरचना :

संशोधनशास्त्रात प्रबंधाची संरचना दिलेली आहे. त्यामध्ये मुख्यत: तीन भाग सांगितले जातात. डॉ. सदा कऱ्हाडे यांनी 'संशोधन : सिद्धांत आणि पद्धती' या ग्रंथामध्ये प्रबंधलेखनाची शिस्त म्हणून तीन भागांचे विवेचन दिलेले आहे. त्यामध्ये १.उपक्रम, २.प्रबंधांग, ३.उपसंहार यांचा समावेश होतो. (पृ.१२६) कोणत्याही प्रबंधाची संरचना या तीन घटकांच्या आधारे मांडता येते. याची मुद्यान्वये मांडणी खालीलप्रमाणे करता येईल. उपक्रम हा प्रबंधाचा आरंभ असतो. प्रास्ताविक, विषयप्रवेश इत्यादींचा समावेश उपक्रमात होतो. विवेचनाविषयीचा प्रस्ताव त्यात मांडलेला असतो. विवेचनाची दिशा निश्चित केलेली असते. म्हणून विषयविवेचनात प्रवेश केल्यासारखेच असते. उपक्रमात प्रामुख्याने चार मुद्दे स्पष्टपणे नमूद केले जावेत.

१. संशोधनाचा अथवा संशोधनावर आधारलेल्या प्रबंधाचा विषय : विषयाची निवड का व कशी केली अथवा विषयाच्या निवडीमागील हेतू, विषयाची व्याप्ती आणि मर्यादा.

२. संशोधन विषयाच्या विवेचनामागची भूमिका अथवा दृष्टिकोन आणि हाताळणी विषय निवेदन, संबंधित विषयावर आतापर्यंत झालेले संशोधन व लेखन, त्यापेक्षा प्रबंधात वेगळे अथवा नव्याने काय सांगितले जाणार याचा निर्देश, नव्याने उपलब्ध झालेल्या माहितीच्या आधारे अथवा तत्त्वांच्या आणि सिद्धांतांच्या अनुषंगाने पुनर्विचार, पुनर्विवेचन, पुनर्मूल्यांकन करण्याचा प्रयत्न असेल तर तसा स्पष्टोल्लेख.

३. संशोधनासाठी कोणती साधने वापरली, साधनांची विश्वसनीयता आणि प्रमाणभूतता कशी पारखून घेतली, संशोधनाच्या कोणत्या पद्धतीचे उपयोजन आपण करणार आहोत तेही उपक्रमात नमूद केले पाहिजे.

४. प्रबंधाची रूपरेषा अर्थात प्रबंधविषयाचे प्रकरणश: विवेचन करावयाचे असल्यामुळे प्रबंधविषयाची विभागणी प्रास्ताविकात दर्शविली पाहिजे.

एकुणात प्रबंधाची रचना साचेबद्ध असून प्रबंध लेखनामध्ये या संरचनेचा विचार केल्याशिवाय प्रबंधाची पूर्णता यशस्वी होणार नाही. म्हणून संशोधनशास्त्रात प्रबंधाची संरचना महत्त्वाची असते.

## ४इ.४ प्रबंधलेखन पद्धती

प्रबंध संकल्पना व स्वरूप लक्षात घेतल्यानंतर प्रबंधाची लेखनपद्धती विचारात घेणे अगत्याचे ठरेल. स.गं.मालशे यांनी लिहिलेले आणि मिलिंद मालशे यांनी संपादित केलेले 'शोधनिबंधाची लेखनपद्धती' हा ग्रंथ यादृष्टीने अतिशय महत्त्वाचा आहे. यामध्ये अतिशय मूलभूतपणे प्रबंध लेखनपद्धतीची मांडणी केलेली आहे. प्रबंध विषयाची मांडणी, वाचनाचे संयोजन, संदर्भशोध, टिपणे, संदर्भसाधने, संदर्भ प्रक्रिया, संशोधनाची मांडणी, समारोप व निष्कर्ष, टीपा व संदर्भ आणि सूची इत्यादी घटक त्यामध्ये अंतर्भूत आहेत. ही मांडणी प्रबंधलेखनासाठी अत्यावश्यक आहे. प्रस्तुत मुद्दयामध्ये प्रबंध लेखनपद्धतीचा विचार पुढील तत्त्वांच्या आधारे करता येईल.

### ४इ.४.१ प्रबंधविषयाची निवड

प्रबंधलेखनामध्ये पहिला महत्त्वाचा घटक म्हणजे प्रबंध विषयाची योग्य निवड करणे होय. बऱ्याच वेळा विषयाची निवड करताना सजग भान न ठेवल्यामुळे संशोधनकार्य अपूर्ण राहू शकते किंवा ते यशस्वी होऊ शकत नाही. म्हणून संशोधन विषय निवड करताना काळजी घ्यावी लागते. याविषयी स.गं.मालशे यांनी मार्मिक विवेचन केलेले आहे. त्यातील काही महत्त्वाच्या भागांचा विचार आपण खालीलप्रमाणे लक्षात घेऊयात.

पहिला भाग म्हणजे संशोधकाने आपल्या आवडीच्या विषयाची निवड करणे हा महत्त्वाचा भाग सर्वप्रथम असतो. याविषयी स.गं.मालशे लिहितात, अभ्यासकाला आपल्या विषयात मनोमन रस वाटला पाहिजे, आपले कुतूहल जागृत राहील आणि अधिकाधिक खोलवर जाता येईल, असाच विषय निवडला पाहिजे. मार्गदर्शकांनी भलावण केली म्हणून किंवा लोकप्रियतेच्या प्रलोभनाला बळी पडून विषय ठरवू नये. आपली जिज्ञासावृत्ती ज्या विषयाने जागृत केली असेल, असाच विषय हाती घ्यावा. आवडीचा विषय असला की अभ्यासक परिश्रमाने आणि प्रयत्नांचे आव्हान हौसेने स्वीकारतो. (पृ.११) इथे एक गोष्ट आपण लक्षात घ्यायला हवी की, विषय निवड ही निर्णायक असते. ती जर चुकली तर संशोधन कार्यही साध्य करता येत नाही. त्यामुळे विचारपूर्वक आणि अभ्यासपूर्वक विषय निवड करणे गरजेचे असते.

दुसरा भाग विषय निवडीत महत्त्वाचा असतो तो म्हणजे विषयाचा आवाका, त्याची व्याप्ती मर्यादित असायला हवी. अवाढव्य, अतिव्याप्त विषय निवडू नयेत. याविषयी स.गं.मालशे लिहितात, विस्तृत क्षेत्रमर्यादा असणारा विषय बौद्धिकदृष्ट्या एक आव्हान ठरत असला तरी व्यावहारिक भान ठेवून प्रत्यक्ष संशोधन करताना विषयाचा आवाका सीमित करणे आवश्यक असते. संशोधनासाठीचा किती कालावधी उपलब्ध आहे याचे भानही विषय निवड करताना

ठेवावे लागते. कमी सवड असणाऱ्या अभ्यासकांनी मुद्रित साधनांचा पुरेपूर उपयोग करून घेता येईल असा विषय निवडावा. ज्यात आपल्याला फारसे गम्य नाही असा तांत्रिक विषय निवडण्याच्या भरीस पडू नये. विषय चालू काळाशी निगडित असायला हरकत नाही. पण अशा विषयावर संशोधन करून नेमके निष्कर्ष काढणे कठीण असते, तसेच साधनांची वाणवाही असू शकते, याची जाणीव ठेवावी. (पृ.१३) याचा मतितार्थ विषय निवडताना त्याची व्याप्ती निर्धारित करून निवड करणे गरजेचे असते.

तिसरा भाग म्हणजे विषय निवडताना तो सोपा असावा याचा अर्थ तो फुटकळ असता का नये. याची दक्षता संशोधकाने घ्यायला हवी. पूर्वी झालेल्याच विषयाला मोडतोड करून, आदलाबदल करून विषय निवडला जाऊ नये. यातून कोणतेही नवे संशोधन होऊ शकत नाही. विषयाचे स्वरूप अगदीच क्षुद्र वा फुटकळ वा अतिमहत्त्वाकांक्षीही असू नये ही काळजी घेणे गरजेचे असते. असा सल्ला स.गं.मालशे यांनी प्रबंध लेखनाचा विषय निवडताना घ्यावा असे सांगितलेले आहे.

चौथा भाग नव संशोधकांसाठी महत्त्वाचा आहे. याविषयी स.गं.मालशे लिहितात, नवख्या संशोधकाच्या दृष्टीने आणखी एक युक्तीची गोष्ट सांगता येईल. ती म्हणजे जो लेखक वा ग्रंथ विशेष ज्ञात नाही तो अभ्यासार्थ निवडणे. एक तर अशा विषयावर आपणच प्रथम प्रकाश टाकीत असल्याने त्याला आपोआपच एक मौलिकता लाभते. अलक्षित किंवा अज्ञात विषय संशोधनार्थ निवडावा, हे म्हणणेही तारतम्यानेच स्वीकारले पाहिजे. (पृ.१६) इथे एक गोष्ट महत्त्वाची आहे ती म्हणजे सर्वसामान्य संशोधकाने स्वत:च्या आवाक्याचा विचार करूनच विषय निवडणे योग्य ठरते.

पाचवा भाग म्हणजे विभूतिपूजा, भक्तिभाव, प्रचारकी अथवा नकारात्मक दृष्टिकोन विषयनिवडीत टाकणे गरजेचे असते. याविषयी स.गं.मालशे लिहितात, ज्या विषयात आपण तटस्थ राहून विश्लेषण करू शकतो, असाच विषय निवडावा. एखाद्या लेखकाविषयी किंवा विचारप्रणालीविषयी आपल्याला भक्तिभाव वाटत असेल किंवा तुच्छता मनात असेल तर संशोधनविषय म्हणून त्याची निवड करू नये. कारण अभिनिवेशामुळे वा पूर्वग्रहांमुळे आवश्यक ती वस्तुनिष्ठता संशोधनाला लाभू शकत नाही. ज्या विषयासंबंधी आपला दृष्टिकोण सकारात्मक आहे, असाच विषय शक्यतो संशोधनार्थ घ्यावा. (पृ.१७) एकुणात प्रबंधलेखनासाठी विषय निवडताना वरील सर्व भागांचा, मुद्यांचा विचार करणे गरजेचे आहे. या तत्त्वांधारेच विषय निवडल्यास प्रबंधलेखन करणे सुलभ होईल.

### ४इ.४.२ वाचनाचे संयोजन

प्रबंधलेखन करण्यासाठी वाचन हा अतिशय महत्त्वाचा भाग असतो. विषयकेंद्री वाचन करणे त्यामध्ये महत्त्वपूर्ण असते. आपला जो प्रबंधविषय आहे त्या विषयाशी निगडित आणि संदर्भीत ग्रंथ, कोश, लेख आणि इतर साधनांचे वाचन करणे यामध्ये अंतर्भूत होते. यासंदर्भात स.गं.मालशे यांनी म्हटलेले आहे की, आपण ज्या क्षेत्रातील विषय निवडलेला असेल त्या क्षेत्रात आपल्या विषयावर पूर्वी कोणती भर पडलेली आहे हे अवलोकन करणे, ही संशोधनप्रक्रियेमधील पुढची महत्त्वाची पायरी असते. आणि तिच्यासाठी ग्रंथालयासारखे दुसरे साधन नाही. आता हळूहळू संगणकीय महाजाल हेही संशोधनाचे महत्त्वाचे साधन होते आहे आणि कोणत्या ग्रंथालयात कोणती साधने आहेत याची माहितीसुद्धा महाजालावर

मिळू लागली आहे. दिशाहीन वाचन करीत गेल्यास काळ आणि श्रम निष्कारण वाया जातात. हे ध्यानात घेऊन ग्रंथसूची, ज्ञानकोश, चरित्रकोश यांसारख्या संकलनात्मक ग्रंथांवरून आपल्या विषयावरची साधने कोणती आहेत याची कल्पना करून घ्यावी. (पृ.२०) प्रबंधलेखन करत असताना मूलभूत ग्रंथांचे वाचन करणे अगत्याचे ठरते. प्रबंध विषय हा काही एककेंद्री असत नाही. त्यात विविध अंतर्गत विषयांची जोड असते. अशावेळी वेगवेगळ्या ज्ञानशाखेतील ग्रंथाचे वाचन करावे लागते. अशावेळी वाचनाचे संयोजन अभ्यासकाला करावेच लागते. अन्यथा वरती म्हटल्याप्रमाणे आपले वाचन अवांतर ठरू शकते. यासाठी अभ्यासकाने काळजी घेऊन प्रबंधलेखन करताना वाचनाचे संयोजन करणे गरजेचे आहे.

### ४इ.४.३ संदर्भशोध

प्रबंधलेखनातील महत्त्वाचा भाग म्हणजे संदर्भ होय. हे संदर्भ अभ्यासकाने वाचनातून मिळवायचे असतात. यासाठी त्याला आपल्या विषयाशी निगडित आणि पुढे लेखनासाठी उपयुक्त ठरतील अशा संदर्भांचा शोध घेणे अगत्याचे असते. हा शोध विविधांगी असतो. बऱ्याच वेळा हे काम अत्यंत जिकीरीचे ठरते. एखादा अखंड ग्रंथ वाचल्यानंतर चार ओळींचा संदर्भ आपल्याला मिळू शकतो. असे असले तरी संशोधनाच्या कार्यात या गोष्टी महत्त्वाच्या ठरतात. स.गं.मालशे यांनी प्रबंधलेखनासाठी ग्रंथालयीन शोध आणि संगणकीय शोध या दोन प्रकारांचा विचार संदर्भशोधामध्ये सांगितलेला आहे. ते लिहितात, ग्रंथालयीन वर्गीकरण पद्धतीची आणि तालिका पद्धतीची तोंडओळख करून घेतल्याने संशोधन कार्य सुलभ होते. सामान्यत: शब्दकोशातील शब्दक्रमाप्रमाणे म्हणजे अकारविल्ह्याप्रमाणे ग्रंथालयीन तालिका तयार केलेल्या असतात. तालिकांतील पुष्ठिकांचे वा कार्डांचे वर्गीकरण तीन वेगवेगळ्या सदरांखाली विभागलेले असतात : १.ग्रंथकाराच्या आडनावातील आद्याक्षराने प्रारंभ होणाऱ्या, २.ग्रंथनामातील पहिल्या शब्दातील आद्याक्षराने प्रारंभ होणाऱ्या, ३. विषयानुसारी. काही ग्रंथालयामध्ये या तिन्हींचा मिळून एकत्र वा संकलित स्वरूपाचा तालिकासंग्रहसुद्धा असतो. (पृ.२१) ग्रंथालय हे संदर्भशोधाचा मुख्य मार्ग असतो. त्यामध्ये ग्रंथाबरोबरच नियतकालिके, वर्तमानपत्रे, कोश, सूची इत्यादी साधने मोठ्या प्रमाणात असतात. प्रबंधलेखनासाठी या साधनांचा शोध सातत्याने घेणे गरजेचे असते.

संशोधनाच्या प्रक्रियेमध्ये संदर्भसाधनांचा शोध या भागामध्ये ज्याप्रमाणे ग्रंथालयीन शोध महत्त्वाचा आहे त्याचप्रमाणे अलीकडच्या काळात संगणकीय शोध हा घटकही अतिशय महत्त्वपूर्ण बनलेला आहे. पारंपरिक हस्तलिखिते किंवा टंकलिखित संदर्भ साधने संगणकावर समाविष्ट करण्यात आलेली आहेत. याचा फायदा आपण घरबसल्या घेऊ शकतो. ई-बुक, ई-मॅगझिन, ई-पेपर, ई-रिसर्चच्या माध्यमातून संदर्भशोध अगदी जलद गतीने व्हायला लागलेला आहे. प्रबंधलेखनामध्ये संगणकाचा वापर करून संदर्भशोधाबरोबरच संदर्भांचे जतन करणे, त्याचे व्यवस्थापन करणे, त्यात बदल करणे, संदर्भांची मांडणी हवी तशी करणे सोपे झालेले आहे. त्यामुळे संगणक हा प्रबंधलेखनातील महत्त्वाचा भाग बनलेला आहे.

## ४इ.४.४ टिपणे



प्रबंधलेखनातील महत्त्वाचा दस्तऐवज म्हणजे टिपणे होय. टिपणांच्या आधारेच संशोधन विषय प्रबंधामध्ये विस्तृतपणे मांडता येतो. किंबहुना विषयविवेचन करताना ही टिपणे सहाय्यभूत ठरतात. त्यामुळे प्रबंधलेखनात टिपणांचा विचार पूर्वीपासून चालत आलेला आहे. अलीकडच्या काळात संगणकावर अशी टिपणे तयार करून ठेवली जातात. त्यांचा वापर सरळपणे प्रबंधलेखनात केला जातो. असे असले तरी संशोधनशास्त्रात आजही हस्तलिखित टिपणांना अतिशय महत्त्वाचे स्थान आहे. स.गं.मालशे यांनी प्रबंधलेखन पद्धतीमध्ये अशा टिपणांच्या नोंदीसाठी **पुठ्ठिका वापराचे तंत्र** अत्यंत प्रभावीपणे विशद केलेले आहे. ते लिहितात, साधनसूचीच्या नोंदी आणि मजकुराची टिपणे वहीत करण्याची पद्धत मराठीतील बहुसंख्य अभ्यासक अवलंबित असतात. ही पद्धत चुकीची आणि अतिशय गैरसोयीची आहे. त्यासाठी पुठ्ठिका वा कार्डे किंवा सुटे कागद उपयोगात आणणे सोयीचे असते. तसेच पुठ्ठिकेवर किंवा सुट्या कागदावर एकच नोंद कटाक्षाने करणे उपयुक्त ठरते. त्यातही सुट्या कागदांपेक्षाही पुठ्ठिकाच अधिक सोयीच्या असतात. त्याची कारणे अशी : पुठ्ठिका जाड असल्याने अधिक टिकतात. त्या हाताळायला सोयीच्या असतात. त्या अधिक काळ वापरता येतात. (पृ.२९) प्रबंधलेखनात पुठ्ठिकांचे महत्त्व आपल्या लक्षात आलेले असेल परंतु याचा वापर कसा करावा हे सुद्धा महत्त्वाचे असते.

प्रबंधलेखनात पुठ्ठिकांचा वापर कसा करावा याविषयी स.गं.मालशे लिहितात, पुठ्ठिका वरचेवर वर्ग कराव्या लागत असल्यामुळे एका पुठ्ठिकेवर माहितीचा एकच घटक नोंदण्याची काळजी घेतली पाहिजे. एखादे टिपण विस्तृत असल्याने ते दोनतीन पुठ्ठिकाही व्यापील. अशावेळी सर्व पुठ्ठिकांना एकच क्रमांक द्यावा पण त्यांचा क्रम दर्शविण्यासाठी अ,ब,क अशी अक्षरे क्रमांकापुढे द्यावीत. कधी माहितीचा एकच घटक हा एखाद्या वाक्यांगाचा किंवा शब्दाचाही बनलेला असेल पण तेवढ्यासाठी एक स्वतंत्र पुठ्ठिका खर्ची टाकणे इष्ट असते. पुठ्ठिका संगणकावरही तयार करता येतात. विशिष्ट प्रकारचा फॉर्म किंवा मजकूर चौकट टेम्प्लेटस् या स्वरूपात संगणकावर तयार करून ठेवता येते. यातील अवतरणेही साठवून ठेवता येतील. निबंध वा प्रबंध यांचे लेखन करताना हे संदर्भस्त्रोत व ही अवतरणे थेट कॉपी-पेस्ट करून वापरता येतील. (पृ.३२) एकूणच प्रबंधलेखनात टिपणे काढत असताना पुठ्ठिकांचा योग्य वापर महत्त्वाचा असतो.

## ४इ.४.५ संदर्भसाधने

प्रबंधलेखन हे विविध संदर्भ साधनांच्या साहाय्याने केले जाते. त्या संदर्भांची जुळणी ग्रंथालय, संगणक इत्यादी माध्यमातून केली जाते. हा सगळा भाग प्रबंधलेखनात महत्त्वाचा असतो. परंतु जी संदर्भसाधने एकत्रित केलेली आहेत त्यांचा दर्जासुद्धा प्रबंधलेखनात विचारात घ्यावा लागतो. साधारणपणे प्रबंधलेखनात जी संदर्भसाधने वापरली जातात त्यांची प्रतवारी अस्सल, दुय्यम आणि तिय्यम साधने अशी केली जाते. बहुतांश प्रबंधलेखन हे दुय्यम आणि तिय्यम साधनांवर होत असल्याचे बोलले जाते. ते वास्तवही नाकारता येत नाही. असे असले तरी काही प्रबंधलेखन हे अव्वल दर्जाच्या अस्सल संदर्भसाधनांच्या माध्यमातून केले जाते. यामध्ये जी संदर्भसाधने वापरली जातात. याविषयी स.गं.मालशे यांनी मार्मिक भाष्य केलेले आहे. ते लिहितात, आपल्या शोधनिबंधाचा भर मूलभूत किंवा

अस्सल साधनांवर असला पाहिजे. आपण जितके मुळाशी जाऊ, तितका आपल्या माहितीचा अस्सलपणा, अधिकृतता आणि विश्वसनीयता वाढत जाईल. विश्वसनीयतेच्या दृष्टीने साधनांची उतरती क्रमवारी पुढीलप्रमाणे मानता येईल. १.प्रत्यक्ष प्रयोगाने सिद्ध केलेली साधने (साहित्यसंशोधनात अशी साधने प्राय: नसतात.) २.हस्तलिखित दुर्मीळ साधने : शासनाच्या पुरातत्त्व विभागातील अस्सल लेख, शासकीय किंवा तत्सम प्रतिवृत्ते. ३.उच्च पदवीसाठी साधार रीतीने लिहिलेले प्रबंध, संशोधनपद्धतीस अनुसरून लिहिलेले शोधनिबंध, विद्यापीठाची किंवा संशोधनसंस्थांची नियतकालिके इ. ४ पत्रव्यवहार, दैनंदिन्या, आत्मचरित्रे. ५.प्रश्नावल्या पाठवून किंवा प्रत्यक्ष मुलाखती घेऊन मिळविलेली माहिती. ६.तोंडी, ऐकीव किंवा संकलनात्मक ग्रंथातील माहिती. ७.कला किंवा साहित्यक्षेत्रातील सर्जनशील आविष्कारातून अनुमानित होणारी माहिती. ८.समकालीन नियतकालिकांतील माहिती. (पृ.३३) संदर्भसाधने एकत्रित करताना सजगता अतिशय महत्त्वाची असते. जी वरील मुद्यांच्या आधारे आपणास विचारात घेता येईल.

संदर्भसाधनाची प्रमाणभूतता पारखून घेणे गरजेचे असते. एखाद्या विशिष्ट ग्रंथामधील विधानांवर आंधळा विश्वास ठेवून चालत नाही. त्यासाठी या ग्रंथाची विश्वसनीयता अतिशय महत्त्वाची असते. ग्रंथांची प्रमाणभूतता पारखताना कोणत्या गोष्टी ध्यानात घ्यायला हव्यात याविषयी स.गं.मालशे यांनी काही तत्त्वे सांगितलेली आहेत. ते लिहितात, विश्वसनीयता, विधान पद्धती, आद्ययावतपणा, अधिकृतता, व्याप्ती आणि आवाका, शैली आणि मांडणी यांचा सच्चेपणा, प्रचारकी वा व्यासंगी स्वरूप, संदर्भयुक्तता, आकृत्या, कोष्टके, आलेख यांचे उपयोजन, लेखकाची पात्रता आणि प्रकाशनसंस्थेचा दर्जा (पृ.३४) या सर्व गोष्टी संदर्भसाधनांचे नियोजन करण्यासाठी अतिशय महत्त्वाचे आहेत. याचा विचार प्रबंधलेखनात करावा लागतो.

### ४इ.४.६ संदर्भप्रक्रिया

प्रबंधलेखनात संदर्भप्रक्रिया हा घटक अतिशय महत्त्वाचा आहे. त्यामध्ये अवतरणे व त्यांची नोंद, टिपा/तळटिपा, संदर्भक्रम, तत्रैव आणि उनि, संदर्भसूची, सामाजिक व इतर विज्ञानांमधील पद्धती, इंटरनेटवरील साधनांचे संदर्भ अशा विविध मुद्दांचा समावेश होतो. या मुद्यांची विस्तृत मांडणी स.गं.मालशे यांनी आपल्या 'शोधप्रबंधाची लेखनपद्धती' या ग्रंथामध्ये केलेली आहे. यातील काही मुद्यांचा विचार करता येईल.

प्रबंधलेखनात अवतरणे देत असताना तारतम्य बाळगणे आवश्यक आहे. अनावश्यक ठिकाणी अवतरणे देणे, अयोग्य पद्धतीने देणे, गैरलागू असताना ती देणे या गोष्टी टाळणे गरजेचे असते. अवतरणे कुठे द्यावीत याविषयी स.गं.मालशे लिहितात, अवतरणातील मुद्दा महत्त्वाचा असल्यास, त्यातील मुद्दयांचे खंडण करावयाचे असल्यास, त्यातील विधान शंकास्पद असल्यास, त्यात रूढ मताहून वेगळे आणि लक्षणीय मत मांडलेले असल्यास, आपणास मांडावयाचे मत नेमक्या शब्दात आणि खास शैलीत मांडलेले असल्यास अवतरणे द्यावीत. (पृ.३८) अन्यथा प्रबंधलेखनात अवतरणे वापरू नयेत. टिपा/तळटिपा या देण्याची पद्धती प्रबंधलेखनात महत्त्वाची असते. याविषयी पुढे विस्ताराने चर्चा करता येईल. इथे एवढाच मुद्दा लक्षात घेऊयात की, प्रबंधलेखनात तळटिपा या लेखनाला संदर्भमूल्य प्राप्त करून देतात. याचप्रमाणे संदर्भ देण्याची पद्धतीसुद्धा प्रबंधलेखनात विशिष्ट प्रकाराची असते.

शेवटी इंटरनेटवरील साधनांचा वापर संदर्भात घेतला जातो. या सर्व गोष्टी संदर्भप्रक्रियेत महत्त्वाच्या आहेत.

### ४इ.४.७ प्रबंधविषयाची मांडणी

प्रबंधलेखनातील मुख्य भाग म्हणजे प्रबंधविषयाची मांडणी होय. हा प्रबंधाचा गाभा असतो असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. प्रबंधविषयाची मांडणी करणे हे संशोधकासमोरी आव्हान असते. वाचन, संदर्भशोध झाल्यानंतर प्रबंधाची प्रकरणनिहाय मांडणी येते. इथे संशोधनशास्त्रातील प्रबंधलेखन पद्धतीचा वापर करावा लागतो. स.गं.मालशे यांनी संशोधनाची मांडणी करताना पुढीलप्रकारे विवेचन केलेले आहे. ते लिहितात, शोधनिबंधाचा वा प्रबंधाचा उपोद्घात आणि उपसंहार थोडक्यात पण सुस्पष्ट असा असला पाहिजे. प्रबंधाची विभागणी यथायोग्य प्रकरणांत केलेली असावी. प्रकरणांना अन्वर्थक शीर्षके द्यावीत.

१. **मुखपृष्ठ**
२. **प्रास्ताविक :** हे शक्य तितके संक्षिप्त असावे. त्यात पुढील विषय यावेत. अ) विषयाचे कुतूहल कसे निर्माण झाले? आ) नवीन सिद्धांत कोणता मांडला? इ) मूलभूत साधनांविषयी काही खास उल्लेख ई) विषयविस्ताराची रूपरेषा उ) ऋणनिर्देश.
३. **विषय अनुक्रमणिका :** प्रबंधातील सर्व प्रकरणांची, त्यातील पोटमथळ्यांसह आणि पृष्ठांकांसह नोंद करावी. शिवाय परिशिष्टे, विविध प्रकारच्या दर्शिका, संदर्भसूची यांचीही पृष्ठांकांसह नोंद करावी.
४. **संक्षेपसूची :** वारंवार पुनरुक्ती टाळावी म्हणून ज्या संदर्भग्रंथासाठी संक्षेपाक्षरे योजलेली असतील, त्यांचे स्पष्टीकरण या सूचीत यावे, तसेच कंसादी चिन्हांचे स्पष्टीकरण करावे.
५. **उपोदघात :** काही निबंधात औपचारिक प्रस्तावना आवश्यक असेल, काहींत एकदम विषयप्रवेश करता येईल. हे प्रकरण आटोपशीर असावे.
६. **प्रत्यक्ष प्रबंधाचा गाभा** : याची प्रकरणे आणि उपविभाग नेमके असावे. शीर्षके आणि उपशीर्षके आशय स्पष्ट करणारी असावीत. आलंकारिक नसावी.
७. **उपसंहार** : यात मागील प्रकरणांचा सारांश एकत्र देण्याची पद्धती आहे. परंतु प्रकरणांच्या उपसंहारात सारांश येऊन गेलेला असेल, तर तो पुन्हा देण्यात स्वारस्य नसते. तेव्हा यात सर्व धागेदोरे एकत्र करण्याचा प्रयत्न करून विचारमंथनाचे नवनीत देण्याचा प्रयत्न करावा.
८. **परिशिष्टे :** यात परिशिष्टांनाही आशय स्पष्ट करणारी शीर्षके असावी. कालपट, सनावळ्या, वंशवृक्ष, यांच्या जंत्रीसाठी किंवा काही प्रदीर्घ मूलभूत साधने देण्यासाठी परिशिष्टांचा उपयोग केला जातो. (पृ.५६)

वरील सर्व मुद्दे प्रबंधलेखनात महत्त्वाचे आहेत. विशेषत: प्रबंध मांडणीत भाषाशैली अतिशय महत्त्वाची असते. त्यामध्ये अचूकपणा, नेमकेपणा, स्पष्टपणा आणि अल्पाक्षरत्व असावे लागते. अतिशयोक्तीपणा, दुर्बोधता, संदिग्धता, शब्दबंबाळपणा, उपरोधकता इत्यादी गोष्टी प्रबंधलेखनात कटाक्षाने टाळायच्या असतात. प्रबंधलेखन हे वस्तुनिष्ठ, तर्कसंगत आणि

चिंतनशीलदृष्ट्या समतोल राखणारे असले पाहिजे. तरच त्याची मांडणी संशोधनमूल्य असणारी ठरू शकते. एकुणात वरील सर्व घटकांची मांडणी प्रबंधलेखनामध्ये महत्त्वाची असून याआधारे केलेले संशोधन निश्चित मूलभूत स्वरूपाचे ठरू शकते.

### ४इ.४.८ निष्कर्ष

प्रबंधलेखनात शेवटचा भाग म्हणजे निष्कर्ष होय. यामध्ये संशोधक प्रबंधामध्ये केलेल्या मांडणीची निष्कर्षात्मक मांडणी करत असतो. बऱ्याच वेळा प्रकरणाच्या शेवटी निष्कर्ष दिले जातात. परंतु प्रबंधाच्या उपसंहार या भागामध्ये समग्र प्रबंधाचे निष्कर्ष एकत्रित देण्याची पद्धती असते. त्याची संख्या किती असावी याविषयी काही संकेत नाहीत. तशीलसुद्धा क्रमबद्धपणे निष्कर्ष देणे अगत्याचे ठरते. प्रबंधाचे निष्कर्ष हे संक्षिप्त रूपात असावेत. त्यामध्ये विधानात्मकता असावी. फक्त धाडसी विधाने करू नयेत. बऱ्याच वेळा संशोधक अलौकिक असे काही मांडण्याच्या अविर्भावात काही निष्कर्ष मांडतात. परंतु त्याला सबळ पुरावे असणे गरजेचे असते. निष्कर्ष मांडत असताना त्याला याठिकाणी काही पुरावे देण्याची गरज नाही. कारण त्याचे संदर्भ विवेचनात दिलेले असतात. त्यामुळे निष्कर्ष मांडताना संशोधकाने तारतम्यभाव राखणे गरजेचे आहे.

### ४इ.४.९ टिपा / तळटिपा व संदर्भनोंदी

प्रबंधलेखन झाल्यानंतर काही तांत्रिक भाग शेवटी येतात. त्यामध्ये टिपा व संदर्भ देण्याची पद्धती अंतर्भूत असते. या टिपा व तळटिपा आणि संदर्भ यांची मांडणी कशी करावी याविषयी स. गं. मालशे यांनी काही नियम सांगितलेले आहेत. त्या नियमांचा विचार पुढीलप्रमाणे लक्षात घेता येईल.

१. टिपा प्रबंधाच्या शेवटी संदर्भ सूचीच्या आधी दिल्या जातात. तर तळटिपा या त्या त्या पृष्ठांच्या तळाला दिल्या जातात.

२. प्रबंधामध्ये टिपा देण्याचे दोन पर्याय असतात. एक म्हणजे प्रत्येक प्रकरणाच्या शेवटी त्या त्या प्रकरणाच्या टिपा देणे, तर दुसरा संपूर्ण प्रबंधाच्या शेवटी प्रकरणवार टिपा देणे.

३. टिपा वा तळटिपा देण्यासंबंधी अनेक पद्धती असतात. या बाबतीतली पहिली शर्त ही की त्या सर्वत्र एकरूप असाव्यात. म्हणजे प्रबंधात त्या एकाच पद्धतीला अनुसरून द्याव्यात. तसेच त्या सुटसुटीत असाव्यात. अन्य लेखकाचे शब्द जसेच्या तसे उदधृत केल्यासच टिपा द्यावयाच्या, असे नसून दुसऱ्याचे मत साररूपाने किंवा स्वत:च्या शब्दांत दिलेले असल्यासही टिपा दिल्या पाहिजेत.

४. एकाच साधनावरून संकलित केलेली माहिती परिच्छेदरूपाने दिलेली असल्यास शेवटी एक तळटीप द्यावी. पार्श्वभूमीदाखल दिलेली साधी माहिती किंवा सुप्रसिद्ध ऐतिहासिक घटना या बाबतीत तळटीप देण्याची गरज नाही.

५. प्रबंधाच्या एखाद्या प्रकणात संशोधकाने केवळ संहितेचे प्रथमच पृथक्करण करून स्वत:चेच सिद्धांत मांडलेले असतील, तर त्यात एकही टीप न येणे शक्य असते.

६. एखादा ग्रंथातील मजकुराचा जेव्हा प्रथमोल्लेख येतो, तेव्हा तळटिपेत संदर्भविषयक माहिती संपूर्णपणे द्यावी लागते. त्यामध्ये ग्रंथकारनाम, ग्रंथनाम, प्रकाशनविषयक माहिती, पृष्ठांक इ. चा समावेश करावा.

७. एकाच साधनाचा संदर्भ जेव्हा लागोपाठ येतो, तेव्हा 'तत्रैव' हा अधोरेखित शब्द योजावा आणि पृष्ठांक द्यावा. यासाठी पूर्वी 'कित्ता' असा शब्द योजीत असत. तसेच एखाद्या साधनाचा संदर्भ एकदा पूर्ण येऊन गेल्यानंतर मध्ये इतर साधनांचे संदर्भ येऊन पुनश्च त्या साधनग्रंथाचा संदर्भ आल्यास ग्रंथकारनाम देऊन 'उनि' (उपरिनिर्दिष्ट) हा संक्षेप योजावा व पृष्ठांक द्यावा.

८. प्रबंधाच्या प्रकरणातील तळटिपा आणि शेवटी जोडण्याची साधनसूची किंवा संदर्भसूची यात परस्परपूरकता असते. तळटिपा आधारनिर्देशासाठी असतात तर संदर्भसूचीचा हेतू साधनविषयक सर्व माहिती पुरवण्याचा असतो. तळटिपेतील नोंद आणि संदर्भसूचीतील नोंद यातला एक ठळक फरक म्हणजे तळटिपेत ग्रंथकाराच्या आद्याक्षरांनी किंवा नावाने प्रारंभ होतो, तर संदर्भसूचीत आडनावाने प्रारंभ होतो.

९. आधुनिक काळात संदर्भसाधनांच्या नोंदीच्या विविध पद्धती व्यावसायिक व संशोधनात्मक संस्थानी तयार केलेल्या आहे. त्यामध्ये मॉडर्न लँग्विज असोसिएशन ऑफ अमेरिका या संस्थेने निश्चित केलेले लेखन-संकेत एम.एल.ए. स्टाईल आणि हँडबुक फॉर रायटर्झ ऑफ रिसर्च पेपर्स यांच्या रूपात उपलब्ध आहेत. साहित्य, कला व इतर मानव्यविद्या या क्षेत्रामधील संशोधनाच्या प्रकाशनासाठी आंतरराष्ट्रीय पातळीवर हे संकेत मोठ्या प्रमाणात वापरले जातात. याबरोबरच ए.पी.ए. संदर्भपद्धत वा लेखन-संकेत सद्या सामाजिकशास्त्रात वापरली जाताना दिसते.

१०. इंटरनेटवरील संदर्भसाधनांच्या नोंदी अलीकडे प्रबंधलेखनात घेतल्या जातात. त्यांना संशोधनमान्यता आहे. इथे वरील प्रकारेच नोंद लिहिली जाते. परंतु त्यामध्ये इंटरनेटवर ती नोंद कधी आणि कोणत्या संकेतस्थानावरून घेतली याची स्पष्ट नोंद येथे करावी लागते. याला संगणकीय भाषेत यू. आर. एल. (युनिव्हर्सल किंवा युनिफॉर्म रिसोर्स लोकेटर) असे म्हणतात. उदा. www.worldmarathi.com/kavit/index अशी नोंद घ्यावी लागते. (पृ.३९-५४)

एकूणच प्रबंधलेखनात टिपा/तळटिपा व संदर्भांच्या नोंदी करणे हे संशोधनशास्त्राच्या पद्धतीनुसार आवश्यक असते. त्याची तत्त्वे प्रबंधलेखनात दिलेली असून ती वरीलप्रमाणे बारकाईने लक्षात ठेवावी लागतात.

### ४इ.४.१० सूची

प्रबंधलेखनातील शेवटचा महत्त्वपूर्ण भाग म्हणजे सूची होय. प्रबंधामध्ये परिशिष्टात विविध सूची दिल्या जातात. त्यामध्ये साधनग्रंथ सूची, संदर्भग्रंथसूची, नामसूची, विषयसूची, संज्ञासूची, परिभाषासूची अशा विविध सूचींचा समावेश होतो. अशा सूचींचे महत्त्व प्रबंधलेखनात अनन्यसाधारण असते. संशोधनशास्त्रातील तत्त्वांच्या आधारे अशा सूची प्रबंधलेखनात मांडणे अत्यावश्यक असते. या सूचींविषयी स.गं.मालशे लिहितात, कोणत्याही विवेचक ग्रंथाच्या शेवटी ग्रंथात आलेल्या विषयांची सूची अकारविल्ह्याने व

पृष्ठांकासह देणे फार उपयुक्त ठरते. अभ्यासकाला कथा –कादंबरीतील निर्देश धुंडाळण्याची वेळ क्वचितच येते, पण प्रबंधातील वा विवेचक ग्रंथांतील विशिष्ट संदर्भ वारंवार पाहावे लागत असतात. मराठीतील अशा ग्रंथांना पुष्कळदा विषयसूची नसतात. त्यामुळे अपेक्षित माहिती मिळविताना वेळ वाया जातो. तेव्हा कोणत्याही विवेचक स्वरूपाच्या ग्रंथाच्या वा प्रबंधाच्या शेवटी विषयांच्या उल्लेखांची सूची देणे आवश्यक मानले पाहिजे. ग्रंथातील विषयोल्लेखांच्या नोंदी असणाऱ्या या सूचीला विषयसूची किंवा दर्शिका (इंडेक्स) म्हणतात. तीत ग्रंथात उल्लेखिलेली व्यक्तिनामे, ग्रंथनामे, स्थलनामे, संस्थानामे, संज्ञा, घटना वा विषय अकारविल्ह्याने पृष्ठांकासह द्यावयाचे असतात. ही सूची संकलित स्वरूपाची किंवा वर्गीकृत (क्लॅसिफाइड) किंवा पृथक्करणात्मक (ॲनलिटिकल) अशी असू शकते. दर्शिकेची प्रकारश: विभागणी ग्रंथाचे स्वरूप व अभ्यासकांच्या अपेक्षा यांना धरून करावी. ग्रंथारंभीची अनुक्रमणिका आणि ही विषयसूची या दोन्ही परस्परपूरक असतात. अनुक्रमणिकेत ग्रंथातील विषय पृष्ठांकांसह तपशीलवार दिलेले असतील, तर विषयसूचीत त्यांची पुनरुक्ती करू नये. विषयसूचीतील नोंद ग्रंथकाराची असेल व ती पोटविभाग पाडून द्यायची असेल, तर ग्रंथकाराच्या आयुष्यातील ठळक घटना आणि त्याचे ग्रंथ यांच्या नोंदी कालानुक्रमे देऊन पृष्ठांक द्यावा. ही नोंद एखाद्या घटनेची असेल तर तिचा प्रारंभ, रचना व स्वरूप, तिची वाढ किंवा पुस्ती-दुरूस्ती आणि सद्य:स्थिती अशा क्रमाने पोटविभाग पाडता येतील. विषयसूचीतील नोंदीसाठी वर संदर्भसूचीच्या संदर्भात सांगितलेली अकारविल्ह्याची पद्धत अंगीकारावी. नोंदीच्या उल्लेखानंतर स्वल्पविराम देऊन पृष्ठांक द्यावा. (पृ. ५५) उदा. केशवसुत, १०, १५, १८, ५५, ३०१ इत्यादी. प्रबंधलेखनातील सूचीचे महत्त्व अनन्यसाधारण असून त्याची पद्धती वरील विवेचनातून आपल्याला अवगत होते. जी प्रबंधलेखन करणाऱ्या संशोधकांसाठी दिशादर्शक ठरणारी आहे.

## ४इ.५ समारोप

संशोधनशास्त्रामध्ये प्रबंधलेखन पद्धती हा एक महत्त्वाचा भाग आहे. त्याची व्याप्ती प्रदीर्घ असून यासाठी अभ्यासकाला प्रचंड कष्ट, परिश्रम घ्यावे लागतात. परंतु जर संशोधकाला संशोधनाचे पद्धतीशास्त्र अवगत असेल तर प्रबंधलेखनाचे कार्य सोपे होते. वास्तविक संशोधन ही एक बौद्धिक प्रक्रिया आहे. त्यामध्ये निष्ठेने कार्य करणे गरजेचे असते. जिज्ञासा, सत्यनिष्ठता, परिश्रमशीलता, चिकाटी याच्या जोडीला संशोधनशास्त्रीय तत्त्वांची प्रगल्भ जाण या गोष्टी अतिशय महत्त्वाच्या असतात. विद्यापीठीय प्रबंधलेखनात विविध टप्पे असतात. त्यामध्ये प्रबंधलेखनाचा टप्पा महत्त्वाचा असतो. तो यशस्वीपणे पूर्ण करण्यासाठी वरील विवेचन महत्त्वाचे ठरणारे आहे.

## ४इ.६ संदर्भ ग्रंथ

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मालशे, स.गं. | : | 'शोधनिबंध लेखनपद्धती', लोकवाङ्मय गृह, मुंबई, १९७५. |
| २. | चुनेकर, सु.रा. (संपादक) | : | 'संशोधन : स्वरूप आणि पद्धती', शिक्षण प्रसारक संस्था, संगमनेर, १९८३. |
| ३. | क्षीरसागर, शकुंतला | : | 'प्रबंधलेखनपद्धती', युनिव्हर्सल प्रकाशन, पुणे, २०१६. |

४इ. जोशी, वसंत (संपादक) : 'भाषा व साहित्य : संशोधन' खंड पहिला, म.सा.परिषद, पुणे, १९८१.

५. शेलार, सुधाकर : 'साहित्यसंशोधन : वाटा आणि वळणे', अक्षरवाङ्मय प्रकाशन,पुणे, २०१९.


## ४इ.७ पूरक वाचन


१. डॉ. उषा देशमुख : 'मराठी संशोधनविद्या'
२. डॉ. रमेश वरखेडे व मंगला वरखेडे : 'संशोधनाचे पद्धतीशास्त्र'
३. डॉ.जयंत वेलणकर : 'प्रबंध कसा लिहावा?'
४. रा.ग. जाधव : 'वाङ्मयीन निबंधलेखन'
५. व. वि. कुलकर्णी : 'मराठी प्रबंध सूची'


## ४इ.८ सरावासाठी प्रश्न

**अ) दीर्घोत्तरी :**

१. प्रबंध संकल्पना स्पष्ट करा.

२. प्रबंधाचे स्वरूप विशद करा.

३. प्रबंधाची संरचना विशद करा.

४. प्रबंधाचे महत्त्व स्पष्ट करा.

५. प्रबंधलेखनाचे स्वरूप विशद करा.

**ब) लघुत्तरी / टिपा :**

१. प्रबंधलेखनाची पूर्वतयारी विशद करा.

२. प्रबंधलेखनासाठी वाचन कसे करावे ते लिहा.

३. प्रबंधलेखनातील संदर्भशोध स्पष्ट करा.

४. प्रबंधाची सुरुवात कशी करावी ते स्पष्ट करा.

५. प्रबंधलेखनाची तत्त्वे विशद करा.

**क) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. प्रबंध शब्दार्थ लिहा.

२. प्रबंध म्हणजे काय?

३. प्रबंधलेखन पद्धती म्हणजे काय?

४. प्रबंधलेखनात निष्कर्ष किती महत्त्वाचे आहेत?

५. प्रबंधातील सूचीमध्ये कोणते घटक येतात?

✞✞✞✞